# लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# विश्वासार्ह माहिती आणि संतुलित विचार लोकसत्ताच्या रूपात थेट आपल्या घरात

**लोकसत्ता घरपोच मिळवण्यासाठी येथे क्लिक करून अर्ज भरा किंवा आजच ८६५७४०७३०१ या क्रमांकावर संपर्क साधा.**

करोनाचा विळखा आणि त्यातून उद्भवलेली टाळेबंदी यामुळे सारे काही झाकोळल्यागत झाले होते. पण तरीही विश्वासार्ह माहिती आणि संतुलित विचार आपल्यापर्यंत गेले दहा महिने लोकसत्ताच्या माध्यमातून पोहोचतच राहिले.

आपण या काळात दररोज पीडीएफ स्वरूपातील पेपर वाचण्याचा आनंद घेतलात. पण आता सर्व काही पूर्वपदावर येत आहे, तसेच लोकसत्ता आता आपल्या पूर्वस्वरूपात सर्वत्र उपलब्ध होत असल्याने येत्या १ फेब्रुवारीपासून पीडीएफ स्वरूपातील पेपर बंद करत आहोत, याची कृपया नोंद घ्यावी.

जाणत्या जनांसाठी | लोकसत्ता लोकमान्य लोकशक्ती

Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

वर्ष ३३, अंक २७८, ५ रुपये, शहर आवृत्ती

चतुरंगसह पृष्ठे १८

पुणे, शनिवार, ३० जानेवारी २०२१

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

तापमान | कमाल ३१.०°सें | किमान १२.७°सें

हवामानाचा अंदाज

आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याची शक्यता.

चतुरंग

दशकाचा सामाजिक लेखाजोखा

हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १००% सूट

आता हिऱ्यांचा दागिना

रू. १०,०००/- पासून उपलब्ध

१४ फेब्रुवारीपर्यंत

* नियम व अटी लागू

पु. ना. गाडगीळ आणि सन्स १८३२

सोने । चांदी । रत्ने

टोल फ्री नं: १८०० २३३ ०८८८

CIN: U36911PN2017PLC173262

पुणे

औंध - ८३८००४४३७१

हॅपी कॉलनी - ९६८९७०२१०२

सातारा रस्ता - ८३८००४४३७०


सिंहगड रस्ता - ९७६५४०९४४५

चिंचवड - ७७७४०१७८७३

भोसरी - ९६८९९१३६३३

शिरूर - ९५४५३३७५५५

नारायणगाव - ७७७४०१७८७४




## आर्थिक पाहणी अहवाल सादर, पुढील वर्षी ११ टक्के वृद्धीची आस

# अर्थउभारीचा आशावादी सूर

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

**करोना आपत्तीला** प्रतिबंध म्हणून दाखविलेल्या तत्परतेचा 'लाभांश' भारतीय अर्थव्यवस्थेला निश्चितच होईल आणि २०२१-२२ या वर्षात सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा दर दमदार ११ टक्क्यांवर झेपावलेला दिसेल, असा आशावादी सूर शुक्रवारी संसदेत मांडलेल्या अर्थसंकल्प-पूर्व पाहणी अहवालाने व्यक्त केला आहे.


अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी शुक्रवारी संसदेपुढे ठेवलेल्या 'आर्थिक पाहणी अहवाल २०२१'ने आगामी दोन वर्षे ही भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी वेगवान विकासाची असतील, असा विश्वास व्यक्त केला. बहुतांश अर्थविश्लेषकाच्या कयासाप्रमाणे, चालू वर्षात वित्तीय तुटीचे प्रमाण वाजवीपेक्षा जास्त राहण्याचे संकेतही या अहवालाने दिले आहेत.

करोना साथीचा परिणाम म्हणून अडखळलेल्या अर्थचक्रामुळे चालू आर्थिक वर्षात सकल राष्ट्रीय उत्पादनांत उणे ७.७ टक्क्यांची घसरण दिसेल, असाही देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार कृष्णमूर्ती वेंकट सुब्रमणियन यांनी तयार केलेल्या आर्थिक पाहणी अहवालाचा होरा आहे. मात्र २०२१-२२मध्ये ११.० टक्क्यांच्या सकारात्मक वाढीची शक्यताही अहवालाने व्यक्त केली आहे. करोना लसीकरणामुळे एकंदर आर्थिक घडामोडी सामान्य पातळीवर येण्यामुळे दिसणारी ही संभाव्य वाढ असल्याचा अहवालाचा होरा आहे. हा पाहणी अहवाल देशाला भक्कम आधार देणाऱ्या करोना योद्ध्यांनाच समर्पित असल्याचे सुब्रमणियन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

करोनासाथीचा फैलाव रोखण्यासाठी लागू केलेल्या टाळेबंदीचे आणि शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असलेल्या नव्या कृषी कायद्यांचे आर्थिक पाहणी अहवालाने जोरदार समर्थन केले आहे. करोना संकटामुळे सेवाक्षेत्र, निर्मितीक्षेत्र, बांधकामक्षेत्राला जबर घाव सोसावे लागले, तर या काळवंडलेल्या वातावरणात कृषीक्षेत्रातील (पान २ वर)

**दृष्टिक्षेपात अहवाल...**

- एप्रिल ते नोव्हेंबर २०२०चा कल पाहता वित्तीय तुटीत लक्षणीय वाढीची शक्यता.
- १७ वर्षांनंतर प्रथमच चालू खात्यावर मोठी वरकड राहण्याची आशा.
- टाळेबंदीमुळे लाखभर लोकांचा जीव वाचला, करोना रुग्णसंख्या ३७ लाखांपर्यंत राखण्यात यश.
- सार्वजनिक आरोग्य सेवांवर खर्चात तिपटीने वाढ आवश्यक.
- शिक्षणक्षेत्रातील विषमतेवर ऑनलाइन शिक्षण हाच उतारा.
- भारताच्या निम्न पतमानांकनात अर्थवास्तव प्रतिबिंबित होत नसल्याची टीका.
- अनुदानात वाढीने नव्हे, तर अर्थवृद्धीवर भर देऊनच दारिद्र्य निर्मूलन शक्य.
- पत गुणवत्ता मूल्यांकनातून बँकांच्या ताळेबंदाचे तातडीने शुद्धीकरण आवश्यक.



> करोना संकटाला देशाने दिलेला धोरणात्मक प्रतिसाद हा अर्थव्यवस्थेतील तात्पुरती घसरण नंतर भरून काढता येईल, पण मानवी जीव गमवावे लागणार नाहीत, या जाणिवेतून प्रेरित होता.
>
> आपण अर्थशास्त्रज्ञ आहोत आणि केवळ अर्थशास्त्रीय अंगाने चर्चा करण्यावर भर देतो, तर अर्थशास्त्र हेच सांगते शेतीविषयक कायद्यांचे फायदेच अनेक आहेत.
>
> - कृष्णमूर्ती वेंकट सुब्रमणियन


■ अग्रलेख ■

**उणे आणि उणे-दुणे...**

## महापालिकेचे ७ हजार ६५० कोटींचे अंदाजपत्रक

### कागदावरच राहण्याची शक्यता अधिक

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** दरवर्षी मिळकतकरातून जास्तीत जास्त १ हजार ३०० कोटींपर्यंतचे उत्पन्न मिळत असतानाही या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करत मिळकतकरातून आगामी आर्थिक वर्षात सुमारे २ हजार ४०० कोटींचे उत्पन्न मिळेल, असे गृहीत धरून महापालिका आयुक्तांनी मांडलेले अंदाजपत्रक उत्पन्नाच्या दृष्टीने प्रत्यक्षात उतरण्याची शक्यता कमी आहे. बांधकाम क्षेत्रात मंदी असताना त्या विभागाकडून सुमारे १ हजार कोटींचे उत्पन्न महापालिके ला मिळण्याबाबतही संदिग्धताच आहे. त्यामुळे आयुक्तांनी सादर केलेले ७ हजार ६५० कोटींचे अंदाजपत्रक कागदावरच राहण्याची शक्यता अधिक आहे. दरम्यान, मिळकतकरामध्ये प्रस्तावित ११ टक्के करवाढ स्थायी समितीकडून फे टाळली जाणार आहे.

महापालिका आयुक्त विक्रम कु मार यांनी आगामी आर्थिक वर्षासाठीचे ७ हजार ६५० कोटींचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केले. या अंदाजपत्रकामध्ये सर्वाधिक उत्पन्न मिळकतकरातून मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. डिसेंबर २०२० पर्यंत महापालिकेला ३ हजार १०७ कोटी रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले आहे. मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी राबविण्यात आलेल्या अभय योजनेमुळे यंदा मिळकत करातून सर्वाधिक १ हजार ३८० कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. त्याखालोखाल वस्तू आणि सेवा करापोटीच्या अनुदानातून डिसेंबर अखेरपर्यंत १ हजार ३७९ कोटी मिळाले आहेत. पाणीपट्टीतून २०५ कोटी, बांधकाम परवानगीतून १५७ कोटी रुपये डिसेंबर अखेरपर्यंत मिळाले आहेत. डिसेंबर अखेरपर्यंत महापालिकेला (पान ३ वर)

> आयुक्तांनी अवास्तव अंदाजपत्रक मांडले आहे. अभय योजना असताना पहिल्या ९ महिन्यात मिळकतकरातून १ हजार कोटी आणि २०० कोटी पाणीपट्टीतून उत्पन्न मिळविणाऱ्या महापालिकेला पुढच्या १२ महिन्यात या दोन्हीतून एकूण २ हजार ८७० कोटी उत्पन्न मिळेल, हा अति आत्मविश्वास येतो कोठून ? बांधकाम क्षेत्र अडचणीत असताना नऊ महिन्यात २७५ कोटी रुपये मिळाले आहेत. यंदा ते उत्पन्न सुमारे १ हजार कोटी होईल, हा आशावाद कशाच्या जोरावर आहे? स्थायी समितीकडून अंदाजपत्रक पाचशे कोटींनी फु गविले जाण्याची शक्यता आहे.
>
> - विवेक वेलणकर, अध्यक्ष, सजग नागरिक मंच

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी



सतत मोबाइलवरती खेळ खेळून कंटाळली होती बिच्चारी! म्हणून म्हटलं थोडा चेंज म्हणून आता कॉम्प्युटरवरती खेळ खेळ!!

## मुंबईत सोमवारपासून लोकल सर्वांना!

**मुंबई :** साडेदहा महिन्यांनंतर सर्वसामान्यांना येत्या सोमवारपासून मुंबईत उपनगरीय रेल्वे सेवेतून प्रवास करण्यास राज्य शासनाने मुभा दिली.

गर्दी टाळण्याकरिता मात्र वेळेचे बंधन घालण्यात आले आहे. तसेच कार्यालयीन वेळांमध्ये बदल करण्याची विनंती सरकारने खासगी आस्थापनांना केली आहे. करोनाच्या (पान ३ वर)

# प्रजासत्ताक दिनी झालेला हिंसाचार दुर्दैवी

## राष्ट्रपती कोविंद यांची खंत; कृषी कायदे शेतकऱ्यांसाठी लाभदायक!

वृत्तसंस्था, नवी दिल्ली



**राष्ट्रपती रामनाथ** कोविंद यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांपुढे केलेल्या भाषणात नव्या कृषी कायद्यांचे समर्थन करताना, या कायद्यांमुळे लहान शेतकऱ्यांना लाभ मिळून लागल्याचे नमूद केले. त्याचबरोबर शेतकरी आंदोलनात प्रजासत्ताकदिनी झालेल्या हिंसाचाराचा आणि राष्ट्रध्वजाच्या अवमानाचा 'अतिशय दुर्दैवी' अशा शब्दांत त्यांनी निषेध केला.

नव्या कृषी कायद्यांबाबत राष्ट्रपती म्हणाले, या कायद्यांचा लाभ १० कोटी लहान शेतकऱ्यांना झाला आहे. काही राजकीय पक्षांनी आधी या कायद्यांमधील तरतुदींना पाठिंबा दिला होता. २६ (पान २ वर)

### २० विरोधी पक्षांचा बहिष्कार

राष्ट्रपती कोविंद यांच्या तासाभराच्या भाषणावर २० विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला. त्यांनी तीन कृषी कायदे रद्द करण्याची मागणी केली आहे. काँग्रेस खासदार रवणीत सिंग बिट्टू यांनी भाषणावेळी 'जय जवान जय किसान'च्या घोषणा दिल्या. काही विरोधी खासदारांनी सेंट्रल हॉलच्या सज्जात घोषणाबाजी केली.

# सिंघू-टिकरी परिसरात तणाव

## शेतकऱ्यांवर दगडफेक आणि मारहाण; आंदोलकांवर आणखी दबाव

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**नवी दिल्ली :** सिंघू सीमेवर सुमारे दोनशे जणांच्या जमावाने बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांच्या मोठ्या फौजफाट्यातही शेतकऱ्यांवर दगडफेक आणि मारहाण केली. त्यांच्या तंबूंची मोडतोड केली. त्यामुळे आंदोलनस्थळी शुक्रवारी दिवसभर तणाव निर्माण झाला होता. या घटनेत काही शेतकरी जखमी झाले.

हा संघर्ष नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना अश्रूधुराचा वापर करावा लागला. पोलीस अधिकाऱ्यावर तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न करणाऱ्याला ताब्यात घेण्यात आले. हे विरोधक स्थानिक रहिवाशी असल्याचे सांगितले जात असले तरी, भाजपसमर्थक टोळके असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला. टिकरी येथेही स्थानिक रहिवाशांनी शेतकऱ्यांविरोधात घोषणाबाजी केली. सिंघू, टिकरी आणि गाझीपूर या तीनही ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. दिल्ली पोलिसांनी सिंघू सीमेवर शेतकरी नेत्यांना शुक्रवारी नोटिसा बजावल्या असून तीन दिवसांत उत्तर देण्यास सांगण्यात आल्या आहेत. या नोटिशांना शनिवारी नेत्यांना स्पष्टीकरण द्यावे लागेल.

**आंदोलनाला पुन्हा उभारी**

'मी आंदोलन गुंडाळून निघून जाऊ शकलो असतो किंवा स्वतःला अटकही करून घेतली असती पण, तसे केले असते तर, शेतकऱ्यांवर देशद्रोहाचा डाग लागला असता, तो कधीही पुसला गेला नसता आणि हेच मला मान्य नाही. आंदोलनाविरोधात षडयंत्र रचले असून आता मी जीव गेला तरी हटणार नाही, असे सांगत भारतीय किसान युनियनचे प्रवक्ता व शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी शेतकरी आंदोलनाला शुक्रवारी नवी उभारी दिली.

प्रजासत्ताक दिनी लालकिल्ला, आयटीओ व अन्यत्र झालेल्या हिंसाचाराच्या घटनांनंतर शेतकरी आंदोलनावरील दबाव वाढू लागला आहे. दोन शेतकरी संघटनांनी आंदोलनातून माघार घेतल्यानंतर गाझीपूर सीमेवरील (पान २ वर)

**संसदेत पडसाद**

नवी दिल्ली : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील राष्ट्रपतींच्या अभिभाषणापूर्वी शुक्रवारी, शेतकऱ्यांच्या पुन्हा तीव्र झालेल्या आंदोलनाचे पडसाद उमटले. लोकशाही मूल्यांचे महत्त्व लक्षात घेऊन लोकांच्या जगण्याशी संबंधित सर्व प्रश्नांवर सदस्यांनी संसदेत चर्चा करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिभाषणासाठी मध्यवर्ती सभागृहात जाण्याआधी केले. मात्र, ठरल्याप्रमाणे १९ विरोधी पक्षांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बहिष्कार टाकला.






## अर्थउभारीचा आशावादी सूर

(पान १ वरून)

प्रगतीने अर्थव्यवस्थेला सोनेरी किनार प्रदान केल्याचे पाहणी अहवालाने नमूद केले आहे.

करोना साथ सुरू होताच केलेल्या प्रतिबंधात्मक उपायांमुळे एकूण रुग्णसंख्या ३७ लाखांपर्यंत मर्यादित ठेवता आली, लाखभर लोकांचा जीव वाचविण्यासह, लक्षावधींच्या उपजीविकांचे रक्षण झाले, अशा शब्दांत पाहणी अहवालाने टाळेबंदीच्या आकस्मिक घोषणेचे समर्थन केले. तर नवीन शेती सुधारणा कायदे लहान आणि अल्पभूधारक असलेल्या ८५ टक्के शेतकऱ्यांचे हित ध्यानात घेऊनच करण्यात आले असल्याचा दावा अहवालाने केला आहे.

## दिल्लीत इस्राएलच्या दूतावासाबाहेर कमी तीव्रतेचा बॉम्बस्फोट

**पीटीआय, नवी दिल्ली**

**दिल्लीतील इस्राएलच्या** दूतावासाबाहेर शुक्रवारी सायंकाळी अत्यंत कमी तीव्रतेचा बॉम्बस्फोट झाला, त्यामध्ये कोणीही जखमी झाले नाही, असे पोलिसांनी सांगितले.

स्फोटाच्या ठिकाणी उभ्या असलेल्या काही गाड्यांचे नुकसान झाले. या घटनेचे वृत्त कळताच अग्निशामक दलाचे तीन बंब घटनास्थळी रवाना झाले. काही गाड्यांच्या काचा फुटल्या, मालमत्तेचे नुकसान झालेले नाही, असे दिल्ली पोलीस अतिरिक्त जनसंपर्क अधिकारी अनिल मित्तल यांनी सांगितले.

सनसनाटी निर्माण करण्यासाठीचा हा प्रयत्न होता असे प्रथमदर्शनी दिसून येत आहे, घटनास्थळापासून काही कि.मी. अंतरावरच बिटिंग रीट्रिट कार्यक्रम सुरू होता. या परिसरात लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजची अधिकारी पाहणी करीत आहेत. घटनास्थळी मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून परिसराला वेढा घालण्यात आला आहे.

# ‘टाळेबंदीच्या ‘धाडसा’चे जोरकस समर्थन!

## लाखांचे जीव आणि लाखोंची उपजीविका वाचू शकली; आर्थिक पाहणी अहवाल - २०२१ मध्ये दावा



### भारतीय क्रिकेट संघाच्या कामगिरीचेच प्रतिबिंब

विद्यमान २०२०-२१ सालातील उणे ७.७ टक्क्यांच्या ऐतिहासिक घसरणीतून, पुढील आर्थिक वर्षात सकल राष्ट्रीय उत्पादनात ११ टक्क्यांच्या जोरदार मुसंडीपर्यंत अर्थव्यवस्थेची उभारी ही भारताच्या क्रिकेट संघाच्या ऑस्ट्रेलियातील अलिकडच्या कामगिरीलाच प्रतिबिंबीत करणारी असेल.

– कृष्णमूर्ती वेंकट सुब्रमणियन, देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार.

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

**कोविड-१९ आजारसाथीला** सुरुवात होताच तातडीने योजलेल्या प्रतिबंधात्मक उपायामुळे एकूण रुग्णसंख्या ३७ लाखांपर्यंत मर्यादित राखता आली, लाखभर लोकांचे जीव वाचले आणि लक्षावधींच्या उपजीविकांचे रक्षण झाले. पुरेसा कालावधी न देताच अकस्मात लादल्या गेलेल्या देशव्यापी टाळेबंदीमुळे विशेषतः गरीब, स्थलांतरित मजुरांना सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टांमुळे केंद्र सरकारवर होत असलेल्या टीकेला खोडून काढणारे उत्तर ‘आर्थिक पाहणी अहवाल २०२१’ने दिले आहे. दीर्घकालीन लाभ मिळविण्यासाठी अल्पकालीन वेदना सोसण्याच्या इच्छाशक्तीचे आता देशाला समर्पक फायदे दिसून येत आहेत, असे अहवालाने निरीक्षण नोंदविले आहे.

आर्थिक पाहणी अहवालाच्या, ‘शतकातून एकदाच भेडसावणाऱ्या आपत्तीदरम्यान, जीव आणि उपजीविकांचे रक्षण’ शीर्षकाच्या पहिल्याच प्रकरणात, साथीच्या आजाराला प्रारंभ होण्यापूर्वीच योजल्या गेलेल्या धाडसी आणि प्रतिबंधात्मक उपायांमधून भारत आता ‘टाळेबंदीचा लाभांश’ उपभोगत आहे, अशी अहवालाने टिप्पणी केली आहे.

म्हणूनच, सकल राष्ट्रीय उत्पादनात तात्पुरत्या घसरणीची आर्थिक निर्बंधामुळे मोजाव्या लागलेल्या किमतीच्या तुलनेत वाचविलेल्या मानवी जीवांचे मूल्य हे खूप मोठे आहे, असे पाहणी अहवाल सांगतो. टाळेबंदीची घाई केली गेली नसती तर, मे २०२० पर्यंत देशभरात एकूण रुग्णसंख्या ३० कोटींवर आणि त्यापैकी हजारोंना मृत्यूला सामोरे जावे लागले असते, असे अहवालाने नमूद केले आहे.

## शैक्षणिक असमानतेवर ‘ऑनलाइन’ शिक्षणच उतारा

**कोविडकाळात अपरिहार्यता** म्हणून सुरू झालेल्या ऑनलाइन शिक्षणाच्या प्रथेचा जर योग्य रीतीने वापर केल्यास, ते शिक्षणातील असमानतेला कमी करणारे प्रभावी साधन ठरेल, असा ‘आर्थिक पाहणी अहवाल २०२१’ने दावा केला आहे.

वर्ष २०२०च्या ‘असर’ वार्षिक सर्वेक्षणाचा हवाला देत, ग्रामीण भारतातील सरकारी आणि खासगी शाळांमधील स्मार्टफोन असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे २०१८ सालातील ३६.५ टक्क्यांवरून, २०२० सालात ६१.८ टक्के झाले आहे, असे आर्थिक पाहणी अहवालाने नमूद केले आहे. म्हणूनच ई-शिक्षणाचा प्रभावी वापर केल्यास, ग्रामीण व शहरी भागातील डिजिटल दरी भरून निघण्यासह, लिंग, वय आणि उत्पन्न स्तर या घटकांमुळे दिसणाऱ्या निकालातील असमानतेला संपुष्टात आणले जाईल, असा विश्वास पाहणी अहवालाने व्यक्त केला आहे.

## नवीन कृषी कायदे बाजारपेठेच्या स्वातंत्र्याचे नव पर्वाची नांदी



**सरकारने आणलेल्या** नवीन शेती सुधारणा कायद्यांचे जोरकसपणे समर्थन करताना, ‘आर्थिक पाहणी अहवाल २०२१’ने या कायद्यांमुळे कृषी बाजारपेठेच्या स्वातंत्र्याचे नवीन पर्व खुले होईल, जे अंतिमतः अल्प भूधारक व छोट्या शेतकऱ्यांसाठी हितकारक ठरेल.

हे कायदे मुळातच शेतकरी समुदायातील ८५ टक्क्यांच्या घरात असणाऱ्या छोट्या व अल्प भूधारक शेतकऱ्यांना ध्यानात घेऊन तयार केले गेले. शेतकऱ्यांचा हाच वर्ग कृषी-उत्पन्न बाजार समित्यांद्वारे नियंत्रित बाजार यंत्रणेने सर्वाधिक ग्रासलेला वर्ग आहे, असे पाहणी अहवालाने म्हटले आहे. विशेषतः नवीन कायदे हे भांडवलदार-धार्जिणे आणि बाजार समित्यांच्या नियंत्रित व्यवस्थेला कमजोर करणारे असल्याचे म्हणत त्या विरोधात शेतकऱ्यांचे दीर्घकाळापासून कडवे आंदोलन सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीतील बाजार समित्या हाच मुख्य अडसर असल्याचे पाहणी अहवाल सांगतो.

## शेती नव्हे, अत्याधुनिक उद्योग!

**देशातील शेतीक्षेत्राकडे** अत्याधुनिक उद्योग म्हणून पाहण्याची आवश्यकता नमूद करतानाच या क्षेत्रात तात्काळ सुधारणांची अंमलबजावणी करण्याचे सुचविण्यात आले आहे. तसे न केल्यास देशाच्या कृषीक्षेत्राची शाश्वत वाढ होणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे.

कृषी कायद्यांवरून सरकार व शेतकरी यांच्याविरुद्धचा संघर्ष बैठका तसेच दिवसांनंतरही संपुष्टात आला नसताना पाहणी अहवालातील सूचना सरकारसाठी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. कोविड-टाळेबंदी दरम्यानही देशातील कृषीक्षेत्र वेगाने वाढल्याचे नमूद करत चालू आर्थिक वर्षात या क्षेत्राचा वेग ३.४ टक्के असेल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला आहे.

कृषी - शेती क्षेत्राशी निगडित पत पुरवठा, अन्न प्रक्रिया उद्योग यांना ‘आत्मनिर्भर भारत’ मोहिमेमुळे विश्वासार्हता मिळाल्याचेही नमूद करण्यात आले. कृषी उत्पादन वाढण्यासह त्याची गुणवत्ताही सुधारल्याचे म्हटले आहे. त्यासाठी साठवणूक क्षमता विस्ताराबाबतची सरकारची पावले आश्वासक पडल्याचे म्हटले आहे.

## आरोग्य सेवेवरील खर्च तिप्पट



**करोना साथरूपाने** चालू वित्त वर्षात संपूर्ण अर्थव्यवस्थेचे कंबरडे मोडणाऱ्या आरोग्य क्षेत्रावर नव्या आर्थिक वर्षात अधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता नमूद करण्यात आली आहे. देशातील आरोग्य पायाभूत सेवा क्षेत्र अधिक सक्षम करताना त्यासाठीचा सरकारी खर्च कमी करून अन्य मार्गाने तो करता येईल, असे म्हटले आहे.

सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ नुसार आरोग्य क्षेत्रावर सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १ टक्क्यावरून २.५ ते ३ टक्के खर्च करण्याच्या उद्दिष्टाचा उल्लेख करत या क्षेत्रावर सरकारी खर्चाचे प्रमाण ६५ टक्क्यांवरून ३० टक्क्यांवर आणण्याचे पाऊल उचलण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यात आली आहे. कोविड कालावधीत आरोग्यसेवेवरील खर्च येत्या कालावधीत विस्तारताना तो अन्य मार्गाने करण्यावर भर देण्यात आला आहे. ‘आयुष्यमान भारत’बरोबरच राष्ट्रीय आरोग्य धोरणाची अंमलबजावणी यापुढील कालावधीतही व्हायला हवी, असे नमूद करण्यात आले आहे.

## पायाभूत सेवा क्षेत्र विस्ताराला वाव

**देशातील पायाभूत** सेवा क्षेत्राची वाढ करोना साथीनंतर शिथील करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे अधिक झाली असून क्षेत्र पूर्वपदावर येण्यासाठी सज्ज झाले असल्याचे म्हटले आहे. देशाच्या आर्थिक विकासात पायाभूत सेवा क्षेत्राचा सिंहाचा वाटा राहिला असून करोना-टाळेबंदी संकटानंतर त्यातील गती वाढल्याचे नमूद करण्यात आले. या क्षेत्राच्या अधिक विकासासाठी पाया आहेच, मात्र तो आणखी भक्कम करण्यास संधी असल्याचे म्हटले आहे. पायाभूत सेवा क्षेत्राशी संबंधित यंत्रणांमधील गळती थांबली असून परिणामी कामही वेगाने होऊ लागल्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

### गृहनिर्मितीत वेग

गेल्या काही वर्षांपासून मोठा अर्थफटका बसलेल्या देशातील गृहनिर्माण क्षेत्रातील हालचाल जुलै २०२० पासून वाढल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत काहीसे ठप्प पडलेले हे क्षेत्र गेल्या १० महिन्यांत मात्र विस्तारल्याचे नमूद करण्यात आले. मार्च २०२० ते जून २०२० दरम्यान घरांच्या किमती ७१ टक्क्यांनी कमी झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय गृहनिर्माण बँकेच्या गृह किंमत निर्देशांकाचे फलीत यशस्वी ठरल्याचेही म्हटले आहे.



केंद्रीय कृषी राज्यमंत्री कैलाश चौधरी, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राळेगणसिद्धीत येऊन अण्णा हजारे यांच्याशी चर्चा केली.

## अण्णा हजारे यांचे उपोषण स्थगित

**लोकसत्ता वार्ताहर**

**पारनेर :** ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी केलेल्या शेतकरीहिताच्या मागण्यांसंदर्भात विचार करण्यासाठी केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केल्यामुळे हजारे यांनी उपोषणाचा निर्णय स्थगित केला आहे.

१५ मागण्यांसाठी हजारे यांनी ३० जानेवारीपासून राळेगणसिद्धीत शेवटचे उपोषण करण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर केंद्रीय कृषी राज्यमंत्री कैलाश चौधरी, माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राळेगणसिद्धीत येऊन तीन तास हजारे यांच्याशी चर्चा केली. हजारे यांच्या मागण्यांबाबत कार्यवाही करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केल्याचे पत्र चौधरी यांनी त्यांना दिले.

केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर या समितीचे अध्यक्ष असतील, तर केंद्रीय कृषि राज्यमंत्र्यांसह निती आयोगातील कृषितज्ज्ञांचा समितीत समावेश आहे. अण्णा हजारे समितीचे निमंत्रित सदस्य असणार आहेत. तसेच, हजारे सुचवतील त्या तीन सदस्यांची अशासकीय सदस्य म्हणून समितीमध्ये नियुक्ती करण्यात येणार आहे. सहा महिन्याच्या कालावधीत निर्णय घेऊन कारवाई करण्याचे बंधन समितीवर असणार आहे, अशी माहिती चौधरी यांनी दिली.

> “शेतकरीहिताच्या मागण्यांसंदर्भात शेवटचे उपोषण करण्याचा इशारा दिला होता. या आंदोलनात आपले काही बरेवाईट झाले तर भारतीय जनता पक्षाचे नुकसान होईल. कदाचित सत्ता जाईल या भीतीने भाजपप्रणीत केंद्र सरकारमधील मंत्र्यांची, नेत्यांची धावपळ सुरू होती. सरकार केवळ ‘पडण्या’ला घाबरते. त्यातूनच मग आंदोलन होऊ नये यासाठी प्रयत्न केले गेले. आता मागण्यांसंदर्भात निर्णय घेण्यात आले.
>
> -अण्णा हजारे, ज्येष्ठ समाजसेवक

हजारे यांनी उपस्थित केलेल्या कृषिमूल्य आयोगाला स्वायत्तता देण्याबाबत, लोकपाल कायद्याच्या अंमलबजावणीबाबत सकारात्मक चर्चा झाली. लोकपाल कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात लवकरच समिती स्थापन करण्यात येईल व या समितीच्या बैठकीसाठी हजारे यांना आमंत्रित करण्यात येईल.

## निर्देशांकांचा घसरण षटकार!

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** भांडवली बाजारातील घसरण सलग सहाव्या सत्रातही कायम राहिली. सप्ताहअखेरच्या व्यवहारात सेन्सेक्ससह निफ्टी एक टक्क्याहून अधिक प्रमाणात घसरले. गुरुवारप्रमाणेच दोलायमान राहिलेल्या बाजाराची दिशा सत्रअखेरीसही नकारात्मकतेकडे झुकलेलीच राहिली. व्यवहारातील अस्थिरता आर्थिक पाहणी अहवालातील देशाच्या अर्थव्यवस्थेबाबतच्या उत्सुकतेने सत्रअखेर अधिक खोलात गेली.

मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स एकाच व्यवहारात ५८८.५९ अंशांनी खाली येत ४६,२८५.७७ वर स्थिरावला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टी निर्देशांक १८२.९५ अंश घसरण होऊन तो १३,६३४.६० पर्यंत थांबला. मुंबई निर्देशांकाने सत्रात १,२६३.२० अंश आपटी अनुभवली. तर गेल्या सलग सहा सत्रांतील मिळून त्यातील घसरण ३,५०६.३५ अंश राहिली आहे. टक्केवारीत हे प्रमाण ७ हून अधिक आहे. तर निफ्टी या दरम्यान १,०१०.१० अंशांने, जवळपास त्याच प्रमाणात घसरला आहे.

## सिंघू-टिकरी परिसरात तणाव

(पान १ वरून)

शेतकऱ्यांना आंदोलनस्थळावरून उठवण्याचे प्रयत्न गुरुवारी उत्तर प्रदेश प्रशासनाने केले. आंदोलन संपवण्यासंदर्भात गाझीपूर पोलिसांनी टिकैत यांच्याशी चर्चा केल्यानंतर शेतकऱ्यांना दगाफटका होण्याची भीती व्यक्त करत टिकैत यांनी ‘गोळी मारली तरी हटणार नाही’ असे भावनिक आवाहन केले. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद देत पश्चिम उत्तर प्रदेश आणि दक्षिण हरियाणातील जाट समाजाने टिकैत यांना पाठिंबा दिला.

खात पंचायतींनीही टिकैत यांच्या आंदोलनाचे समर्थन केले. त्यामुळे हजारोंच्या संख्येने शेतकरी शुक्रवारी सकाळी गाझीपूरच्या सीमेवर आंदोलनस्थळी येऊन दाखल झाले. प्रजासत्ताक दिनानंतर गावी गेलेले शेतकरी पुन्हा गाझीपूरला परतल्यामुळे गाझीपूर सीमेवर शेतकऱ्यांचा ओघ वाढला.

### ‘आप’चा मदतीचा हात

**गाझीपूर प्रशासनाने आंदोलनस्थळावरील वीज व पाण्याचा पुरवठा तोडला असला तरी दिल्लीतील सत्ताधारी ‘आप’ सरकारने दोन्ही पुरवण्याची तयारी दाखवली. गावाकडून पाणी आल्याशिवाय पाणी घेणार नाही असे टिकैत म्हणाले होते. त्यांच्यासाठी पाणी आणले गेले व लहान मुलाच्या हस्ते टिकैत यांना दिले गेले. भारतीय किसान युनियनचे अध्यक्ष नरेश टिकैत यांनी मुझफ्फरनगर येथे ‘महापंचायत’ घेऊन आंदोलन कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. छोट्या-छोट्या गटांमध्ये शेतकऱ्यांनी दिल्लीकडे रवाना होण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजते.**

**‘आंदोलन कायम राहील’**

गाझीपूर सीमेवर संयुक्त किसान मोर्चातील दर्शन पाल, योगेंद्र यादव आदी नेतेही येऊन दाखल झाले. पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री योगी यांनी लक्षात घ्यावे की, केंद्र व राज्य सरकारने शेतकरी आंदोलनाला बदनाम करण्याचा, त्यांना देशद्रोही ठरवण्याचा प्रयत्न केला, आता शेतकरी कोणत्याही परिस्थितीत मागे फिरणार नाहीत, आंदोलन कायम राहील, असा इशारा स्वराज इंडियाचे नेते योगेंद्र यादव यांनी दिला. काँग्रेस, आप आदी राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही गाझीपूर सीमेवर टिकैत यांची भेट घेऊन पाठिंबा व्यक्त केला. महाराष्ट्रातून आलेल्या सुमारे दीडशे शेतकऱ्यांचा जथा पलवलहून गाझीपूर सीमेवर येऊन दाखल झाला आहे. ‘डकैतला (दरोडेखोर) पाठिंबा द्यायचा की टिकैत यांच्या पाठीशी उभे राहायचे, हे आता देशाच्या जनतेने ठरवावे’, असे आवाहन राष्ट्रीय किसान महासंघाचे समन्वयक संदीप गिड्डे पाटील यांनी गाझीपूरमधील सभेत केले.

## प्रजासत्ताक दिनी झालेला हिंसाचार दुर्दैवी : राष्ट्रपती

(पान १ वरून)

जानेवारीला प्रजासत्ताकदिनी झालेल्या हिंसाचाराचा निषेध करताना ते म्हणाले, की जर संविधानाने आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले असेल तर त्याचा वापर कायदा आणि नियम पाळून गांभीर्याने करणे अपेक्षित आहे.

संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या अर्थसंकल्पी अधिवेशनात राष्ट्रपती कोविंद यांनी केलेल्या पारंपरिक भाषणात भारत-चीन संघर्षासह अनेक मुद्द्यांचा परामर्श घेतला. चीनचा उल्लेख टाळून राष्ट्रपती म्हणाले की प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील शांततेत बाधा आणण्याचे प्रयत्न असून त्यामुळे द्विपक्षीय संबंध आणि करारांचा अनादर होत आहे. परंतु भारत आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यास कटिबद्ध असून त्यासाठी सीमेवर अतिरिक्त लष्कर तैनात करण्यात आले आहे. पूर्व लडाखमध्ये गलवान येथे २० जवानांनी चीनविरुद्धच्या संघर्षात केलेले प्राणार्पण हा सर्वोच्च त्याग आहे, असेही राष्ट्रपती म्हणाले.

### भाषणसंक्षेप

- सर्वोच्च न्यायालयाने नव्या कृषी कायद्यांना दिलेल्या स्थगितीचा केंद्र सरकारला आदर., कृषी सुधारणांतून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण.
- थेंबागणिक जास्त पीक योजनेची अंमलबजावणी, सूक्ष्म सिंचनाखालील क्षेत्र ४२ लाख हेक्टरवरून ५६ लाख हेक्टरवर.
- प्रधानमंत्री किसान योजनेत शेतकऱ्यांना १,१३००० कोटी रुपयांची मदत थेट हस्तांतरित.
- एक हजार शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्याचा केंद्र सरकारचा विचार.
- यूपीआय पद्धतीच्या माध्यमातून डिसेंबर २०२० पासून चार लाख कोटी डिजिटल व्यवहार झाले असून दोनशे बँकांची ‘यूपीआय’शी जोडल्या.
- करोना नियंत्रणाबाबत सरकारने वेळीच घेतलेल्या निर्णयांमुळे लाखो लोकांचे प्राण वाचले. अर्थव्यवस्थाही रूळावर येण्यास सुरुवात.
- अवकाश क्षेत्रात सुधारणांसाठी इंडियन नॅशनल स्पेस प्रमोशन अँड ऑथॉरायझेशन सेंटर म्हणजे ‘इन-स्पेस’ या संस्थेची स्थापना.

## दिनदर्शिका

**शनिवार, ३० जानेवारी २०२१**
भारतीय सौर १० माघ शके १९४२
मिती पौष कृष्णपक्ष - द्वितीया : २२ : १३ पर्यंत. नक्षत्र : मघा : उ.रा. २ : २८ पर्यंत. चंद्र - सिंह

**मेष :** नवीन प्रशिक्षण घ्याल.
**वृषभ :** बचतीत वाढ कराल.
**मिथुन :** शेजारधर्म पाळाल.
**कर्क :** आर्थिक सफलता राहील.
**सिंह :** योजनांचा लाभ घ्याल.
**कन्या :** कर्ज करणे टाळा.
**तूळ :** पारितोषिकाचा लाभ.
**वृश्चिक :** कार्यारंभ होईल.
**धनू :** मानसन्मान मिळेल.
**मकर :** उष्ण प्रकृती राहील.
**कुंभ :** वैवाहिक मतभेद टाळा.
**मीन :** क्रोधावर नियंत्रण ठेवा.

**शुभ राशी : मेष, सिंह**

## नेटक्लिप्स

लोकसत्ता.COM


- देशाचे पंतप्रधान मुख्यमंत्र्यांशी बोलतही नाहीत हे दुर्दैवी - बाळासाहेब थोरात
- सरकारी कार्यालयांची वेळ १२ नंतर करा, लोकलच्या मुद्यावर जनतेच्या संतप्त भावना

हे व्हिडीओ बघण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा..

## सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख- महाराष्ट्र ‘धर्म’!
- मुंबईकरांना मोठा दिलासा! १फेब्रुवारीपासून सर्वांसाठी लोकल
- भारत वि. इंग्लंड : ‘टीम इंडिया’च्या खेळाडूंसाठी ‘गुड - न्यूज’चा डबल धमाका
- ६० वर्षांपासून गुहेत राहणाऱ्या बाबांनी अयोध्येतील राम मंदिरासाठी दिले एक कोटी रुपये

## शब्दकोडे - ३३३



**आडवी विधाने :**
(१) हसविण्याजोगे छोटे नाटक, फार्स, हास्यप्रधान रुपक
(४) मूर्तीच्या पाठीमागे चांदी इत्यादी धातूची केलेली महिरप
(६) चित्त, ध्यान, लक्ष (७) दडपण, वजन (१०) सोने, सुवर्ण
(१२) धाक, दरारा, जरब (१४) वचपा, बदला (१५) साद, आरोळी
(१७) लोणी (१९) अंतःपूर, जनानखाना (२१) खड्डा, खंदक
(२३) मेळ, जुळणी (२४) डबके (२६) प्रभात, पहाट
(२८) शिळा, अंघोळ न केलेला (३०) दंत, दात (३२) फळातील द्रवपदार्थ
(३३) तृणाचे सूक्ष्म अग्र (३४) पृथ्वीभोवतालचे वायूचे वेष्टन
(३६) आंदोलन, हालचाल, जागृती, चेतना (३८) शिकारीसाठी बांधलेला उंच माळा
(३९) पुढे उत्कर्ष होईल असा

**उभी विधाने :**
(१) सूर्य, भास्कर (२) हत्या, वध (३) मोठी नदी (४) विवरण, व्याख्यान
(५) सन, साल (८) विहीर (९) नारळाचे झाड (११) गोष्ट, कथा
(१३) साल, फळावरील कठीण आवरण
(१४) धागा, दोरा (१६) खिडकी झरोक्यातून डोकावलेला प्रकाशकिरण
(१८) बेचव, पचपचीत, अळणी (१९) प्रभू रामचंद्रांचे एक प्रसिद्ध स्तोत्र
(२०) प्रामाणिक किंवा पतदार मनुष्य (२२) कंटाळा, सुस्ती
(२३) जास्वंदीचे फूल (२५) चिपळ्या, झांज, टाळी
(२७) निमित्त, सबब (२९) पागोळीच्या खालचा भाग, पाख्याचे भिंतीकडील टोक
(३१) हिमतुषार (३४) वर्दळ, ये-जा, राबता (३५) चांदी, रुपे (३७) झाड, वृक्ष

– सरोज ताठरे

### सुडोकू - ३३३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | | | | ७ | | | ५ |
| | | | ६ | २ | | | ४ | |
| ८ | | २ | | ९ | | | | १ |
| ६ | | ८ | ९ | | | | | ७ |
| | ३ | १ | ५ | | ४ | ८ | ६ | |
| ७ | | | | | २ | १ | | ३ |
| ५ | | | | १ | | ७ | | ४ |
| | ९ | | | ८ | ३ | | | |
| ४ | | | ७ | | | | २ | ८ |

### सुडोकू - ३३२चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ४ | ८ | २ | १ | ७ | ३ | ५ | ६ |
| १ | ७ | ५ | ६ | ४ | ३ | २ | ८ | ९ |
| ६ | ३ | २ | ९ | ८ | ५ | १ | ४ | ७ |
| ३ | ६ | ७ | ५ | ९ | ८ | ४ | १ | २ |
| ४ | २ | ९ | ७ | ३ | १ | ५ | ६ | ८ |
| ५ | ८ | १ | ४ | २ | ६ | ९ | ७ | ३ |
| ८ | ९ | ६ | १ | ५ | २ | ७ | ३ | ४ |
| २ | १ | ३ | ८ | ७ | ४ | ६ | ९ | ५ |
| ७ | ५ | ४ | ३ | ६ | ९ | ८ | २ | १ |

### शब्दकोडे क्र. ३३२चे उत्तर



# राजकारणाच्या भानगडीत पडू नका

## उपमुख्यमंत्र्यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** क्षेत्र निवडताना कामातून मिळणारा आनंद आणि पैसा याचा विचार करा. मी राजकारणात पडलो आणि अडकलो, आता बाहेरही पडता येत नाही. मात्र, विद्यार्थ्यांनो राजकारणाच्या भानगडीत पडू नका, असा सल्ला राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला. राजकारणापेक्षा प्रशासकीय सेवा किंवा स्वतःचा व्यवसाय यांबाबत विचार करण्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने राज्य गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांच्या गौरव कार्यक्रमात उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. ते म्हणाले, 'जोवर जनतेने आम्हाला खुर्चीवर बसवले तोवर आहोत, ज्यादिवशी घरी बसवतील, त्यादिवशी आम्ही चाललो. मात्र, प्रशासकीय सेवेतील अधिकारी निवृत्त होईपर्यंत खुर्चीवर असतो. प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्याची संधी असते. त्यामुळे क्षेत्र निवडताना वडिलधाऱ्यांचा सल्ला घ्या, स्पर्धा परीक्षेमध्ये पुढे या, ज्या क्षेत्रात उतराल त्यात आपल्या आई-वडिलांचे नाव करा.'

पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी भारत शेंडगे, उपाध्यक्ष रणजित शिवतरे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुनंदा वखारे, प्राथमिक शिक्षणाधिकारी सुनील कुऱ्हाडे यांच्यासह जिल्हा परिषदेचे सदस्य या वेळी उपस्थित होते.

### शेतकरी आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न

महात्मा गांधी यांच्या अहिंसेच्या मार्गाने शेतकरी दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करत होते. कृषी कायद्यांना स्थगिती मिळाली असली, तरी शेतकरी आणि केंद्र सरकार यांच्यात आतापर्यंत १२ ते १५ बैठका निष्फळ ठरल्या. गेले दोन महिने शांततेने आंदोलन करणारे शेतकरी चुकीच्या मार्गाने जाऊ शकत नाहीत. आंदोलकांना खेळवले जात असून राज्यकर्ते कायद्याचा आधार घेऊन शेतकरी आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे पवार यांनी कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# भेसळीच्या धास्तीने पेट्रोलपंपच बंद केला!

## उपमुख्यमंत्र्यांची ३० वर्षांपूर्वीची आठवण



प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गृहप्रकल्प योजनेची मोशीतील कामांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी पाहणी केली. विभागीय आयुक्त सौरभ राव, पीएमआरडीएचे आयुक्त सुहास दिवसे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजोग वाघेरे, विरोधी पक्षनेते राजू मिसाळ आदी उपस्थित होते.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** पेट्रोलपंपावर भेसळ होईल आणि नाहक आपली बदनामी होईल, या धास्तीने आपण स्वतःचा पेट्रोलपंप बंद केला, अशी ३० वर्षांपूर्वीची आठवण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी खेडमध्ये बोलताना सांगितली. दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेलचे दर वाढतच असून पेट्रोलच्या दराने आता शंभरी गाठली तरी आश्चर्य नको, अशी टिपणी त्यांनी केली.

चिंबळीतील एका पेट्रोलपंपाचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले, तेव्हा ते बोलत होते.

पवार म्हणाले की, १९९१ च्या सुमारास माझा लोणीकंदला पेट्रोलपंप होता. त्या काळात अनेक जण पंपात भेसळीचे उद्योग करायचे. आपल्या नकळत पंपावर भेसळ झाली तर आपली नाहक बदनामी होईल, म्हणून तो पेट्रोलपपंप मी बंद केला. नंतर तो बांदल नावाच्या व्यक्तीला चालवायला दिला. ही घटना ३० वर्षांपूर्वीची आहे. आता भेसळीचे प्रमाण जवळपास संपले आहे. त्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा आधार घेऊन अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत आणि नागरिकही जागरूक झाले आहेत. एखाद्या पंपावर भेसळ होत असल्याची शंका आली, तरी तो पंप ओस पडतो, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

## पुणे शहरात २०१, पिंपरीमध्ये १०३ नवे रुग्ण

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह ग्रामीण भागात शुक्रवारी करोना संसर्गाचे ४९२ नवे रुग्ण आढळून आले. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण रुग्णांची संख्या ३ लाख ७८ हजार ४२६ झाली आहे. शुक्रवारी दिवसभरात पुणे, पिंपरी-चिंचवडसह जिल्ह्यातील कटक मंडळे आणि ग्रामीण भागात १० रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

- पुणे - २०१ नवे रुग्ण, ५ मृत्यू
- पिंपरी-चिंचवड- १०३ नवे रुग्ण, २ मृत्यू
- उर्वरित जिल्हा- १८८ नवे रुग्ण, ३ मृत्यू

करोनामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची एकूण संख्या ९ हजार ४६ झाली आहे. दरम्यान, शहरात शुक्रवारी चाचण्या आणि त्यातून नव्याने आढळलेले रुग्ण पाहता रुग्ण आढळून येण्याचे प्रमाण ४.५७ टक्के असल्याचे दिसून येत आहे. आरोग्य विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार शुक्रवारी दिवसभरात आढळलेल्या रुग्णांपैकी २०१ रुग्ण पुणे शहरातील आहेत, तर पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रामध्ये १०३ रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागात १८८ नवे रुग्ण आहेत. दिवसभरात मृत्युमुखी पडलेल्या १० रुग्णांपैकी ५ रुग्ण पुणे शहरातील आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील २ रुग्ण असून जिल्ह्यातील रुग्ण ३ आहेत. दरम्यान, जिल्ह्यातील एकूण ३ लाख ६४ हजार ४०५ रुग्ण उपचारांनंतर बरे झाले आहेत. पुणे शहरातील २०४ रुग्ण, तर पिंपरी-चिंचवडमधील ४४ आणि कटक मंडळे आणि ग्रामीण भागातील मिळून १६१ रुग्ण अशा एकूण ४०९ रुग्णांना उपचारांनंतर शुक्रवारी घरी सोडण्यात आले.



वस्तू व सेवा कर (जीएसटी) कायद्यातील वारंवार होणारे बदल थांबवावेत, जीएसटी परताव्यात सुधारणा करण्याची अनुमती द्यावी अशा विविध मागण्यांसाठी ऑल इंडिया प्रोटेस्ट कमिटीतर्फे शुक्रवारी देशभरात आंदोलन करण्यात आले. पुण्यातील जीएसटी कार्यालयासमोर झालेल्या आंदोलनात कर सल्लागार, सनदी लेखापालांनी सहभाग घेतला. ऑल इंडिया प्रोटेस्ट कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष नरेंद्र सोनावणे, पश्चिम महाराष्ट्र कर सल्लागार संघटनेचे अध्यक्ष विलास आहेरकर, सनदी लेखापाल स्वप्नील मुनोत, डॉ. अशोककुमार पगारिया, व्यापारी संघटनेचे महेंद्र पितळीया आदी या वेळी उपस्थित होते.

## महापालिकेचे ७ हजार ६५० कोटींचे अंदाजपत्रक

*(पान १ वरून)*

मिळालेल्या एकूण उत्पन्नात मार्च २०२१ पर्यंत पाचशे ते सातशे कोटींनी वाढ होईल, असा अंदाज आहे.

मिळकतकरातून २ हजार ३५६ कोटी रुपये मिळतील, बांधकाम परवानगीतून ९८५ कोटी रुपये, तर वस्तू आणि सेवा कर विधेयकातून १ हजार ९ ८५ कोटी मिळतील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

गावांच्या समावेशाची प्रक्रिया सुरू असल्यामुळे गावातील बांधकामातून उत्पन्न मिळेल तसेच मिळकतींवरील करातूनही महापालिकेला आर्थिक हातभार लागेल, असा दावा केला जात आहे. आत्तापर्यंतच्या अंदाजपत्रकाच्या अंमलबजावणीतून महापालिकेला दरवर्षी साडेचार हजार कोटींचे उत्पन्न मिळते, हे स्पष्ट झाले आहे. त्यात भांडवली कामे, सेवकवर्गाचा खर्च मोठा आहे. त्यामुळे यंदाही आयुक्तांचे अंदाजपत्रक स्वप्नरंजनच ठरणार आहे.

## एल्गार परिषदेसाठी शहरात बंदोबस्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** एल्गार परिषदेचे आयोजन शनिवारी (३० जानेवारी) श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे करण्यात आले आहे. परिषदेच्या ठिकाणी तसेच शहराच्या वेगवेगळ्या भागात बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

स्वारगेट, टिळक रस्ता परिसरातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी या भागात वाहतूक शाखेचे अतिरिक्त पोलीस नेमण्यात येणार आहेत, तसेच श्री गणेश कला क्रीडा रंगमंच परिसरात बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

शहरातील संवेदनशील ठिकाणी बंदोबस्तात वाढ करण्यात येणार आहे. स्वारगेट पोलिसांसह गुन्हे शाखेची पथके, विशेष शाखेची पथके बंदोबस्तासाठी तैनात करण्यात येणार आहेत.

दरम्यान, एल्गार परिषदेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मध्यरात्री शहराच्या वेगवेगळ्या भागात शोधमोहीम (कोम्बिंग ऑपरेशन) राबवून दोन हजार जणांची चौकशी केली.

# कोकणात गारठा

**पुणे :** उत्तरेकडील बहुतांश राज्यांबरोबरच गुजरातमध्येही सध्या थंडीच्या लाटेची स्थिती असल्याने मुंबईसह कोकण विभागातील रात्रीचे किमान तापमान सरासरीखाली येऊन गारवा निर्माण झाला आहे. उत्तर महाराष्ट्रातही तापमानात घट झाली आहे. विदर्भात मात्र काही भागांत पावसाळी स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तरेकडील पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान आदी भागांमध्ये गेल्या तीन ते चार दिवसांपासून थंडीची लाट आहे. परिणामी महाराष्ट्रातील किमान तापमानात काही प्रमाणात घट झाली आहे. तरी राज्यातील काही भागांत तापमानाचा पारा झपाट्याने खाली येऊ शकला नाही. त्यामुळे कडाक्याची थंडी अवतरली नाही.

## मुंबईत सोमवारपासून लोकल सर्वांना!

*(पान १ वरून)* प्रादुर्भावामुळे गेल्या वर्षी मार्च महिन्यात शेवटच्या आठवड्यापासून सर्वसामान्यांकरिता उपनगरीय रेल्वे सेवा बंद करण्यात आली होती. जून महिन्यापासून टप्प्याटप्प्याने अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी किंवा विविध प्रवर्गांना प्रवासाची परवानगी देण्यात आली. सर्वसामान्यांना रेल्वे प्रवासास परवानगी देण्याची मागणी अनेक महिन्यांपासून करण्यात येत होती.

विविध प्रवर्गांना प्रवासास देण्यात आलेल्या परवानगीमुळे सध्या ६० टक्क्यांच्या आसपास विविध सेवांमधील कर्मचारी उपनगरीय रेल्वे सेवेचा वापर करतात. मुंबईतील उपनगरीय सेवा कधी सुरू होते याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले होते. राज्य सरकारने रेल्वे प्रवासाला मुभा दिली असली तरी घातलेल्या वेळेच्या बंधनामुळे नोकरदारांना त्याचा फारसा फायदा होणार नाही, असाही सूर उमटत आहे.

## कोथरूड भागात महिलेची आत्महत्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** कोथरूड भागात एका महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघकीस आली आहे. आत्महत्येमागचे कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र, आत्महत्या करण्यापूर्वी महिलेने पतीच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला आहे.

प्रीती दीपक काकडे (वय ३१, रा. कोथरूड) असे आत्महत्या केलेल्या महिलेचे नाव आहे. प्रीतीचे पती संगणक अभियंता आहेत. त्यांना पाच वर्षांची मुलगी आहे. त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार शुक्रवारी उघडकीस आला. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी पतीच्या मोबाइल क्रमांकावर संदेश पाठविला होता. संदेश वाचून दीपक घरी आले. तेव्हा पत्नीने आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी कोथरूड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली. दरम्यान, प्रीती यांचा मृत्यू संशयास्पद असून या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांच्या कुटुंबीयांकडून करण्यात आली आहे.

## शेतकरी बचाव कृती समितीकडून आज उपोषण, पाठिंबा सभा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे : शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पुण्यात स्थापन करण्यात आलेल्या शेतकरी बचाव कृती समितीच्या वतीने शनिवारी शेतकरी आंदोलनासाठी पाठिंबा सभा आणि आंदोलनात प्राण गेलेल्या शेतकऱ्यांना अभिवादन करण्यासाठी उपोषण करण्यात येणार आहे.

किसान मोर्चाच्या आवाहनानुसार पुण्यातील समितीने ८ डिसेंबरला भारत बंद आणि निदर्शने, तर २६ जानेवारीला बैलगाडी मोर्चाचे आयोजन केले होते. संयुक्त किसान मोर्चाने दिल्लीतील हिंसक घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महात्मा गांधींच्या स्मृतिदिनी उपोषण सत्याग्रहाची हाक दिली आहे. त्यामुळे पुण्यातही समितीच्या वतीने झाशीची राणी लक्ष्मीबाई पुतळ्याजवळ उपोषण करण्यात येणार आहे. समितीत काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आम आदमी पक्ष, जनता दल धर्मनिरपेक्ष, शेतकरी कामगार पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, बहुजन समाज पक्ष, लोकायत, दगड खाण कामगार परिषद, अंगमेहनती कष्टकरी संघर्ष समिती आदींनी सहभाग नोंदविला आहे.


Institute of Science, Poona's
INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT AND RESEARCH
Affiliated to Savitribai Phule Pune University NAAC ACCREDITED
S. No. 130, Mumbai-Banglore Highway, Near Bhumkar chowk, Wakad, PUNE - 411057
M.B.A. ADMISSIONS OPEN
[Institute Code: MB 6106]
Applications are invited from the eligible candidates for admission Master of Business Administration (MBA) against Institute Level Seats (18) and Vacant Seats (if any) For further details, Contact:
9890084521, 9011069227, 9922449145
Email : director@ibmrpune.in Visit: www.ibmrpune.in



सर्दी, डोकेदुखी, सुज, लचक-भरणे रिलीफ
HEADROSA BALM. MRP 5gms. ₹.18=00. 10gms. ₹.33=00. 25 gms. ₹.70=00. 40gms. ₹.100=00. & 100gms. ₹.210=00.
१९२४ पासून
हेड्रोसा बाम
उत्पादक वल्लभ विजय ॲन्ड सन्स मुंबई-४०० ०६०.
CUSTOMER CARE NO: 97256-08007

Maharashtra Cosmopolitan Education Society's
Allana Institute of Management Sciences
(Approved by AICTE, Recognized by Govt. of Maharashtra & Affiliated to the Savitribai Phule Pune University)
2390, K. B. Hidayatullah Road, Azam Campus, Camp, Pune - 411001 Tel.: 9607006422 / 9607006322
Cell : 9823585811
www.aimspune.org E-mail : director@aimspune.org
Admission for M.C.A. 2020-21
Against Minority Level, Institute Level and Vacant Seats.
Eligibility: DTE Maharashtra Govt. norms.
Applications are invited from the eligible students on or before 5th February 2021 for MCA
Dr. Roshan Kazi
I/C Director

AISSMS
INSTITUTE OF MANAGEMENT
CRAFTING VALUED CORPORATE PROFESSIONALS
Approved by AICTE, New Delhi, DTE, Govt. of Maharashtra, Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University
Accredited by NAAC with 'A+' Grade
Located Near RTO, Pune Railway Station, Pune - 01
MBA ADMISSION 2020-2021
Applications are invited from the eligible candidates for:
• Institute Level Seats
• Against Cancellation / Vacant Seats after CAP Round, (if any)

| Course | Choice Code |
|---|---|
| M.B.A. [ 1st Shift] | 611810110 |
| M.B.A. [ 2nd Shift] | 611810120 |

Admissions will be as per the norms & the procedure prescribed by State CET Cell, & DTE Government of Maharashtra. (Refer: MAH- State CET Cell- MBA/MCA Information Brochure-2020)
Our Features :-
• Quality Education
• Holistic Personality Development
• Linkage with highly reputed Industries
• Excellent Placement Record
Last date of Application 01/02/2021
For Admissions
Contact No. : 7798739415
Email : enquiry@aissmsiom.org
Website : www.aissmsiom.org
Dr. Abhijit Mancharkar, Director, AISSMS- IOM
Shri. Malojiraje Chhatrapati, Honorary Secretary, AISSMS



# बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961
**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे -४११०३५
कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

## मुदत ठेव योजना

क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएएए (स्टेबल)' रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

**₹५ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (०१ फेब्रुवारी २०२१ पासून लागू) वैध आहे.**
नवीन ग्राहकांसाठी:

| कालावधी महिन्यांमध्ये | किमान ठेव (रु. मध्ये) | संचयी | बिगर- संचयी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
| १२ - २३ | २५,००० | ६.१५% | ५.९८% | ६.०१% | ६.०६% | ६.१५% |
| २४ - ३५ | | ६.६०% | ६.४१% | ६.४४% | ६.४९% | ६.६०% |
| ३६ | | ७.००% | ६.७९% | ६.८२% | ६.८८% | ७.००% |

क) ठेवीचा किमान आकार हा वर दिल्याप्रमाणे राहिल. केवळ एनआरओ (अ-निवासी बँक) खात्यांमधूनच ठेवीचा निधी स्वीकारार्ह असेल.
ख) जेष्ठ नागरिक जर प्रथम अर्जदार असेल तर (म्हणजे, वय वर्षे ६० हुन जास्त असलेल्या व्यक्ती, वयाच्या पुराव्याच्या तरतुदी अधीन): ₹५ (पाच) कोटीपर्यंतच्या प्रत्येक ठेव रकमेवर दर साल ०.२५% या दराने अतिरिक्त व्याज दिले जाईल;
ग) एफडी नूतनीकरण करणारे ग्राहक (केवळ वैयक्तिक ग्राहक) - ₹५ कोटीपर्यंतच्या आकाराच्या ठेवीवर दर साल ०.१०% हा अतिरिक्त व्याजदर. विशेष प्रवर्ग फायद्याच्या वर हा अतिरिक्त दर लागू होईल.
घ) ₹५ कोटीहून जास्त रकमेच्या बल्क ठेवींवरील व्याजदर हा, प्रत्येक ठेवीनुसार, प्रसिद्ध केलेल्या कार्डावरील दरापेक्षा वेगळा असू शकतो आणि त्या त्या केसच्या आधारावर तो ठरवला जाईल पण असा वेगळा दर हा रिझर्व बँकेने निश्चित केलेल्या व्याजदराच्या मर्यादेतीलच असेल.
ड) मुदत-पूर्तीच्या (मॅच्युरिटी) दिनांकापूर्वी ठरलेल्या विहित कालावधीत नूतनीकरणाची कोणतीही विनंती कंपनीला प्राप्त झालेली नसल्यास, कंपनीकडून मुदत-पूर्तीच्या दिनांकाला ठेव परत केली जाईल. एनईएफटी किंवा आरटीजीएस आणि / किंवा धनादेशाद्वारे (जर एनईएफटी/आरटीजीएस द्वारे हस्तांतरण नाकारले गेल्यास) ठेव अर्जात नमूद केलेल्या ठेवीदाराच्या बँक खात्यात देय दिले जाईल.
च) ठेवीच्या (किंवा त्यातील एखाद्या हिश्शाच्या) नूतनीकरणासाठीची विनंती प्रत्यक्षतः, मुदत-पूर्तीच्या दिनांकापूर्वी ३ कामाच्या दिवसांआधी करता येऊ शकेल, त्यासाठी सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांद्वारे लेखी विनंती देता येऊ शकेल, त्याप्रमाणे कंपनीला ठेव-परती किंवा ठेवीचे (किंवा त्यातील एखाद्या हिश्शाचे) नूतनीकरण ठरलेल्या देय दिनांकाला करता येईल. उपरोक्त उल्लेखित कालावधीच्या आधी ठेवीच्या नूतनीकरणाची विनंती ठेवीदाराने सादर करावयाची आहे. नूतनीकरणाच्या विनंतीसोबत सर्व ठेवीदारांनी विहित अर्जाचा नमुना यथायोग्य भरून व सह्या करून द्यावयाचा आहे. नूतनीकरण हे, ठेवीच्या नूतनीकरणाच्या दिवशी प्रचलित असणारे व्याजदर आणि इतर अटी व शर्ती यांच्या अधीन राहिल. विद्यमान ठेवीच्या मुदत-पूर्तीच्या दिवसानंतर एफडीआर हे रद्दबातल आणि अवैध ठरत असल्याने ठेवीच्या नूतनीकरणाच्या वेळी त्याची आवश्यकता असेलच असे नाही.
छ) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी ३ दिवस आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.
दुरूस्ती झालेल्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन-बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

**क. कंपनीचे नावः बजाज फायनान्स लि.**
**ख. गठित केले गेल्याचा दिनांक: 25 मार्च, 1987**
**ग. प्रॉफिटस्/डिव्हिडंडस्:**
वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

| आर्थिक वर्ष रोजी संपले | नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व | कर-पश्चात | लाभांश % |
|---|---|---|---|
| 31.03.2018 | 4,056.36 | 2,646.70 | 200 |
| 31.03.2019 | 6,035.30 | 3,890.34 | 300 |
| 31.03.2020 | 6,808.13 | 4,881.12 | 500 |

**घ. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशील:**
संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार-उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकाना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

**च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय:**

| नाव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. राहुल बजाज, (अकार्यकारी संचालक) | बजाज विहार कॉलनी, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे- ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. संजीव बजाज (अध्यक्ष) | बजाज विहार कॉलनी, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे - ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव जैन, (व्यवस्थापकीय संचालक) | डी-२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे -४११ ०१४. | नोकरी |
| श्री. मधूर बजाज (अकार्यकारी संचालक) | बंगला क्र. ३, बजाज विहार कॉलनी, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव बजाज (अकार्यकारी संचालक) | ३४/३५, योग कोरेगाव पार्क, लेम क्र. २, पुणे -४११०३५. | उद्योगपती |
| श्री दिपक पोद्दार (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ब्रिज कुटीर, रुंगठा लेन, १७ वा मजला, नेपियन सी रोड लगत, मुंबई- ४०० ०२६. | उद्योगपती |
| श्री राजन संघी (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | फ्लॅट क्र. २१, मिस्त्री कोर्ट, ४ था मजला, दिनशॉ वच्छा रोड; मुंबई -४०० ०२०. | व्यवसाय |
| श्री. डी जे बालाजी राव (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | डी-१०३, आदर्श रेसिडेन्सी, ४७ क्रॉस, २ रा मेन, ८ वा ब्लॉक, जयानगर, बंगलोर -५६००८२ | व्यावसायिक |
| डॉ. ओंकार गोस्वामी (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ई-१२१, मस्जिद मॉथ, पहिला मजला, ग्रेटर कैलाश ३, नवी दिल्ली - ११० ०४८. | अर्थशास्त्रज्ञ |
| डॉ. गीता पिरामल (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | पिरामल हाऊस, ६ वा मजला, ६१, पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई -४०० ०२५. | व्यवसाय |
| डॉ नौशाद फोर्ब्स (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ७४ कोरेगाव पार्क, पुणे - ४११ ००१. | व्यवसाय |
| श्री अनामी नारायण राव (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ६२ सागर तरंग, वरळी सी फेस, मुंबई -४०० ०३०. | सामाजिक उद्योजक, सेवानिवृत्त सनदी सेवक |

**च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश**

(₹ कोटींमध्ये)

| | 31 मार्च 2020 रोजी | 31 मार्च 2019 रोजी |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख समकक्ष | 674.53 | 240.00 |
| रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स | 4.83 | 1.69 |
| व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | 171.76 | - |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | 867.18 | 805.38 |
| कर्जे | 1,13,417.08 | 95,181.26 |
| गुंतवणूकी | 20,138.98 | 10,370.41 |
| इतर आर्थिक मालमत्ता | 349.51 | 381.61 |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **1,35,623.87** | **1,06,980.35** |
| **बिगर-आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | 204.57 | 147.80 |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | 847.61 | 660.83 |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | 1,016.16 | 495.84 |
| अमूर्त मालमत्ता | 211.98 | 158.49 |
| इतर बिगर-आर्थिक मालमत्ता | 99.38 | 56.56 |
| **एकूण बिगर-आर्थिक मालमत्ता** | **2,379.70** | **1,519.52** |
| **एकूण मालमत्ता** | **1,38,003.57** | **1,08,499.87** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| देय | | |
| व्यापार देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | 0.30 | 0.44 |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | 636.76 | 547.25 |
| इतर देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | - | - |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | 179.46 | 218.64 |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | 41,713.77 | 39,048.97 |
| उधारी (कर्ज रोखे वगळता) | 36,923.32 | 29,970.67 |
| ठेवी | 21,427.10 | 13,193.01 |
| उप-कर्जे | 4,141.75 | 4,139.07 |
| ईंर आर्थिक देणी | 669.90 | 1,411.81 |
| **एकूण आर्थिक देणी** | **105,692.36** | **88,529.86** |
| **बिगर-आर्थिक देणी** | | |
| सध्याचे कराचे देणे (निव्वळ) | 52.10 | 22.37 |
| तरतुदी | 78.87 | 68.88 |
| ईंर बिगर-आर्थिक देणी | 367.03 | 315.13 |
| **एकूण बिगर-आर्थिक देणी** | **498.00** | **406.38** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | 119.99 | 115.37 |
| इतर इक्विटी | 31,693.22 | 19,448.26 |
| **एकूण इक्विटी** | **31,813.21** | **19,563.63** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **1,38,003.57** | **1,08,499.87** |

**आकस्मिक देणी (स्टँडअलोन)**

| तपशील | 31 मार्च 2020 रोजी | 31 मार्च 2019 रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरूद्धचे विवादाचे दावे | 44.18 | 28.04 |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | 4.39 | 4.39 |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | 5.14 | 5.14 |
| अपील अंतर्गत सेवा कर बाबी | | |
| - व्याज सबसिडीवर | 1,971.65 | 1,340.49 |
| - दंडव्याज/ चार्जेस यांवर | 223.15 | - |
| - इतरांबाबत | 6.22 | 5.45 |
| प्राप्तीकराच्या बाबीः | | |
| - कंपनीद्वारे केली गेलेली अपिल्स | 0.32 | 0.32 |
| - प्राप्तीकर विभागाने केलेली अपिल्स | 0.24 | 0.24 |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, 2016 यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: 43,046.58 कोटी**
**ख) प्रत्यक्षात 31.03.2020 रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम आहे : 21,427.10 कोटी**
**ज.** ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही ४३.५३ कोटी इतकी आहेत (बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स कंपनी - ५.०२ कोटी, बजाज अलियांझ लाईफ इन्शुरन्स लि. - ५.५९ कोटी, बजाज ऑटो लि. - ०.२५ कोटी, बजाज इलेक्ट्रिकल्स लि. - ०.०८ कोटी, बजाज हाउसिंग फायनान्स लि. - ७.२६ कोटी, जमनालाल सन्स प्रा. लि. - ०.१९ कोटी, आणि मुकुंद लि. - २५.१४ कोटी).
**झ.** ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.
**ञ.** कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः
I) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.
ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही
iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.
iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.
v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती-कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी बँक ऑफ इंडिया घेत नाही.
**ट.** ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.
**ठ.** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मृत्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल
क) ठेव ठेवल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांपर्यंतः काढण्याची परवानगी नाही
ख) ३ महिन्यांनंतर पण ६ महिन्यांच्या आतः व्याज देय असणार नाही.
ग) ६ महिन्यांनंतर पण अंतिम मुदतीच्या दिनांकाआधीः ही योजना चालवली जात आहे त्या कालावधीदरम्यान निश्चित केल्या गेलेल्या व्याजदरापेक्षा २% व्याजदर कमी राहिल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निश्चित केला गेला नसल्याच्या प्रकरणी बीएफएल द्वारे देऊ केल्या गेलेल्या सर्वाधिक कमी दरापेक्षा ३% कमी व्याजदर देय राहिल.
**ड.** असल्यास, शाखांच्या किंवा एककांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः
१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार-उदीमः
ग्राहकांना अर्थ-पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश - वाहन-कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी-सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेत: आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुझ्झा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहराडून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिंम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क-हाड, कराईकुडी, कर्नाल, करुनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरुक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पाँडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ली, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.
२. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार-उदीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

**जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने २१ जुलै २०२० च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि बहुतेक संचालकांनी सह्या केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे.**

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

पुणे
२७ जानेवारी २०२१

राजीव जैन
व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०१५५०१५८

**गुंतवणूक कशी करावी:**
गुंतवणूक केवळ धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे किंवा डेबिट कार्ड द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास ''Bajaj Finance Ltd. for FD of <गुंतवणूकदाराचे नांव> ह्या नावाने करावी. त्यावर 'अकाऊंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS पूर्ततेचा असावा. गुंतवणूक रकमेसह अर्ज प्रपत्र ह बजाज फिनान्स च्या मुदत ठेव वितरकांकडे किंवा बजाज फिनान्स च्या कोणत्याही शाखांकडे द्यावे. नेटबँकिंग द्वारे गुंतवणूक करायची असल्यास ह्या तपशीलाचा वापर करावा: लाभार्थी नावः बजाज फिनान्स लि., बँक खाते क्र.: ZBAJAJFD (बँक खाते क्र. मध्ये अंक नाहीत, CMS कलेक्शन कोड वापरला आहे), बँक खाते प्रकार: करंट खाते, बँकेचे नाव: इंड्सइंड बँक लि., आयएफएससी: INDB0000006, बँक शाखा: नरिमन पॉईंट, मुंबई.
**अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी** fd@bajajfinserv.in **वर ई-मेल करा किंवा ०२० ७१५०५२७५ वर फोन करा.**

## दिल्ली दंगल प्रकरणी कलिताला जामीन नाही

**नवी दिल्ली :** जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची विद्यार्थिनी व पिंजरा तोड गटाची सदस्य देवांगना कलिता हिला बेकादेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यानुसार ईशान्य दिल्लीतील दंगल प्रकरणात न्यायालयाने जामीन नाकारला आहे. सकृद्दर्शनी तिच्यावर ठेवण्यात आलेले आरोप हे दहशतवादविरोधी कायद्यात बसणारे असल्याने जामीन मंजूर करता येणार नाही असे न्यायालयाने म्हटले आहे. नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या विरोधात नियोजनपूर्वक आंदोलन करण्यात आले होते व नंतर त्याला हिंसाचाराची जोड मिळाली, त्यातून दंगल झाली. यात भारताप्रती द्वेष निर्माण करण्याचा संबंधितांचा हेतू होता, असे दिसून येते असे निरीक्षण नोंदवत न्यायाधीश अमिताभ रावत यांनी सांगितले, की या प्रकरणातील कट हा व्यापक स्वरूपाचा होता. त्यात बरीच गोपनीयता राखण्यात आली होती. त्यात अनेक शंकास्पद मुद्देही आहेत. कलिता हिला दंगलीचा पूर्वनियोजित कट केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली असून गुरुवारी न्यायालयाने आदेशात म्हटले आहे, की तिचा गुन्ह्यात सहभाग असल्याचे पुरावे आहेत, असे सकृतदर्शनी दिसून आले आहे. तिला जामीन देता येणार नाही.

# वादग्रस्त ट्वीटचे कामरा यांच्याकडून समर्थन

## न्यायालयाच्या अवमानाचा हेतू नसल्याचा दावा

पीटीआय, नवी दिल्ली

**सर्वोच्च न्यायालयासंबंधात** ट्वीटरवर विधाने करताना आपण वापरलेली भाषा ही न्यायालयाचा अवमान करण्याच्या हेतूने नव्हे, तर जनमानसात चर्चिल्या जाणाऱ्या मुद्द्यांवर अधिक गांभीर्याने चर्चा घडावी, या उद्देशाने वापरली आहे. विनोदनिर्मिती करताना थट्टा आणि अतिशयोक्तीचा आधार घ्यावा लागतो, अशी भूमिका स्टॅण्ड-अप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात मांडली.

आपण मर्यादा ओलांडली आहे असे न्यायालयास वाटत असेल आणि न्यायालयाला आपली इंटरनेट सेवा बेमुदत काळासाठी बंद करण्याची इच्छा असेल तर काश्मीरमधील मित्रांप्रमाणे आपणही दरवर्षी १५ ऑगस्टला पोस्टकार्डावर स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा पाठवू, असे कामरा यांनी म्हटले आहे.

आत्महत्येला प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून अर्णब गोस्वामी यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या खटल्यात उच्च न्यायालयाने हंगामी जामीन नाकारल्यानंतर गोस्वामी यांनी सर्वोच्च न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. त्यावेळी कामरा यांनी ही विधाने केली होती.

अतिशयोक्तीपूर्ण अलंकारिक घटक हे विनोदी कार्यक्रमासाठी आवश्यक आहेत आणि विनोदवीर स्वतःच्या खास शैलीने जनहिताचे प्रश्न मांडत असतो. देशातील सामर्थ्यवान व्यक्ती आणि संस्था यांच्यात टीका सहन करण्याची क्षमता नसेल, तर येथील कलावंतांची प्रतिभा बंदिस्त करून त्यांचे पाळीव श्वानात रूपांतर केल्यासारखे होईल, असे मतही कामरा यांनी न्यायालयापुढे व्यक्त केले आहे.

कामरा यांच्यावर न्यायालयाच्या अवमानप्रकरणी कारवाई करावी यासाठी याचिका दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी त्याने प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. अनेक न्यायालयांनी अनेक प्रकरणांत दिलेले निकाल कदाचित आपल्याला मान्य नसतील, परंतु या पीठाचा जो निर्णय असेल तो आपण सुहास्यवदनाने स्वीकारू, या पीठाचा किंवा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान करणार नाही, असे आश्वासन कामरा यांनी दिले आहे.



### ‘टीकेचे वाढते प्रमाण’

न्यायालयावर टीका करण्याचे प्रमाण वाढत असून आता प्रत्येक जण टीका करू लागला आहे, असे निरीक्षण शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले. न्यायपालिकेविरुद्ध निंदनीय ट्वीट केल्याबद्दल व्यंगचित्रकार रचिता तनेजा हिच्याविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करणारी याचिका करण्यात आली आहे. त्याबाबत म्हणणे मांडण्यासाठी न्यायालयाने रचिता तनेजा हिला तीन आठवड्यांची मुदत दिली आहे.

# भारतात मनुष्यबळाची अफाट क्षमता- बिल गेट्स

अनंत गोएंका, एक्स्प्रेस वृत्तसेवा

**मुंबई :** ‘‘भारतामध्ये मनुष्यबळाची अफाट शक्ती आहे, त्याचा योग्य वापर केला तर अविश्वसनीय अशा गोष्टी आपण घडवू शकतो’’, असे मत बिल व मेलिंडा गेट्स फाउंडेशनचे प्रमुख बिल गेट्स यांनी ‘दी इंडियन एक्स्प्रेस’शी बोलताना व्यक्त केले.

‘‘काही कुटुंबे पिढ्यान पिढ्या श्रीमंत असलेली दिसतात. त्यांच्यापैकी अनेक जण धर्मादाय संस्थांना मदत करतात, मानवतेसाठी मदत करतात. ज्यांना कुणाला नव्याने संपत्तीचा लाभ होतो तेही त्यांच्याकडील ५० ते ९० टक्के रक्कम मानवतावादी कार्यासाठी देत असतात, त्यातून एक नवी आशा बाळगायला हरकत नाही’’, असे त्यांनी स्पष्ट केले.

‘फॅक्टफुलनेस’ या पुस्तकावर मत व्यक्त करताना त्यांनी सांगितले, की यात जगामध्ये नेमके काय चालले आहे ती वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

जगातील देश कमी हिंसक, जास्त समान, कमी गरीब या स्थितीकडे वाटचाल करीत आहेत. पण यात करोना साथीने मानव जातीला किती हादरा दिला, असे विचारले असता ते म्हणाले, की करोना साथ हा मोठा धक्काच होता. त्याचा मूल्यमापनात्मक स्पष्ट परिणाम अजून समजलेला नाही, पण मानसिक आरोग्याचे, शैक्षणिक व आर्थिक नुकसानीचे प्रमाण जास्त आहे. येत्या दोन ते पाच वर्षांत ही परिस्थिती पूर्वपदावर येईल. त्यामुळे आताची हानी ही कायमची आहे अशी निराशा बाळगण्याचे कारण नाही. करोनाची साथ ही जागतिक महायुद्धासारखी होती, कारण ज्या देशात प्राणहानी फार कमी झाली, तेथे आर्थिक फटका मोठा आहे.

पुढील दोन ते पाच वर्षांत पुन्हा करोनासारखी महासाथ येण्याची शक्यता वर्षात २ टक्के आहे. त्यामुळे अजून दहा वर्षे तरी अशी साथ पुन्हा येणार नाही. औषधे व लशी येत आहेत, त्यामुळे यापुढील काळात दुर्दैवाने अशी साथ आली तरी ती किरकोळ असेल कारण आपली सज्जता मोठी असणार आहे. आताच्या साथीतही आपण ऑस्ट्रेलिया व दक्षिण कोरिया यांनी किती तत्परतेने या साथीला प्रतिसाद दिला हे पाहिले आहे. त्यामुळे त्या देशांना कमी फटका बसला. आरोग्य व शिक्षण या दोन गोष्टींवर भर द्यायला हवा कारण त्यात असमानता आहे, असे सांगून ते म्हणाले, की २०१५ मध्ये टेड टॉकमध्ये मी अशा साथीची शक्यता वर्तवली होती. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. कोॲलिशन फॉर एपिडेमिक प्रिपेअर्डनेस इनोव्हेशन्स (सीइपीआय) या संस्थेची स्थापना आताच्या साथीच्या काळात करण्यात आली तरी त्यातून पाच टक्केही अपेक्षित काम झालेले नाही. पोलिओ, हिवताप यासाठी काम करण्यासाठी अनुदाने दिली जातात. या वेळी खूप मोठ्या प्रमाणावर मदतीसाठी लोक पुढे आले अशातला भाग नाही. तरीसुद्धा चांगली निदान साधने, देखरेख, पायाभूत सुविधा यात मानवी समुदाय यशस्वी झाला आहे.

करोना साथीतून आपण नेमका काय धडा घेणार, या मुद्द्यावर त्यांनी सांगितले, की यातून पुढील काळात येणाऱ्या प्रश्नांची व्याप्ती आधीच लक्षात आली. आपल्याकडे प्रतिकूल हवामान घटना बऱ्याच प्रमाणात दिसून आल्या. युरोपीय समुदाय व इतर देशांनी त्याबाबत कार्यक्रमही हाती घेतले आहेत. करोना हवामानाशी निगडित आहे हे अजून स्पष्ट नसले तरी हवामानाच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष झालेले नाही, पण त्यावर नियोजन नाही. आता या प्रश्नाकडे जास्त गांभीर्याने पाहिले जाईल यात शंका नाही. फायझर व बायोएनटेकच्या लशी आता आलेल्या आहेत. ॲस्ट्राझेनेका व सीरम यांच्यात भागीदारी आहे, त्यातून प्रश्न सुटण्यास मदत झाली. यात नेहमीच्या फायद्यातोट्यांचा विचार उपयोगाचा नाही. मानवतेला मदत करणे महत्त्वाचे आहे. करोनाविरोधात सर्वांनी एकत्र येणे गरजेचे होते; बऱ्याच अंशी तसे झाले ही चांगली गोष्ट आहे. जगातील अनेक लस कारखाने भारतात आहेत. त्यामुळे आम्ही या कंपन्यांशी करार करून लशी विकत घेतल्या.



### गमावलेली संधी, खेद आणि खंत...

तुमच्या आयुष्यातील गमावलेली संधी कोणती, या प्रश्नावर त्यांनी सांगितले, की मायक्रोसॉफ्टला फोन संचालन प्रणाली तयार करता आली नाही याची खंत मला वाटते. काही चुका मीही केल्या त्याचा खेद वाटतो. इंटरनेटमध्ये बदल करायचे झाल्यास ते व्यक्तीची ओळख व सुरक्षा या दोन मुद्द्यांवर करावे लागतील. पण ते तितके सोपे नाही.

# पर्ल यांच्या मारेकऱ्यांवर खटल्याची अमेरिकेची मागणी

**वॉशिंग्टन :** अमेरिकी पत्रकार डॅनियल पर्ल यांच्या २००२ मधील खूनप्रकरणी आरोपींना निर्दोष सोडून दिल्याबाबत अमेरिकेने संतप्त भावना व्यक्त केल्या असून पाकिस्तानने यातील कायदेशीर पर्यायांचा वेगाने विचार करावा. अल कायदाचा दहशतवादी असलेला आरोपी ओमर सईद शेख व इतरांवर खटले भरण्याची परवानगी अमेरिकेला द्यावी, तरच डॅनियल पर्ल या अमेरिकी पत्रकाराच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल असे म्हटले आहे.

पर्ल हे ‘दी वॉल स्ट्रीट जर्नल’च्या दक्षिण आशिया विभागाचे प्रमुख होते व इस्लामी दहशतवादी गटांबाबत वार्तांकन करण्यासाठी पाकिस्तानात आले होते. पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय व ११ सप्टेंबर २००१ मधील हल्ला यांचा संबंध शोधण्याचा ते प्रयत्न करीत होते. त्या वेळी त्यांचे कराचीतून अपहरण करण्यात आले व नंतर त्यांचा शिरच्छेद करण्यात आला होता.

अल कायदाचा जन्माने ब्रिटिश असलेला दहशतवादी शेख व इतर आरोपींना निर्दोष सोडण्याच्या विरोधातील आव्हान याचिका पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली होती.

## नोव्हाव्हॅक्स लस कोविड विषाणूवर प्रभावी

**वॉशिंग्टन :** नोव्हाव्हॅक्स इनकार्पोरेशन या संस्थेने तयार केलेली लस कोविड १९ विषाणूवर प्रभावी असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही लस ८९ टक्के प्रभावी असल्याचे प्राथमिक अभ्यासात दिसून आले आहे. ब्रिटनने याबाबत केलेल्या अभ्यासानुरा ही कोविड प्रतिबंधक लस दक्षिण कोरिया व इतर देशातील उत्परिवर्तित विषाणूवरही गुणकारी आहे. जगात करोनाचे नवे विषाणू उत्परिवर्तित स्वरूपात येत असून त्याबाबत जनतेत चिंतेचे वातावरण असताना नोव्हाव्हॅक्सची लस सर्वच प्रकारच्या करोना विषाणूंवर गुणकारी असल्याचे सांगण्यात आले.

# रजीब बॅनर्जी तृणमूलबाहेर; भाजप प्रवेशाची शक्यता

**कोलकाता :** पश्चिम बंगालचे माजी वनमंत्री रजीब बॅनर्जी यांनी आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर काही तासातच तृणमूल काँग्रेस (टीएमसी) पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचाही राजीनामा दिल्याचे वृत्त आहे.

तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडे रजीब बॅनर्जी यांनी आपले राजीनामापत्र पाठविले आहे. पक्षाच्या सदस्यत्वाचा आणि पक्षातील अन्य पदांचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी पत्रामध्ये म्हटले आहे. काही दिवसांपूर्वी मंत्रिपदाचा राजीनामा दिलेले रजीब बॅनर्जी यांनी शुक्रवारी आमदारकीचाही राजीनामा दिला. बॅनर्जीही लवकरच भाजपमध्ये प्रवेश करण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

दोमजूर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे माजी वनमंत्री बॅनर्जी यांनी शुक्रवारी सकाळी विधानमंडळात जाऊन आपला राजीनामा विधानसभेचे अध्यक्ष बिमन बॅनर्जी यांच्याकडे सुपूर्द केला.

भाजप प्रवेशाबाबत विचारले असता बॅनर्जी म्हणाले की, अद्याप आपली भाजपच्या नेत्यांशी चर्चा झालेली नाही.

## दोन भारतीय अमेरिकी महिलांची संयुक्त राष्ट्र दूतावासात नेमणूक

**वॉशिंग्टन :** बायडेन प्रशासनाने अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रांतील दूतावासात सोहिनी चटर्जी व आदिती गोरूर यांची नेमणूक केली आहे. चटर्जी या संयुक्त राष्ट्रांच्या अमेरिकेतील राजदूतांच्या सल्लागार असणार आहेत तर दूतावासाच्या धोरणात्मक सल्लागारपदी गोरूर यांची नेमणूक केली आहे. चटर्जी या जागतिक विकास, संघर्ष, सामूहिक अत्याचार या विषयातील तज्ज्ञ असून त्या अलिकडे कोलंबिया विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय कामकाज व सार्वजनिक कामकाज विभागात मानद प्राध्यापक होत्या.

# भारत-पाकिस्तान संघर्षाचे जगावर परिणाम- गट्रेस

वृत्तसंस्था, संयुक्त राष्ट्रे

**भारत व पाकिस्तान** यांनी एकत्र येणे गरजेचे असून त्यांनी संघर्षाच्या मुद्द्यावर मार्ग काढला पाहिजे, कारण दोन्ही देशात जर युद्ध झाले तर त्याचे फार वाईट परिणाम दोन्ही देशांनाच नव्हे तर जगाला भोगावे लागतील, असे मत संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँतोनियो गट्रेस यांनी व्यक्त केले आहे.

ते म्हणाले, की भारत व पाकिस्तान या दोन्ही देशातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील तणाव कमी करण्याची गरज आहे. भारत व पाकिस्तान यांच्यात काश्मीर प्रश्नावरून संघर्ष होऊ शकतो काय, या एका पाकिस्तानी पत्रकाराने विचारलेल्या प्रश्नावर ते म्हणाले,की दोन्ही देशांनी संयम पाळण्याची गरज आहे. ऑगस्ट २०१९ मध्ये अशाच प्रकारे जम्मू व काश्मीरमध्ये तणावाची स्थिती असताना गट्रेस यांनी संयमाचे आवाहन केले होते. दोन्ही देशांनी एकत्र येऊन त्यांचे काही मतभेदाचे मुद्दे असतील तर ते सोडवले पाहिजेत. मानवी हक्कांचे सर्व भागांमध्ये पालन करण्याची गरज आहे. सध्याची परिस्थिती योग्य दिशेने चालली आहे असे नाही.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
प्रस्तुत
लोकसत्ता यशस्वी भव! २२६




## S.S.C. Board Exam, Model Activity Sheet for Practice. Sr. No. 3

**Sub : Science and Technology- I**
**Marks : 40** **Time : 2 Hours**

**Note :**i) In case of MCQ'S (Q.No.1(A)) only the first attempt will be Evaluated and will be given credit. For correct alternative (A), (B), (C), (D) with sub-question number is to written as an answer. For eg: (i) (A), (ii) (B), (iii) (C)

**Q 1 (A) Write the correct alternative: (5)**

i) Non-metals are found in ______ block of the modern periodic table.
(a) s-block (b) p-block (c) d- block (d) f- block

ii) A student gradually adds dilute ferrous sulphate solution to a conical flask containing acidified potassium permanganate solution. The light purple colour of the solution fades and finally, it becomes colourless. Which of the following is correct regarding the above observation?
(a) Potassium permanganate oxidises ferrous sulphate. (b) Potassium permanganate reduces ferrous sulphate. (c) Ferrous sulphate oxidises potassium permanganate. (d) Potassium permanganate is an unstable compound and undergoes decomposition to form a colourless compound.

iii) Rusting of iron requires ____________.
(a) only water (b) only oxygen (c) both oxygen and water (d) neither oxygen nor water.

iv) The velocity of light in air is _____ m/s.
(a) 3*1010 (b) 3*108 (c) 1.5*108 (d) 0.3*108

v) When rays of light are incident on a glass slab, then the incident ray and emergent ray are ________ to each other.
a. perpendicular b. parallel
c. opposite d. concurrent

**Q.1 (B) Answer the following. (5)**

i) Name the gas formed when copper reacts with concentrated nitric acid.

ii) Complete the analogy: Oersted : Electromagnetism::__: Law of electromagnetic induction.

iii) What is a solenoid?

iv) Find the odd one out: Focal length, Radius of curvature, Image distance, Size of image.

v) What is meant by power of accommodation?

**Q 2 (A) Give scientific reasons. ( Any two) (4)**

i) Metallic characters goes on decreasing while going from left to right in a period.


ii) A magnetic field produced by a coil of wire is much stronger than that produced by the same wire when it is stretched in a straight line.

iii) One can sense colours only in bright light.

**Q 2 (B) Answer the following. ( Any three) (6)**

i) If the mass of a planet is eight times the mass of the earth and its radius is twice the radius of the earth what will be the escape velocity for that planet.


ii) Observe the diagram and answer the questions given below:



a) Which laws do we understand from the above diagram and description?
b) State the law regarding areas swept by the line joining the planet and the sun.

iii) Draw a neat labelled ray diagram for image formed by a convex lens when an object is placed beyond 2F1.

iv) Observe the diagram and answer the questions given below:



a) Name the phenomenon shown in the diagram.
b) Explain in short the phenomenon shown in the diagram.


v) Complete and balance the following equations:
a) $CH_3COOH + Na_2CO_3 \rightarrow$--- + $CO_2 + H_2O$
b) $CH_3CH_2OH + Na \rightarrow$-------- + $H_2$

**Q 3. Answer the following. ( Any 5) (15)**


i) Two elements 'X' and 'Y' have atomic numbers 12 and 14 respectively-
a) Write the electronic configuration for these elements. (1)
b) To which period of the Modern Periodic Table these two elements belong? Explain your answer. (2)

ii) Read the following passage and answer the question given below:
Metals get attacked by substances around it such as moisture, acid etc. Metal is said to 'corrode' due to this attack and the process is called corrosion. Many metals like iron, copper, silver etc get corroded. When iron is exposed to moist air, it undergoes corrosion and a reddish-brown coloured solid layer is formed on its surface. Corrosion of iron, which is known as rusting, is a serious problem as enormous amount of money is spent every year to replace damaged iron.
**Questions :**
a. What is rust?
b. Give the chemical formula of rust.
c. Do gold ornaments corrode? Justify your answer.

iii) Name the following diagram and explain the concept behind them.


(a) (b)

iv) Observe the diagram and answer the questions given below:




a) Which law do you understand from the above diagram?
b) State the mathematical equation for the law.
c) In case the two bodies are not spherical, then in which direction is the force-directed?

v) For an electric motor shown in the figure:



a) Label A,B,C,D,E,F and G.
b) What is the function of C and D?
c) State uses of F and G.

vi) Draw and complete the flow chart :





vii) With a neat labelled diagram describe the electrolytic reduction of alumina.

viii) The electronic configuration of metal 'A' is 2,8,1 and that of metal 'B' is 2,8,2
a) Identify 'A' and 'B'. Which of the two metals is more reactive? (1)
b) Write the reaction of 'A' and 'B' with dilute hydrochloric acid (2)

**Q.4 Answer any one of the following. (5)**

i) Explain with suitable diagram, how Hope's apparatus can be used to demonstrate anomalous behaviour of water.

ii) Observe the diagram and answer the questions given below:



a) What is the experimental setup shown in the above diagram?
b) Identify the gas evolved in the above experiment.
c) What happens when the evolved gas reacts with lime water?
d) Write the chemical reaction for the reaction shown in the diagram.
e) Write the chemical equation for the reaction of ethanoic acid with sodium bi carbonate.

**Written by : Prasitha S. Nair,** SIES (Dr APJ Abdul Kalam Memorial) High School Ghatkopar (W)
**Co-ordinated by : C. D. Vadke,** Vidhyaprabodhini, Dadar

उद्याचा विषय : सराव कृतिपत्रिका

# शेतकरी आंदोलनाचे संसदेत पडसाद

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील राष्ट्रपतींच्या अभिभाषणापूर्वी शुक्रवारी, शेतकऱ्यांच्या पुन्हा तीव्र झालेल्या आंदोलनाचे पडसाद उमटले. लोकशाही मूल्यांचे महत्त्व लक्षात घेऊन लोकांच्या जगण्याशी संबंधित सर्व प्रश्नांवर सदस्यांनी संसदेत चर्चा करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिभाषणासाठी मध्यवर्ती सभागृहात जाण्याआधी केले. मात्र, ठरल्याप्रमाणे १९ विरोधी पक्षांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बहिष्कार टाकला.

राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी अभिभाषणात नवे कृषी कायदे आणि शेतकरी आंदोलनावर विशेष टिप्पणी केली. २६ जानेवारी रोजी, प्रजासत्ताक दिनी लालकिल्ल्यावरील घटना दुर्दैवी असून तिरंग्याचा अपमान करणे योग्य नसल्याचे सांगत राष्ट्रपती कोविंद यांनी नव्या कृषी कायद्यांचे समर्थन केले. या कायद्यांमुळे कोणत्याही शेतकऱ्याचे हक्क काढून घेतले जाणार नाहीत, उलट, नव्या शेती कायद्यांमुळे केंद्र सरकार शेतकऱ्यांना नवी सुविधा उपलब्ध करून देत आहे. सर्वोच्च न्यायालयाने या कायद्यांवर हंगामी स्थगिती दिली असून न्यायालयाच्या निर्णयाचा केंद्र सरकार आदर करेल, असे कोविंद यांनी सांगितले. केंद्र सरकारने अल्पभूधारक व छोट्या शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधीतून १ लाख १३ हजार कोटी रुपये दिल्याचेही कोविंद म्हणाले.

अभिभाषण सुरू असताना काँग्रेसचे लोकसभेतील पंजाबचे खासदार रवनीत सिंग बिट्टू यांनी संसदेत कृषी कायद्यांविरोधात घोषणाबाजी केली. त्यानंतर, काँग्रेस मुख्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून केंद्र सरकारला धारेवर धरले. तीनही नवे कायदे दीड-दोन वर्षांसाठी स्थगित करण्याची तयारी केंद्र सरकारने दाखवली होती तर, तीन वर्षांसाठी हे कायदे थेट रद्द करावेत व नंतर पुन्हा त्यावर चर्चा करावी. मग, काँग्रेसही केंद्र सरकारला सहकार्य करेल. शेती क्षेत्रात सुधारणा झाल्या पाहिजेत पण, शेतकऱ्यांचे नुकसान झालेले सहन केले जाणार नाही, अशी टीका राहुल गांधी यांनी केली. आत्ता पंजाब, हरियाणा, राजस्थानमधील शेतकऱ्यांना नव्या शेती कायद्यांमुळे नेमके कोणते नुकसान होईल हे लक्षात आले आहे, अन्य राज्यांतील शेतकऱ्यांनाही समजेल. हे आंदोलन थांबवणार नाही, ते मोठ्या शहरांमध्येही विस्तारत जाईल. या कायद्यांमुळे फक्त शेतकऱ्यांचेच नव्हे तर शहरांतील तरुण-मध्यम वर्गाचेही नुकसान होईल, असा इशारा राहुल गांधी यांनी दिला.

संपूर्ण विरोधी पक्षांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बहिष्कार टाकणे खरोखरच दुर्दैवी असल्याची टिप्पणी केंद्रीयमंत्री रविशंकर प्रसाद यांनी केली. मात्र, राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बहिष्कार टाकला म्हणजे राष्ट्रपतींचा अवमान नव्हे. आम्ही (काँग्रेस सदस्य) शेतकऱ्यांना पाठिंबा देत आहोत आणि कायदे मागे घेण्याची मागणी करत आहोत. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत आम्ही सहभागी होऊन भूमिका मांडू, असे लोकसभेतील काँग्रेसचे गटनेते अधीर रंजन चौधरी यांनी सांगितले.


विरोधी पक्षांनी अभिभाषणावर बहिष्कार टाकला असला तरी शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारच्या विरोधात नेमकी कोणती रणनीती आखली जाईल हे अजून स्पष्ट झालेले नाही.

काँग्रेसच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी यांनी प्रमुख विरोधी पक्षनेत्यांशी चर्चा केली होती. यासंदर्भात चर्चा करून संसदेतील रणनीती निश्चित केली जाईल, असे राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, दिल्लीत प्रजासत्ताकदिनी झालेला हिंसाचार हा शेतकऱ्यांना बदनाम करण्यासाठीचा पूर्वनियोजित कट असल्याचा आरोप शिवसेना खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी केला. दिल्लीच्या सीमेवर शेतकऱ्यांवर लाठीमार, अश्रुधुराचा वापर करण्यात येत आहे. केंद्र सरकार बळाचा वापर करून शेतकऱ्यांना उखडून टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. हजारो शेतकरी दिल्लीत असताना भाजपशी संबंधित व्यक्तीच्या नेतृत्वाखाली एका गटाने हिंसाचार घडविण्यात आल्याचे दिसून येत असल्याचे राऊत यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या आंदोलनाला जनतेची सहानुभूती मिळत होती. ती कमी करण्यासाठी राष्ट्रवाद व राष्ट्रध्वजाचा अवमान झाल्याचे नेहमीचे तंत्र भाजपकडून वापरण्यात आल्याचा आरोप राऊत यांनी केला.

## आवारात निदर्शने



नवे शेती कायदे रद्द करण्याच्या मागणीसाठी संसदेच्या आवारात काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी महात्मा गांधींच्या पुतळ्यासमोर निदर्शनेही केली. माकपच्या खासदारांनी स्वतंत्रपणे मोठे फलक घेऊन केंद्र सरकारविरोधात घोषणा दिल्या. राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे अभिभाषण सुरू असताना राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्षाचे प्रमुख व लोकसभेतील खासदार हनुमान बेनिवाल हे 'कृषी कायदे रद्द करा', असे लिहिलेले फलक घेऊन संसदभवनाच्या द्वार क्रमांक-२ नजीक उभे राहून केंद्र सरकारचा निषेध करत होते. बेनिवाल यांनी शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला असून सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून (एनडीए) बाहेर पडले आहेत. 'आप'चे खासदार संजय सिंह व भगवंत मान यांनीही निषेध नोंदवला.

# राज ठाकरे मार्चमध्ये अयोध्या दौऱ्यावर

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे एक ते नऊ मार्चदरम्यान एक दिवस अयोध्येला जाऊन श्रीरामाचे दर्शन घेणार आहेत व नऊ मार्चनंतर राज्याचा दौरा करणार असल्याचे मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी सांगितले.

मुंबईसह राज्यातील काही महापालिकांच्या निवडणुका वर्षभरात होणार असून मनसेने त्यांची तयारी सुरू केली आहे. त्यादृष्टीने मनसेच्या पदाधिकाऱ्यांची शुक्रवारी बैठक आयोजित करण्यात आली होती, अशी माहिती नांदगावकर यांनी दिली.


# बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961

**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे –४११०३५

कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे–अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे – ४११०१४

## मुदत ठेव योजना

क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएए (स्टेबल)' रेटिंग

या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

**₹५ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (०१ फेब्रुवारी २०२१ पासून लागू) वैध आहे.**

नवीन ग्राहकांसाठी:

| कालावधी महिन्यांमध्ये | किमान ठेव (रु. मध्ये) | संचयी | बिगर- संचयी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
| १२ – २३ | २५,००० | ६.१५% | ५.९८% | ६.०१% | ६.०६% | ६.१५% |
| २४ – ३५ | | ६.६०% | ६.४१% | ६.४४% | ६.४९% | ६.६०% |
| ३६ – ६० | | ७.००% | ६.७९% | ६.८२% | ६.८८% | ७.००% |

क) ठेवीचा किमान आकार हा वर दिल्याप्रमाणे राहिल.

ख)(I) जेष्ठ नागरिक जर प्रथम अर्जदार असेल तर (म्हणजे, वय वर्षे ६० हुन जास्त असलेल्या व्यक्ती, वयाच्या पुराव्याच्या तरतुदी अधीन): ₹५ (पाच) कोटीपर्यंतच्या प्रत्येक ठेव रकमेवर दर साल ०.२५% या दराने अतिरिक्त व्याज दिले जाईल;

(ii) प्रथम अर्जदार जर https://www.bajajfinserv.in/fixed-deposit-application-form?ProductName=FD या संकेत स्थळावर अर्ज भरत असेल तर (सर्व प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन): ₹५ (पाच) कोटी पर्यंतच्या रकमेवर वार्षिक ०.१०% दराने अतिरिक्त व्याज);

प्रत्येक व्यवहारासाठी केवळ वरील विशेष श्रेणींपैकी एका श्रेणीचा लाभ घेता येईल.

ग) एफडी नूतनीकरण करणारे ग्राहक (केवळ वैयक्तिक ग्राहक) – ₹५कोटीपर्यंतच्या आकाराच्या ठेवींवर दर साल ०.१०% हा अतिरिक्त व्याजदर. विशेष प्रवर्ग फायद्याच्या वर हा अतिरिक्त दर लागू होईल. जर ऑनलाईन पद्धतीने नूतनीकरण असेल, तर फक्त नूतनीकरणाचाच अतिरिक्त व्याजदर मिळेल.

घ) ₹५ कोटींहून जास्त रकमेच्या प्रत्येक घाऊक ठेवीसाठी प्रकाशित झालेल्या कार्ड दराहून व्याज दर भिन्न असू शकतो आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने विनिर्दिष्ट केलेल्या व्याज दराच्या मर्यादेमध्ये प्रत्येक प्रकरणानुसार ठरवला जाईल.

ड) ऑनलाईन अर्जामध्ये पहिले ठेव हि तेव्हाच बुक होईल, जेव्हा बजाज फायनान्स ला रक्कम मिळेल. हि रक्कम एका मध्यस्थी काढून कंपनी ला मिळते, त्यामुळे जास्तीत जास्त 5 दिवस बुकिंग साठी लागू शकतात. व्याज त्या दिवसापासून लागू होईल ज्या दिवशी कंपनी ला रक्का मिळेल.

च) परिपक्वतेच्या तारखेपूर्वी विहित कालावधीमध्ये नूतनीकरणाची विनंती प्राप्त न झाल्यास परिपक्वतेच्या तारखेला कंपनी ठेवीची रक्कम परत करेल. ठेवीच्या अर्जामध्ये ठेवीदाराने नमूद केलेल्या बँक खात्यामध्ये एनईएफटी किंवा आरटीजीएस किंवा धनादेशाने (एनईएफटी/आरटीजीएस नाकारले गेल्यास) प्रदान केले जाईल.

छ) ठेवीचे (किंवा त्यातील काही भागाचे) नूतनीकरण करण्याची विनंती ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपूर्वी कामकाजाच्या निदान ३ (तीन) दिवस आधी, कंपनीच्या जवळच्या शाखेला भेट देऊन किंवा टपाल, स्वतंत्र आर्थिक सल्लागार किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे लेखी विनंती पाठवून केली जाऊ शकते, ज्यायोगे कंपनीला देय तारखेला प्रकरणानुसार ठेवीची (किंवा त्यातील काही भागाची) परतफेड आणि/किंवा नूतनीकरण करता येईल. वर नमूद केलेल्या कालावधीनंतर ठेवीच्या नूतनीकरणाच्या कोणत्याही विनंत्या स्वीकारल्या जाणार नाहीत. नूतनीकरणाच्या विनंतीसह सर्व ठेवीदारांनी योग्य प्रकारे भरलेला आणि स्वाक्षरी केलेला ठेवीच्या अर्जाचा फॉर्म असणे आवश्यक आहे. ठेवीचे नूतनीकरण हे नूतनीकरणाच्या तारखेला असलेल्या व्याज दर आणि इतर अटी आणि शर्तींनुसार होईल. ठेवींच्या नूतनीकरणाच्या वेळी विद्यमान ठेवीचा एफडीआर आवश्यक नसेल कारण परिपक्वतेच्या तारखेनंतर तो रद्दबातल होईल.

ज) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी ३ दिवस आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दुरूस्ती झालेल्या नॉन–बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन–बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

**क. कंपनीचे नाव: बजाज फायनान्स लि.**

**ख. गठित केले गेल्याचा दिनांक: 25 मार्च, 1987**

**ग. प्रॉफिटस्/डिव्हिडंडस्:**

वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

| आर्थिक वर्ष रोजी संपले | नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व | कर-पश्चात | लाभांश % |
|---|---|---|---|
| 31.03.2018 | 4,056.36 | 2,646.70 | 200 |
| 31.03.2019 | 6,035.30 | 3,890.34 | 300 |
| 31.03.2020 | 6,808.13 | 4,881.12 | 500 |

**घ ड. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशील:**

संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार–उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकाना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

**च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय:**

| नाव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. राहुल बजाज, (अकार्यकारी संचालक) | बजाज विहार कॉलनी, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे– ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. संजीव बजाज (अध्यक्ष) | बजाज विहार कॉलनी, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे – ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव जैन, (व्यवस्थापकीय संचालक) | डी–२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे –४११ ०१४. | नोकरी |
| श्री. मधूर बजाज (अकार्यकारी संचालक) | बंगला क्र. ३, बजाज विहार कॉलनी, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे –४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव बजाज (अकार्यकारी संचालक) | ३४/३५, योग कोरेगाव पार्क, लेन क्र. २, पुणे –४११०३५. | उद्योगपती |
| श्री दिपक पोद्दार (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ब्रिज कुटीर, रुंगठा लेन, १७ वा मजला, नेपियन सी रोड लगत, मुंबई– ४०० ०२६. | उद्योगपती |
| श्री राजन संघी (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | फ्लॅट क्र. २१, मिस्त्री कोर्ट, ४ था मजला, दिनशॉ वच्छा रोड; मुंबई –४०० ०२०. | व्यवसाय |
| श्री. डी जे बालाजी राव (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | डी–१०३, आदर्श रेसिडेन्सी, ४७ क्रॉस, २ रा मेन, ८ वा ब्लॉक, जयानगर, बंगलोर –५६००८२ | व्यावसायिक |
| डॉ. ओंकार गोस्वामी (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ई–१२१, मस्जिद मॉथ, पहिला मजला, ग्रेटर कैलाश ३, नवी दिल्ली – ११० ०४८. | अर्थशास्त्रज्ञ |
| डॉ. गीता पिरामल (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | पिरामल हाऊस, ६ वा मजला, ६१, पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई –४०० ०२५. | व्यवसाय |
| डॉ नौशाद फोर्ब्स (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ७४ कोरेगाव पार्क, पुणे – ४११ ००१. | व्यवसाय |
| श्री अनामी नारायण राव (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ६२ सागर तरंग, वरळी सी फेस, मुंबई –४०० ०३०. | सामाजिक उद्योजक, सेवानिवृत्त सनदी सेवक |

**च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश**

(₹ कोटींमध्ये)

| | 31 मार्च 2020 रोजी | 31 मार्च 2019 रोजी |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख समकक्ष | 674.53 | 240.00 |
| रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स | 4.83 | 1.69 |
| व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | 171.76 | - |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | 867.18 | 805.38 |
| कर्जे | 1,13,417.08 | 95,181.26 |
| गुंतवणूकी | 20,138.98 | 10,370.41 |
| इतर आर्थिक मालमत्ता | 349.51 | 381.61 |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **1,35,623.87** | **1,06,980.35** |
| **बिगर–आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | 204.57 | 147.80 |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | 847.61 | 660.83 |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | 1,016.16 | 495.84 |
| अमूर्त मालमत्ता | 211.98 | 158.49 |
| इतर बिगर–आर्थिक मालमत्ता | 99.38 | 56.56 |
| **एकूण बिगर–आर्थिक मालमत्ता** | **2,379.70** | **1,519.52** |
| **एकूण मालमत्ता** | **1,38,003.57** | **1,08,499.87** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| देय | | |
| व्यापार देय | | |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | 0.30 | 0.44 |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | 636.76 | 547.25 |
| इतर देय | | |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | - | - |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | 179.46 | 218.64 |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | 41,713.77 | 39,048.97 |
| उधारी (कर्ज रोखे वगळता) | 36,923.32 | 29,970.67 |
| ठेवी | 21,427.10 | 13,193.01 |
| उप–कर्जे | 4,141.75 | 4,139.07 |
| ईतर आर्थिक देणी | 669.90 | 1,411.81 |
| **एकूण आर्थिक देणी** | **105,692.36** | **88,529.86** |
| **बिगर–आर्थिक देणी** | | |
| सध्याचे कराचे देणे (निव्वळ) | 52.10 | 22.37 |
| तरतुदी | 78.87 | 68.88 |
| ईतर बिगर–आर्थिक देणी | 367.03 | 315.13 |
| **एकूण बिगर–आर्थिक देणी** | **498.00** | **406.38** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | 119.99 | 115.37 |
| ईतर इक्विटी | 31,693.22 | 19,448.26 |
| **एकूण मालमत्ता** | **31,813.21** | **19,563.63** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **1,38,003.57** | **1,08,499.87** |

**आकस्मिक देणी (स्टँडअलोन)**

| तपशील | 31 मार्च 2020 रोजी | 31 मार्च 2019 रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरूद्धचे विवादाचे दावे | 44.18 | 28.04 |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | 4.39 | 4.39 |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | 5.14 | 5.14 |
| अपील अंतर्गत सेवा कर बाबी | | |
| – व्याज सबसिडीवर | 1,971.65 | 1,340.49 |
| – दंडव्याज/ चार्जेस यांवर | 223.15 | 245.19 |
| – इतरांबाबत | 6.22 | 5.45 |
| प्राप्तीकराच्या बाबीः | | |
| – कंपनीद्वारे केली गेलेली अपिल्स | 0.32 | 0.32 |
| – प्राप्तीकर विभागाने केलेली अपिल्स | 0.24 | 0.24 |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, 2016 यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: 43,046.58 कोटी**

**ख) प्रत्यक्षात 31.03.2020 रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम आहे : 21,427.10 कोटी**

**ज.** ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार–उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर–निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही ४३.५३ कोटी इतकी आहेत (बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स कंपनी – ५.०२ कोटी, बजाज अलियांझ लाईफ इन्शुरन्स लि. – ५.५९ कोटी, बजाज ऑटो लि. – ०.२५ कोटी, बजाज इलेक्ट्रिकल्स लि. – ०.०८ कोटी, बजाज हाउसिंग फायनान्स लि. – ७.२६ कोटी, जमनालाल सन्स प्रा. लि. – ०.१९ कोटी, आणि मुकुंद लि. – २५.१४ कोटी).

**झ.** ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.

**ञ.** कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः

i) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.

ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही

iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.

iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.

v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती–कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी बँक ऑफ इंडिया घेत नाही.

**ट.** ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.

**ठ.** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मृत्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल

क) ठेव ठेवल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांपर्यंतः काढण्याची परवानगी नाही

ख) ३ महिन्यांनंतर पण ६ महिन्यांच्या आतः व्याज देय असणार नाही.

ग) ६ महिन्यांनंतर पण अंतिम मुदतीच्या दिनांकाआधीः ही योजना चालवली जात आहे त्या कालावधीदरम्यान निश्चित केल्या गेलेल्या व्याजदरापेक्षा २% व्याजदर कमी राहिल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निश्चित केला गेला नसल्याच्या प्रकरणी बीएफएल द्वारे देऊ केल्या गेलेल्या सर्वाधिक कमी दरापेक्षा ३% कमी व्याजदर देय राहिल.

**ड.** असल्यास, शाखांच्या किंवा एककांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार–उदीमः

१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार–उदीमः

ग्राहकांना अर्थ–पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश – वाहन–कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी–सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेत: आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुइझा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहराडून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिंम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क–हाड, कराईकुडी, कर्नाल, करुनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरूक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पाँडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ली, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.

२. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार–उदीमः

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे –४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार–उदीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे –४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

**जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने २१ जुलै २०२० च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि बहुतेक संचालकांनी सह्या केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे.**

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

राजीव जैन
व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०१५५०१५८

पुणे
२७ जानेवारी २०२१

**गुंतवणूक कशी करावी:**

गुंतवणूक केवळ धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे किंवा डेबिट कार्ड द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास ''Bajaj Finance Ltd. for FD of < गुंतवणूकदाराचे नांव> ह्या नावाने करावी. त्यावर 'अकाऊंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS पूर्ततेचा असावा. गुंतवणूक रकमेसह अर्ज प्रपत्र ह बजाज फिनान्स च्या मुदत ठेव वितरकांकडे किंवा बजाज फिनान्स च्या कोणत्याही शाखांकडे द्यावे. नेटबँकिंग द्वारे गुंतवणूक करायची असल्यास ह्या तपशीलाचा वापर करावा: लाभार्थी नावः बजाज फिनान्स लि., बँक खाते क्र.: ZBAJAJFD (बँक खाते क्र. मध्ये अंक नाहीत, CMS कलेक्शन कोड वापरला आहे), बँक खाते प्रकार: करंट खाते, बँकेचे नाव: इंडसइंड बँक लि., आयएफएससी: INDB0000006, बँक शाखा: नरिमन पॉईंट, मुंबई. गुंतवणूक https://www.bajajfinserv.in/fixed-deposit या संकेतस्थळावर किंवा आमच्या वितरकांकडे पण करू शकता.

**अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी** fd@bajajfinserv.in **वर ई-मेल करा किंवा +९१ ८६९८०९०९०९ वर फोन करा.**


# राज्यातील काँग्रेस मंत्र्यांची आज दिल्लीत बैठक

## प्रदेशाध्यक्ष बदल, निवडणुकांबाबत चर्चा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी एच. के. पाटील यांनी राज्यातील काँग्रेसच्या सर्व मंत्र्यांची शनिवारी नवी दिल्ली येथे बैठक आयोजित केली आहे. प्रदेशाध्यक्ष बदल, तसेच पाच राज्यांच्या विधानसभांच्या होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या संदर्भात बैठकीत चर्चा होणार असल्याचे सांगण्यात आले.

राज्याच्या प्रभारीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर एच. के. पाटील यांनी पक्षसंघटनेत बदल करण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेची पुढील वर्षी निवडणूक होणार आहे. काँग्रेसच्या दृष्टीने ही निवडणूक महत्त्वाची आहे. त्याचा विचार करून मुंबई काँग्रेसमध्येही फेरबदल करून भाई जगताप यांच्याकडे अध्यक्षपद सोपविण्यात आले. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष बदलाबाबतही हालचाली सुरू केल्या आहेत.

प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात हे महसूलमंत्री आहेत, तसेच विधिमंडळ पक्षनेतेपदही त्यांच्याकडेच आहे. त्यामुळे प्रदेशाध्यक्षपद अन्य नेत्याकडे सोपविण्याबाबत पक्षात विचार सुरू झाला आहे.

या महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पाटील यांनी मुंबईत पक्षाचे मंत्री, वरिष्ठ नेते, आमदार, पदाधिकारी यांच्या बैठका घेऊन प्रदेशाध्यक्ष बदलाबाबत त्यांची मते जाणून घेतली. त्या वेळी वेगवेगळी मते मांडण्यात आली. प्रदेशाध्यक्ष बदलण्याची एवढी घाई का केली जात आहे, असा प्रश्नही काही आमदारांनी उपस्थित केल्याचे समजते.

एच. के. पाटील यांनी शनिवारी दिल्लीत राज्यातील सर्व काँग्रेस मंत्र्यांची बैठक बोलावली आहे. येत्या आगामी काळात पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, आसाम आणि पुदुचेरी येथील विधानसभांच्या निवडणुका होणार आहेत. बैठकीत प्रदेशाध्यक्ष बदलाबरोबरच या निवडणुकांमध्ये काही जबाबदाऱ्या देण्याबाबत चर्चा होणार असल्याचे सांगण्यात आले.

# महाविद्यालयांबाबत लवकरच घोषणा

उदय सामंत यांची माहिती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबत येत्या दोन-तीन दिवसांत निर्णय जाहीर केला जाईल, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली. तर महाविद्यालये व शिक्षणसंस्था सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी असल्याचे कुलगुरूंनी राज्यपालांबरोबर झालेल्या बैठकीत स्पष्ट केले.

करोनाचा संसर्ग वाढल्याने मार्च २०२० पासून राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे बंद करण्यात आली. त्यानंतर ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले. मागील दोन-तीन महिन्यांपासून करोनाचा प्रादुर्भाव कमी होऊ लागल्यामुळे पहिल्या टप्प्यात २३ नोव्हेंबर २०२० पासून ९ वी ते १२ वीचे वर्ग सुरू करण्यात आले. त्यानंतर २७ जानेवारीपासून ५ वी ते ८ वीचे वर्ग सुरू करण्यात आले.

विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा अंतिम निर्णय लवकरत जाहीर केला जाईल. आरोग्य सुरक्षेची काळजी घेत लगेच पूर्ण क्षमतेने महाविद्यालये सुरू न करता पहिल्या टप्प्यात काही टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती असावी, असा विचार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी शुक्रवारी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंची दूरचित्रसंवाद माध्यमातून बैठक घेऊन महाविद्यालयांचे प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याबाबत आढावा घेतला.


# IndusInd Bank

**CIN:** L65191PN1994PLC076333 **I Regd. Office:** 2401, Gen. Thimmayya Road, Cantonment, Pune - 411 001.
**Corporate Office:** 8th Floor, Tower 1, One Indiabulls Centre, 841 S. B. Marg, Elphinstone Road, Mumbai - 400 013.

**Q3 FY 21 Performance**

Net Profit (Q-o-Q) up by **25%** to **₹830 crs**

Net NPA down to **0.22%**

NIM at **4.12%**

PCR at **87%**

CRAR at **16.34%**

## Unaudited Financial Results for the quarter ended / nine months ended December 31, 2020

(₹ in Lakhs)

| Particulars | Consolidated | | | Standalone | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Quarter ended 31.12.2020 (unaudited) | Nine months ended 31.12.2020 (unaudited) | Quarter ended 31.12.2019 (unaudited) | Quarter ended 31.12.2020 (unaudited) | Nine months ended 31.12.2020 (unaudited) | Quarter ended 31.12.2019 (unaudited) |
| Total income from operations | 888728 | 2630097 | 907455 | 894696 | 2635893 | 907393 |
| Net Profit / (Loss) for the period (before tax, exceptional and / or extraordinary items) | 111004 | 266644 | 171426 | 111976 | 258830 | 170219 |
| Net Profit / (Loss) for the period before tax (after exceptional and / or extraordinary items) | 111004 | 266644 | 171426 | 111976 | 258830 | 170219 |
| Net Profit / (Loss) for the period after tax (after exceptional and / or extraordinary items) | 83041 | 200388 | 130943 | 85276 | 196044 | 130020 |
| Equity Share Capital | 75711 | 75711 | 69307 | 75711 | 75711 | 69307 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Audited Balance Sheet of the previous year) | 3306110 (As at 31.03.2020) | 3306110 (As at 31.03.2020) | 2575901 (As at 31.03.2019) | 3301956 (As at 31.03.2020) | 3301956 (As at 31.03.2020) | 2575773 (As at 31.03.2019) |
| Earnings Per Share (of ₹10 each) (for continuing and discontinued operations) (not annualised) | | | | | | |
| - Basic | 10.97 | 27.79 | 18.89 | 11.27 | 27.18 | 18.76 |
| - Diluted | 10.96 | 27.75 | 18.82 | 11.25 | 27.15 | 18.69 |

Note:

1. The above is an extract of the detailed format of Quarterly / Annual Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Financial Results are available on the Stock Exchange websites (www.bseindia.com and www.nseindia.com) and Bank website www.indusind.com.
2. Information relating to Total Comprehensive Income and Other Comprehensive Income are not furnished as Ind AS is not yet made applicable to banks.

**Mumbai**
**January 29, 2021**

**Sumant Kathpalia**
**Managing Director & CEO**

# साखर महागण्याची शक्यता

## राष्ट्रीय साखर महासंघाचे केंद्राला दरवाढीचे साकडे

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : गेल्या वर्षीची शिल्लक साखर आणि यंदाच्या साखर उत्पादनामुळे साखरेचा अतिरिक्त साठा होणार आहे. परिणामी साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करून हा दर ३१०० रुपयांऐवजी ३८०० रुपये प्रतिक्विंटल करण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाने केंद्र सरकारला दिला आहे. हा प्रस्ताव मान्य झाल्यास साखरेच्या दरात प्रतिकिलोमार्गे दहा रुपयांपर्यंत वाढीची शक्यता आहे.

राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश नाईकनवरे आणि महाराष्ट्र सहकारी साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ यांनी केंद्राला दिलेल्या दरवाढीच्या प्रस्तावाबाबतची माहिती दिली.



नाईकनवरे म्हणाले, साखरेचे विक्रमी उत्पादन होत असले, तरी साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करणे आवश्यक आहे. सध्या ३१०० रुपये प्रतिक्विंटल दर असून, तो ३८०० प्रतिक्विंटल करण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. साखर कारखान्यांना १४ दिवसांमध्ये रास्त व किफायतशीर किंमत (एफआरपी) द्यावी लागते. साखरेच्या उत्पादनाचा खर्च पाहता कारखान्यांना तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे किमान विक्री दरात वाढीचा प्रस्ताव दिला आहे. गेल्या वर्षीची १०७ लाख टन साखर शिल्लक आहे. यंदा आणखी ३१० लाख टन साखरेचे उत्पादन होण्याची शक्यता आहे. परिणामी साखरेचा अतिरिक्त साठा होणार आहे. साखर उत्पादनाबरोबरच कारखाने इथेनॉल निर्मितीकडे वळले आहेत. त्यामुळे यंदा २० लाख टन इथेनॉल निर्मिती होण्याचा अंदाज आहे.

भविष्यात साखर उत्पादनाचे प्रमाण वाढत राहणार असल्याने कारखान्यांनी साखर उत्पादनाऐवजी इथेनॉल निर्मितीवर भर दिला असला, तरी बँकांच्या आर्थिक निकषांमध्ये बसत नसल्याने ७५ साखर कारखान्यांची ३२२१ कोटी रुपयांची कर्ज प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, असे नाईकनवरे यांनी सांगितले.

### ३२२१ कोटी रुपयांची कर्ज प्रकरणे प्रलंबित

इथेनॉल निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी कारखान्यांकडून बँकांकडे कर्जाची मागणी करण्यात येत आहे. आतापर्यंत १२९ कारखान्यांची कर्ज प्रकरणे मंजूर झाली असून संबंधितांना ५८३८ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झाले आहे. त्यापैकी १८ कारखान्यांना ८७५ कोटी रुपयांचे कर्ज मिळाले आहे. १२ कारखान्यांची कर्ज प्रकरणे मंजूर झाली असली, तरी प्रत्यक्षात त्यांना कर्जाची रक्कम मिळालेली नाही. ही रक्कम ५९६ कोटी रुपये आहे. २४ कारखान्यांचे कर्जांचे प्रस्ताव बँकांकडे प्रलंबित असून ११४२ कोटी रुपयांचे हे प्रस्ताव आहेत. मात्र, ७५ कारखाने बँकांच्या आर्थिक निकषांमध्ये बसत नसल्याने ३२२१ कोटी रुपयांची कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत, असेही नाईकनवरे यांनी सांगितले.

# आमदारांचे वाहनचालक तुपाशी; शिक्षणसेवक उपाशी

## मानधनवाढीची प्रतीक्षा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील शिक्षणसेवक सहा ते आठ हजार रुपये मानधनावर काम करत असताना आमदारांच्या वाहनचालकांना दरमहा १५ हजार रुपये देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आर्थिक अडचणींना तोंड देत मानधनवाढीच्या प्रतीक्षेत शिक्षणसेवक काम करत असून, आमदारांचे वाहनचालक तुपाशी आणि शिक्षणसेवक उपाशी असे चित्र आहे.

करोनाच्या प्रादुर्भावानंतर आर्थिक अडचणी निर्माण झाल्याचे राज्य शासनाकडून सातत्याने सांगितले जात आहे. असे असताना विधान मंडळ सदस्यांना त्यांच्या पदाची कार्ये अधिक परिणामकारकपणे पार पाडता येण्यासाठी वाहनचालक सुविधेसाठी सुरुवातीला १५ हजार रुपये दरमहा मानधन १ जानेवारीपासून देण्यास मान्यता देण्यात आल्याचा शासन निर्णय संसदीय कार्य विभागाने ११ जानेवारीला प्रसिद्ध केला आहे. शिक्षणसेवकांकडून मानधनवाढ करण्याच्या मागणीला राज्य शासनाने दाद दिलेली नाही. त्यामुळे आमदारांच्या वाहनचालकांना दरमहा १५ हजार रुपये देण्याच्या निर्णयामुळे शिक्षणसेवकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

'शिक्षणसेवकांच्या मानधनात २०११मध्ये वाढ करण्यात आली. त्यावेळी ही रक्कम सहा हजार, आठ हजार आणि नऊ हजार करण्यात आली. गेल्या दहा वर्षांत झालेली महागाई पाहता शिक्षणसेवकांचे मानधन अत्यल्प आहे. त्यामुळे शिक्षणसेवकांच्या मानधनात वाढ करण्यासाठी बऱ्याच काळापासून पाठपुरावा सुरू आहे. मात्र शासनाच्या निर्णयामुळे आमदारांचे वाहनचालक तुपाशी आणि शिक्षणसेवक उपाशी असे चित्र आहे. राज्य शासनाने आता शिक्षणसेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा तातडीने निर्णय घेतला पाहिजे,' असे डीटीएड, बीएड स्टुडंट्स असोसिएशनचे अध्यक्ष संतोष मगर यांनी सांगितले.

### प्रस्ताव राज्य शासनाला सादर

प्राथमिकच्या शिक्षणसेवकांना सहा हजार, माध्यमिकच्या शिक्षणसेवकाला आठ हजार आणि उच्च माध्यमिकच्या शिक्षणसेवकाला नऊ हजार रुपये मानधन दिले जाते. हे मानधन दुप्पट करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला सादर करण्यात आला आहे, अशी माहिती प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांनी दिली.



संग्रहित छायाचित्र

> करोना काळात आर्थिक अडचणींमुळे केवळ सहाच विभागांसाठी आर्थिक तरतूद उपलब्ध होती. आता परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने शाळांना २० टक्के आणि ३० टक्के अनुदानाचा निर्णय घेतला आहे. शिक्षणसेवकांचे मानधनाबाबतही लवकरच निर्णय घेण्यात येईल.
>
> – वर्षा गायकवाड, शालेय शिक्षणमंत्री

# बदलत्या काळानुसार शिक्षकांनाही नवे प्रशिक्षण

## यूजीसीकडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : बदलत्या काळानुसार शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'मेंटरशिप ऑफ टीचर्स इन नॉन टेक्निकल स्ट्रीम' या मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मूलभूत संवादकौशल्ये, अध्यापन पद्धतींपासून बौद्धिक संपदा, संशोधन आणि नवसंकल्पना, हरित आणि शाश्वत तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रशिक्षण अशा विविध घटकांचा त्यात समावेश असून, या मार्गदर्शक सूचनांच्या मसुद्यावर ६ फेब्रुवारीपर्यंत हरकती आणि सूचना नोंदवता येणार आहेत.

नव्या शैक्षणिक धोरणात शिक्षकांच्या प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे. प्रादेशिक भाषांतून शिकवण्याची क्षमता विकसित करण्यासाठी राष्ट्रीय प्रशिक्षण मोहीम (नॅशनल मिशन फॉर मेंटरिंग), नॅशनल एज्युकेशन टेक्नॉलॉजी फोरम स्थापन करण्याबाबत नव्या शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर यूजीसीने प्रा. ए. सी. पांडे यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती नियुक्त करून शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठीच्या मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. त्यानुसार शिक्षकांना आठ आठवड्यांचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल. नव्या प्रशिक्षणात शिक्षकांना मूलभूत संवाद कौशल्ये, अध्यापन यासह संशोधन आणि नवसंकल्पना, प्रकल्प नियोजन आणि व्यवस्थापन, व्यवसायाधारित संशोधन, बौद्धिक संपदा अधिकार, संस्थात्मक व्यवस्थापन आणि उद्योजकता यासह उदयोन्मुख अध्यापन पद्धती, अध्ययन विश्लेषण, अभ्यासक्रम निर्मिती, आभासी शिक्षण, विदा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्रशिक्षण, हरित आणि शाश्वत तंत्रज्ञान अशा विविध घटकांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. मार्गदर्शक सूचनांचा मसुदा यूजीसीने संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. तसेच, त्यावर ६ फेब्रुवारीपर्यंत हरकती आणि सूचना नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

> शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल होत असल्याने शिक्षकांना सातत्यपूर्ण प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. सध्या रिफ्रेशर कोर्स वगैरे होतात, पण शिक्षकांना त्यांची बदलती भूमिका समजावून सांगितली पाहिजे. त्यासाठीच मार्गदर्शक सूचना तयार करण्यात येत आहेत.
>
> – डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, यूजीसी


# बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961

**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे –४११०३५

कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे–अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे – ४११०१४

## मुदत ठेव योजना

क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएएए (स्टेबल)' रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

**₹५ कोटी पर्यंतच्या पद्धतशीर ठेवींसाठी (सिस्टेमॅटिक डिपॉझिट) वार्षिक व्याज दर (०१ फेब्रुवारी २०२१ पासून लागू) वैध आहे..**

| कालावधी महिन्यांमध्ये | व्याजाचे संचयी दर | | |
|---|---|---|---|
| | ज्येष्ठ नागरिकांव्यतिरिक्त अन्य ठेवीदारांसाठी | विशेष श्रेणी | |
| | | ज्येष्ठ नागरिकांसाठी | ऑनलाईन अर्जदारासाठी |
| १२ – २३ | ६.१५% | ६.४०% | ६.२५% |
| २४ – ३५ | ६.६०% | ६.८५% | ६.७०% |
| ३६ – ६० | ७.००% | ७.२५% | ७.१०% |

क) मासिक ठेव योजनेच्या अंतर्गत प्रत्येक ठेवीची किमान रककम ₹५०००/– असेल.
ख) हि योजना फक्त भारतीय रहिवाश्यांसाठी आहे.
ग) या योजने अंतर्गत प्रत्येक ठेव एक स्वतंत्र मुदत ठेव म्हणून समजली जाईल ज्याची प्रत्येकी वेगळी मुदत ठेव पावती असेल. प्रत्येक ठेवांचा कालावधी हा स्कतंत्र असेल.
घ) मासिक प्राप्ती योजने अंतर्गत, ६ ते ४८ गुंतवणुका ग्राहक करू शकतात. मात्र, एकत्र प्राप्ती योजने अंतर्गत ६ ते ४७ गुंतवणुका ग्राहक करू शकतात:
ङ) मासिक प्राप्ती योजने अंतर्गत प्रत्येक ठेवीचा कालावधी १२ ते ६० महिने असेल
च) मासिक प्राप्ती योजने अंतर्गत प्रत्येक ठेवीचा कालावधी २४ ते ६० महिने असेल आणि सर्व ठेवींची परिपक्वता एकाच तारखेला होईल. त्यामुळे, या योजने अंतर्गत पहिल्या ठेवीचा कालावधी वरील दिलेल्या तख्त्याप्रमाणे असेल व त्यानंतरच्या ठेवींचा कालावधी अश्या तऱ्हेने कमी होत जाईल कि त्या व ठेवींची परिपक्वता एकाच तारखेला होईल.
छ) प्रत्येक गुंतवणुकीच्या दिवशी जो दर चालू असेल तो त्या गुंतवणुकीला लागू होईल.
ज) ऑनलाईन अर्जामध्ये पहिले ठेव हि तेव्हाच बुक होईल, जेव्हा बजाज फायनान्स ला रक्कम मिळेल. हि रक्कम एका मध्यस्थी काढून कंपनी ला मिळते, त्यामुळे जास्तीत जास्त 5 दिवस बुकिंग साठी लागू शकतात. ह्या योजनेमधील उर्वरित ठेवी त्या दिवशी बुक होतील ज्या दिवशी कंपनी ला रक्कम मिळेल. व्याज त्या दिवसापासून लागू होईल ज्या दिवशी कंपनी ला राक्का मिळेल.
झ) या योजने अंतर्गत फक्त संचयी विकल्प आहे. व्याज हा मुद्दलेसोबत गुंतवणूक कालावधी संपल्यावर दिला जाईल.
ञ) या योजने अंतर्गत ग्राहक पहिली गुंतवणूक धनादेशने करायची आहे. त्यानंतरच्या सर्व गुंतवणुका National Automated Clearing House (NACH) पद्धतीने केल्या जातील. जी तारीख ग्राहक अर्ज प्रपत्र मध्ये निवडेल, त्या दिवशी गुंतवणूक होईल. परंतु, गुंतवणूक तोपर्यंत चालू नाही होणार जोपर्यंत NACH चे पंजीकरण होत नाही.
ट) I) जेष्ठ नागरिक जर प्रथम अर्जदार असेल (म्हणजे, वय वर्षे ६० हुन जास्त असलेल्या व्यक्ती, वयाच्या पुराव्याच्या तरतुदी अधीन): ₹५ (पाच) कोटीपर्यंतच्या प्रत्येक ठेव रकमेवर दर साल ०.२५% या दराने अतिरिक्त व्याज दिले जाईल;
ii) आमची ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु झाल्यावर, प्रथम अर्जदार जर https://www.bajajfinserv.in/fixed-deposit-application-form?ProductName=FD या संकेत स्थळावर अर्ज भरत असेल तर (सर्व प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन): ₹ ५ (पाच) कोटी पर्यंतच्या रकमेवर वार्षिक ०.१०% दराने अतिरिक्त व्याज.
प्रत्येक व्यवहारासाठी केवळ वरील विशेष श्रेणींपैकी एका श्रेणीचा लाभ घेता येईल. जर पहिली ठेव ठेवल्या नंतर अर्जदाराची श्रेणी बदलत असेल तर त्याला पुढील ठेवींवर विशेष श्रेणीचा लाभ मिळणार नाही
ठ) एफडी नूतनीकरण करणारे ग्राहक (केवळ वैयक्तिक ग्राहक) – ₹५कोटीपर्यंतच्या आकाराच्या ठेवीवर दर साल ०.१०% हा अतिरिक्त व्याजदर. विशेष प्रवर्ग फायद्याच्या वर हा अतिरिक्त दर लागू होईल.
ड) ₹५ कोटींहून जास्त रकमेच्या प्रत्येक घाऊक ठेवीसाठी प्रकाशित झालेल्या कार्ड दराहून व्याज दर भिन्न असू शकतो आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने विनिर्दिष्ट केलेल्या व्याज दराच्या मर्यादेमध्ये प्रत्येक प्रकरणानुसार ठरवला जाईल.
ढ) परिपक्वतेच्या तारखेपूर्वी विहित कालावधीमध्ये नूतनीकरणाची विनंती प्राप्त न झाल्यास परिपक्वतेच्या तारखेला कंपनी ठेवीची रक्कम परत करेल. ठेवीच्या अर्जामध्ये ठेवीदाराने नमूद केलेल्या बँक खात्यामध्ये एनईएफटी किंवा आरटीजीएस किंवा धनादेशाने (एनईएफटी/आरटीजीएस नाकारले गेल्यास) प्रदान केले जाईल.
ण) जर NACH च्या अंतर्गत पैसे वटले नाहीत, तर ती गुंतवणूक ग्राह्य धरली जाणार नाही आणि NACH पुढच्या महिन्यात परत बँकेत पैसे वटण्याकरता दिला जाईल. असे झाल्यास कालावधी वाढवून दिला जाणार नाही.
त) वरील जाहिरातीत "गुंतवणूक" म्हणजे मासिक NACH पद्धती जी बँकेत पैसे वटण्याकरता दिली जाते.
थ) मासिक प्राप्ती योजने अंतर्गत ठेवींचे (किंवा त्यातील काही भागाचे) नूतनीकरण करण्याची विनंती ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपूर्वी कामकाजाच्या निदान ३ (तीन) दिवस आधी, कंपनीच्या जवळच्या शाखेला भेट देऊन किंवा टपाल, स्वतंत्र आर्थिक सल्लागार किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे लेखी विनंती पाठवून केली जाऊ शकते, ज्यायोगे कंपनीला देय तारखेला प्रकरणानुसार ठेवीची (किंवा त्यातील काही भागाची) परतफेड आणि/किंवा नूतनीकरण करता येईल. वर नमूद केलेल्या कालावधीनंतर ठेवीच्या नूतनीकरणाच्या कोणत्याही विनंत्या स्वीकारल्या जाणार नाहीत. नूतनीकरणाच्या विनंतीसह सर्व ठेवीदारांनी योग्य प्रकारे भरलेला आणि स्वाक्षरी केलेला ठेवीच्या अर्जाचा फॉर्म असणे आवश्यक आहे. ठेवीचे नूतनीकरण हे नूतनीकरणाच्या तारखेला असलेल्या व्याज दर आणि इतर अटी आणि शर्तींनुसार होईल. ठेवींच्या नूतनीकरणाच्या वेळी विद्यमान ठेवीचा एफडीआर आवश्यक नसेल कारण परिपक्वतेच्या तारखेनंतर तो रद्दबातल होईल. एकत्र प्राप्ती योजने अंतर्गत नूतनीकरण केले जाणार नाही. मासिक प्राप्ती योजनेअंतर्गत जर नूतनीकरण केले तर त्याला मुदत ठेवींच्या सर्व अति शर्ती लागू होतील
द) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी ३ दिवस आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.
ध) जर प्राथमिक अर्जदाराचा मृत्यू झाला तर मासिक ठेव योजना संपुष्टात येईल आणि NACH च्या आधारे पुढील ठेवी बनणार नाहीत. मृत्यू पश्चात चे दावे कंपनी अति–शर्ती अनुसार करेल.
दुरूस्ती झालेल्या नॉन–बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन–बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

**क. कंपनीचे नाव: बजाज फायनान्स लि.**
**ख. गठित केले गेल्याचा दिनांक: 25 मार्च, 1987**
**ग. प्रॉफिट्स/डिव्हिडंड्स:**
वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा. (₹ कोटींमध्ये)

| आर्थिक वर्ष रोजी संपले | नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व | कर-पश्चात | लाभांश % |
|---|---|---|---|
| 31.03.2018 | 4,056.36 | 2,646.70 | 200 |
| 31.03.2019 | 6,035.30 | 3,890.34 | 300 |
| 31.03.2020 | 6,808.13 | 4,881.12 | 500 |

**घ. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशील:**
संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार–उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकाना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

**ङ. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसाय:**

| नाव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. राहुल बजाज, (अकार्यकारी संचालक) | बजाज विहार कॉलनी, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे– ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. संजीव बजाज (अध्यक्ष) | बजाज विहार कॉलनी, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे – ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव जैन, (व्यवस्थापकीय संचालक) | डी–२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे –४११ ०१४. | नोकरी |
| श्री. मधूर बजाज (अकार्यकारी संचालक) | बंगला क्र. ३, बजाज विहार कॉलनी, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे –४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव बजाज (अकार्यकारी संचालक) | ३४/३५, योग कोरेगाव पार्क, लेम क्र. २, पुणे –४११०३५. | उद्योगपती |
| श्री दिपक पोद्दार (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ब्रिज कुटीर, रुंगठा लेन, १७ वा मजला, नेपियन सी रोड लगत, मुंबई– ४०० ०२६. | उद्योगपती |
| श्री राजन संघी (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | फ्लॅट क्र. २१, मिस्त्री कोर्ट, ४ था मजला, दिनशॉ वच्छा रोड; मुंबई –४०० ०२०. | व्यवसाय |
| श्री. डी जे बालाजी राव (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | डी–१०३, आदर्श रेसिडेन्सी, ४७ क्रॉस, २ रा मेन, ८ वा ब्लॉक, जयानगर, बंगलोर –५६००८२ | व्यावसायिक |
| डॉ. ओंकार गोस्वामी (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ई–१२१, मस्जिद मॉथ, पहिला मजला, ग्रेटर कैलाश ३, नवी दिल्ली – ११० ०४८. | अर्थशास्त्रज्ञ |
| डॉ. गीता पिरामल (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | पिरामल हाऊस, ६ वा मजला, ६१, पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई –४०० ०२५. | व्यवसाय |
| डॉ नौशाद फोर्ब्स (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ७४ कोरेगाव पार्क, पुणे – ४११ ००१. | व्यवसाय |
| श्री अनामी नारायण राव (अकार्यकारी स्वतंत्र संचालक) | ६२ सागर तरंग, वरळी सी फेस, मुंबई –४०० ०३०. | सामाजिक उद्योजक, सेवानिवृत्त सनदी सेवक |

**च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश**

(₹ कोटींमध्ये)

| | 31 मार्च 2020 रोजी | 31 मार्च 2019 रोजी |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख समकक्ष | 674.53 | 240.00 |
| रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स | 4.83 | 1.69 |
| व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | 171.76 | - |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | 867.18 | 805.38 |
| कर्जे | 1,13,417.08 | 95,181.26 |
| गुंतवणूकी | 20,138.98 | 10,370.41 |
| इतर आर्थिक मालमत्ता | 349.51 | 381.61 |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **1,35,623.87** | **1,06,980.35** |
| **बिगर–आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | 204.57 | 147.80 |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | 847.61 | 660.83 |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | 1,016.16 | 495.84 |
| अमूर्त मालमत्ता | 211.98 | 158.49 |
| इतर बिगर–आर्थिक मालमत्ता | 99.38 | 56.56 |
| **एकूण बिगर–आर्थिक मालमत्ता** | **2,379.70** | **1,519.52** |
| **एकूण मालमत्ता** | **1,38,003.57** | **1,08,499.87** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| देय | | |
| व्यापार देय | | |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | 0.30 | 0.44 |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोंची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | 636.76 | 547.25 |
| इतर देय | | |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | - | - |
| –छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोंची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | 179.46 | 218.64 |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | 41,713.77 | 39,048.97 |
| उधारी (कर्ज रोखे वगळता) | 36,923.32 | 29,970.67 |
| ठेवी | 21,427.10 | 13,193.01 |
| उप–कर्जे | 4,141.75 | 4,139.07 |
| ईतर आर्थिक देणी | 669.90 | 1,411.81 |
| **एकूण आर्थिक देणी** | **105,692.36** | **88,529.86** |
| **बिगर–आर्थिक देणी** | | |
| सध्याचे कराचे देणे (निव्वळ) | 52.10 | 22.37 |
| तरतुदी | 78.87 | 68.88 |
| ईतर बिगर–आर्थिक देणी | 367.03 | 315.13 |
| **एकूण बिगर–आर्थिक देणी** | **498.00** | **406.38** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | 119.99 | 115.37 |
| ईतर इक्विटी | 31,693.22 | 19,448.26 |
| **एकूण मालमत्ता** | **31,813.21** | **19,563.63** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **1,38,003.57** | **1,08,499.87** |

**आकस्मिक देणी (स्टँडअलोन)**

| तपशील | 31 मार्च 2020 रोजी | 31 मार्च 2019 रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरूद्धचे विवादाचे दावे | 44.18 | 28.04 |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | 4.39 | 4.39 |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | 5.14 | 5.14 |
| अपील अंतर्गत सेवा कर बाबी | | |
| – व्याज सबसिडीवर | 1,971.65 | 1,340.49 |
| – दंडव्याज/ चार्जेस यांवर | 223.15 | 245.19 |
| – इतरांबाबत | 6.22 | 5.45 |
| प्राप्तीकराच्या बाबीः | | |
| – कंपनीद्वारे केली गेलेली अपिल्स | 0.32 | 0.32 |
| – प्राप्तीकर विभागाने केलेली अपिल्स | 0.24 | 0.24 |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, 2016 यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: 43,046.58 कोटी**
**ख) प्रत्यक्षात 31.03.2020 रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम आहे : 21,427.10 कोटी**

**ज.** ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार–उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर–निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही ४३.५३ कोटी इतकी आहेत (बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स कंपनी – ५.०२ कोटी, बजाज अलियांझ लाईफ इन्शुरन्स लि. – ५.५९ कोटी, बजाज ऑटो लि. – ०.२५ कोटी, बजाज इलेक्ट्रिकल्स लि. – ०.०८ कोटी, बजाज हाउसिंग फायनान्स लि. – ७.२६ कोटी, जमनालाल सन्स प्रा. लि. – ०.१९ कोटी, आणि मुकुंद लि. – २५.१४ कोटी).

**झ.** ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.

**ञ.** कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः
I) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.
ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही
iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.
iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.
v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती–कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी बँक ऑफ इंडिया घेत नाही.

**ट.** ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.

**ठ.** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मृत्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल
क) ठेव ठेवल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांपर्यंतः काढण्याची परवानगी नाही
ख) ३ महिन्यांनंतर पण ६ महिन्यांच्या आतः व्याज देय असणार नाही.
ग) ६ महिन्यांनंतर पण अंतिम मुदतीच्या दिनांकाआधीः ही योजना चालवली जात आहे त्या कालावधीदरम्यान निश्चित केल्या गेलेल्या व्याजदरापेक्षा २% व्याजदर कमी राहिल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निश्चित केला गेला नसल्याच्या प्रकरणी बीएफएल द्वारे देऊ केल्या गेलेल्या सर्वाधिक कमी दरापेक्षा ३% कमी व्याजदर देय राहिल.

**ड.** असल्यास, शाखांच्या किंवा एककांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार–उदीमः
१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार–उदीमः
ग्राहकांना अर्थ–पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश – वाहन–कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी–सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेत: आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुझ्झा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहराडून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिंम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क–हाड, कराईकुडी, कर्नाल, करुनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरूक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पाँडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ली, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.
२. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार–उदीमः

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे –४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार–उदीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई–पुणे रोड, आकुर्डी, पुणे –४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

**जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने २१ जुलै २०२० च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि बहुतेक संचालकांनी सह्या केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे. मुदत ठेवीचा अर्ज आणि KYC च्या पूर्तीनंतरच अति–शर्ती च्या अनुसार ठेव घेतली जाईल.**

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

राजीव जैन
व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०१५५०१५८

पुणे
२७ जानेवारी २०२१

**गुंतवणूक कशी करावी:**
गुंतवणूक केवळ धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे किंवा डेबिट कार्ड द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास ''Bajaj Finance Ltd. for FD of < गुंतवणूकदाराचे नांव> ह्या नावाने करावी. त्यावर 'अकाऊंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS पूर्ततेचा असावा. गुंतवणूक रकमेसह अर्ज प्रपत्र ह बजाज फिनान्स च्या मुदत ठेव वितरकांकडे किंवा बजाज फिनान्स च्या कोणत्याही शाखांकडे द्यावे. नेटबँकिंग द्वारे गुंतवणूक करायची असल्यास ह्या तपशीलाचा वापर करावा: लाभार्थी नावः बजाज फिनान्स लि., बँक खाते क्र.: ZBAJAJFD (बँक खाते क्र. मध्ये अंक नाहीत, CMS कलेक्शन कोड वापरला आहे), बँक खात्याचे प्रकार: करंट खाते, बँकेचे नाव: इंडसइंड बँक लि., आयएफएससी: INDB0000006, बँक शाखा: नरिमन पॉईंट, मुंबई. गुंतवणूक https://www.bajajfinserv.in/fixed-deposit या संकेतस्थळावर किंवा आमच्या वितरकांकडे पण करू शकता.
**अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी** fd@bajajfinserv.in **वर ई-मेल करा किंवा +९१ ८६९८०१०१०१ वर फोन करा.**



ZenSar

**झेन्सार टेक्नॉलॉजीज् लिमिटेड**
**सीआयएन नं.:** एल७२२००पीएन१९६३पीएलसी०१२६२१
**नोंदणीकृत कार्यालय :** झेन्सार नॉलेज पार्क, प्लॉट # ४, एमआयडीसी, खराडी, नगर रोड जवळ, पुणे–४११०१४. **फोन :** ०२०–६६०५७५००
**ई–मेल:** investor@zensar.com **संकेतस्थळ :** www.zensar.com

## पोस्टल बॅलट आणि दूरस्थ ई–मतदानाबाबत माहितीसाठी सूचना

कंपनीज ॲक्ट, २०१३ (ॲक्ट)चे कलम ११० आणि असल्यास अन्य तरतुदी आणि त्यासह वाचल्या जाणाऱ्या कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) रुल्स, २०१४ जे वेळोवेळी अस्तित्वात आहेत (''रुल्स'')(कायदेशीर सुधारणा आणि फेर–अंमलबजावणी), सर्वसाधारण परिपत्रक क्र.१४,१७,२२,३३ आणि ३९/२०२० दिनांक अनुक्रमे ८ एप्रिल २०२०, १३ एप्रिल २०२०, १५ जून २०२०, २८ सप्टेंबर २०२० आणि ३१ डिसेंबर २०२० जे कंपनी व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए सर्क्युलर्स'') जारी केलेले परिपत्रक आणि अन्य लागू असलेले कायदे आणि नियम यांच्या अधीन राहून, कंपनीच्या सभासदांची पुढे नमूद करण्यात आलेला ठराव (आलेले ठराव) मंजूर करण्यासाठी पोस्टल बॅलटद्वारे, दूरस्थ ई–मतदानामार्फत अनुमती घेण्यात येत आहे.

| अनु. क्र. | तपशील |
|---|---|
| १. | अजयसिंह भुटोरिया (डीआयएन: ०९०१३८६२) यांची १२ जानेवारी, २०२१ पासून कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करणे आणि मानधन निश्चित करणे. |
| २. | माजी कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप किशोर यांना मानधन प्रदान करणे |

एमसीए परिपत्रकांची पूर्तता करुन, तपशील असलेले निवेदन (''नोटीस'') आणि पोस्टल बॅलटची सूचना शुक्रवार, २९ जानेवारी २०२१ रोजी, इलेक्ट्रॉनिक पध्दतीने अशा सभासदांना पाठविण्यात येत आहे की, ज्यांचे ई–मेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी पार्टीसिपंट (सिपंटस्) यांच्याकडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांची नावे कट–ऑफ–डेटला म्हणजे शुक्रवार २२ जानेवारी २०२१ रोजी रजिस्टर ऑफ मेंबर्स / रेकॉर्ड ऑफ डिपॉझिटरीज् यांच्याकडे आहेत. सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ **www.zensar.com**, केफिन टेक्नॉलॉजीज् प्रा. लि.चे संकेतस्थळ **www.evoting.kfintech.com**, बीएसई लिमिटेड यांचे संकेतस्थळ **www.bseindia.com**, आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लि. यांचे संकेतस्थळ **www.nseindia.com** येथेही उपलब्ध आहे. कट–ऑफ डेटला जी व्यक्ती सभासद नाही, तिने ही सूचना फक्त माहितीच्या हेतूने आहे असे समजावे. सभासदांनी त्यांचा होकार अथवा नकार दूरस्थ ई–मतदानाद्वारे कळवावा.

सदर कायद्याचे सेक्शन १०८ सह वाचल्या जाणाऱ्या रूल २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिसक्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ चे रेग्युलेशन ४४, मधील तरतुदींनुसार कंपनीने आपल्या सर्व सभासदांना दूरस्थ ई–मतदानाची सुविधा पुढे नमूद केलेल्या कालावधीत त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यासाठी केफिन टेक्नॉलॉजीज् प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची कार्वी फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड) जी कंपनीची रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट (केफिनटेक किंवा आरटीए) आहे यांची सेवा प्राप्त केली आहे आणि मतदानाचा कालावधी संपल्यानंतर ही पद्धती दूरस्थ ई–मतदानासाठी बंद होईल.

| | |
|---|---|
| **दूरस्थ ई–मतदान सुरू होण्याची तारीख आणि वेळ :** | सोमवार, ०१ फेब्रुवारी, २०२१ (सकाळी ९.०० वाजता, भारतीय प्रमाणवेळ) |
| **दूरस्थ ई–मतदान संपण्याची तारीख आणि वेळ :** | मंगळवार, ०२ मार्च, २०२१ (सायंकाळी ५.०० वाजता, भारतीय प्रमाणवेळ) |

कट–ऑफ–डेटला म्हणजे शुक्रवार, २२ जानेवारी, २०२१ रोजी ज्या सभासदांची नावे रजिस्टर ऑफ मेंबर्स/रेकॉर्ड ऑफ डिपॉझिटरीज् यांच्याकडे नोंदणीकृत आहे त्यांनाच फक्त दूरस्थ ई–मतदानाची सुविधा उपलब्ध होईल. एकदा सभासदाने मतदान केले की, त्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. जे सभासद कंपनीचे समभाग अप्रत्यक्ष पद्धतीत, प्रत्यक्ष पद्धतीत धारण करतात त्या सभासदांसाठी आणि ज्या सभासदांनी त्यांचे ई–मेल नोंदविलेले नाहीत, त्यांसाठी दूरस्थ ई–मतदान पध्दतीद्वारे मतदानाची तपशीलवार माहिती व सुचना या सूचनेचा एक भाग आहेत.

कंपनीच्या संचालक मंडळाने श्रीधर मुदलियार (एफसीएस ६१५६) आणि ते उपलब्ध नसल्यास शीतल जोशी (एफसीएस १०४८०) मे. एसव्हीडी ॲण्ड असोसिएट्स, प्रॅक्टीसिंग कंपनी सेक्रेटरीज यांची पारदर्शक पध्दतीने पोस्टल बॅलट प्रक्रिया (दूरस्थ ई–मतदनद्वारा) पूर्ण करण्यासाठी निरिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. दूरस्थ ई–मतदानाद्वारे करण्यात आलेल्या पोस्टल बॅलटचा निकाल (निरिक्षकांच्या अहवालासह) गुरुवार, दि. ०४ मार्च, २०२१ रोजी सायं. ५.०० वा. किंवा त्यापूर्वी (भारतीय प्रमाणवेळ) जाहीर करण्यात येईल. सदरचे निकाल कंपनीचे संकेतस्थळ **www.zensar.com**, केफिन टेक चे संकेतस्थळ **https://evoting.kfintech.com** वर घोषित करण्यात येईल, त्याचबरोबर डिपॉझिटरीज्, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड आणि बीएसई लिमिटेड यांना कळविण्यात येईल.

जर कोणतीही शंका असेल तर नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि सभासदांसाठी असलेले ई–वोटिंग यूजर मॅन्युअल जे **https://evoting.kfintech.com** येथे डाऊनलोडस् सेक्शनमध्ये उपलब्ध आहे ते पहावे किंवा टोल फ्री नं. १८०० ३४५ ४००१ वर संपर्क साधावा किंवा एस.व्ही. राजू, उप महाप्रबंधक, मे. केफिन टेक्नॉलॉजीज् प्रायव्हेट लिमिटेड, टॉवर बी, प्लॉट नं. ३१–३२, गाचिबोली फाईनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानक्रमगुडा, हैद्राबाद – ५०० ०३२ याच्याकडे त्यासाठी असलेला ई–मेल आयडी **einward.ris@kfintech.com** येथे किंवा फोन नं. ०४० ६७१६ २२२२ येथे संपर्क साधावा.

कंपनीच्या ज्या सभासदांनी त्यांचे ई–मेल आयडी नोंदविलेले नाही / अद्ययावत केलेले नाहीत त्यांनी पुढील प्रक्रिया पूर्ण करुन आपले ई–मेल आयडी नोंदवावेत / अद्ययावत करावेत.

| | |
|---|---|
| **प्रत्यक्ष धारण करणारे** | कंपनीच्या आरटीए यांच्याकडे **einward.ris@kfintech.com** वर ई–मेल पाठवून विनंतीपत्र, फोलिओ नं., भागधारकाचे नाव, आणि समभाग प्रमाणपत्राची स्कॅन कॉपी (पुढील आणि मागील बाजू), पॅन कार्ड (स्वयंसाक्षांकित पत्र) आणि आधार कार्ड (स्वयंसाक्षांकित स्कॅन कॉपी) यासह संपर्क साधावा. |
| **डीमॅट धारणा** | संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटशी संपर्क साधावा. |

**झेन्सार टेक्नॉलॉजीज् लिमिटेड साठी**

**ठिकाण :** पुणे
**दिनांक :** २९ जानेवारी, २०२१

**गौरव टोंगिया**
कंपनी सचिव

# नवसाम्राज्यवादाची नवलक्षणे...

**‘अमेरिकेचा साम्राज्यवादी - किंवा ‘नवसाम्राज्यवादी’- कृतिकार्यक्रम आता तरी बदलेल का?’ हा प्रश्न डोनाल्ड ट्रम्प यांच्या पराभवानंतरच्या आणि ‘डेमोक्रॅटिक’ जो बायडेन अध्यक्षस्थानी आल्यानंतरच्या सकारात्मक वातावरणातही का विचारला पाहिजे, हे सांगणाऱ्या पुस्तकाविषयी...**

**अभिजीत ताम्हणे**

**जगभरच्या लोकशाहीप्रेमी,** न्यायप्रेमी मानवांना ‘अमेरिकेची संयुक्त संस्थाने’नामक- पण ‘अमेरिका’ म्हणूनच सहसा ओळखल्या जाणाऱ्या- देशातील राष्ट्राध्यक्ष निवडणुकीच्या निकालानंतर हायसे वाटले. ‘ट्रम्प संहार जाहला’ अशा आनंदाचे तरंग उमटले. अमेरिकी डेमोक्रॅटिक पक्षाला बराक ओबामांच्या निवडीनंतर जणू काही वंचितांचा पक्ष असल्यागत वलय प्राप्त झालेले होते; त्या वलयाची प्रभा ट्रम्प यांच्या उच्छादामुळे टिकूनही राहिलेली होती, त्याचा सारा फायदा नवे अमेरिकी राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांना मिळत असल्याचे दिसले. अशा छान छान आनंदी वगैरे वातावरणात काही जण एकच प्रश्न विचारू इच्छितात : ‘अमेरिकेचा साम्राज्यवादी- किंवा ‘नवसाम्राज्यवादी’- कृतिकार्यक्रम आता तरी बदलेल का?’

- ‘नाही बदलणार!’ हे या प्रश्नाचे उत्तर, तो विचारणाऱ्या बहुतेकांना माहीत असते. अमेरिकेने जगभरच्या लहान-मध्यम आकाराच्या अनेक देशांमध्ये गेल्या सुमारे ७० वर्षांत जे काही राजकीय उत्पात घडवून आणले, ते पडताळून पाहिल्यास हे उत्तर खरेही असते. पण हा प्रश्न विचारणारे किंवा त्याचे उत्तर माहीत असणारे हल्ली फारच थोडे... त्याहून अधिक असे जे बहुसंख्य, त्यांना स्वतःच्या देशापासून पळ काढण्यासाठी अमेरिका हाच उत्तम आधार वाटतो. अगदी भारतीयांनाही, आपल्या कुणा नातलगाला वा कुटुंब-सदस्याला ‘ग्रीनकार्ड’ मिळाले याचाच आनंद असतो (तोही ट्रम्प हिरावून घेऊ पाहात होते). ‘नवसाम्राज्यवाद’ हा अमेरिकेचा काळाकुट्ट इतिहास आणि वर्तमान आहे, याची फिकीर या बहुसंख्यांना नसते. तशी फिकीर असावी, अमेरिकेचा हा इतिहास सर्वांना माहीत व्हावा, यासाठी विजय प्रशाद यांनी ‘वॉशिंग्टन बुलेट्स’ हे छोटेखानी म्हणावे असे पुस्तक, अगदी सोप्या भाषेत लिहिलेले आहे.

सन १८२३ च्या ‘मन्रो डॉक्ट्रीन’पासून ते आताच्या कोविडकाळापर्यंतचे दाखले या पुस्तकात असले, तरी त्याचा भर १९४५ नंतरच्या घडामोडींवर आहे (असे का, ते नंतर पाहू). ‘मन्रो डॉक्ट्रीन’ हे ‘अमेरिका खंडात युरोपची लुडबुड नको’ असे ठणकावणारे धोरण तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जेम्स मन्रो यांच्या कारकीर्दीत अमलात आले. मन्रोकाळातील परराष्ट्रमंत्री जॉन क्विन्सी ॲडॅम्स याने ते आखले आणि राबवले. म्हणजे काय केले? तर युरोपऐवजी अमेरिकेनेच या अमेरिका खंडातील (विशेषतः दक्षिण अमेरिका भागातील) देशांत लुडबुड करावी, हे तत्त्व ॲडॅम्सने इतके रेटले की अन्य देशांनी त्यापुढे हात टेकले. परिणामी पुढे, १८६० च्या दशकाअखेरपर्यंत मेक्सिकोचा बराच भाग तसेच टेक्सास प्रांत अमेरिकेने गिळंकृतच केले. हा अमेरिकी विस्तारवाद होता. सामोआ बेटे (१८८९), हवाई बेटे (१८९३), पनामा (१९०३), होंडुरास (१९०३-२५), निकाराग्वा (१९१२), मेक्सिको (१९१३), हैती (१९१५)... अशा तऱ्हेने हे विस्तारवादी धोरण सोकावले आणि १९४५ मध्ये ‘दोस्तराष्ट्रां’चा विजय झाल्यावर त्याला नवी, ‘जागतिक लोकशाही व्यवस्थे’ची भाषा मिळाली! - हा इतिहास या पुस्तकात येतोच, पण उदाहरणार्थ, निकाराग्वात घुसखोरीच कशी केली, ती करण्याची काहीही गरजच कशी नव्हती, याचीही कल्पना देतो.

लेखकाने हा इतिहास अगदी थोडक्यात- कल्पनाच येण्याइतपत ओझरता मांडला आहे आणि मग विषयांतराचा धोका पत्करून निराळा, पण महत्त्वाचा विषय हाताळला आहे. साम्राज्यवादाला आंतरराष्ट्रीय सैद्धान्तिक बैठक कशी मिळत गेली आणि तिच्यातील फोलपणा दाखवण्याचे ठाम प्रयत्नही अन्य देशांनी पुढल्या काळात कसे केले, हा तो विषय. १९१९ च्या ‘लीग ऑफ नेशन्स’पासूनच साम्राज्यवादाला जणू शिष्टाचार कसे मानले गेले, हे दाखवून देताना लेखक अनेक मुद्दे मांडतो. या लीगमध्ये ब्रिटनसारख्या शासक देशांना, भारतासारख्या तेव्हाच्या शासित देशांच्या ‘वतीने’ मत देण्याची मुभा मिळाली. या संदर्भात, ‘राजकारण’ या भारतीय नियतकालिकाच्या नोव्हेंबर-१९१९ च्या अंकाने ‘भारताला याचा



काहीही लाभ नाही’ अशी साधार टीका केली होती. मुळात ‘आंतरराष्ट्रीय कायद्या’ची पायाभरणीच असल्या विषमतावादी, भेदभावमूलक तत्त्वांवर कशी झाली, हे सांगताना लेखकाने दाखला दिला आहे तो १८९४ मध्ये आंतरराष्ट्रीय कायद्याचे पहिले पाठ्य-पुस्तक लिहिणारे केम्ब्रिज विद्यापीठातील प्रोफेसर जॉन वेस्टलेक यांचा. ‘नेटिव्हांना’ आंतरराष्ट्रीय कायदा असंस्कृत-असभ्य मानतो आणि वसाहतवादी ‘सभ्य’ देशांनी जर या ‘असभ्यां’वरला ताबा सोडला तर ते आपसांत झगडतील, टापूत हाहाकार माजेल आणि तो टाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करणारे ‘सभ्य’ देश असणे आवश्यकच आहे, असे या वेस्टलेक यांचे तर्कट. ते पुढे ‘मायबाप सरकार’ या संकल्पनेशी भिडणारेच असले तरी तो विषय या पुस्तकाचा नव्हे. या पुस्तकात हे अवतरण येते ते, वेस्टलेक यांच्यासारख्यांकडून वसाहतवादी मानसिकतेचे आंतरराष्ट्रीयीकरण कसे होत गेले आणि अमेरिकेच्या कृत्यांमध्ये आजसुद्धा दिसणारी निरर्गल बेमुर्वतखोरी नेमकी कुठून आली, याचा नेमका छडा लावण्यासाठी!

वसाहतवाद ते नवसाम्राज्यवाद या प्रवासाची पाळेमुळे खोदणारे हे विषयांतर, हाच या तीन भागांच्या पुस्तकाचा प्राण आहे. लेखकाने एका मुलाखतीत सांगितले की, तो मी सलग लिहून काढला... त्या सलगपणातला त्वेष या भागात पुरेपूर उतरला आहे. लेखक कुणालाही दोषदर्शक विशेषणे लावत नाही. पुस्तकातील बहुतेक वाक्यांची रचना ही तथ्यनिरूपणाच्या अंगानेच जाणारी आहे. त्यामुळेच, वेस्टलेक ज्यांना ‘सभ्य’ म्हणतो ते देश प्रत्यक्षात किती कोते होते आणि आदर्श जगाचे स्वप्न पाहण्यात ते किती कमी पडले, हे थेट न सांगता या पुस्तकात- पहिल्या भागातच- ‘तिसऱ्या जगाचा प्रकल्प आणि अलिप्ततावाद’ हे आणखी एक विषयांतर आवश्यक ठरते. ते करताना लेखकाने ‘तिसऱ्या जगा’च्या संकल्पनेमध्ये एकमेकांचा आदर व त्यातून येणारा अनाग्रहीपणा, स्पर्धेऐवजी सहकार्य ही तत्त्वे कशी उदात्त होती याची जाण वाचकाला दिली आहे आणि अमेरिकेसारख्या देशाने ‘लोकशाही’ची वटवट करीत दुसऱ्या स्वतंत्र-स्वायत्त देशामध्ये लुडबुड करण्यातून या तत्त्वांना कसे पायदळी तुडवले जाते, याचे भानही देऊ केले आहे. पुस्तकाचा हा भाग इतिहासकथनाचा वापर तत्त्वचर्चेसाठी करणारा ठरतो आणि म्हणूनच अनेकदा त्याची चर्चा अधिक होते, होत राहील.

दुसरा भाग ‘नवसाम्राज्यवाद’ ही संकल्पना स्पष्ट करणारा आहे. वरवर पाहता ‘मुक्त’ आणि ‘सरकारी हस्तक्षेपविहीन’ भासणाऱ्या भांडवलशाहीतील सत्ताधारी वर्गाने बड्या कॉर्पोरेट्सना- उद्योगसमूहांनाच ‘सत्तादायक’ मानून, त्यांच्या हितरक्षणासाठी केलेले वर्चस्ववादी शोषण म्हणजे नवसाम्राज्यवाद... पण अशी एखादी व्याख्या थेटपणे करण्यापेक्षा, लेखक ग्वाटेमाला आणि ‘युनायटेड फ्रूट’ यांचे उदाहरण देतो. या अमेरिकी कंपनीने ग्वाटेमालात घेतलेली दोन लाख एकर (सुमारे ८०९ चौरस किलोमीटर) जमीन ग्वाटेमालाचे तत्कालीन अध्यक्ष याकोबो आर्बेन्झ यांनी १९५३ सालात, ‘शेतजमीन सुधार (फेरवाटप)’ कार्यक्रमाचा भाग म्हणून सरकारजमा केली. यामुळे ‘युनायटेड फ्रूट’ ही अमेरिकी कंपनीच नव्हे तर तिच्या मालकांची ज्यांच्याशी ‘थेट ओळख’ होती, ते अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ड्वाइट आयसेनहॉवरही खवळले. मग सुरू झाला खास ‘अमेरिकी अपप्रचारा’चा अंक... आर्बेन्झ यांना राज्यकारभार करता येत नाही, पाहा पाहा लोक कसे दुःखी आहेत, तरीही पाहा लोक पेटून उठत नाहीत... वगैरे! अखेर, आर्बेन्झ यांना सत्तेवरून खाली खेचूनच अमेरिका थांबली. याच प्रकारचे सत्ताबदल- इतक्या उघडपणे एकाच कंपनीसाठी नसले तरी आर्थिक हेतूंसाठीच- अमेरिकेने अनेक देशांमध्ये केले. त्या संचिताचे सार काढताना लेखकाने नऊ मुद्दे मांडले आहेत. पुस्तकाच्या ‘वॉशिंग्टन बुलेट्स’ या नावामध्ये जो दुहेरी अर्थ ‘बुलेट्स म्हणजे बंदुकीच्या गोळ्या आणि बुलेट्स म्हणजे एकाखाली एक लिहिलेले मुद्देदेखील’ म्हणून दडलेला आहे; त्यापैकी दुसऱ्या अर्थाचे सार्थक करणारा हा भाग आहे. हे नऊ मुद्दे असे : (१) ‘लोक’भावना ‘जागृत’ करणे, (२) जमिनीवर योग्य माणूस नेमणे, (३) लष्करी अधिकाऱ्यांनाही तयार ठेवणे, (४) अर्थव्यवस्थेला टाहो फोडण्यास भाग पाडणे, (५) राजनैतिकदृष्ट्या वाळीत टाकणे, (६) मोठमोठी आंदोलने घडवून आणणे, (७) योग्य वेळेची (सिग्नलचा दिवा हिरवा होण्याची) वाट पाहणे, (८) हत्या-अभ्यास आणि (९) हे आम्ही केलेलेच नाही असे भासवणे.



**‘वॉशिंग्टन बुलेट्स’**
लेखक : **विजय प्रशाद**
प्रकाशक : **लेफ्टवर्ड बुक्स**
पृष्ठे : **१६२,** किंमत : **२५० रुपये**

ही नऊही सूत्रे भरपूर उदाहरणांनिशी सांगण्यासाठी लेखकाने थेट अमेरिकी ‘सीआयए’ या गुप्तचर यंत्रणेच्या असंख्य कागदपत्रांचा, कित्येक सीआयए अधिकाऱ्यांनी लिहिलेल्या आठवणीवजा पुस्तकांचा तसेच राफाएल क्विन्टेरो, टायलर ड्रमहेलर आणि दिवंगत चक कोगान या माजी सीआयए एजंटांच्या मुलाखतींचा आधार घेतला आहे. पुस्तकाचे अखेरचे प्रकरण ‘सोर्सेस’ (माहितीस्रोत) सांगणारेच आहे! पण अमेरिकी नवसाम्राज्यवादी उचापतींची ही स्थलकालसिद्ध नऊ सूत्रे सांगून न थांबता पुढेही, अमेरिकेच्या निमित्ताने एकंदर भांडवलशाहीची वाटचाल नेहमी नवसाम्राज्यवादाकडे कशी होते, असे सांगण्याचा प्रयत्न तिसऱ्या भागात केलेला आढळेल. लेखक विजय प्रशाद हे साम्यवादी विचारांकडे झुकलेले असल्याचा ‘त्रास’ जो काही होईल तो या तिसऱ्या प्रकरणात. बाकी पुस्तक मात्र कोणत्याही विचारधारेच्या वाचकांना शहाणे करणारेच आहे!

abhijeet.tamhane@expressindia.com

# संस्कृतीच्या आत्महत्येचा ‘डिस्टोपिया’

**अव-काळाचे आर्त**
**अभिजीत रणदिवे**

**जगाकडे आणि स्वत:कडेही तिरकसपणे पाहणाऱ्या फ्राँस्वा या पॅरिसस्थित मध्यमवयीन प्राध्यापकाभोवती फिरणारी ही कादंबरी ‘पाश्चात्त्य संस्कृती’च्या ऱ्हासाची भयचिन्हं दाखवते, अन् २१व्या शतकातलं परिचित वास्तवच वाचकासमोर उभं राहातं...**

**‘डिस्टोपियन फिक्शन’मध्ये** बऱ्याचदा सुरुवातीपासूनच ‘डिस्टोपिया’ अस्तित्वात असतो. उदाहरणार्थ, ‘बिग ब्रदर’च्या आधिपत्याखालीच जॉर्ज ऑर्वेलची ‘१९८४’ सुरू होते. मिशेल वेलबेक या फ्रेंच लेखकाच्या ‘सबमिशन’मध्ये (‘सबमिशन’, मूळ फ्रेंच शीर्षक : Soumission; प्रकाशक : फ्लामारिओं; इंग्रजी भाषांतर : लोरिन स्टाइन; प्रकाशक : विलियम हाइनमान; पृष्ठे : २५६, किंमत : ८३१ रु.) मात्र तसं नाही. २०२२च्या फ्रान्समध्ये कादंबरी सुरू होते, तेव्हा २१व्या शतकातलं परिचित वास्तवच दिसतं. फ्राँस्वा नावाच्या पॅरिसस्थित मध्यमवयीन प्राध्यापकासमोर आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यावर काही अस्तित्ववादी प्रश्न उभे असतात; पण त्यांना सामोरं जाण्यापेक्षा एका उच्चभ्रू, माणूसघाण्या, तुच्छतावादी (थोडक्यात, खास फ्रेंच!) नजरेतून तो जगाकडे आणि स्वतःकडेही तिरकसपणे पाहात असतो. त्याची मतं वाचताना गंमत वाटते खरी, पण एका फ्रेंच कादंबरीची सुरुवात म्हणून हे इतकं ठोकळेबाज आहे, की जणू येऊ घातलेल्या ‘डिस्टोपिया’विषयी वाचकाला गाफील ठेवण्याचाच हा कट वाटावा! किंबहुना, सावजाला हसवत-खेळवत एका गाफील क्षणी त्याची मुंडी पिरगाळणारी ही कादंबरी आहे. वाचक गाफील राहतो, कारण पाश्चात्त्य संस्कृतीचा ऱ्हास पुस्तकातल्या ‘डिस्टोपिया’चा पाया आहे. तो ऱ्हास समजून घेण्यासाठी, वेलबेकचा रोख जिच्यावर आहे ती पाश्चात्त्य संस्कृती कोणती हे आधी पाहायला हवं.

मध्ययुगीन काळापर्यंत ‘पाश्चात्त्य संस्कृती’चं काही प्रारूप अस्तित्वातच नव्हतं. प्लेगसारख्या महासाथी, धर्मयुद्धं, सत्तापिपासूंचे आपसांतले संघर्ष, अशा गोष्टींखाली पिचलेला तेव्हाचा युरोप सुसंस्कृत आहे असं कुणी म्हणू धजलं नसतं. त्याउलट, पश्चिम आशियातील आणि पौर्वात्य संस्कृती तेव्हा प्रगत मानल्या जात. पण मग काही तरी हललं. ‘आय थिंक, देअरफोर आय ॲम’ असं (फ्रेंच!) देकार्त म्हणून गेला (इ.स. १६३७). त्यामुळे जगात विवेकवादाचा पाया घातला गेला आणि ते घालणारी संस्कृती म्हणजे ‘पाश्चात्त्य संस्कृती’ असं (त्याच संस्कृतीत) मानलं जाऊ लागलं. मग १७८९ मध्ये राज्यक्रांती झाली (पुन्हा फ्रेंच!) आणि राजसत्ता झुगारून लोकराज्य आलं असंही मानलं जाऊ लागलं. मानवी हक्क, अभिव्यक्तिस्वातंत्र्य वगैरे लोकशाही मूल्यं राज्यघटनेत समाविष्ट झाली. मग त्यात आणखी एका गोष्टीची भर पडली- निधर्मीवाद! निधर्मी प्रजासत्ताकाची फ्रेंच संकल्पना आपल्या राज्यघटनेतल्या सर्वधर्मसमभावापेक्षा खूप वेगळी आहे. धर्मसंस्था आणि राज्यसंस्था यांची पूर्ण फारकत फ्रेंच निधर्मीवादाला अभिप्रेत आहे. मध्ययुगीन युरोपात ‘इन्क्विझिशन (धार्मिक न्यायमंडळ)’सारख्या गोष्टींद्वारे ख्रिस्ती धर्मसंस्थेनं अनन्वित अत्याचार केले. नाझींनी ज्यूंचं शिरकाण केलं हा तर ताजाच इतिहास आहे. म्हणून, कोणताही धर्मविचार मानवतावादी मूल्यांविरोधातच काम करतो, असं मानत धर्माला सार्वजनिक जीवनातून हद्दपार करणं फ्रेंच निधर्मीवादात अभिप्रेत आहे.

या मूल्यांच्या पायावर आपल्या संस्कृतीचं श्रेष्ठत्व उभं आहे असं मानणारी ‘आयडिया ऑफ फ्रान्स/युरोप’ आणि तिचा ऱ्हास वेलबेकला अभिप्रेत आहे. याचे अनेक पुरावे कादंबरीच्या सुरुवातीपासून मिळतात. फ्राँस्वा फ्रेंच साहित्याचा प्राध्यापक आहे. त्याची पीएच.डी. वीसमाँस या १९व्या शतकाच्या अखेरच्या काळातल्या एका साहित्यिकावर आहे. एखादी संस्कृती पराकोटीची परिष्कृत अवस्था (रिफाइनमेंट) गाठते तेव्हा त्यातच तिचा ऱ्हास अंतर्भूत असतो, अशी मांडणी वीसमाँसनं केली. आधुनिक जगण्यातली निरर्थकता जाणवल्यामुळे आयुष्याला कंटाळलेले प्रतिनायक (अँटीहिरो) त्यानं रंगवले. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात वीसमाँसला कॅथॉलिक धर्मामध्ये जगण्याचा अर्थ सापडला आणि तो विविध मठांच्या सान्निध्यात जगला. फ्राँस्वाचं (आणि त्याच्या बुद्धिजीवी परिसरातल्या कित्येकांचं) आयुष्यही परिष्कृततेच्या टोकावर आहे. सोर्बोन या जगविख्यात विद्यापीठात तो प्राध्यापक आहे. तो एकटा राहतो. भावनिक जवळिकीचा अनुभव ज्यातून मिळेल अशा कोणत्याही नात्याला त्याच्या आयुष्यात स्थान नाही; तशी त्याची गरज असल्याचं कोणतंही चिन्ह तो दाखवत नाही. शारीरिक गरज भागवण्यासाठी तो आपल्या एखाद्या विद्यार्थिनीशी मैत्री करतो (जी फार तर वर्षभरच टिकते), वेश्यागमन करतो किंवा इंटरनेटवर पॉर्न पाहतो. त्याचा अभ्यासविषय असलेलं १९व्या शतकातलं फ्रेंच साहित्य वगळता त्याला कशातही रस नाही. त्याला जगाविषयी आशा नाही. त्याची कशावरही श्रद्धा नाही. त्याचा तुच्छतावादही त्यातून येतो आणि त्याचा परात्मभावही (एलियनेशन). थोडक्यात, फ्राँस्वा एखाद्या फ्रेंच अस्तित्ववादी कादंबरीचा प्रतिनायक शोभतो.

व्यक्तिस्वातंत्र्याच्या एका उपभोक्ततावादी टोकावर उभ्या आताच्या पाश्चात्त्य संस्कृतीची जी टिंगल फ्राँस्वा करतो ती पाहता, त्याच्या मते ती संस्कृती ऱ्हास होण्याच्याच लायकीची असावी. या ऱ्हासाची भयचिन्हं कथानकात सुरुवातीपासून पेरलेली आहेत. सुरुवातीला एखाद्या दबा धरलेल्या श्वापदाप्रमाणे असलेला ‘डिस्टोपिया’ आधुनिक लोकशाहीच्याच सुपरिचित अवताराद्वारे स्पष्ट दर्शन देतो : २०२२ राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीचं वर्ष असतं. (प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या आणि सध्या लक्षणीय लोकाश्रय मिळणाऱ्या) कट्टर उजव्या, ख्रिस्ती धर्मवादी, राष्ट्रवादी, वर्णवर्चस्ववादी ‘नॅशनल फ्रंट’ पक्षाशी जवळीक असलेले लोक आणि अल्पसंख्य इस्लामधर्मी लोक यांच्यात देशभर दंगली होत असतात (आजचा फ्रान्स = सुमारे ४१ टक्के लोक ख्रिस्ती; ४० टक्के निधर्मी; ६ टक्के मुस्लीम). दंगलींच्या वार्तांकनामुळे उजव्या पक्षाची सरशी होईल या भीतीनं प्रसारमाध्यमं ते टाळत असतात किंवा वास्तव सौम्य करून सांगत असतात. निवडणुकीच्या पहिल्या फेरीतले पहिल्या दोन क्रमांकाचे उमेदवार राष्ट्राध्यक्षपदाच्या स्पर्धेच्या अखेरच्या फेरीत टिकणार असतात. अपेक्षेनुसार ‘नॅशनल फ्रंट’ची उमेदवार मारीन ल पेन प्रथम येते, पण दुसऱ्या क्रमांकावर ‘मुस्लीम ब्रदरहूड’ या (काल्पनिक) इस्लामवादी पक्षाचा उमेदवार मुहंमद बेन अब्बेस येतो. समाजवादी पक्ष तिसऱ्या क्रमांकावर फेकला जातो. ख्रिस्ती पक्षाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी समाजवाद्यांचा पाठिंबा इस्लामवादी पक्षाला मिळतो. इतिहासात प्रथमच एक इस्लामधर्मी पुरुष फ्रान्सचा राष्ट्राध्यक्ष होतो. सत्तेवर येताच तो फ्रान्सला इस्लामी राष्ट्र जाहीर करून तिथे शरिया कायदा लागू करतो. आतापावेतो निधर्मी असलेल्या शिक्षणव्यवस्थेत इस्लामी पद्धतीच्या शिक्षणाचा पर्याय सरकारी अनुदानानं उपलब्ध होतो. पुढच्या पिढ्यांना परंपरावादी, पुरुषवर्चस्ववादी आणि धर्मवादी करण्याचा चंग ‘मुस्लीम ब्रदरहूड’नं बांधलेला असतो. सोर्बोन इस्लामी विद्यापीठ होतं. नोकरी टिकवण्यासाठी प्र-कुलगुरू धर्मांतर करतो आणि फ्राँस्वालाही तसा सल्ला देतो. आपल्या हयातीत परिस्थिती फारशी बदलणं शक्य नाही असं मानणाऱ्या फ्राँस्वाला आणि त्याच्यासारख्या फ्रेंच वाचकाला हा ‘डिस्टोपिया’ का वाटेल ते सुस्पष्ट आहे.







**जादूगार वेलबेकनं वर्तवलेलं भविष्य : “२०१५ला माझे दात पडणार आणि २०२२ ला मी रमझान पाळणार”!**

पण ही ‘डिस्टोपिया’ची केवळ नांदी ठरते. वेलबेकचा फ्रान्स म्हणजे राजा-राणीचा शिरच्छेद करणारा क्रांतिकारी फ्रान्स नाही, तर नाझी आक्रमणाखाली तगून राहण्यासाठी जर्मन सत्ताधाऱ्यांशी संगनमत करणारा फ्रान्स आहे. नवा राष्ट्राध्यक्ष हिटलरसारखा आक्रमक नाही, तर एक उच्चशिक्षित, मवाळ, चलाख आणि ठाम विचारांचा माणूस आहे. आपापलं जगणं ‘आहे तसं’ राखण्यासाठी धुरीणवर्ग शांतपणे हे नवं वास्तव स्वीकारतो. आणि हे केवळ तगून राहणं नाही : आपलं वय झालं तरीही शरियानुसार आपण कितीही तरण्याताठ्या मुलींशी विवाह करू शकतो आणि त्यांना हक्कानं भोगू शकतो ही कल्पना फ्राँस्वाला सुखावतेच! म्हणजेच, विवेकवाद, समान मानवी हक्क, वगैरे गोष्टींचा वारसा मानणारी ‘आयडिया ऑफ फ्रान्स’ इथे मरतेदेखील आणि कुणी आसवंही ढाळत नाही, हा इथला खरा ‘डिस्टोपिया’ आहे.

समकालीन फ्रेंच लेखकांपैकी एक आघाडीचा लेखक तर वेलबेक आधीपासून होताच. त्यातच, विषयाच्या निवडीमुळेही ‘सबमिशन’ बहुचर्चित व बहुखपाऊ कादंबरी होणार हे प्रकाशनाआधीच स्पष्ट होतं. पण एका विचित्र योगायोगामुळे प्रकाशनाच्या दिवशीच ‘शार्ली एब्दो’ नियतकालिकावर (प्रेषित मुहंमदाची अर्कचित्रं छापली म्हणून) हल्ला झाला. ‘शार्ली’च्या ताज्या अंकाच्या मुखपृष्ठावर तेव्हा वेलबेकच झळकत होता. पुस्तकाच्या खपासाठी ही अकल्पित पर्वणी ठरली.


सोव्हिएत रशियाच्या अस्तानंतर ‘आता जग एकध्रुवीय झालं आहे आणि त्या ध्रुवावर आपणच आहोत’ असं पाश्चात्त्य जगाला वाटू लागलं होतं. पण सलमान रश्दीविरुद्धच्या फतव्यानंतरच (१९८९) वातावरण बदलू लागलं. नव्वदच्या दशकात इस्लामी मूलतत्त्ववादाचा प्रश्न फणा काढू लागला. उत्तर आफ्रिकेतल्या फ्रेंच वसाहतींतून आलेल्या अनेक इस्लामधर्मीयांच्या दुसऱ्या-तिसऱ्या पिढ्याही फ्रान्समध्ये जन्मलेल्या होत्या; पण ‘आम्हाला इथे परकं मानलं जातं’ ही त्यांची तक्रार गांभीर्यानं ऐकून न घेता सरकारं उलट संस्कृतिबहुलता नाकारणारे कायदे आणत राहिली (उदा. सरकारी शाळांमध्ये प्रकट धर्मचिन्हांवर बंदी आहे. यात शिखांची पगडीही चालत नाही. तसंच संपूर्ण चेहरा झाकणाऱ्या बुरख्यावर सार्वजनिक ठिकाणी बंदी आहे.). नव्वदच्या दशकापासून अधूनमधून मुस्लीम युवकांच्या दंगली होत राहिल्या. २०१५ नंतर सातत्यानं दहशतवादी हल्ले होत राहिले. ऑक्टोबर २०२० मध्ये सॅम्युएल पाती या शाळाशिक्षकाचा शिरच्छेद करण्यात आला. त्याचा गुन्हा? - वर्गात अभिव्यक्तिस्वातंत्र्याची संकल्पना समजावून सांगताना त्यानं प्रेषिताची अर्कचित्रं दाखवली. या वातावरणात राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन (माक्रों) यांनी एकीकडे फ्रेंचांचा सर्वधर्मनिंदा करण्याचा हक्क उचलून धरला व पोलीसदलाला व्यापक अधिकार देणारे कायदे आणण्याचा प्रयत्नही केला. गोऱ्या माणसापेक्षा काळ्या माणसावर पोलीस अधिक अत्याचार करतात हे उघड आहे. त्यात सरकारच्या अशा धोरणांमुळे समाजातलं ध्रुवीकरण वाढत चाललं आहे. आधुनिकतावादी- अभिव्यक्ती स्वातंत्र्यवादी- उदारमतवादी नागरिक आणि कट्टर उजवे ख्रिस्ती यांच्यातली सीमारेषा एकीकडे धूसर होत चालली आहे, तर दुसरीकडे स्वतःला आधी फ्रेंच, मग मुस्लीम मानणारे मवाळ तरुणही कट्टर इस्लामवाद्यांच्या बाजूला जाऊ लागले आहेत.

वेलबेकच्या कादंबरीला आता सहा वर्षं झाली आहेत. वर्गात अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर चर्चा करून झाल्यावर, ‘अर्कचित्रं प्रकाशित करणं योग्य की अयोग्य?’ यावर विद्यार्थ्यांचं मत सॅम्युएल पातीनं विचारलं होतं. वर्गाचा कल अर्कचित्रं प्रकाशित करण्याच्या विरोधात गेला होता. काहींच्या मते हीच प्रत्यक्षातल्या ‘डिस्टोपिया’ची सुरुवात आहे, तर काहींच्या मते पाश्चात्त्य संस्कृतीविषयी खोलात जाऊन प्रश्न उपस्थित करण्याची हीच वेळ आहे : ते केलं नाही, तर डिस्टोपिया अटळ आहे. ‘एखाद्या संस्कृतीचा अंत होतो ते तिची हत्या होते म्हणून नव्हे, तर ती आत्महत्या करते, म्हणून’ असं उद्धरण कादंबरीत येऊन जातं. पाश्चात्त्य संस्कृतीनं आत्महत्या केलेली आहे, हे सांगण्यासाठी ते कादंबरीत वापरलं जातं. वेलबेकचं असं मत आहे का? नक्की सांगता येत नाही, पण वाचकाला या मुद्द्यांविषयी अंतर्मुख करण्यासाठी तो संस्कृतीच्या आत्महत्येचा ‘डिस्टोपिया’ वापरतो हे स्पष्ट आहे.

rabhijeet@gmail.com

# पूर्वार्धातले गांधीजी...

**बॅरिस्टर मोहनदास** करमचंद गांधी यांना आपल्या जीवनतत्त्वज्ञानाची दिशा १९०८ साली, लंडनहून दक्षिण आफ्रिकेला जाताना गवसली अन् ती त्यांनी ‘हिंद स्वराज’मधून लगोलग सांगितलीदेखील. पाश्चात्त्य संस्कृतीवरील टीका म्हणून त्याकडे कोणी पाहते, कोणास त्यात पर्यावरणसंवर्धनाची कळकळ दिसते, तर कोणास अगदी हिंदुत्ववादही दिसतो (: गांधींच्या जीवनतत्त्वज्ञानाचं हिंदुत्ववादी वाचन करणारं पुस्तक इंग्रजीतच नववर्षारंभी आलं, हे ‘बुकमार्क’च्या वाचकांना ठाऊक असेलच). पुढे १९१५ साली गांधी भारतात परतले. आजच्या भाषेत त्यांचे ‘मेण्टॉर’ ठरावेत असे गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांना वर्षभर भारत जाणून घेण्यास सांगितलं. त्याचदरम्यान हरद्वार येथे आचार्य श्रद्धानंद यांनीच प्रथम ‘महात्मा’ या उपाधीनं त्यांना संबोधलं. त्यानंतर ‘महात्मा गांधी’ आणि भारतीय स्वातंत्र्यलढा यांची वाटचाल संगतीनंच झाली. त्याविषयी अगदी इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांपासून ते स्वतंत्र पुस्तकांपर्यंत वाचायला मिळतं. भारतात येईपर्यंतच्या गांधीजींविषयी, त्यांच्याच ‘माझे सत्याचे प्रयोग’ (‘माय एक्सपेरिमेंट्स विथ ट्रुथ’) या पुस्तकात लिहिलं आहेच. पण मध्येच थबकलेल्या या आत्मचरित्रानंतरही, ‘पूर्वार्धातल्या गांधींविषयी’ खुद्द गांधीजींनीच लिहून ठेवलेले अनेक दाखले त्यांच्या विपुल लेखनदफ्तरात आढळतात. प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रातील अनेक गाळलेल्या जागाही त्या दाखल्यांनी भरता येतात. गांधींनीच आपल्या पूर्वायुष्याविषयी लिहिलेल्या अशा नोंदी आता एकत्रितपणे वाचायला मिळतील. गांधीजींचे नातू गोपाळकृष्ण गांधी यांनी ‘रेस्टलेस ॲज मर्क्युरी : माय लाइफ ॲज अ यंग मॅन’ या पुस्तकात त्या संपादित केल्या आहेत. यंदा १० जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेल्या या पुस्तकात सहा भागांमध्ये गांधीजींच्या जन्मापासून ते आफ्रिकेतून भारतात परतण्यापर्यंतचा जीवनकाळ मांडला आहे. पहिल्या भागात, गांधीजींचे शालेय शिक्षण ते कस्तुरबांशी विवाह; दुसऱ्या भागात, इंग्लंडमधलं शिक्षण ते द. आफ्रिकेत जाईपर्यंतचा कालखंड; तिसऱ्या भागात, गांधींनी अनुभवलेली आफ्रिकेतील दोन युद्धं; चौथ्या भागात, गांधीजींना गवसलेली सत्याग्रहाची संकल्पना; पाचव्या भागात, आफ्रिकेतील ‘टॉलस्टॉय फार्म’ची स्थापना आणि कौटुंबिक पातळीवरील ओढाताण; सहाव्या भागात, मायदेशी परतणारे गांधीजी- अशी १८६९ ते १९१५, म्हणजे तब्बल ४६ वर्षांची गांधीजींची जीवनकथा खुद्द त्यांच्याच शब्दांत या पुस्तकात वाचायला मिळते. पुस्तकाचे संपादक गोपाळकृष्ण गांधी म्हणतात, गांधीजींनी केलेल्या विधानांना, मांडलेल्या मतांना त्या त्या काळाच्या संदर्भातच पाहायला हवं. तसं पाहिल्यास हे ध्यानात येईल की, (१) कुठल्याही माणसाप्रमाणे गांधीजीही चुकू शकतात (२) ‘मी इतरांपेक्षा कोणी निराळा’ असा दावा गांधीजींनीही कधी केला नव्हता आणि (३) ते नेहमी आपली मते दुरुस्त करत राहिले. संपादनकर्त्याची ही दृष्टी कुठल्याही समाजपुरुषाच्या जीवनाचं मूल्यमापन करण्यास साहाय्यक ठरावी!



**‘रेस्टलेस ॲज मर्क्युरी’**
संपादन : **गोपाळकृष्ण गांधी**
प्रकाशक : **आलेफ बुक कं.**
पृष्ठे : **४००,** किंमत : **९९९ रु.**


## बुकबातमी

**ओसामा बिन** लादेनचा आणि त्याच्या ‘अल् कायदा’चा माग घेणाऱ्या ‘द लूमिंग टॉवर’ या पुस्तकाचे पुलित्झर विजेते लेखक लॉरेन्स राइट यांची ‘द एण्ड ऑफ ऑक्टोबर’ ही महासाथींभोवती गुंफलेली रहस्यप्रधान कादंबरी गतवर्षी ऐन करोनाकाळात (एप्रिल २०२०) प्रसिद्ध झाली. त्या कादंबरीविषयीच्या चर्चेला आता कुठे सुरुवात झाली होती, तोच राइट यांच्या नव्या पुस्तकाची बातमी आली. त्यांचं नवं पुस्तकही साथीविषयीच, नेमकंपणानं सांगायचं तर करोना महामारीविषयी आहे. ‘द एण्ड ऑफ ऑक्टोबर’ची प्रकाशन संस्था असलेल्या ‘नॉफ’कडूनच हे नवं पुस्तकही प्रसिद्ध होणार असलं, तरी ते कादंबरी नव्हे; करोना साथहाताळणीचं वास्तव हा या नव्या पुस्तकाचा चर्चाविषय आहे. राइट हे अमेरिकास्थित पत्रकार. ‘द न्यू यॉर्कर’चे नियमित लेखक. ‘न्यू यॉर्कर’च्याच गतवर्षीच्या डिसेंबरमधील शेवटच्या अंकात त्यांची ‘द प्लेग इयर’ ही वृत्तकथा प्रसिद्ध झाली होती. त्याच शीर्षकानं ही वृत्तकथा वाढीव स्वरूपात जूनमध्ये पुस्तकरूपात येत आहे. या पुस्तकासाठी राइट यांनी करोना साथहाताळणीत गुंतलेल्या शंभरेक उच्चपदस्थांच्या मुलाखती घेतल्या आहेत. अमेरिकेस करोना साथहाताळणीत आलेलं अपयश ‘धक्कादायक’ असल्याचं मत राइट यांनी याआधी स्पष्टपणे मांडलं आहेच; त्या मताला पुष्टी देणारं हे पुस्तक असेल, हे ‘बुकमार्क’च्या वाचकांना सांगावयास हवे काय?



# महासाथीचा मागोवा...

परंतु साथहाताळणीतलं हे अपयश अमेरिकेपुरतं नाही आणि नवं तर नाहीच नाही. पण असं अपयश का येतं, याचा मागोवा घेणारं पुस्तक ख्यातनाम पत्रकार-लेखक मायकेल लुईस लिहीत आहेत, अशी बातमीही सरत्या आठवड्यात आली. ऐंशीच्या दशकातील ‘वॉल स्ट्रीट’चं वास्तवदर्शन घडवणारं ‘लायर्स पोकर’ हे १९८९ सालातलं पुस्तक असो वा अगदी अलीकडचं, डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळातील प्रशासकीय/राजकीय नियुक्त्यांवर बोट ठेवणारं ‘द फिफ्थ रिस्क’ हे पुस्तक असो, मायकेल लुईस यांची पुस्तकं त्या त्या विषयाची न दिसणारी, अनवट बाजू उलगडणारी असतात. लुईस यांच्या मते, आजवरच्या प्रत्येक साथरोगावेळी माणूस कायमच भांबावल्यागत वागला आहे. साथ आटोक्यात आणण्यासाठी मानवानं निर्माण केलेली व्यवस्था प्रत्येक वेळी त्याच त्या चुका करताना दिसते. ती कशी, हे सांगण्यासाठी लुईस यांनी ‘द प्रीमॉनिशन : अ पॅण्डेमिक स्टोरी’ या नव्या पुस्तकात तीन पात्रं घडवली आहेत. मात्र त्या पात्रांबद्दल त्यांनी तूर्त काहीही उघड केलेलं नाही. तेव्हा, येत्या मे महिन्यापर्यंत, म्हणजे हे पुस्तक प्रसिद्ध होईपर्यंत त्याबाबत वाट पाहावी लागणार!



# उणे आणि उणे-दुणे...

## शून्याखाली गेलेल्या विकासदराकडून वृद्धीकडे वाटचाल कशी होणार यावर सखोल आणि अभ्यासू भाष्य यंदाच्या आर्थिक पाहणी अहवालातही अपेक्षित होते...

**सहसा आर्थिक** सर्वेक्षण अहवालांचे कुतूहलमूल्य २४ तासांपेक्षा अधिक नसते, कारण बहुतेकदा दुसऱ्याच दिवशी केंद्रीय अर्थसंकल्प मांडला जाण्याची प्रथा आहे. पाहणी अहवालातील बहुतांश आकडेवारी अर्थसंकल्पातही नव्याने मांडली जातेच. यंदाचा आर्थिक सर्वेक्षण किंवा पाहणी अहवाल मात्र अधिक काळ चर्चिला- चर्विला जाणार, कारण शुक्रवारी तो मांडला गेल्यानंतर अर्थसंकल्प मांडला जाण्यास सोमवार उजाडावा लागेल. हे झाले एक कारण. शिवाय इतर कोणत्याही आर्थिक वर्षापेक्षा सरते वर्ष अधिक लक्षणीय, कारण त्यावर कोविड-१९ महासाथीचा आणि त्यानिमित्ताने देशभर व जगभर झालेल्या मनुष्यहानीचा व त्याहीपेक्षा अधिक संहारक आर्थिक विध्वंसाचा झाकोळ आहे. त्यामुळेही अर्थव्यवस्थेच्या प्रगती पुस्तकात किंवा खरे तर अधोगती पुस्तकात लाल शेरे किती, याचा धांडोळा घेणे सरकार व विश्लेषकांइतकेच इतरेजनांसाठीही आवश्यक ठरते. या एका कारणास्तव यंदाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल केवळ 'आणखी एक दस्तावेज' ठरूच शकत नाही. गेल्या वर्षी, बरोबर ३० जानेवारी याच दिवशी भारतातील पहिल्या करोनाबाधित रुग्णाची नोंद केरळमध्ये झाली होती. त्यानंतर वर्षभरात बाधितांची संख्या कोटीपल्याड गेलेली आहे. मृतांच्या संख्येने लाखाचा आकडा ओलांडला आहे. गतवर्षी १ एप्रिल रोजी नवीन आर्थिक वर्ष सुरू झाले, तोपर्यंत देशभर कोविडप्रतिबंधक टाळेबंदीला सुरुवात झालेली होती. कोविड साथ नियंत्रणाखाली येत असली आणि लसीकरण मोहिमेनेही बऱ्यापैकी वेग घेतलेला असला, तरी विस्कटलेली आर्थिक घडी बसवण्याचे काम अजूनही सुरू आहे हे सर्वेक्षणातील आकडेवारीतून पुरेसे स्पष्ट होते. २०२०-२१ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था ७.७ टक्क्यांनी आक्रसेल, असे या अहवालाचे लेखक आणि केंद्र सरकारचे प्रमुख आर्थिक सल्लागार कृष्णमूर्ती सुब्रमणियन सांगतात. रिझर्व्ह बँक आणि केंद्रीय सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनेही जवळपास असेच भाकीत वर्तवले आहे. केंद्रीय आर्थिक सर्वेक्षणातून निव्वळ नैराश्य पाझरू नये या उद्देशाने असेल; पण पुढील आर्थिक वर्षात म्हणजे सन २०२१-२२ या काळात हीच अर्थव्यवस्था ११ टक्क्यांची भरारी घेईल, असा साहसी आशावादही ते व्यक्त करतात. निव्वळ गणिती निकष पाहता, उणे ७.७ टक्के खोलात गेल्यानंतर ११ टक्क्यांची भरारी म्हणजे वास्तवात ३.३ टक्केच प्रगती! हे जरा बाजूला ठेवू. ११.५ टक्के भरारीचे भाकीत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनेही परवाच व्यक्त केले होते. मात्र त्याबाबत ताजा खुलासा नाणेनिधीच्याच प्रमुख अर्थतज्ज्ञ गीता गोपिनाथ यांनी केलेला आहे. ही आकडेवारी तांत्रिक आहे आणि वास्तवात पुढील आणखी दोन वर्षे वास्तवातील वृद्धी दोन ते तीन टक्के इतकीच राहील असे त्या म्हणतात. तेव्हा भरारी साजरी करण्याची वेळ येईल तेव्हा येवो, तूर्त अर्थव्यवस्थेत पडलेली विवरे कशी बुजवता येतील यावरच चर्चा होणे योग्य.

बहुतेक निरीक्षणे अपेक्षितच होती. ग्रामीण भागांमध्ये सुरुवातीचा बराच काळ करोनाचा शिरकाव झालेला नव्हता. त्यामुळे कृषी आणि कृषी-आधारित क्षेत्राला मोठ्या प्रमाणात तडाखा बसला नव्हता. गेली काही वर्षे कृषी क्षेत्रातील वाढ तुलनेने कमी होत असताना, करोनाकाळात मात्र हेच क्षेत्र इतरांच्या तुलनेत 'चमकदार' ठरले. परंतु ही कृष्णमेघाभोवतीची चंदेरी किनारच ठरते. कारण गृहनिर्माण, सेवा व उत्पादन क्षेत्रांना टाळेबंदीमुळे बसलेला फटका अतोनात आहे. तरीही टाळेबंदी लादली गेली नसती, तरी जनता बाहेर पडणारच नव्हती यावर सुब्रमणियन महोदयांनी त्यांच्या सादरीकरणाच्या सुरुवातीला भर दिलेला आहे. टाळेबंदीचे समर्थन करण्यात त्यांनी अर्धा तास घालवला. त्यांना टाळेबंदीचा आढावा घेण्यासाठी नऊ-दहा महिने मिळाले आणि ती निव्वळ आवश्यकच नव्हे तर उत्पादकही ठरली असेही भासवले गेले. परंतु टाळेबंदी आणि संचारबंदी लागू करताना संबंधितांना आवश्यक ती तजवीज करण्यासाठी आठ-नऊ तासही दिले गेले नाहीत याकडे दुर्लक्ष कसे करता येईल? आणखी एक मुद्दा पतमानांकनाचा. 'प्रगतिपथावर असूनही भारताचे मानांकन आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्थांकडून नेहमीच प्रतिकूल स्वरूपाचे केले जाते,' अशी तक्रार भर अहवालात आळवण्यात आली आहे. तिचे काय प्रयोजन? आपण जे काही करतो आहोत, त्याविषयी चिकित्सा करणाऱ्यांकडे नकारात्मक दृष्टिकोनातूनच पाहण्याची विद्यमान सरकारची सवय आर्थिक सर्वेक्षण अहवालासारख्या शास्त्रीय मानल्या जाणाऱ्या पत्रिकेतही उमटणे योग्य नव्हे.

**...त्याऐवजी हा अहवाल आंतरराष्ट्रीय पतमानांकन संस्था भारतास कशा डावलतात, यावर डाफरतो. मात्र, आर्थिक मदत सुरू ठेवावीच लागणार हेही सांगतो!**

आरोग्यक्षेत्राचे आणि या क्षेत्रातील सरकारी व खासगी गुंतवणुकीचे महत्त्व यंदा कधी नव्हे इतके अधोरेखित झालेले आहे. त्याची दखल घेऊन विशेषतः आर्थिक सक्षम राज्यांनी त्यांच्या एकूण उत्पादनाच्या २.५ ते ३ टक्के रक्कम आरोग्यक्षेत्रावर खर्च केली पाहिजे, असे सुब्रमणियन सुचवतात. त्यात नक्कीच तथ्य आहे. पंतप्रधान जनआरोग्य योजनेचा योग्यरीत्या विनियोग करणाऱ्या राज्यांमध्ये आरोग्यविमा कवच मिळवलेल्या लाभार्थींच्या संख्येत वाढ झालेली दाखवून देण्यात आली आहे. कोविडविषयी खासगी आरोग्यविमा क्षेत्राकडून संदिग्ध भूमिका घेतली जात असल्याच्या पार्श्वभूमीवर ही आकडेवारी आश्वासक ठरते. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेअंतर्गत येणाऱ्या रुग्णालयांमध्ये अव्यवस्था आणि अनास्था, तर खासगी आरोग्यसेवा सुस्थापितांच्याही आवाक्याबाहेरची या कात्रीत गतवर्षी कोविडग्रस्त जनता सापडली होती. कोविडग्रस्तांना एका मर्यादेनंतर मदत मिळूही लागली. परंतु कोविडेतर रुग्णांचे हाल अगदी अलीकडेपर्यंत सुरू होते. भविष्यात अशी भीषण फजिती होऊ द्यायची नसेल तर आरोग्यक्षेत्रातील गुंतवणूक वाढवावी लागेलच, शिवाय परवडण्याजोग्या आरोग्यसेवेची व्याप्तीही वाढवावी लागेल.

कृषीक्षेत्रामध्ये यंदाच्या वर्षी ३.४ टक्के वृद्धी अपेक्षित आहे, जिला प्राप्त परिप्रेक्ष्यात चंदेरी किनार असेच संबोधावे लागेल. आयातीमध्ये ५.८ टक्के आणि निर्यातीत ११.३ टक्के घट अपेक्षित आहे. त्यामुळे चालू खात्यामध्ये जीडीपीच्या २ टक्के अतिरिक्त निधी अपेक्षित आहे. तो १७ वर्षांतील ऐतिहासिक असला, तरी मंदावलेल्या अर्थव्यवस्थेत त्याचे कवित्व मर्यादितच. बँकांकडून होणारा मर्यादित पतपुरवठा हा अद्यापही चिंतेचा विषय ठरतो. कृषी, बांधकाम, व्यापार आणि आतिथ्य उद्योगांना होणाऱ्या पतपुरवठ्यात ऑक्टोबरपासून वाढ दिसत असली, तरी अत्यंत महत्त्वाच्या उत्पादन क्षेत्राबाबत औदासीन्य दिसते. आर्थिक मदत सुरूच ठेवावी लागणार असे अर्थसल्लागार महोदयांनी सुचवले आहे, याचे स्वागत करावे लागेल. वित्तीय तूट फुगत असल्याची आकडेवारी अलीकडे विश्लेषक सादर करतात. परंतु अर्थव्यवस्था पूर्वपदावर आणण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची गरज आजही ठळक आहे. व्याजदर कमी आहेत पण बँका कर्जे देण्यास कचरतात. कारण थकीत कर्जांचे प्रमाण कमी झालेले नाही. या परिस्थिती बँकांना फेरभांडवलीकरणाची आणखी एक लस देणे क्रमप्राप्त ठरते, याची दखल सर्वेक्षणात घेण्यात आली आहे. तिचेही स्वागतच. कोविडग्रस्त अर्थव्यवस्थेची सरकारकडून झालेली हाताळणी जगासाठी आदर्शवत ठरेल असे सुब्रमणियन वारंवार सांगतात. यासाठी इंग्रजी 'व्ही' आकाराच्या आलेखाचा दाखला देतात. परंतु यासाठी क्रयशक्तीबरोबर मागणीही वाढण्याची गरज असते. ती कशी वाढणार याविषयी अहवालात भाष्य नाही. समाधानकारक पाऊस आणि उत्सवकाळ या घटकांमुळे अनुभवायास आलेली वृद्धी खरोखर विकास आहे की सूज, याची चिकित्सा फारशी दिसत नाही. उणे विकासदराकडून वृद्धीकडे वाटचाल कशी होणार यावर सखोल भाष्य करण्याऐवजी सुब्रमणियन पतमानांकन संस्थांचे उणे-दुणे काढण्यासाठी ऊर्जाव्यय करतात. त्यांच्यासारख्या उच्चशिक्षितांकडून सरकारभक्तीपलीकडे रोकड्या विश्लेषणाची अपेक्षा होती.

---

# सार्वभौमांचा काळ!

अन्यथा

गिरीश कुबेर

**दक्षिण चीन समुद्राची काळजी आपण कशाला करायची याची प्रमुख कारणं दोन : या दक्षिण चीन समुद्रातून भारताचे व्यापारी हितसंबंध असलेल्या अनेक देशांचा मार्ग आहे हे एक ; आणि दुसरं म्हणजे या परिसरात ११०० कोटी बॅरल्स इतकं तेल आहे...**

**२०२१ या वर्षाला** २०२०नं काय दिलं?

या प्रश्नावर दोन गोष्टी नक्की सांगता येतील. एक अर्थातच करोना. आणि दुसरी म्हणजे चीनची समस्या. यातल्या पहिल्यावर आपल्याला बोलायला खूप आवडतं. म्हणजे दोन भारतीय लशी (दोन?), आपण किती कर्तबगारीनं ही साथ रोखली वगैरे. आपल्या सरकारची कामगिरी मोठीच म्हणायची. या विषाणूचा प्रसार रोखण्यात आपण मोठ्या प्रमाणावर यशस्वी ठरतोय असं सरकार म्हणतंय ते बरोबरच असणार. त्यामुळे आपल्या सरकारच्या पाठीवर आपण शाबासकीची थाप द्यायला काही हरकत नाही.

फक्त ती देता देता आपल्या आसपासच्या देशांचंही कौतुक करायला हवं. त्यांच्यासाठीही टाळ्या वाजवायला हव्यात. या बिचाऱ्या देशांना (अर्थातच अपवाद पाकिस्तानचा) आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आपल्यासारखी प्रसिद्धी मिळवून देणारा कोणी नाही आणि मैत्रीपूर्ण माध्यमंही दिमतीला नाहीत. त्यामुळे त्यांच्या वाट्यास कौतुकाचे चार शब्द येणं कठीणच. म्हणून आपण आपली आरती ओवाळताना या देशांच्या नावावरून औक्षण करायला काही हरकत नाही. उदाहरणार्थ तुर्कमेनिस्तान या देशात अद्याप एकही करोना रुग्ण नाही आणि म्हणून एकही करोनामृत्यू नाही. त्या शेजारच्या ताजिकिस्तानात अवघ्या ९१ जणांचे प्राण करोनात गेले आणि बाधित होते १३,१७४. पलीकडच्या उझबेकिस्तानात अवघ्या ७८,५५६ जणांना करोनाची लागण झाली आणि फक्त ६२१ त्यातून वाचू शकले नाहीत. अफगाणिस्तान तसा आपल्याला तगडा माहीत. त्या देशात ५४,८९१ जणांना करोनानं ग्रासलं. पण मरण पावलेल्यांची संख्या आहे २३९७ इतकीच. आपल्या सगळ्यांच्या जिव्हाळ्याचा पाकिस्तान. त्या देशात ५ लाख ३७ हजार ४७७ जणांना करोना झाला. प्राण गेले ११,४५० पाकींचे. नेपाळमध्ये तर जेमतेम २,७०,३७५ इतके करोनाने आजारी पडले. मरण पावले २०२० जण. सर्वात सुखी भूतानमध्ये करोनाने प्राण गेलेला अवघा १ आहे. बाधित होते ८५६ जण. ज्यांना आपण 'बांगलादेशी' म्हणून हिणवतो त्या आपल्या शेजारी देशात करोनाबळी फक्त ८०७२ इतके आहेत. तेदेखील ५,३३,४००हून अधिक करोनाबाधितांतून. संयुक्त अरब अमिराती, म्हणजे दुबई वगैरे, प्रांतात करोनाने दगावलेले आहेत फक्त ८११ आणि आजारी होते २,८९,०८६. म्यानमारही आपला पूर्वेचा शेजारी. त्या देशात करोनानं १,३८,८०२ जणांना आडवं केलं. पण प्राण वाचवता आले नाहीत फक्त ३०८९ जणांचेच. थायलंड हा आपल्या पर्यटनाच्या यादीतला सर्वात सोपा. त्या देशात फक्त १६,२२१ जणांना करोना आजारी पाडू शकला आणि त्यापैकी ७६ जीव गेले. कमाल आहे ती व्हिएतनामची. त्या देशातल्या फक्त १५५३ नागरिकांना हा विषाणू डसला. त्यातले अवघे ३५ निजधामास अंतरले. अशी अनेक उदाहरणं देता येतील.



'ओएनजीसी विदेश'ने व्हिएतनामच्या 'लान्-ते' सागरी तेलक्षेत्रात 'पेट्रो-व्हिएतनाम' या कंपनीसाठी उभारलेली तेलविहीर

ती देण्याचा उद्देश इतकाच की आपल्याप्रमाणे या देशांतही आपल्यासारखंच कार्यक्षम सरकार आहे हे आपल्या लक्षात यावं म्हणून. गवगवा नसेल होत त्यांचा. पण म्हणून काय कौतुक करू नये, असं थोडंच आहे. ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटना या देशांचा इतका तपशील देतीये त्या अर्थी ती माहिती खरीच असणार. असो.

तर गेल्या वर्षीचा हा करोना या वर्षातही आपल्या ताटात वाढला गेलेला आहेच. त्याचा आपण कसा फडशा पाडला याची गौरवगाथा ऐकून आपली छाती फुलून वगैरे येत असली तरी या ताटातल्या दुसऱ्या चीन-नामे पदार्थाची मात्र काही आपण तितकी दखल घेताना दिसत नाही.

आपले परराष्ट्रमंत्री जयशंकर (जाता जाता : करोना विषाणू तसा नशीबवान. त्यावर थेट पंतप्रधानच बोलतात. त्या मानानं चीन तसा कमनशिबी. परराष्ट्रमंत्री, नाव न घेता संरक्षणमंत्री वगैरेंच त्यावर ऐकायला मिळतात. असो.) नुकतेच मान्य करते झालेत की गेल्या वर्षी गलवानमध्ये चीननं जे काही केलं त्यामुळे उभय देशांचे संबंध तिठ्यावर आलेत (जयशंकर 'ॲट क्रॉसरोड्स' म्हणाले). म्हणजे उभयतांचे रस्ते यापुढे वेगळे असू शकतील असं त्यांनी सूचित केलं. थोडक्यात, त्या देशाचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांना यापुढे कदाचित आपण झोपाळ्यावर बसवणार नाही किंवा नारळपाणी वगैरे पाजणार नाही. गलवान खोऱ्यातली घुसखोरी, अलीकडच्या काही चकमकी किंवा आपल्या सीमावर्ती भागात चीननं नवं खेडं वसवल्याच्या बातम्या वगैरे येत असताना इतकं तर कडक आपण व्हायलाच हवं.

पण या सगळ्या आपल्या कडक, स्वाभिमानी भूमिकांवर चीनची प्रतिक्रिया काय, हा खरा या संदर्भातला महत्त्वाचा प्रश्न. सरकार त्याला हात घालेल नाही घालेल, आपण तरी त्याचा विचार करायला हवा. सरकारवर तरी किती अवलंबून राहायचं आपण हाही एक प्रश्नच. कुठे कुठे म्हणून पाहणार सरकार!

तर चीननं गेल्या आठवड्यात, २२ जानेवारीला, आपला नवा तटरक्षक दल कायदा मंजूर करून तो अमलात येत असल्याची घोषणा केली. ही घटना इतकी महत्त्वाची आहे की आपल्या सरकारतर्फे कोणीही त्यावर प्रतिक्रियादेखील दिलेली नाही. आपले अत्यंत अभ्यासक परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनीदेखील त्यावर काही भाष्य केल्याचं आढळलं नाही. ट्वीट वगैरे काही त्यावर कोणाचं आहे का याचा तपास घेतलेला नाही; पण तसं काही असतं तर त्याचीही बातमी झालीच असती. अजून तरी तसं काही वाचनात आलेलं नाही.

चीनच्या सर्वोच्च 'नॅशनल पीपल्स काँग्रेस'नं गेल्या आठवड्यात या कायद्याला मंजुरी दिली. या 'काँग्रेस'च्या स्थायी समितीनंही हा कायदा मंजूर केला. या नव्या कायद्यान्वये चीननं स्वतःच स्वतःला दक्षिण चीन समुद्र आणि परिसराच्या सुरक्षेसाठी आपण मुखत्यार असल्याचं जाहीर केलंय आणि इतकंच नाही तर ''यापुढे या समुद्रात चीन कोणत्याही जहाज, नौका वा बेटांवर एकतर्फी हल्ला करू शकेल''. या कायद्यानुसार, त्या समुद्रामध्ये ''चीनची राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रीय हितसंबंध, सार्वभौमत्व यांस बाधा आणणाऱ्या'' कोणाही विरोधात लष्करी कारवाई करण्याचे अधिकार आपल्या या शेजारी देशानं स्वतःकडे घेतलेत. म्हणजे या देशानं पूर्वेकडे समुद्रात जपानच्या अधिकाराला आव्हान दिलंय आणि दक्षिण समुद्रातून चीननं अनेक देशांविरोधात शड्डू ठोकलेत.

हे वाचून असंही वाटेल काहींना की, ते दक्षिण चीन समुद्राचं इतकं काय घेऊन बसायचं, आपण चीनला आपल्याच दारात इतकं घाबरवलेलं असताना इतक्या लांबची काळजी कशाला करायची वगैरे. याची दोन प्रमुख कारणं : या दक्षिण चीन समुद्रातून आपले व्यापारी हितसंबंध असलेल्या अनेक देशांचा मार्ग आहे, हे एक. आणि दुसरं म्हणजे या परिसरात ११०० कोटी बॅरल्स इतकं तेल आहे आणि १९० लाख कोटी घनमीटर इतका नैसर्गिक वायू आहे. चीनला या इतक्या प्रचंड ऊर्जा स्रोतात कोणालाही भागीदार करायचं नाही. हे सर्व आपल्यासाठीच असायला हवं असा त्या देशाचा आग्रह आहे.

आणि मुख्य म्हणजे व्हिएतनामसारख्या देशात आपली 'ओएनजीसी विदेश'सारखी कंपनी मोठमोठी कंत्राटं राबवतीये. हा कायदा प्रत्यक्षात येण्याआधीच चीननं आपल्या 'ओएनजीसी'च्या कामात अडथळे आणायला सुरुवात केली आहे. व्हिएतनामनं तशी तक्रारही केली आपल्याकडे. आपण त्यावर चीनला किती रागे भरले हे काही कळायला मार्ग नाही. पण आता तर तीही शक्यता नाही. कारण या परिसराची सार्वभौम मालकीच चीननं स्वतःकडे घेतल्याचं जाहीर केलंय.

सार्वभौम नेते, सार्वभौम देश. अशा सार्वभौमांच्या कात्रीत सध्या जग सापडलेलं दिसतंय.

girish.kuber@expressindia.com
@girishkuber

---

## व्यक्तिवेध

**पत्रकारितेत राहून** साहित्याच्या जगात विहार करणारे अनेक ज्येष्ठ पत्रकार आहेत. ही परंपरा अगदी कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांपासून सुरू होते आणि ती अखंडितच आहे. शंकर सारडा हे या परंपरेतील एक लक्षात राहणारे व्यक्तिमत्त्व. दैनिकाच्या धबडग्यात बातमीदारी किंवा बातम्यांची भाषांतरे करणे, याहून जरा निराळे पण आवडीचे असे पुरवणी संपादनाचे काम त्यांना मिळाले आणि त्यामुळेच त्यांना त्यांचा व्यासंगही करता आला. उत्तम लेखक आणि समीक्षक ही त्यांची ओळख. वृत्तपत्रीय स्तंभांमध्ये येणारी पुस्तक परीक्षणे ही परिचयात्मक न राहता, त्यामध्ये अधिक सखोलता यायला हवी, असा सारडा यांचा हट्ट असे. त्यांनी लिहिलेली परीक्षणे याची साक्ष आहेत. त्या लेखनामुळे साहित्य वर्तुळात त्यांचा दबदबा तर निर्माण झालाच, परंतु स्वतःच्या लेखनाकडेही त्यांना समीक्षकाच्या नजरेतून पाहता आले. लहानपणापासून असलेली वाचनाची आवड जशी त्यांच्या उपयोगाला आली, तशीच लेखनाची पारखही करता आली. ज्या काळात मराठी साहित्यामध्ये आधुनिकतेचा प्रवाह क्षीण स्वरूपात का होईना सुरू झाला, तेव्हा शंकर सारडा यांनी त्या प्रवाहाला उजळ केले आणि वासूनाका, चक्र यांसारख्या कादंबऱ्यांचे महत्त्व वाचकांसाठी अधोरेखित केले. आनंद, साधना यांसारख्या नियतकालिकातून ते लिहिते झाले आणि त्यांनी स्वतंत्र लेखनालाही प्रारंभ केला. टॉलस्टॉय, गीबन यांच्या कादंबऱ्यांचा अनुवाद आणि सोन्याच्या टेकडीचा शोध, जादूमंतर छू, शर्थ पराक्रमाची यांसारख्या बालसाहित्यात भर घालणारी अनेक पुस्तके त्यांच्या नावावर जमा आहेत. विश्वसाहित्याची मराठी वाचकांना ओळख करून देणारा त्यांचा ग्रंथही वाचकप्रिय ठरला. बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद जसे त्यांनी भूषवले, तसेच विभागीय साहित्य संमेलनाचेही ते अध्यक्ष राहिले. महाराष्ट्र टाइम्स या दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीला साहित्यिक अंगाने नटवण्याचे त्यांचे कसब त्या काळी अतिशय नावाजले गेले. मराठी ग्रंथव्यवहारात वृत्तपत्रीय परीक्षणांचे महत्त्व वाढीस लावण्यासाठी सारडा यांनी प्रयत्न केले. साहित्य हा केवळ करमणुकीचा विषय नसून त्याकडे अधिक गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे, या त्यांच्या भूमिकेमुळे साहित्य जगात नव्या विचारांना दिशा मिळाली. नव्या लेखकांना प्रोत्साहन देत असतानाच त्यांच्या साहित्यिक कृतीचे यथायोग्य मूल्यमापन करण्याचे कामही त्यांनी केले. साधना साप्ताहिकात सहसंपादक म्हणून काम करताना वैचारिक लेखनाकडे वेगळ्या नजरेने पाहण्याची गरज त्यांच्या लक्षात आली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नियतकालिकाचे संपादन करतानाही त्यांनी जाणीवपूर्वक साहित्यिक मूल्ये वाढीस लागावीत यासाठी प्रयत्न केले. संपादक, लेखक, अनुवादक, समीक्षक आणि बालसाहित्यकार अशा अनेक पातळ्यांवर त्यांनी केलेले काम लक्षात राहणारे ठरले आहे. साहित्याकडे पाहण्याची विचक्षण वृत्ती आणि ममत्व हा त्यांच्या व्यक्तित्वाचा विशेष.



शंकर सारडा

त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मशाल सतत तेवत ठेवणारा एक लेखक आणि समीक्षक हरपला आहे.

---

## लोकमानस

loksatta@expressindia.com

### पायघड्यांनंतरही वाट पाहात राहू...

**'महाराष्ट्र 'धर्म'!'** (२९ जानेवारी) हा अग्रलेख वाचला. विजेवर चालणाऱ्या मोटारगाडी-निर्मितीतील टेस्लासारख्या जागतिक स्तरावरील उद्योगांना महाराष्ट्रासारख्या राज्यात कारखाने उभे करण्यास योग्य व अनुकूल वातावरण असल्यास नक्कीच येथे येऊ शकतील. परंतु त्यासाठी ते स्वतःहून पदर पसरतील अशी आशा करणे भाबडेपणाचे ठरेल. या कंपन्यांना पुढील ५०-६० वर्षे तरी बिनधोकपणे उद्योग करण्याची खात्री दिल्याशिवाय त्या येथे प्रस्थापित होणार नाहीत.

भविष्यातील उद्योग व्यवस्था हे केवळ पारंपरिक नट-बोल्ट-स्क्रू वा 'स्क्रू ड्रायव्हर' तंत्रज्ञानाच्या प्रकारच्या नसून नॅनो तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), जनुकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान व रोबो अशा अति प्रगत तंत्रज्ञानाशी निगडित असतील. त्यामुळे जमीन, पाणी, वीज वा 'एक खिडकी योजना'सारख्या अत्यावश्यक मूलभूत संसाधनाबरोबरच या तंत्रज्ञानांना पूरक अशी कुशल मानव संसाधने येथे आहेत व भविष्यकाळातही असतील याचीसुद्धा सरकारला खात्री द्यावी लागेल. हे उद्योग येथे धर्मादाय वा भारतीयांना रोजी-रोटी पुरविण्यासाठी येत नसून नफा कमविण्यासाठी येत असल्यामुळे सुलभ करप्रणाली वा इतर कुठल्याही प्रकारच्या हस्तक्षेपाविना त्यांच्या कंपन्या चालू राहण्यासाठी (केंद्र व) राज्य सरकारची धोरणे तसेच अंमलबजावणी यंत्रणा असणे अत्यंत गरजेचे आहे. सरकारे बदलली की ध्येय-धोरणे बदलतील हा 'पोरखेळ' या मोठ्या उद्योगांना चालणार नाही. या संदर्भात ठाम निर्धार असेल तरच येथेसुद्धा हे उद्योग उभे राहतील व मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकेल.

रतीब घातल्याप्रमाणे दर वर्षी भव्य-दिव्य प्रदर्शन वा समारंभात या प्रकारच्या कंपन्यातील बड्या बड्या अधिकाऱ्यांना पायघड्या घालून बोलाविले तरी तोंडी आश्वासने देत आपल्याला झुलवत ठेवतील व आपण मात्र ते येण्याची व भांडवल गुंतविण्याची वाट बघत राहू!

– **प्रभाकर नानावटी**, पुणे

### 'अर्थसंकल्प धर्म'देखील पाहावयास हवा

**'महाराष्ट्र 'धर्म'!'** हे संपादकीय (२९ जानेवारी) वाचले. औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र नेहमी पुढेच राहावा, राज्यात असलेल्या औद्योगिक क्षेत्रातील संधी वाढाव्यात ही कळकळ त्यात आहे. त्याबरोबरच, सोमवारी सादर होणार असलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात (२०२१-२२) महाराष्ट्रासाठी काय प्रोत्साहनपर तरतूद होईल, हाही मुद्दा महत्त्वाचा ठरला असता.

संसदेत १ फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या या अर्थसंकल्पाकडून अपेक्षा व्यक्त करताना देशातील जनतेच्या क्रयशक्तीमध्ये कशा प्रकारे वाढ होईल ही बाब महत्त्वाची असेल. कारण लोकांच्या हातात पैसा खर्च करण्यासाठी जर मोठ्या प्रमाणावर देण्यात आला तर त्याचा निश्चितच परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सकारात्मकपणे दिसून येईल. एकंदरीत सार्वजनिक खर्चामध्ये वाढ करणे अपेक्षित आहे. त्यावर राज्यातील कृषी, उद्योग, रोजगार यांना चालना मिळून करोनामुळे डबघाईस गेलेली राज्याची अर्थव्यवस्था पुन्हा नव्याने उभे राहू शकेल. याचा उपयोग महाराष्ट्र राज्याच्या विकासाला गती मिळण्यासाठी निश्चितच होईल, अशी आशा करता येते.

– **डॉ. नितीन चौधरी**, अकोला

### हा प्रकार आंदोलन फोडण्यासाठी?

**शेतकरी आंदोलनाविषयीची** पत्रे (लोकमानस, २८ जाने.) वाचली. प्रजासत्ताकदिनी जे घडले त्याचे सर्व भारतीयांना वाईट वाटत असेलच. सर्वात सुरक्षित असलेल्या ठिकाणापैकी एक महत्त्वाचे स्थान, तेथे घुसणे एवढे सोपे होते का? एवढा कडेकोट बंदोबस्त असताना असा अनुचित प्रकार घडत असेल तर प्रश्नचिन्ह उभे राहणारच. मागील साठ दिवसापासून आंदोलन करणारे आणि सरकार यांच्यात वाटाघाटीच्या ११ फेऱ्यानंतरही काही मार्ग निघत नाही हे विचारांना न पटण्यासारखे आहे. आंदोलन फोडण्यासाठी केलेला हा नियोजित प्रकार नाही, हे कशावरून ठरवणार?

– **अमोल बोरकर**, नांदगाव (चंद्रपूर)

### देवळात स्त्री-पुरोहित का असू नयेत?

**तृप्ती देसाई** यांनी देवीच्या देवळात स्त्री पुरोहित असावेत अशी मागणी केलेली आहे, याला पुण्याच्या ब्राह्मण महासंघ या संस्थेतील महिलांनीच विरोध केला आहे. विरोध करताना 'शिर्डीत त्या वाचल्या; पुण्यात समोरासमोर आल्यावर आम्ही बघून घेऊ' अशी हिंसक भाषा वापरली आहे. धार्मिक व्यक्ती वेळोवेळी अशा हिंसक का होतात हे न उलगडलेले कोडे आहे. घराघरात महिलाच मोठ्या संख्येने पूजा करताना आढळून येतात. पौरोहित्यातही रोजगारांची संधी विपुल प्रमाणात आहे. तेव्हा महाराष्ट्रातील समस्त महिलांनी या मागणीला पूर्ण पाठिंबा द्यायला हवा. देवीच्याच काय, पण देवांच्या देवळातही स्त्रिया पुरोहित का असू नयेत, असेही मला वाटते.

– **श्रीप्रसाद खुळे**, डोंबिवली पश्चिम

### रेखांश नव्हे, अक्षांशावर दोन तुकडे...

**'विचार' पानावरील** 'नवदेशांचा उदयास्त' या सुनीत पोतनीस यांच्या नव्या सदरात 'कोरियाचे दोन तुकडे' या मथळ्याचा माहितीपूर्ण लेख (२८ जाने.) वाचला. त्यात एक छोटी चूक आहे- 'हे तुकडे ३८ रेखांशाला धरून करण्यात आले...' अशा तऱ्हेचा उल्लेख या लघुलेखात आहे. परंतु रेखांश उत्तर-दक्षिण असतात. त्यांना स्थानपरत्वे 'पूर्व रेखांश'वा 'पश्चिम रेखांश' असे लिहावे लागते. रेखांशामुळे भूभागाचे उभे तुकडे पडतात. कोरियाच्या बाबतीत फाळणी आडव्या रेषेने पडली असून ती ३८° उत्तर या अक्षांशाला धरून आहे. तेव्हा '३८ रेखांश'च्याऐवजी '३८° उत्तर अक्षांश' असा उल्लेख हवा.

– **अरविंद वैद्य**, सोलापूर

### तिथे कोणता बोध घ्यायचा?

**'उलटा चष्मा'** सदरातील 'तुरुंगपर्यटन!' हे स्फुट (२९ जाने.) वाचले, तसेच त्याआधी (२६ जानेवारी) व्यंगचित्रकार प्रशांत कुलकर्णी यांच्या 'काय चाललय काय!' या सदरात त्यांनी मांडलेला 'आता इडी पर्यटन, सीबीआय पर्यटन...' हा मुद्दाही मिष्कील वाटला. फार पूर्वी आपले स्वातंत्र्य सेनानी, स्वातंत्र्य सैनिक यांनी कारावासात कोणत्या हालअपेष्टा, नरकयातना सोसल्या हे इतिहासाच्या धड्यांतून तसेच त्यांच्या चरित्र/आत्मचरित्रांतून वाचावयास मिळते. त्याउलट आता तुरुंगात कोण आहेत? काही चित्रपट तारे, तारका, काही राजकारणी तर काही घोटाळेवीर? तर काही चोर, बलात्कारी, भोंदू बाबा मंडळी यांना पाहण्यासाठी जायचे काय? त्यतून काय आदर्श, कोणता बोध घ्यायचा? काही कैदी वेगळ्या मार्गाने सुधारत आहेत ही जमेची बाजू पण त्यासाठी तुरुंगपर्यटन जरा नवलच आहे.

– **संतोष ह. राऊत**, लोणंद (जि. सातारा)

# वीजेची थकबाकी ८०० कोटींवर

## जिल्ह्यात करोना काळातील एकूण थकबाकी १०८१ कोटींवर पोहोचल्याने कारवाई सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** करोनाच्या काळामध्ये गेल्या दहा महिन्यांत पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील वीजबिलांची थकबाकी ८०० कोटींच्या पुढे गेली आहे. टाळेबंदीपूर्वीची थकबाकी धरून आता एकूण थकबाकी तब्बल १०८१ कोटींवर पोहोचली असल्याने आता थकबाकीदारांचा वीजपुरवठा तोडण्याच्या कारवाईचा इशारा महावितरणकडून देण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये प्रामुख्याने घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक वीजग्राहक नियमित वीजबिलांचा भरणा करीत असल्याने चालू बिलांची थकबाकी दरमहा ७० ते ८० कोटी रुपयांची दिसून येत होती. मात्र हीच थकबाकी आता तब्बल १०८१ कोटी ४१ लाख रुपयांवर गेली असल्याने महावितरणच्या महसुली तुटीमध्ये दिवसेंदिवस मोठी वाढ होत आहे. करोनाच्या गेल्या १० महिन्यांच्या कालावधीत पुणे जिल्ह्यातील वीजबिलांची थकबाकी ८०३ कोटींनी वाढली आहे. महावितरणच्या अस्तित्वासाठी नाइलाजाने थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई करावी लागणार आहे. वीजग्राहकांनी सहकार्य करून थकीत आणि चालू वीजबिलांचा भरणा करावा, असे आवाहन प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी केले आहे.

थकबाकी असणारे सर्वाधिक ११ लाख ५६ हजार ७५० ग्राहक घरगुती आहेत. त्यांच्याकडे ६३५ कोटी ४९ लाख रुपयांची थकबाकी आहे. वाणिज्यिक १ लाख ९४ हजार २५० ग्राहकांकडे २९५ कोटी ५५ लाख, तर औद्योगिक २७ हजार ९७० ग्राहकांकडे १५० कोटी ३६ लाख रुपयांची थकबाकी आहे. थकबाकीचा डोंगर ८०० कोटींच्या पुढे गेल्यानंतरही महावितरणकडून कोणतीही कारवाई झाली नव्हती. मात्र, सध्या महावितरणला वीज खरेदी, ठेकेदारांची देणी आणि दैनंदिन खर्चासाठीही पैसे उपलब्ध होत नसल्याने थकबाकीदारांना नियमाप्रमाणे नोटिस पाठवून नाइलाजाने वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई सुरू करण्यात येत आहे, असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### ६२ कोटींवरून १००० कोटींपुढे

पुणे, पिंपरी-चिंचवड शहर आणि जिल्ह्यात घरगुती, वाणिज्यिक आणि औद्योगिक वर्गवारीमध्ये सुमारे ३६ लाख ९० हजार ग्राहक आहेत. मार्च २०१९ मध्ये ५ लाख ९५ हजार ग्राहकांकडे केवळ ६२ कोटी ३८ लाख रुपयांची थकबाकी होती. मार्च २०२० मध्ये ८ लाख ९४ वीजग्राहकांकडे २७८ कोटींची थकबाकी होती. ही थकबाकी वसूल करण्यापूर्वीच मार्चमध्ये करोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे टाळेबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे वसुली थांबली आणि ही थकबाकी १००० कोटींच्याही पुढे गेली.

### हप्त्यांची सुविधा

करोनाकाळात वीजग्राहकांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून चालू वीजबिल तसेच थकबाकीची रक्कम भरण्यासाठी सुलभ हप्त्यांची सोय करून देण्यात आली आहे. वीजबिलांच्या तक्रारी असल्यास त्या संदर्भात तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व कार्यालयांना देण्यात आल्या आहेत, असे महावितरणकडून सांगण्यात आले.

# प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याबाबत कुलगुरूंची राज्यपालांकडे मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** राज्यातील उच्च शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांतील वर्ग प्रत्यक्ष सुरू करण्याची विद्यापीठांची तयारी असूनही राज्य शासनाच्या परवानगीशिवाय महाविद्यालये सुरू करता येत नाहीत. विद्यार्थीही महाविद्यालये सुरू करण्याची मागणी करत असून, महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी देण्याची मागणी राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे शुक्रवारी केली. विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्देश दिले असून विद्यापीठांनी प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याबाबत पुढाकार घ्यावा, असे राज्यपालांनी स्पष्ट केले.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूबरोबर दूरचित्रसंवादाद्वारे बैठक घेतली. उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव ओम प्रकाश गुप्ता या वेळी उपस्थित होते. विद्यापीठांचे २०२०-२१ या शैक्षणिक सत्रातील प्रत्यक्ष वर्ग सुरू करणे, विद्यापीठांतील रिक्त पदांची स्थिती, विद्यापीठांचे वार्षिक लेखापरीक्षण याबाबत आढावा घेण्यासाठी ही बैठक झाली.

राज्यातील पाचवी ते आठवीचे वर्ग सुरू झाल्याचे वर्तमानपत्रांतून कळते. अशा वेळी महाविद्यालये आणि विद्यापीठांतील वर्ग प्रत्यक्ष सुरू न होणे विसंगत वाटते. विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष सुरू करून ऑनलाइन वर्ग घेतले जात आहेत. आता करोनाची परिस्थिती नियंत्रणात आल्याने विद्यापीठे, महाविद्यालयांनी वर्ग सुरू करण्याचा, पाळ्यांमध्ये चालवण्याचा विचार करावा. विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालये सुरू करण्याबाबतचे निर्देश दिले असल्याने विद्यापीठांनी पुढाकार घ्यावा, असे राज्यपालांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांची वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय लवकर घेण्याची सूचनाही राज्यपालांनी केली.

**पदभरतीला अनुमती देण्याची सूचना**

विद्यापीठांमध्ये संविधानिक पदांशिवाय शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जवळ जवळ ५० टक्के पदे रिक्त असल्याचे काही कुलगुरूंनी राज्यपालांच्या निदर्शनास आणून दिले. रिक्त पदांमुळे विद्यापीठ प्रशासन चालवणे कठीण झाले असून तातडीने पदभरती करण्यास परवानगी देण्याची मागणीही कुलगुरूंनी केली. या पार्श्वभूमीवर संविधानिक पदांच्या भरतीला परवानगी देण्याची सूचना राज्यपालांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाला केली.

# घरवापसी रोखण्यासाठी भाजप सत्तेत येणार हे फडणवीस यांचे ध्रृपद

## बाळासाहेब थोरात यांच्याकडून खिल्ली

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** घरवापसीच्या निमित्ताने कोणी राष्ट्रवादी, कोणी काँग्रेस तर कोणी शिवसेनेत जाण्यास निघालेले आहेत. त्यांना रोखण्यासाठी भाजप सत्तेमध्ये येणार असे भाजपचे नेतेमंडळी बोलतात. भाजपा सत्तेत येणार हे हल्ली माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणाचे ध्रृपद झालं आहे, अशा शब्दांत महसूलमंत्री आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांनी फडणवीस यांची खिल्ली उडवली.

एका कार्यक्रमानिमित्त पुण्यात आलेल्या थोरात यांनी पत्रकारांशी संवाद साधला. थोरात म्हणाले, हिटलरशाहीप्रमाणे वागत केंद्र सरकार शेतकरी आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न करत आहे. अण्णा हजारे ज्येष्ठ सामाजिक नेते आहेत. कोठेही अन्याय होत असताना ते शांत राहतील, असे वाटत नाही. मात्र, त्यांच्या वयाचा विचार करता तब्येतीची काळजी वाटते. सत्तेच्या काळजीपोटी अण्णांना उपोषणाला न बसण्याची विनंती भाजप नेते करत असतील.

**चार-पाच महिन्यांमध्ये सामान्यांना लस**

करोना प्रतिबंधक लसीची कमतरता भासणार नाही. सामान्य नागरिकांना चार ते पाच महिन्यांमध्ये लस उपलब्ध करून देण्यात येणार असून राज्य सरकार योग्य तो पाठपुरावा करत असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

टोपे म्हणाले, लसीकरणाचा २ लाखांचा टप्पा आपण पूर्ण केला आहे. लसीकरणाबाबत आत्मविश्वस वाढत आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थानी लसीकरणासाठी नावे नोंदवून घेतली पाहिजेत. ३० कोटी लोकांना आपण लसीकरण करणार आहोत.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आंदोलन करत आहेत याचा अर्थ सरकार कुठे तरी चुकत आहे. त्यांच्या आंदोलनाला महत्त्व असल्याने मनधरणी केली जात आहे, अशी टिपणी टोपे यांनी केली.

# राष्ट्रीय युद्ध स्मारकाचे लोकार्पण



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** नूतनीकरण केलेल्या राष्ट्रीय युद्ध स्मारकाचे शुक्रवारी लोकार्पण करण्यात आले. दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल सी. पी. मोहंती यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

भारतीय लष्कराने १९७१च्या भारत-पाक युद्धात मिळवलेल्या विजयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त १९९८ मध्ये या स्मारकाची उभारणी करण्यात आली. इंडियन एक्स्प्रेस समूहाच्या पुढाकाराने १५ ऑगस्ट १९९८ रोजी महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल पी. सी. अलेक्झांडर यांच्या हस्ते या स्मारकाचे लोकार्पण झाले होते. त्यानंतर या स्मारकाने पुण्यातील महत्त्वाच्या स्मारकांमध्ये स्थान मिळवले आहे.दररोज १००० पेक्षा जास्त पर्यटक येथे भेट देतात. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय लष्कराच्या आठ प्रमुख कामगिरी दर्शवणारे आठ शौर्यस्तंभ, विविध लढ्यांमधील शौर्यगाथांवर आधारित चार भित्तिशिल्प आणि परमवीरचक्र सन्मान प्राप्त २१ जवानांची शिल्पेही उभारण्यात आली आहेत. नूतनीकरण केलेले युद्ध स्मारक आणि लाइट अँड साउंड शो करोनाच्या नियमांचे पालन करून शुक्रवार, शनिवार आणि रविवारी पर्यटकांसाठी खुले राहणार असल्याचेही या वेळी जाहीर करण्यात आले.


HOME LOAN
6.90% Onwards
Loan upto ₹ 15cr
*Terms & Conditions Apply



- 6 EMI Waiver on Ready to Move Home
- Exclusive Griha Varishtha Home Loan scheme for retired pensioners and salaried individuals having pension benefit with loan tenure upto attainment of 80 years of age
- Waiver of Processing Fees

२७.९३% वितरण वायओवाय (क्यु-३)
३०.१०% पीबीटी वायओवाय (क्यु-३)
२१.६७% पीएटी वायओवाय (क्यु-३)

स्वगृहाय अर्थसहाय:
LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD

सीआयएन : एल६५९२२एमएच१९८९पीएलसी०५२२५७
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे लाईफ बिल्डिंग, २रा मजला, ४५/४७, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१.
दूरध्वनी : ९१–२२–२२०४९९१९, २२०४९७९९,
फॅक्स : ९१–२२–२२०४९६८२
कॉर्पोरेट कार्यालय : १३१, मेकर टॉवर, एफ प्रिमायसेस, १३वा मजला, कफ परेड, मुंबई – ४००००५.
दूर. : ९१–२२–२२१७८६००, फॅक्स : ९१–२२–२२१७८७७७
ई–मेल : lichousing@lichousing.com

**३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाहीकरिता अलेखापरिक्षित स्वायत्त वित्तीय निष्कर्षांचा सारांश**

(₹ कोटीत)

| अनु क्र. | तपशील | ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेली तिमाही | ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेली नऊमाही | ३१ डिसेंबर, २०१९ रोजी संपलेली तिमाही |
|---|---|---|---|---|
| | | पुनरावलोकीत | पुनरावलोकीत | पुनरावलोकीत |
| १ | प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ४,९२३.९९ | १४,८८३.३२ | ४,९९६.४७ |
| २ | कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपूर्व) | ९६९.६४ | २,९९६.५७ | ७४५.३२ |
| ३ | कालावधीतील करपूर्व निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींनंतर) | ९६९.६४ | २,९९६.५७ | ७४५.३२ |
| ४ | कालावधीतील करोत्तर निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींनंतर) | ७२७.०४ | २,३३५.४२ | ५९७.५३ |
| ५ | कालावधीतील एकूण समावेशक उत्पन्न (कालावधीतील नफा/(तोटा) (करोत्तर) आणि अन्य समावेशक उत्पन्न (करोत्तर) समाविष्ट असलेले) | ७२१.३७ | २,३२९.१३ | ५९५.५५ |
| ६ | भरणा केलेले सम भाग भांडवल | १००.९३ | १००.९३ | १००.९३ |
| ७ | (प्रत्येकी रु. २/–च्या) प्रति भाग मिळकत (चालू असलेल्या व खंडित प्रवर्तनांसाठी) पायाभूत आणि सौम्यीकृत *(तिमाही आणि नऊमाहिकरीता ईपीएसचे वार्षीकीकरण केलेले नाही) | १४.४१ * | ४६.२८ * | ११.८४ * |

टीपा:

१. मागील कालावधीतील आकडेवारी ही चालू आकडेवारीसोबत म्हणजेच दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या आकडेवारीसोबत तूलना करण्याकरिता आवश्यक असेल तेथे एकत्रित/पुनर्वर्गीकृत/पुनर्संचयित केली गेली आहे.

२. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही/नऊमाहीकरीता स्वायत्त वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. तिमाही/नऊमाहीकरीता स्वायत्त वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारुप स्टॉक एक्सचेंजेस – नॅशनल स्टॉक एक्सचेंजेस (एनएसई), बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) वेबसाइट्स www.nseindia.com, www.bseindia.com व कंपनीची वेबसाइट www.lichousing.com वरही उपलब्ध आहे.

**३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊमाहीकरिता अलेखापरिक्षित एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षांचा सारांश**

(₹ कोटीत)

| अनु क्र. | तपशील | ३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेली तिमाही | ३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेली नऊमाही | ३१ डिसेंबर २०१९ रोजी संपलेली तिमाही |
|---|---|---|---|---|
| | | पुनरावलोकीत | पुनरावलोकीत | पुनरावलोकीत |
| १ | प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ४,९२६.६५ | १४,९००.३१ | ५,००६.०२ |
| २ | कालावधीतील निव्वळ नफा / (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींपूर्व) | ९७०.०८ | ३,००२.६६ | ७५१.३६ |
| ३ | कालावधीतील करपूर्व निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींनंतर) | ९७०.०८ | ३,००२.६६ | ७५१.३६ |
| ४ | कालावधीतील करोत्तर निव्वळ नफा / (तोटा) (अपवादात्मक आणि/अथवा असाधारण बाबींनंतर) | ७२१.११ | २,३३४.८६ | ६०२.२५ |
| ५ | कालावधीतील एकूण समावेशक उत्पन्न (कालावधीतील नफा/(तोटा) (करोत्तर) आणि अन्य समावेशक उत्पन्न (करोत्तर) समाविष्ट असलेले) | ७१३.६९ | २,३३०.०८ | ६००.२५ |
| ६ | भरणा केलेले सम भाग भांडवल | १००.९३ | १००.९३ | १००.९३ |
| ७ | (प्रत्येकी रु. २/–च्या) प्रति भाग मिळकत (चालू असलेल्या व खंडित प्रवर्तनांसाठी) पायाभूत आणि सौम्यीकृत *(तिमाही आणि नऊमाहिकरीता ईपीएसचे वार्षीकीकरण केलेले नाही) | १४.२९ * | ४६.२७ * | ११.९३ * |

टीपा:

१. मागील कालावधीतील आकडेवारी ही चालू आकडेवारीसोबत म्हणजेच दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या आकडेवारीसोबत तूलना करण्याकरिता आवश्यक असेल तेथे एकत्रित/पुनर्वर्गीकृत/पुनर्संचयित केली गेली आहे.

२. वरील विवरण हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या तिमाही/नऊमाहीकरीता एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारुपाचा सारांश आहे. स्वायत्त आणि एकत्रिकृत वार्षिक वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारुप स्टॉक एक्सचेंजेस – नॅशनल स्टॉक एक्सचेंजेस (एनएसई), बॉम्बे स्टॉक एक्सचेंज (बीएसई) वेबसाइट्स www.nseindia.com, www.bseindia.com व कंपनीची वेबसाइट www.lichousing.com वरही उपलब्ध आहे.

मंडळाच्या वतीने आणि साठी
सही/ –
सिद्धार्था मोहंती
व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९ जानेवारी, २०२१

Apply online at lichousing.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# चतुरंग

आपल्या प्रतिक्रिया व सूचना देण्यासाठी
chaturang@expressindia.com

शनिवार, ३० जानेवारी २०२१







## दशकथा

### २०१०-२०२०


**या वर्षी, २०२१ मध्ये आपण नुसते नववर्षातच नाही, तर नव्याकोऱ्या दशकात पाऊल टाकले आहे. एक अख्खे दशक संपते तेव्हा एक मोठा आणि नोंदी करण्याजोगा ऐवज ते आपल्या हाती देऊन गेलेले असते. या नोंदी महत्त्वाच्या, कारण त्यात आपण शिकलेले धडे असतात. ठेचा खाऊन कमावलेल्या अनुभवांचा तो ठेवा असतो. या ठेव्यामध्ये 'अर्धी लोकसंख्या' असलेल्या स्त्रियांच्या हाती काय लागले, याचा हिशोब मांडायलाच हवा. काही स्वप्नभंगाचे क्षण आणि काही कटू आठवणींच्या शिकवणीबरोबरच नव्या दशकासाठी अंगी बाळगण्याची उमेदही या हिशोबातून मिळेल. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, विज्ञान, तंत्रज्ञान, मनोरंजन, कला, कायदा अशा विविध क्षेत्रात स्त्रियांनी या दशकात काय कमावले आणि काय गमावले याचा हिशोब मांडणारे सदर 'दशकथा' दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी.**

# दशकाचा सामाजिक लेखाजोखा

**गेल्या दशकातील घडामोडींचा स्त्रीवर, तिच्या जगण्यावर प्रतिकूल, अनुकूल परिणाम घडले. काय आहेत ते? महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेच्या उपसभापती आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतलेला गेल्या दशकातील सामाजिक घडामोडींचा हा आढावा.**

२०१० ते २०२० या दशकाची सुरुवात झाली त्या वेळेस १९९० च्या जागतिकीकरणाचा सगळा संदर्भ आणि त्यामुळे झालेली नांदी तर स्पष्टच होती. विशेषतः २०१० पर्यंत जे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदल झाले होते त्याबाबतच्या वेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रियांना आणि परिणामांना सुरुवात झाली होती, असे म्हणायला हरकत नाही. दशकाच्या सुरुवातीला स्थिर वाटणारे, पण या दशकांचा एकूण मागोवा घेतला, तर सामाजिक संदर्भ आणि त्यातील विकासाच्या सर्व प्रश्नांचा विचार केल्यावर वाटते, की जणू आपण मोठ्या गोल कालचक्रामध्ये उभे असावे आणि आसपासची जमीन, आकाश, उजवी-डावीकडे तुम्ही धरलेले आधार आणि तुमचे शेजारी, सोबती सगळे दणादण गरगर फिरवून ते परत एका बाजूला मंद गतीने वर्तुळाकार फिरत असावे! त्यानंतर तुम्ही १० वर्षांनी तपासून पाहिले तर दाही दिशांचे अष्टावधानी बदल लक्षात येतात...

एकतर कुटुंब, संस्कृती, समाज आणि धर्म या चारही क्षेत्रांमध्ये अनेक मूल्यांमध्ये बदलाला सुरुवात झालेली आपल्याला दिसून येते. तशी ही समाज सुधारण्याची प्रक्रिया अनेक वर्षांपासून सुरू असतेच, तरीसुद्धा गेल्या दशकात विशेषतः आपल्या हाताशी आलेल्या तंत्रज्ञानाची फार मोठी



शक्ती, समाजमाध्यमे, त्यामधून जगाशी आणि बाकीच्या आप्तस्वकीयांशी जोडले जाण्याची संधी, तसेच समाजात प्रचंड वाढलेली अस्वस्थता ही काही वैशिष्ट्ये या बदलामागची मूलभूत कारणे आहेत. या अस्वस्थतेतूनच दर वर्ष दीड वर्षाने वेगवेगळ्या विषयांवर फार मोठ्या प्रमाणात उद्रेक झालेले आपल्याला दिसतात. २०१० नंतर झालेले भ्रष्टाचारविरोधी आंदोलन गाजले. त्यानंतर दिल्लीतील 'निर्भया'च्या २०१२ मध्ये घडलेल्या घटनेने तर संपूर्ण देश हादरला. या घटनेच्या निमित्ताने देशभर बलात्काराच्या संदर्भात तीव्र स्वरूपात प्रतिक्रिया उमटल्या. ऐतिहासिक अशा 'निर्भया कायद्या'द्वारे बदलालासुद्धा चालना मिळाली. त्यातून स्त्रियांवरील अत्याचारांच्या विरोधात कठोर पावले उचलणे शक्य झाले.

याच काळात युवकांच्या अस्वस्थतेला आणखी एक परिमाण होते आणि ते म्हणजे त्यांच्या नवस्वप्नांची वाट कशी शोधायची हे. त्यांच्यासाठी हा दुहेरी काटेरी प्रवास होता. कुटुंबाच्या अपेक्षा आणि त्यात आपण बसतो की नाही यामध्ये सातत्याने चालणारे द्वंद्व एकीकडे, तर दुसरीकडे काही प्रश्नांना थेट भिडणाऱ्या सामूहिक चळवळीचा अभाव, त्यांच्या मध्यमवर्गीय विचारांना जाणवत होता. काही प्रश्न सुटले, परंतु काही प्रश्नांना उत्तरे सापडत नसल्याची अधांतर अवस्था, यामुळे एक वेगळी सामाजिक पोकळी आपल्याला दिसून येते. विशेषतः कुटुंबातील नातेसंबंधांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात तडे गेले किंवा त्यामध्ये खूप बदल झाले आहेत, असे आपण म्हणू शकतो. पती-पत्नीच्या नात्याचा कस लावणारे विषय तीव्रतेने बदलू लागले आहेत. नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणामध्ये असे दिसून आले, की शहरांचा विचार करता समाजामध्ये स्त्री-पुरुष समानता अल्पतः का होईना रुजू लागली आहे. दिल्ली, मुंबई, बंगळूरु, कोलकाता, चेन्नई येथील १३ टक्के लोकांना वाटते, की स्त्रियांनी घराबाहेर जाऊन काम करू नये. या ऑनलाइन सर्वेक्षणात ९० टक्के भारतीयांना वाटते, की घरकामात पती-पत्नी दोघांनी हातभार लावला पाहिजे. त्याचबरोबर ७५ टक्के लोकांना असेही वाटते, की स्त्रियांना नोकरीत अजून वाव मिळणे आवश्यक आहे. हे उदाहरण दखलपात्र आणि दिलासा देणारे आहे. 'करोना'मुळे जी उलथापालथ झाली त्याचाही हा परिणाम असू शकतो. पुढच्या काही वर्षांत कौटुंबिक स्तरावर स्त्रियांच्या आयुष्यात काही अंशी का होईना, सकारात्मक फरक पडेल, असे सर्व्हेक्षणामुळे वाटते.

मात्र त्याचवेळी समोर आलेल्या काही घटनांमुळे हेही स्पष्ट होते, की विवाहाचा निर्णय घेणे असो किंवा स्त्री-पुरुषांचे नातेसंबंध, त्या सगळ्यात हिंसात्मकता वाढलेली आहे. ती फक्त कौटुंबिक पती-पत्नी संबंधांतील बदलांमुळे घडणारी हिंसा नाही, तर पालक-मुले यांच्या नात्यातील बदलांमुळे तसेच घरातल्या ज्येष्ठ नागरिकांबरोबरच्या बदलत्या नात्यामुळेही कौटुंबिक ताण वाढलेले आहेत. संयुक्त कुटुंबाकडून विभक्त कुटुंब असा बदल झाला खरा, परंतु गेल्या काही वर्षांत विभक्त कुटुंबांमधील प्रश्न वेगळ्या पद्धतीने वाढले आणि त्याचबरोबरीने संपत्तीवरून निर्माण होणारे प्रश्नही क्लेश, ताण वाढवत आहेत. गेल्या दशकात प्रचंड वेगाने शहरीकरण झालेले असल्यामुळे त्याचा परिणाम कुटुंबात अंतर पडण्यात झाला. एकमेकांमधला संवाद कमी झाला. माणसे आत्मकेंद्री होऊ लागली. मानसिक ताण वाढू लागला. माणसामाणसांतील संवादाची गरज वाढू लागली आहे. पुढच्या काळात हे ताण वाढून वेगळे मानसिक प्रश्न निर्माण होऊ नयेत याची काळजी घ्यावी लागणार आहे.

दुसरीकडे हेही दिसते आहे, की शेतकरी स्त्रियांचे प्रश्न वाढू लागले आहेत. त्यांच्यात प्रचंड परवशता, अस्वस्थता, किंबहुना त्यातील टोकाची प्रतिक्रिया म्हणजे आत्महत्या हेही दिसून येते. पुरुष शेतकऱ्यांनी तर आत्महत्या केलेल्या आपल्याला माहीत आहेतच, परंतु स्त्री शेतकऱ्यांनीही आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. या सगळ्या लढायांमध्ये कायदेशीर मार्गाने आपल्याला न्याय मिळत नाही, अशी एक जाणीव लोकांमध्ये आहे.

आणखी काही महत्वाच्या गोष्टी या दशकामध्ये घडल्या. देशात दोन लोकसभा निवडणुका, महाराष्ट्रातही निवडणुका होऊन गेल्या, त्यात मोठे सत्तांतर झाले. आतापर्यंत पारंपरिकरीत्या जो स्त्री मतदार हा मुख्यतः काँग्रेसविरोधी आहे, असे मानले जात होते, त्यांचा टक्का कमी कमी होत चालला होता. तो टक्का आणखी कमी होऊन त्यांनी सत्ता परिवर्तनाच्या बाजूने कौल दिलेला दिसतो. किंबहुना जे विजयी झाले- मग त्यात महाराष्ट्रातील राजकारण असेल किंवा त्याखेरीज इतर भागांमध्ये, म्हणजे राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, या सगळ्या राज्यांमध्ये ज्या निवडणुका झाल्या किंवा उत्तर प्रदेश, बिहार येथे गेल्या दशकात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकांमध्येही स्त्री मतदारांनी वाढती आणि अधिक जागरूक भूमिका बजावलेली दिसून आली. त्याचबरोबरीने स्त्री मतदारांच्या अपेक्षाही वाढत्या आहेत. या अपेक्षा रोजगार, सुरक्षितता, निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग, काही गावांमधील मोठ्या प्रमाणात झालेली पाणी, पर्यावरण, मंदिर प्रवेशाबाबतची आंदोलने, यात स्पष्ट झाल्या. दारूबंदी व्हावी यासाठी झालेल्या आंदोलनाचा प्रभाव आपल्याला राजकीय प्रक्रियेतदेखील दिसून आला. एका बाजूला बँकांची फसवणूक करणारी मोठी धेंडे षडयंत्रे रचत होती, पण त्याच वेळेला महिला बचतगटांनी संपूर्ण भारतात आणि महाराष्ट्रात प्रचंड संघटन केलेले दिसले. या बचत गटांना मिळालेले यश अत्यंत दखलपात्र आणि देदीप्यमान आहे. महिला बचतगटांमध्ये कर्जाच्या परतफेडीचे प्रमाण ९९ टक्के आहे. स्त्रियांनी किती मोठ्या प्रमाणात प्रामाणिकपणाने आर्थिक व्यवहार शिकून घेतला याचे हे एक चांगले उदाहरण आहे. त्याच बरोबरीने अनेक जणी छोट्यामोठ्या का होईना, पण मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्यामध्ये उतरल्या. साहजिकच आर्थिक भान त्यांच्यात आलेच, शिवाय कुटुंबातही त्यांना महत्त्व मिळू लागल्याचे चित्र दिसते आहे, जे नक्कीच दिलासा देणारे आहे. काळाप्रमाणे बदलणे हा स्थायीभाव. त्याप्रमाणे समाजातील वेगवेगळ्या घटकांनी बदल पाहिले. त्या घटकांमध्ये गरीब, सामान्य १०० स्त्री-पुरुषांपैकी साधारणपणे ६२ लोकांकडे मोबाईल फोन असणे आणि 'डिजिटली' जोडले जाणे हा त्यांच्या कामाचा किंवा त्यांच्या आयुष्याचा भाग बनला. गेल्या विशेषतः तीन-चार वर्षांमध्ये पैशांचे व्यवहार दूरध्वनीवरून किंवा फोनवरून होणे तेसुद्धा अगदी छोट्या छोट्या गावांमध्ये होणे, हा फार मोठा बदल आहे.

असंघटित क्षेत्रातील मजुरांमध्ये दोन तृतीयांश स्त्रियांचा सहभाग आहे. त्यांना कितीतरी आव्हाने पेलावी लागली. यातील चित्र असे आहे, की अर्थव्यवस्थेमध्ये विशाल स्वरूपाची आव्हाने आहेत आणि त्याचबरोबर असंघटित क्षेत्राला मिळणाऱ्या पायाभूत सुविधा अत्यंत कमी. परिणामी अत्यंत कष्टांच्या रहाटगाडग्यामध्ये गोरगरीब स्त्रियांचे जीवन बांधले गेले आहे. याबाबत समाज आणि प्रशासनात संवेदनहीनताच दिसते. ऊसतोड कामगार स्त्रियांना कामाच्या अपरिहार्यतेमुळे स्वतःची आरोग्यविषयक हेळसांड होताना शेवटी गर्भाशय काढून टाकले तर बरे, असे वाटेपर्यंत परिस्थिती व्हावी, हीदेखील शोकांतिका समोर आली आहे. म्हणून असंघटितांच्या डोलाऱ्यावर, तो डोलारा डगमगता ठेवून, त्याच्या पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून संघटित विकास साधला गेला, तर त्याचे पाय अस्थिर राहातील हा संदेश आपल्याला या दशकाने दिला आहे. त्यावर पुढील काळात काही सकारात्मक चित्र दिसेल ही अपेक्षा.

याखेरीज कायदा व्यवस्थेनेसुद्धा काही ऐतिहासिक स्वरूपाचे निर्णय दिले. त्यात स्त्रियांच्या मंदिर प्रवेशाबद्दल 'शबरीमाला'चा जो निर्णय दिला गेला, तो अत्यंत महत्त्वाचा मानला जायला हवा. शबरीमालाच्या निर्णयामध्ये असे स्पष्ट केले, की केवळ स्त्री म्हणून त्यांना प्रवेश नाकारणे योग्य होणार नाही. दुसरे म्हणजे 'निर्भया' कायद्याप्रमाणे 'पॉक्सो' कायदा- म्हणजे बाल लैंगिक शोषण विरोधी कायदाही केंद्र सरकारने मान्य केला आणि त्याला चालना मिळाली. त्यामुळे हळूहळू पुढच्या काळामध्ये न्यायाचे स्वरूप अधिक वेगळे होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र स्त्रियांवरील अत्याचारांच्याबाबतीत हे दशकही अपवाद ठरले नाही. स्त्रियांवर एकामागून एक अत्याचाराची प्रकरणे होत आहेतच. कोपर्डीची घटना महाराष्ट्रामध्ये घडली आणि महाराष्ट्र संपूर्णपणे हादरून गेला. अनेक जिल्ह्यांमधील घटना पाहाता समाजात मुलींच्या अस्तित्वालाच किती आव्हाने आहेत हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. मात्र अशा प्रश्नावर समाज एकत्र येतोय, आवाज उठवतोय, असेही सकारात्मक चित्र यानिमित्ताने दिसले. या सगळ्याचे प्रतिबिंब सर्वोच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या निर्णयांमध्ये अप्रत्यक्षरीत्या दिसले. त्याचा एक वेगळा आविष्कार म्हणजे तिहेरी तलाकच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय. प्रत्येक इच्छुक मुस्लीम स्त्रीला न्यायाच्या पायरीपर्यंत जाता येईल, अशा प्रकारचा हा निर्णय होता.



समलैंगिकतेबद्दलच्या कलम ३७७ बद्दलचा वादंगही सर्वोच्च न्यायालयाने संपवला. त्यात समलैंगिकांच्या अधिकारांबद्दल कोणाला आक्षेप घेता येणार नाही, तो त्यांचा अधिकार म्हणून मान्य होईल, अशा प्रकारची भूमिका स्पष्ट केली. मात्र एकूणच समाजाचा विचार केला तर वास्तवात स्त्रियांविरोधी क्रौर्य वाढलेले दिसून येते. ही क्रूरता आपण हाथरस, उन्नाव तसेच महाराष्ट्रातील वर्ध्याच्या घटनांमध्ये पाहिली. एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्या, अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, बलात्कार, अंधश्रद्धा, जातपंचायत, कौटुंबिक हिंसाचाराच्या वारंवार घडणाऱ्या घटनांमधूनही ती दिसते. त्या पार्श्वभूमीवर आंध्र प्रदेशात एका मुलीवर झालेल्या भीषण बलात्कारानंतर संपूर्ण भारतभर परत 'निर्भया' प्रकरणाप्रमाणेच जागरूकता दिसून आली. 'दिशा' कायदा, किंवा महाराष्ट्रात त्याला 'शक्ती' कायदा मानता येईल, या दृष्टीकोनातून भूमिका घेतली गेली. त्याचा निश्चितच फायदेकारक परिणाम दिसून येईल. अर्थात कायद्यांची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली तर कायदे प्रभावी ठरतात. याचे उदाहरण पाहायचे ठरवले तर कायद्याच्या अंमलबजावणीबाबत राजकीय पक्ष, सामाजिक संस्था व समाजाची इच्छाशक्ती असे सर्व घटक पुढे आले तर मानसिकताही बदलते व कायदा बदलाचा हेतू साध्य होतो, हे आपण स्त्रियांच्या राजकीय आरक्षणातून अनुभवत आहोत.



गेल्या दशकामध्ये स्त्री सक्षमीकरणाची परिमाणे बदलली. सक्षमीकरणाच्या या परिमाणांचा धागादोरा आपल्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांशी जोडला गेला. शाश्वत विकासाची जी १७ उद्दिष्टे आहेत त्या प्रत्येकाचे नाते स्त्रीच्या जीवनाशी आहे. स्त्री जीवन म्हणजे जणू कप्पाबंद चौकट- जणू काही मसाल्याचे १७ डब्यांचे पाळे असावे. त्यात शिक्षण, पर्यावरण, गृह, अशा पध्दतीने स्त्रियांच्या विकासाची एक फक्त कप्पाबंद चौकट धरली जात होती. त्याला शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांमुळे एक व्यापक परिमाण मिळाले. ही सतरा उद्दिष्टे म्हणजे गरीबी निर्मूलन, उपासमारी संपुष्टात आणणे, निरोगी आयुष्य व उत्तम स्वास्थ्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्त्री- पुरुष समानता, सर्वांसाठी पिण्यायोग्य स्वच्छ पाणी, परवडणारी व खात्रीची ऊर्जा, आर्थिक वाढ, पायाभूत सोयीसुविधा, सर्व स्तरावरील विषमतेचा अंत, मानवी वसाहती व शहरीकरण, उत्पादन व वापराची शाश्वत व्यवस्था, हवामानबदल व त्याचे परिणाम, महासागरी व समुद्री संसाधनांचे संरक्षण, जमिनीवरील जैव परिसंस्थांचे रक्षण, शांततामय समाजनिर्मितीला प्रोत्साहन, आंतरराष्ट्रीय सहकार्य ही आहेत. यात स्त्री-पुरूष समानता हे पाचवे उद्दिष्ट असले तरीसुद्धा उर्वरित सगळ्या १६ उद्दिष्टांचा एकमेकांशी कसा संबंध आहे, याबाबत संयुक्त राष्ट्रसंघ सातत्याने लक्ष वेधण्यासाठी कार्यक्रम करत आहे.

भारत सरकारनं पॅरिस करारावरती स्वाक्षरी केली आणि त्याचा आढावा २०१५ पासून सातत्याने घेतला गेला. वादळे, अतिवृष्टी, गारपीट, भूकंप अशा नैसर्गिक आपत्तींनी विकासाला खीळ बसते. त्याबाबत सर्व स्तरावर चिंतन सुरू झाले. सरकार आणि समाजाबरोबर लहान मुलामुलींनी, तरुणाईने हवामानबदल आणि शाश्वत विकास उद्दिष्टांवर मोहिमा हाती घेतल्या. गेल्या दशकाने हाती ठेवलेला वर्तमान आणि भविष्य बदलण्याची इच्छाशक्ती तयार होण्याची आशा या सामाजिक प्रयत्नांतून दिसते.

या दशकात आपण आणखी एका ऐतिहासिक पर्वामध्ये प्रवेश केला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने १ ऑक्टोबर २०२० रोजी जगातील सर्व देशांच्या शिखर परिषदेत २०२० ते २०३० हे संपूर्ण दशक 'महिला विकास आणि शाश्वत विकास' यांच्याबद्दलचे 'कृती दशक' म्हणून जाहीर केले आहे. या दृष्टिकोनातून या दशकामध्ये प्रत्येक देशाने स्वतःच्या विकासाचा आराखडा मांडून आपण जी स्त्री-विकास विषयक उद्दिष्टं १९९५ मध्ये ठरवली होती, त्या उद्दिष्टांची किती परिपूर्ती झाली आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी किती मनुष्यबळ, निधी अपेक्षित आहे याचा ताळमेळ समोर ठेवायचा आहे. 'विकासात कोणालाही मागे सोडू नका. सर्वांना बरोबर घेण्याचा, सामावून घेण्याचा आपण प्रयत्न करू या,' असे त्यातील सूत्र आहे. त्याबरोबरच २०३० पर्यंत सर्व क्षेत्रांत, सर्व स्तरांवर ५० टक्के स्त्रियांचा सहभाग असावा, हाही संकल्प करण्यात आला आहे. हा जाहीर संकल्प सर्व देशांचे पंतप्रधान आणि राष्ट्राध्यक्षांनी केला आहे.

याखेरीज दहशतवाद आणि धार्मिक एकविचारातून सगळ्या जगभर झालेले हल्ले आणि त्यामधून अमुक एका प्रकारचा धार्मिक अतिरेकीवाद नागरी जीवनामध्ये चालणार नाही, अशी भूमिका अनेक देशांनी घेतलेली आपल्याला दिसली. स्त्रियांच्या गळ्यातील स्कार्फ असेल किंवा बुरखा असेल, तिथपासून ते अनेक धार्मिक मुद्द्यांवरसुद्धा त्या-त्या देशांनी एक कठोर भूमिका घेतलेली दिसून येते. परंतु दहशतवादाचा विषय गेल्या दशकामध्ये खूप प्रभावीपणे व्यक्त झाला. भारताला जसे स्वतःवरचे हल्ले सहन करावे लागले, तसेच युद्धामध्ये ज्यांनी आयुष्य गमावले त्यांच्या परिवाराच्या भविष्याचा प्रश्नही समोर आहेच. आता पोलीस, सैनिकांमध्ये स्त्रियांचा समावेश वाढतो आहे. सैनिक परिवारातील काही धैर्यशाली स्त्रियांनी धाडसाने नवे पाऊल टाकत एक वेगळा इतिहास घडवला आहे.

एक देश म्हणून, एक राज्य म्हणून विविध प्रश्नांना सामोरे जात असतानाच एका बाजूस तंत्रज्ञानाचे मोठे आयुध आपल्या हातात आहे. त्याच वेळेस तंत्रज्ञानाच्या आरशामध्ये माणसांचे वैयक्तिक आणि खासगी जीवन ओरबाडले जात नाही ना, याची काळजी वाटावी, असे प्रतिबिंब दिसत आहे. माहितीचा महापूर आपल्यावर कोसळत आहे. जग जवळ येत आहे याचे फायदे आहेतच. गेल्या काही वर्षांत कपडे-घरगुती वस्तू खरेदीपासून कार्यालयीन कामांपर्यंत सर्व ऑनलाइन होत असतानाच माणूस अधिकाधिक व्यक्तीकेंद्री होत चालला आहे, हीसुद्धा काळजी वाटण्यासारखी गोष्ट आहे.

गेल्या दशकामधून काय मिळाले आणि काय गमावले, याचा ज्या वेळी मी विचार करते, तेव्हा 'सैराट'सारख्या चित्रपटातील नायक-नायिकेच्या व्यक्तिरेखांना आलेल्या भीषण अनुभवाप्रमाणे काही तरुण मुलामुलींच्या अपेक्षांच्या ठिकऱ्या झालेल्या मला दिसतात. माणसाच्या होत असलेल्या प्रगतीच्या बरोबरीने प्रबोधन आणि निर्णयप्रक्रियेबद्दलची परिपक्व समज वाढून समाजाने वाटचाल करणे अपरिहार्य असल्याचे जाणवते. तंत्रज्ञानामधून आयुष्य जसे सुखद होत आहे, तशी अलीकडे आलेल्या 'करोना'च्या संकटामधून पुढच्या काळात विज्ञान, संशोधन, आरोग्यविषयक दक्षता आणि सामूहिक मदतीचा शेजारधर्म या गोष्टी माणुसकीला तारणाऱ्या आहेत याची जाणीव झाली. हा फार मोठा धडा आपल्याला 'करोना'मुळे मिळालेला आहे. त्यामुळे २०२० पासून पुढची सुरुवात होत असताना मनुष्यजात म्हणून आपण खूप सक्षम आणि प्रभावी झालो असल्याचे लक्षात येते. त्या माहितीचा उपयोग करण्याबरोबर आणि माहितीच्या शक्तीबरोबरच संवेदनशीलता, सुसंस्कृतपणा आणि परिपक्वताही सांभाळून ठेवणे, हे एक फार जिकिरीचे आणि काळजीपूर्वक करण्यासाठीचे कर्तव्य प्रत्येकासाठी झाले आहे.

स्त्रियांनी यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत. विशेषतः स्त्री-पुरुष समानतेचा जो निर्देशांक आहे, त्यात उच्च शिक्षणामध्ये स्त्रियांनी वरचे स्थान गाठले आहे. परंतु तरीही स्त्रियांवर होणारा हिंसाचार आणि दुसऱ्या बाजूला मोठमोठ्या कंपन्यांमध्ये उच्च पदांवर आजही फार कमी प्रमाणात स्त्रिया असणे, यावर फारशी प्रभावी उत्तरे अद्याप सापडलेली नाहीत.

एवढ्या मोठ्या देशात लोकशाहीचा प्रयोग आपण चांगल्या प्रकारे यशस्वी केला. परंतु याच दशकात वेगळा विचार मांडणाऱ्या डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे, गौरी लंकेश यांसारख्या पुरोगामी, कृतिशील विचारवंतांची आठवण ठेवणेही आवश्यक आहे. इतर देशातील हिंसा या दशकात आपल्यापर्यंत येऊन पोहोचली. परंतु त्यामागच्या ज्या शक्ती आहेत त्या अदृश्य नसून, त्यांच्यापर्यंत पोहोचण्यात दुर्बल, असमर्थ ठरतो आहोत. याची जाणीव प्रत्येक संवेदनशील व्यक्तीला असणे गरजेचे आहे.

स्त्रियांच्या जगामध्ये सगळेच काही निराशेने भरलेले नाही. एका बाजूला स्त्रीला अधिक स्वातंत्र्य मिळाले, तिला संधी मिळते आहे, स्वतःचे अवकाश प्राप्त होत आहे. पण त्याच वेळी त्या अवकाशामध्ये कुठल्या तरी बाजूने तिच्या शक्तीवर घाला घालण्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रयत्न होताना पाहून तिच्या मनात चिंतेची किनारदेखील आहे. तरुण मुलामुलींना आणखी धाडसी व्हावे लागत आहे, लागणार आहे. त्या धाडसाच्या प्रतिक्रियेला जसजशी अनुभवांची शिदोरी प्राप्त होईल, तसतसे या डिजिटल आणि समाजमाध्यमांच्या शक्तीचा उपयोग समाजाच्या विकासासाठी अधिकाधिक होऊ शकेल असे मला वाटते.

असंघटित आणि बेरोजगारांच्या अस्वस्थेतेचे उद्रेक धडका मारत आहेत. प्रत्येक समाजाच्या तटबंदीपुरते ते उद्रेक मर्यादित राहातील की नाही याची शंका वाटते. त्याचे चटके आणि धग प्रत्येक घटकापर्यंत बसते आहे.

जग एका बाजूला व्यापक होत असताना त्यांच्यामधील अधिकारांचे, मानवाधिकारांचे, सामाजिक न्यायाचे धागेसुद्धा कसे मजबूत होतील हे पाहाणे आणि त्या दृष्टिकोनातून स्वतः संवेदनशील राहाणे हा गेल्या दशकाने आपल्याला शिकवलेला एक चांगला धडा आहे, पुढच्या काळासाठी या दशकाने दिलेला...



◆ neeilamgorhe@gmail.com



सरिता आवाड

## ज्येष्ठांचे लिव्ह इन

**वयाची साठी पार केल्यानंतर शारीरिक गरजेपेक्षा माणसाला ओढ असते ती निखळ मैत्रीची, मायेची, आपल्या मनातलं सांगायला, ऐकायला कुणीतरी आहे याची. तारक काटे या वनस्पतीशास्त्र अभ्यासकाला हा अनुभव मिळाला तो थेट जर्मनीत. लग्नाच्या कटू अनुभवानंतर त्यांच्यासारख्याच एकाकी पडलेल्या मोनिका बुलिटा त्यांच्या आयुष्यात आल्या आणि एकमेकांच्या सहवासात आयुष्यात गहिरे रंग भरले गेले. गेली दहा वर्षं लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये आणि तेही भारत-जर्मनी असं दूरदेशी राहूनही त्यांच्यातली ओढ आजही कमी झालेली नाही. काय असतं हे एकमेकांसाठी असणं म्हणजे?**

# उत्तरायणाचे गहिरे रंग



तारक काटे आणि मोनिका बुलिटा

२ जानेवारीला 'ज्येष्ठांचे लिव्ह इन' या सदरातला पहिला लेख प्रसिद्ध झाला आणि त्यावर वाचकांच्या खूप प्रतिक्रिया मिळाल्या. साशंकता आणि उत्सुकता असे दोन्ही पदर या प्रतिक्रियांना होते. त्यातली एक फोनवरून आलेली अनपेक्षित प्रतिक्रिया वर्ध्याच्या तारक काटे यांची होती.

वर्ध्याला शाश्वत विकासासाठी काम करणारी 'धरामित्र' ही संस्था आहे. तारक काटे त्याचे अध्यक्ष. वनस्पतीशास्त्र आणि पर्यावरण हे त्यांच्या अभ्यासाचे विषय आहेत. सेंद्रिय शेतीसंबंधी ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतात. आजतागायत अंदाजे दीड हजार शेतकऱ्यांना त्यांचं मार्गदर्शन लाभलं आहे. गेली अनेक वर्षं ते या कामात मग्न आहेत. तीन वर्षांपूर्वी पुण्यातल्या 'लोकशाही उत्सवा'चं उद्घाटन त्यांच्या हस्ते पार पडलं होतं, त्या वेळी त्यांनी केलेलं माहितीपूर्ण भाषण आणि त्यांची गंभीर मुद्रा माझ्या लक्षात राहिली होती. त्यामुळे तारक काटे यांचा फोन येणं मला उत्साहवर्धक वाटलं. पण ते जे बोलले त्यामुळे मला आनंद आणि आश्चर्य याचं भरतंच आलं. काटे सरांनी प्रांजळपणे सांगितलं, की त्यांना स्वतःला 'लिव्ह इन रिलेशनशिप'चा अनुभव आहे आणि त्यांना हा अनुभव सांगावासा वाटतो. माझा सर्वसाधारण अनुभव असा, की लोकांना 'लिव्ह इन'चा अनुभव असला तरी त्याबद्दल बोलायला सहसा नको वाटतं. आमच्याबद्दल लिहिताना नावं बदलून लिहा, अशीही काही जण विनंती करतात. या पार्श्वभूमीवर काटे सरांची व्यक्त होण्याची तयारी हा सुखद धक्का होता. अडचण म्हणजे ते वर्ध्याला आणि मी पुण्यात. 'करोना'च्या सध्याच्या दिवसांत प्रवास कठीण झालाय. भेटणार कसं? मी त्यांना काही प्रश्न ई-मेल केले आणि त्यांची काटे सरांनी मनमोकळी उत्तरं दिली. तीच उत्तरं लेखाच्या स्वरूपात.

काटे सरांचे वैवाहिक जोडीदाराबरोबरचे संबंध तणावपूर्ण होते. परस्परसंमतीनं २०१२ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला. याआधी बराच काळ ते विभक्त राहात होते. मुलांचाही घटस्फोटाला पाठिंबा होता. सरांचं काम तर सुरूच होतं. २००३ ते २०१२ या दरम्यान दक्षिण आफ्रिकेतल्या 'स्टेलनबॉश विद्यापीठा'त ते 'व्हिजिटिंग प्रोफेसर' म्हणून शिकवण्यासाठी जात असत. तिथे त्यांची व्हेरेना या जर्मन विद्यार्थिनीशी ओळख झाली. तिला भारताबद्दल खूप कुतूहल होतं. दौऱ्यादरम्यानच्या भेटीगाठी, गप्पांमधून सरांच्या आयुष्यातल्या उलथापालथीची तिला माहिती झाली. तिची आई मोनिका (बुलिटा)घटस्फोटित होती. मोनिका जर्मनीत शिक्षिका होत्या, पण घटस्फोटामुळे खूप उदास झाल्या होत्या आणि शाळेच्या नोकरीचा त्यांनी राजीनामा दिला होता. शाईनफेल्ड या जर्मनीतल्या छोट्याशा गावात त्या एकाकी जीवन जगत होत्या. व्हेरेनाला या दोघांच्या स्वभावाचा अंदाज आला होता. आपल्या आईनं आणि सरांनी एकमेकांना साथ द्यावी असं तिला वाटलं. या दोघांचे सूर जुळतील याची तिला खात्री वाटत होती. सरांना तिनं ही कल्पना सांगितल्यावर त्यांनी पहिल्यांदा ती झटकून टाकली. भारत आणि जर्मनी यातला इतका सारा भेद ओलांडून सहजीवनाचा पट कसा विणता येईल, असं त्यांना वाटलं. पण व्हेरेनानं आपला आग्रह सोडला नाही. सरांना आणि आपल्या आईला (मोनिका यांना) परस्परांचे ई-मेल आयडी दिले आणि संवाद साधण्याचा आग्रह केला. तिच्या आग्रहाखातर काटे यांनी मोनिकांशी संवाद साधला. काही महिन्यांनी मोनिकांनी सरांना जर्मनीला बोलावलं. त्याप्रमाणे ते मोनिका यांना भेटले. दोन आठवडे ते एकमेकांच्या सहवासात होते. यानंतर आपण एकत्र येऊ शकतो, आपले सूर जुळतात, असा उभयतांना विश्वास वाटला आणि त्यांनी सहजीवन सुरू करण्याचं ठरवलं. सरांच्या दृष्टीनं ही चमत्काराप्रमाणे अनपेक्षित घटना होती. घटस्फोटानंतर उर्वरित आयुष्य एकट्यानं काढायची त्यांनी मानसिक तयारी केली होती. पण अनपेक्षितपणे आयुष्यानं वळण घेतलं. हा निर्णय घेतला तेव्हा सरांचं वय ६२ होतं, तर मोनिका ५७ वर्षांच्या होत्या. आता या गोष्टीला दहा वर्षं झाली आहेत.

हे वाचल्यावर व्हेरेनाचं मला विशेष कौतुक वाटलं. इथल्या अनुभवाप्रमाणे आपल्या आई किंवा वडिलांच्या आयुष्यात दुसरी कुठली व्यक्ती येणं ही मुलांच्या दृष्टीनं दुस्सह घटना असते. पण सरांची मुलंही याला अपवाद ठरली. त्यांनीसुद्धा या नव्या नात्याचं स्वागतच केलं. मोनिका दोन आठवड्यांसाठी भारतात आल्या असताना एका घरगुती समारंभात नजिकचे स्नेही, आप्त यांना बोलावून सरांनी या नात्याची रुजवात करून दिली. मोनिकांनीसुद्धा सर जर्मनीला आले असताना निकटवर्तीयांना बोलावून छोटा समारंभ घडवून आणला. दहा वर्षांच्या एकटेपणानंतर मोनिकाला सोबत लाभली याचा आनंद सर्वांना झाला. उतारवयात हे उभयता एकमेकांना भावनिक आधार देतील असा दोघांच्याही मुलांना विश्वास वाटला.

या वळणावर माझा नेमका प्रश्न होता, ज्याचं काटे सरांनीही नेमकं उत्तर दिलं, तो म्हणजे 'लग्न न करता 'लिव्ह इन' मध्ये राहाण्याचं का ठरवलं?'. यावर सरांचं उत्तर होतं, ''आम्हाला लग्नाची आवश्यकता भासली नाही. नवरा-बायको म्हणून एकमेकांवर अपेक्षांचं ओझं लादण्यापेक्षा आम्हाला मित्र-मैत्रिणीच्या निखळ नात्याची जास्त गरज वाटली.'' नंतर झालेल्या चर्चेतून हेही स्पष्ट झालं की सरांना आपली मुळं भारतात रुजल्याची जाणीव आहे. आपलं कार्यक्षेत्र इथेच असल्याचं भान आहे. त्यामुळे लग्न करून कायमचं जर्मनीला जाणं त्यांना पटलं नाही. मोनिकांना भारतातल्या तापमानाला तोंड देता येत नाही. तरीही हिवाळ्यात कधी त्या इथे येतात. आपण एकमेकांशी जुळवून घेऊ शकतो यावर मात्र दोघंही ठाम आहेत.

हे दोघं एकमेकांशी कुठल्या भाषेत बोलत असतील याचं मला कुतूहल होतं. इंग्रजी हीच त्यांची संवादाची भाषा आहे. मात्र गेल्याच वर्षी 'मॅक्सम्युलर भवन'मधून सरांनी जर्मन भाषेचा प्राथमिक अभ्यासक्रम केला. सत्तरी पार केल्यावर त्यांनी जर्मन शिकायला सुरुवात केली आहे, हे विशेष.

या दहा वर्षांच्या सहजीवनात ते जेव्हा एकत्र असतात तेव्हा एकमेकांना जपायचा त्यांचा खूप प्रयत्न असतो. आता दोघांच्याही त्रासदायक भूतकाळाच्या पडछाया दूर व्हायला मदत झाली आहे. मोनिका कॅथलिक ख्रिश्चन आहेत. खूप धार्मिक नसल्या तरी भावनिक आधारासाठी रविवारी चर्चमध्ये जायला त्यांना आवडतं. कधी कधी सरही त्यांना सोबत करतात. त्यांच्या संबंधांत धर्म कधी आडवा आलेला नाही. आर्थिकदृष्ट्या दोघंही स्वावलंबी आहेत. या बाबतीत मुळीच अपेक्षा नाहीत. एक मात्र खरं, मोनिकांचं आतापर्यंतचं आयुष्य त्यांची शाळा, घर आणि मुलं असं गेलं आहे. याउलट सरांचं आयुष्य निरनिराळ्या कामात गेलं आहे. त्यामुळे मानवी स्वभाव, माणसांच्या वागण्याच्या तऱ्हा, त्यांना द्यायचा प्रतिसाद, यासंदर्भात त्यांचे मतभेद होतात. बोलताना दोन संस्कृतींच्या फरकामुळे शब्दांचे संदर्भ लक्षात येत नाहीत, गैरसमज होतात. गंमत म्हणजे वागताना एकमेकांना त्रास होऊ नये या प्रयत्नातही कधी कधी गैरसमज होतात. तरीही सतत संवादी राहून ते दोघेही या गैरसमजांवर मात करतात. परस्परांच्या विचारांचा आदर करणं उभयतांच्या वागण्या-बोलण्यात मुरलेलं आहे. एक निरीक्षण सांगते, सर फोनवर बोलताना मोनिकांबद्दल आदरार्थी बोलतात.


गेल्या दहा वर्षांत त्यांना एकमेकांच्या आवडीनिवडी नीट लक्षात आल्या आहेत. उदाहरणार्थ, घरातल्या फर्निचरची नवनवी मांडणी करून पाहाणं हा मोनिकांचा छंद आहे. बागकामात दोघंही रंगून जातात. त्यांचं शाइनफेल्ड हे गाव रम्य आहे. आजूबाजूचे हिरवे डोंगर, रानवाटा यातून भटकण्याचा आनंद ते अगदी मनमुराद लुटतात. ऐतिहासिक स्थळांना, वस्तुसंग्रहालयांना भेटी देणं हाही आवडीचा कार्यक्रम असतो. असं फिरताना कधी कधी विचित्र अडचणी येतात. एका वर्षी नाताळच्या काळात सर तिथे होते. तेव्हा बाहेर बर्फाचा जाड थर साचलेला असताना मोनिकांनी बाहेर फिरायला जाण्याचा आग्रह केला. लहान मुलाची तयारी करून द्यावी तशी त्यांनी सरांची तयारी करून दिली. कोट, ऊबदार बूट, पायमोजे, हातमोजे... बर्फात ते बराच वेळ भटकले, पण त्या रानवाटांमधून फिरताना परतीचा रस्ता विसरले. दिवस मावळला. अरे बापरे, आता काय? अशी घाबरगुंडी उडाली. पण हुश्श! रस्ता सापडला. असे काही आगळेवेगळे क्षण कायम लक्षात राहातील. मोनिकांच्या झुरीच येथे नोकरी करणाऱ्या मुलाकडेही उभयता जाऊन आले. तो प्रवासही अविस्मरणीय ठरला.

या सहजीवनात एक महत्वाची अडचण आहे. लग्न न झाल्यानं त्यांना एका वेळी तीनच महिन्यांचा व्हिसा मिळतो. हा काळ संपत आला की दोघांची उलाघाल होते. अधिक काळ सोबत कसं राहायचं हा त्यांना पडलेला प्रश्न आहे. सर जर्मनीतून उत्साहाची, उमेदीची भली थोरली गोणीच घेऊन येतात. ते संचित बराच काळ पुरतं. इथे त्यांच्या आवडीच्या कामांमध्ये ते व्यग्र असतात. पण मोनिकांना मात्र एकटेपणा तीव्रतेनं जाणवत राहातो, कधी पुन्हा भेट होते असं वाटत राहातं. हे वाचताना सरांच्या आयुष्याच्या उत्तरायणाचे गहिरे रंग मला साक्षात दिसत होते.

'लिव्ह इन रिलेशनशिप' संदर्भातली तुमची भूमिका काय, हा माझा त्यांना शेवटचा प्रश्न होता. याचं त्यांनी दिलेलं उत्तरही स्पष्ट आणि प्रांजळ आहे. ते म्हणतात, ''स्त्री-पुरुषांच्या सहजीवनातील तारुण्याच्या काळात कुटुंबातील कर्तव्यं, जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी विवाह बंधनात राहाणं गरजेचं असेलही, परंतु कौटुंबिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्यावर आयुष्याच्या उत्तरकाळात एकट्या व्यक्तीला जोडीदाराच्या सान्निध्याची गरज वाटते तेव्हा अशा बंधनांची आवश्यकता राहू नये. विशेषतः ज्यांनी आपल्या पूर्वायुष्यात विवाहबंधनातल्या कटुतेचे घाव सोसले आहेत, त्यांना हे बंधन नकोसं वाटणं स्वाभाविक आहे. उत्तरायुष्यात मायेच्या उबेची गरज महत्त्वाची असते, या भूमिकेशी प्रामाणिक राहिल्यास 'लिव्ह इन रिलेशनशिप' मला अधिक सोयीचं वाटतं.''

काटे सरांशी झालेल्या संवादानं मला समृद्ध केलं आहे. आयुष्याच्या उत्तरायणात मैत्रभाव जोपासणारी अशी तुरळक का होईना नाती फुलत आहेत. समाजमान्यतेची भीड न ठेवता अशांनी आपले अनुभव आम्हाला अवश्य सांगावेत. ते इतरांसाठीही मोलाचे आहेत... कारण, जाता जाता सरांनी सांगितलेलं हॅन्स ॲन्डरसन यांचं वचन - *'just living is not enough' said the butterfly. `one must have sunshine, freedom, and a little flower.'*


◆ *sarita.awad1@gmail.com*



डॉ. आशीष देशपांडे

## व्यर्थ चिंता नको रे

**माणसाची उत्क्रांती आणि त्याबरोबरीनं माणसाच्या मनाच्या घडवणुकीचा सुरू झालेला प्रवास समजून घेताना मेंदू आणि मनाचे कंगोरे तपासावे लागतील. मन म्हणजे नेमकं काय, या गहन प्रश्नापासून सुरुवात करून एखाद्याचं मन, त्याचा स्वभाव कसा तयार होत जातो आणि मनाला अस्वस्थता येते म्हणजे काय होतं, हे जाणून घ्यायला हवं. बेचैनी आणि उदासी या विषयांचं मूळ याच अभ्यासात दडलेलं आहे. स्वतःच्या मनाची करून घेतलेली अशी ओळखच मनाच्या बेचैनीवर उपाय शोधताना उपयोगी पडेल.**



# मन मनास उमगत नाही...

दगडी अवजारं बनवत संवादक्षम बनलेला माणूस निसर्ग निरीक्षणाबरोबरच निसर्ग 'घडवू' लागला हे आपण मागच्या लेखात पाहिलं. अहिंस्त्रीकरणातून समूहविश्वास, कुटुंबवत्सलता, प्रेमभाव, सर्जनशीलतेतून अभिव्यक्ती नि नवे शोध... आणि जे मिळालं त्याबद्दल कृतज्ञभाव. या सगळ्याचं त्याच्या 'असण्यातलं' महत्त्व तो समजून घेत होता. या सगळ्या स्थित्यंतरांमध्ये त्याचा मेंदू केवळ मूक पांथस्थ नव्हता. माणसाच्या निसर्ग-समूहाच्या नात्यात तो घडत होता नि घडवतही होता.

आपल्या आयुष्यातली अनिश्चितता कमी करण्यासाठी प्राणीसुलभ प्रतिक्षिप्त वागण्यापासून माणसाचा मेंदू फारकत घेत होता. जनुकांवर बेतलेली मेंदूची रचना नि कार्यप्रवणता बहरण्यासाठी सर्जनशीलता, मोजका धोका पत्करण्याची निकड, नवीन शिकण्याचा खटाटोप, कलासक्ती, संवादकौशल्य नि परस्पर संबंध, आहारनियमन, व्यायाम, अनंत हस्ते देणाऱ्या निसर्गाबद्दल कृतज्ञता, श्रद्धा आणि या सगळ्या गोष्टींची सतत जाण राहावी, समतोल राहावा यासाठी ध्यानधारणा आणि चिंतन अशी ती 'जैविक गरज' घडत गेली, प्रस्थापित झाली आणि आवश्यक झाली, हे आपण आतापर्यंत पाहिलं.

अल्बर्ट आइनस्टाईन म्हणायचा, 'शास्त्राला 'मन' समजलं की आणखी काही समजायचं राहणारच नाही'. माणसाचं वागणं घडवणारं 'मन' असतंच असं अचंबित करणारं. भक्तिरसात बहरून पोटच्या पोराला तुडवणारं, सत्तेच्या लालसेनं 'ध'चा 'मा' करणारं, जन्नतच्या स्वप्नांनी निरपराधांना स्वर्गात धाडणारं आणि स्वर्ग-नरकाच्या भूलथापांनी शतकानुशतकं शोषण करणारंसुद्धा मनच! प्रेमापोटी ताजमहाल बांधणारं नि ॲसिड फेकणारं, स्वतृप्तीसाठी ओरबाडणारं नि निरपेक्ष होणारं, स्वहट्टापायी महायुद्धं घडवणारं आणि अहिंसा-असहकाराच्या असामान्य ताकदीची जाणीव जनमनात करून विश्वसत्तेला नमवणारं, सर्जक मन नि संहारी मन, कलात्मक मन नि कलंकित मन, नादी मन नि अनादीही मन, घडवणारं नि बिघडवणारंही मनच. वैश्विक सत्याचा शोध घेणारं आणि मुलांच्या यशात आपली स्वप्नं पाहणारं, कधी हसणारं, रुसणारं, रोमांचित होणारं, कधी रागावणारं, दुखावणारं, कधी सुखावणारं!

मनाचा हा तऱ्हेवाईकपणा माणसालाही 'वेड' लावणाराच होता. मन कवटीतल्या मेंदूत आहे की कविकल्पनेप्रमाणे हृदयात? वागण्याला जबाबदार माणूस, की देवदानवांचं तर्कट? धर्म, तत्त्वज्ञान आणि वैद्यकशास्त्र यांच्या अहमहमिकेत मन इसवी सनापूर्वीदेखील अडकलं होतं नि अजूनही अडकलं आहे. रेने डेकार्टिस, चार्ल्स ब्रोनेट, फ्रान्झ गॉल, एडमंड ब्रोका, सिग्मंड फ्रॉइड यांनी धर्माच्या कक्षेबाहेर जाऊन मनाचा कारभार समजून घेण्याचा प्रयत्न केला. या दिग्गजांपैकी सिग्मंड फ्रॉइडचा (१८५६-१९३६) प्रभाव ५ ते ६ दशकं अबाधित राहिला. फ्रॉइडनं तयार केलेल्या मनाच्या संकल्पनेच्या कित्येक विचारधारा अजूनही तग धरून आहेत. फ्रॉइडनं 'असा मी, कसा मी?' या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न शक्य आहे, हे पहिल्यांदा दाखवून दिलं. 'सायकोॲनॅलिटिकल थिअरी' म्हणून प्रसिद्धीस पावलेल्या या विचारशृंखलेत 'इद', 'इगो' आणि 'सुपरइगो' या तीन नवकल्पना आढळतात. 'इद' म्हणजे आपल्या प्राथमिक नैसर्गिक गरजा पूर्ण करण्यास सदैव तत्पर असा मनाचा भाग. सदैव सुखासीन! आपल्यातल्या प्राण्याचा लवलेश. 'सुपरइगो' म्हणजे 'संस्कृती रक्षक'. आकलनवयापासून योग्य-अयोग्याचे धडे देणारे आई-बाबा! सतत अवखळ 'इद'ला रोखणारे, सांभाळणारे. 'इगो' म्हणजे 'इद' नि 'सुपरइगो' दोघांनाही व्यवस्थित ओळखणारा आणि प्राणिजन्य गरजा सामाजिक मर्यादा न ओलांडता पूर्ण कशा करायच्या हे समजावणारा मोठा भाऊ! ज्या पद्धतीने 'सुपरइगो' हा प्रयत्न सफाईनं करतो त्या पद्धती म्हणजे 'डिफेन्स मेकॅनिझम्स'. हा मनाचा व्यवहार जाणिवेच्या पलीकडला असतो, पण अजाणतेपणी घडलेला नसतो तर तोही व्यक्ती-व्यक्तींत काही नियम पाळत असतो. या जाणिवेपलीकडल्या नियमांनी व्यक्तिमत्त्व बनत असतं. जाणिवेपलीकडच्या या साम्राज्यातच मनाची अथांगता लपलेली आहे. आपल्या वागण्यातली अतार्किकता याच पोकळीत अर्थाचा शोध घेत असते. सायकोॲनॅलिटिकल थिअरी या पोकळीत शोध घेऊन आपल्या वागण्याचा अर्थ समजून बदल करण्यास मदत करते.

फ्रॉइडनं ज्या काळात आपले विचार मांडले तेव्हा शास्त्राची एकूणच झेप तोकडी होती. मनाच्या या संकल्पनेत वैद्यकीय भाषा वेगळी होती, तर्क वेगळे होते आणि आजारांची मीमांसाही वेगळी होती. मन शरीरशास्त्रापासून फारकत घेत होतं. मनावर बोलण्याचा अधिकार शरीरशास्त्राकडून हिरावला जात होता. अवयव चूपचाप काम करतात आणि जेव्हा बिघडतात तेव्हा वैद्यकीय मदत अनिवार्य होते. पण 'मन' जागेपणी सदोदित आपल्यासोबत असतं म्हणून त्यावर अधिकारानं बोलणं कोणालाच वावगं वाटत नाही. मेंदू शरीरात असूनही मनाचा अभ्यास शरीरशास्त्रात नाही, तर तो कला, साहित्य नि धर्मशास्त्राशी निगडित झाला. अजूनही मानसशास्त्र हा विषय आपल्याकडे कला शाखेत शिकवला जातो आणि मानसोपचारांकडे बघायचा वैद्यकशाखेचा नूर काही वेगळाच असतो. कित्येक डॉक्टरांनाच माहीत नसतं की मेंदुशास्त्रापासून (न्युरॉलॉजी) मेंदुमनशास्त्रापर्यंतचा (न्युरोसायकॉलॉजी) प्रवास संपूर्णपणे रसायनशास्त्रानंच होत आहे. फ्रॉइडच्या संकल्पना जशाच्या तशा जरी अणुरेणूंच्या उभ्याआडव्या रिंगणात उलगडत नसल्या तरीही मार्गदर्शक तरी नक्कीच ठरतात.

मानवी मेंदूला त्याच्या कामाच्या वैविध्यानुसार वाटलं तर एक अख्खं क्रिकेटचं मैदान भरेल. ही कामांची झालेली उत्क्रांतीतली वाढ आदिमानवापासून मेंदुमनाला बदलत आहे नि प्रोत्साहितही करत आहे. या रचनांचा वापर नि त्यातील यशाचा आनंद मेंदुमनातल्या 'बक्षीस-उमेद रचने'शी (रिवॉर्ड ॲंड मोटिव्हेशनल सर्किट) जोडलेला आहे. आवडणाऱ्या गोष्टी परत परत कराव्याशा वाटणं हा याच रचनेचा भाग आहे. स्वसंरक्षण, स्वास्थ्य, जवळची नाती, ऐहिक अपेक्षापूर्ती, समूहात मिळणारा मानसन्मान नि संतृप्ती या क्रमानं होणाऱ्या वाटचालीत हीच रचना कारणीभूत असते नि प्रोत्साहित करते. स्वहित सर्वतोपरी जपणाऱ्या या मेंदूच्या कार्यप्रवणतेत (न्युरोनल पोटेन्शियल), सर्जनशीलता, संवादकौशल्य आणि परस्पर संबंधकौशल्य, स्वास्थ्य, यांतील आनुवंशिकतेचा प्रभाव सर्वज्ञात आहे नि त्यात आमूलाग्र बदल घडवणं आपल्या प्रयत्नकक्षांच्या बाहेर आहे, हेही आपण ओळखून आहोत. पण ३० दिवसांत सवय जडते, नि ९० दिवसांत जीवनशैली बनते, या अनुभव-नियमानं विविध कला/ खेळ/ साहित्याबद्दल प्रेम, कुतूहल नि विचारशोधाची सवय लावणारी छंदांची आवड, शरीरधर्माची बूज राखणारी नि ती राखताना मनुष्यस्वभावाची जाण ठेवणारी 'समजूतदार' शिस्त या आनुवंशिकतेला उभारी नक्कीच देऊ शकतात. या जैविक गरजा भागवण्यासाठीची माणसाच्या मेंदूची रचना ३५ ते ४० हजार पिढ्यांच्या अनुभवानं जनुकांत कोरली गेलेली आहे. आणि म्हणूनच वाढत्या वयात शिकायची राहून गेलेली यातली एखादी सवय कुठच्याही वयात आपण परत शिकू शकतो. बालपणीचा अनुभव नक्कीच फायदेशीर असतो, पण नसला तरीही काही हरकत नसते.

गर्भाशयात नियतीच्या इच्छाशक्तीनं जीव धरतो आणि जगण्याची तीव्र ताकद (लिबिडिनल फोर्स) त्याला निराकारातून आकार देते. आठ ते बारा आठवड्यांत तयार होणारी मेंदूची नळी (न्युरल ट्यूब) जनुकांच्या जादूगारीतनं भविष्यातल्या मेंदूचा संपूर्ण आराखडा तयार करते. या नळीतली पेशीन्‌पेशी अक्षरशः भारावून जाऊन कामाला लागतात. ज्ञानेंद्रियांपासून मेंदूपर्यंतचे मज्जासंस्थेचे विविध घटक एखाद्या वाद्यवृंदाप्रमणे आपलं अस्तित्व सहजपणे उलगडत असतात आणि पुढच्या संरचनेची सम गाठत असतात. ४ ते ६ महिन्यांत संपूर्ण मज्जासंस्थेची 'दिंडी' बसवायची असते त्यांना! पुढे भाषा-भावना नि जाणिवा-नेणिवा यांचं वैविध्य जपत, त्यांतील सूक्ष्म दुवे विणत एक पिंड (टेंपरामेंट) घेऊन जन्म होतो. अंतःस्थ वैविध्याला आता अनुभवविश्वाच्या वैविध्याची जोड लाभते. अस्तित्वाच्या जाणिवेनं स्मरणशक्तीला वेढा घालेपर्यंत आठवणी पुसट राहतात. सहज म्हणून लक्षात येत नाहीत (प्री-कॉन्शियस). वेढा पक्का पडला की अनुभवांची जाणीवही पक्की होते आणि त्यामागचा विचारही! (कॉन्शियस). हे मनाचं 'मीपण', इंद्रियांच्या कामाची सुरुवात, आकलनाच्या पायऱ्यांचा ओनामा आणि निर्णय/ कृतीसाठी लागणाऱ्या सक्षमतेची कुणकुण या प्रक्रिया समांतर वाढत असतात. अनंत तुकड्यांच्या 'जिग्सॉ'प्रमाणे स्वतःहून उलगडत जाणारं हे कोडं बालपण, पौगंडावस्था ओलांडून प्रौढावस्थेत पोहोचतं. साहजिकच या जडणघडणीत बऱ्याच गोष्टी जाणिवेच्या नजरेतनं निसटतात, पण त्यांचे आराखडे किंवा ओरखडे त्यानंतर झालेल्या संरचनांना दिशा देतात किंवा त्यांवर आपली छटा उमटवतात. या विसरलेल्या गोष्टी नसतात, तर 'जाणिवेच्या आधीच्या' असतात (अनकॉन्शियस).

जगण्याच्या तीव्र इच्छेत (लिबिडिनल फोर्स) स्वसुरक्षा, प्रजनन प्रवृत्ती/ संप्रेरणा (इन्स्टिंक्ट्स) असतात. या संप्रेरणांच्या संवर्धनासाठी गर्भावस्थेत जे काही संप्रेरकांचं (हॉर्मोन्स) वितरण मेंदूत/ शरीरात होतं, त्यातून सुखासीनता (हेडोनिझम), लैंगिकता (सेक्शुॲलिटी) माणसाच्या 'नसानसांत' भिनते. अगदी शब्दार्थानं आणि मथितार्थानंही! या रचना बनत असताना गर्भावस्थेत संप्रेरकांचे जे उतारचढाव होतात त्यातून लैंगिकतेचा जो आराखडा तयार होत असतो, त्यातून समलिंगी किंवा विभिन्नलिंगी आकर्षण तयार होतं. लैंगिकतेचा लवलेशही नसताना बाल्यावस्थेत जे अद्भुत आकर्षण तरळून जातं (इलेक्ट्रा कॉम्प्लेक्स आणि एडिपस कॉम्प्लेक्स) त्यातूनच बालक-पालक नात्याला विश्वासाचं वेगळंच कोंदण मिळतं.

बेचैनी/ उदासी म्हणजे तृप्ततेच्या रसायनांची मेंदूतली कमतरता. ताणतणाव, अपेक्षाभंग, संकटं, आजार-मृत्यू नि नकारात्मक अनुभव यांनी ही रसायनं कमी होतात. दर रात्रीच्या झोपेनं ती पूर्ववत झाली नाहीत तर ती उतरण भावनिक भागांत पेशींचं कामच बदलते. मग माणसाच्या भावना परिस्थितीनुरूप वाटत नाहीत. अनाहूत भीती, अस्वस्थता, बेचैनी, काळजी मनात घर करून बसते. मेंदूच्या इतर गरजा भागवणं अशक्यप्राय वाटायला लागतं. स्वतःवरचा नि परिस्थितीवरचा भरवसाच जणू कमी होतो. अकारण असुरक्षिततेमुळे छातीत धडधड, घाम फुटणं, हातपाय गार पडणं, तोंडाला कोरड पडणं, त्याला कुठल्याच गोष्टीकडे सकारात्मकपणे पाहू देत नाही. सगळ्याच गोष्टी हाताबाहेरच्या वाटायला लागतात. न्यूनगंड, अनुभव पराङ्मुखता नि त्यातून येणारी पराभूत एकटेपणाची मानसिकता, वैफल्य नि आत्महत्येचे विचार. ही रासायनिक कमतरता भरून काढण्यासाठी मेंदूच्या उत्क्रांतीत दडलेल्या जैविक गरजांची माहिती म्हणूनच तर उपयोगी पडते. या गरजा जेव्हा भागतात तेव्हा भावनेच्या मेंदूत काही विशेष रसायनं तयार होतात. ती रसायनं जर पुरेशी असली तर त्रास थांबतो वा कमी होतो. नसली तर ती वाढवण्यासाठी औषधांशिवाय पर्याय नसतो.

जनुकीय कारणांनी झालेला रसायनांचा अभाव औषधांशिवाय बरा होणं कठीणच असतं. पण 'जाणिवेच्या नजरेतनं निसटलेल्या मनाच्या ओरखड्यांमुळे' तयार झालेला, ३-५ वर्षांच्या नाजूक वयात तरळून जाणाऱ्या अद्भुत आकर्षणाच्या अपूर्ततेमुळे घडलेला रसायनांचा अभाव जगण्याच्या अनुभवावर हल्ला करतो. परिस्थिती, नाती, संवाद यांतील अनुभूती नकारात्मक बनते नि संतृप्तीच्या रसायनांना धक्का देते. हा धक्का औषधांनी कसा बरा होणार? म्हणतात ना, 'स्वभावाला औषध नसतं.'

हा रासायनिक बदल भरून काढण्यासाठी समुपदेशनाची गरज असते. या समुपदेशनात आहार, व्यायाम, विविध कला, छंदांचं महत्त्व सांगितलं जातंच, पण त्याचबरोबर मोजका धोका पत्करण्याची निकड, नवीन शिकण्याचा खटाटोप, संवादकौशल्य नि परस्पर संबंध, अनंत हस्ते देणाऱ्या निसर्गाबद्दल कृतज्ञता, श्रद्धा नि या सगळ्या गोष्टींची सतत जाण राहावी, समतोल राहावा यासाठी ध्यानधारणा/ चिंतन या सगळ्याचा वापर असतो.

◆ *dr.deshpande.ashish@gmail.com*



रोहिणी हट्टंगडी

## मी, रोहिणी...



# सारं कसं शिस्तबद्ध!

**''गांधी चित्रपट पाहताना त्यातील दृश्यं इतकी सुंदर आणि हुबेहूब पूर्वीचा काळ उभा करणारी कशी होऊ शकली, असा प्रश्न पाहाणाऱ्याला पडतो. त्यामागे अनेक कारणं आहेत. अगदी बारीकसारीक संदर्भांचा अभ्यास करण्यापासून चित्रीकरणात आयत्या वेळी कोणत्या तरी वस्तूची गरज भासेल, म्हणून त्याचाही आधीच विचार करून ती तयार ठेवण्यापर्यंतची शिस्त मला या चित्रपटामुळे करिअरच्या अगदी सुरुवातीला अनुभवायला मिळाली. हा 'अभ्यास' या चित्रपटातल्या माझ्या भूमिकेसाठी उपयुक्त ठरलाच, पण अंगवळणी पडलेली ती शिस्त पुढेही प्रत्येक पावलावर उपयोगास आली...''**

'गांधी' चित्रपटाचा मुहूर्त २७ नोव्हेंबर १९८० ला झाला. हो... 'मुहूर्त' झाला! म्हणजे छोटीशी पूजा, नारळ वाढवून. भारतीय रिवाजानुसार. मग छोटा सीन चित्रित केला गेला. त्या दिवशी मी फक्त हजर होते. माझं काम चार-पाच दिवसांनी असणार होतं. अखेर प्रत्यक्षात माझं चित्रीकरण सुरू झालं, स्क्रिप्ट आधीच मिळालं होतं. कामाचं नियोजनही मिळालं. माझ्या चित्रीकरणाच्या आदल्या दिवशी माझ्या खोलीत 'कॉलशीट' आलं. 'युनिट'मधल्या प्रत्येकाला रोज मिळायचं. त्यात त्या दिवशी लागणाऱ्या सर्व बारीकसारीक गोष्टी लिहिल्या होत्या. अगदी तारीख, सीन नंबर, कलाकार, त्यांच्या वेळा, कपडेपटासाठी, रंगभूषेसाठी, नेपथ्यासाठी सूचना, अगदी तपशिलात!

मला सकाळी सहाचा 'कॉल टाइम' होता मेकअपसाठी. दिल्लीच्या अशोक हॉटेलमध्ये संपूर्ण युनिट राहात होतं. तिथेच पहिल्या मजल्यावर मेकअप, हेअर ड्रेसिंग, कपडेपट अशा सगळ्यासाठी खोल्यांची व्यवस्था केली होती. माझा 'सूट' तिसऱ्या मजल्यावर होता. फक्त लिफ्टनं खाली उतरायचं! निघतच होते आणि अचानक फोनची बेल वाजली. मी फोन उचलला आणि पलीकडून असिस्टंटचा आवाज आला ''रोहिणी, वुई आर वेटिंग फॉर यू!'' घड्याळात पाहिलं, सहा वाजून तीन मिनिटं झाली होती. मनात म्हटलं, ''ब्रिटिशांच्या वक्तशीरपणाचं उदाहरण मिळालं बाई तुम्हाला. यापुढे लक्षात ठेवा!'' लगोलग खाली उतरले.

जाऊन प्रथम 'सॉरी' म्हणाले. तयार होऊन खाली तळमजल्यावर आले. ट्रान्सपोर्ट मॅनेजरनं गाडी बोलावली. होय, हेही एक 'डिपार्टमेंट' होतं. युनिटसाठी, कलाकारांसाठी गाड्या, बस, चित्रीकरणस्थळावर 'व्हॅनिटी व्हॅन्स', ड्रायव्हर्स, सगळ्याची जबाबदारी त्याची. त्यांच्या वक्तशीरपणाचा असाच अनुभव आणखी एकदा अनुभवला. तयार होऊन गाडीसाठी खाली उतरले. मॅनेजर म्हणाला, ''पाच मिनिटं दे. युनिट पण आता निघणार आहे.'' मी जरा बाजूला बसले आणि विश्वास नाही बसणार, पण अख्खं युनिट, अगदी कॅमेरामन, दिग्दर्शकासकट, पाच मिनिटांच्या आत एक-एक करून अगदी घड्याळ लावून आल्यासारखे आले आणि रवाना झाले! एक बस आणि दहा-बारा गाड्या निघाल्या आणि लगेच माझी गाडी निघाली पण!

तर, मी सेटवर पोहोचले. सेट आश्रमाचा होता. साबरमती आश्रमाचा! पंधरा दिवसांपूर्वी बेन (किंग्जले) आणि मी, आम्हाला एक जण बरोबर देऊन अहमदाबादला पाठवलं होतं साबरमती आश्रम बघायला, त्यामुळे तो मनात ताजा होता. हुबेहूब आश्रम. इंचाचाही फरक नाही. भाज्यांचे वाफे केले होते आणि त्यात भाज्या उगवल्याही होत्या. कुठल्याही कामात चालढकल माहितीच नव्हती. यमुनेच्या काठी बदरपूर गावाजवळ हा सेट उभा केला होता. यमुनेच्या पार सूतगिरण्यांचा 'कटआऊट' लावला होता... हो, कॅमेरा फिरताना जागा रिकामी रिकामी नको वाटायला! मुंबईजवळ दक्षिण आफ्रिकेचा 'फिनिक्स आश्रम' उभारला होता. तिथेही गाढवांना झेब्र्यांसारखे पट्टे रंगवून सोडलं होतं! प्रत्येक चित्रीकरणस्थळ, त्या-त्या जागा इतक्या काळजीपूर्वक निवडल्या होत्या!



भारतात पाच ठिकाणी चित्रीकरण झालं. दिल्लीला दोन महिने, मुंबईमध्ये दीड महिना, पुण्यात पंधरा दिवस, पटना आणि राजस्थानला प्रत्येकी आठ दिवस. दक्षिण आफ्रिकेचे सीन्स मुंबईजवळ, काही पुण्यात. धावत्या आगगाड्यांचे शॉट्स जे आपण चित्रपटात पाहातो ती एकच आगगाडी एका बाजूनं दक्षिण आफ्रिकेची आणि एका बाजूनं भारतीय अशी रंगवली होती. त्या वेळच्या मोटारगाड्या कालानुरूप इथे नव्हत्या तर इंग्लंडहून मागवल्या होत्या. कुठेही कमी राहाता कामा नये!

प्रत्येक डिपार्टमेंट नवीन नवीन अनुभव देत होतं. जेवणही दोन पद्धतीचं 'वेस्टर्न' आणि 'इंडियन'! त्यासाठी दोन वेगळ्या व्हॅन्स. सुरुवातीला सगळेच नावीन्य म्हणून दुसऱ्या पद्धतीचं जेवत होते. नंतर आले मूळपदावर! व्हॅनवर मेनू लिहिलेला असायचा. रांगेत उभं राहून आपापलं जेवण घ्यायचं आणि जेवणासाठी खास उभ्या केलेल्या पेंडॉलमध्ये जेवायचं. अर्थात व्यवस्थित टेबल-खुर्च्या असायच्याच. सर्वजण, अगदी सर रिचर्डसह सगळे तिथेच जेवायचे.

जेम्स कॅलेहॅन (युनायटेड किंग्डमचे माजी पंतप्रधान)- सर रिचर्डचे मित्र. त्यांनाही त्या रांगेत पाहिलंय मी. जेवणाच्या सुट्टी नंतर 'ब्रेक ओव्हर' असं कोणीही ओरडायचं नाही. जो तो आपलं झालं की नेमक्या वेळात आपापल्या कामाला हजर असायचा. चित्रीकरणाच्या ठिकाणी एक डॉक्टर, एक परिचारिका आणि रुग्णवाहिका तैनात असायची. डॉक्टर तिकडचाच, पण भारतीय होता.

'गांधी' फिल्मचं दुसरं युनिटही होतं. त्याचे दिग्दर्शक गोविंद निहलानी होते. मुख्य युनिट काम करत असताना दुसरं महत्त्वाचं चित्रीकरण त्यांच्याकडे असायचं. गांधीजी भारतभर फिरले त्या वेळची काही महत्त्वाची दृश्यं, छोटे प्रसंग चित्रित करणं त्यांचं काम होतं. चित्रपटात एक प्रसंग आहे जिथे चंपारणहून एक माणूस गांधींना भेटायला येतो. तो सीन रिचर्डना हवा तसा घेता आला नाही. मग तो चित्रित करायची जबाबदारी गोविंदजींना दिली. माझी मोकळी तारीख बघून, मला रीतसर विचारून तो सीन घेण्यात आला. (खरंतर मी तिथेच होते. युनिटबरोबरच राहात होते. दुसरं काहीही काम करत नव्हते. पण तुमचा मोकळा वेळ तुमचा आहे, तो आम्ही वापरणार म्हणून ही परवानगी!) असंच एकदा चित्रीकरण चालू असताना संध्याकाळी पाचच्या सुमारास रिचर्ड माझ्याजवळ आले आणि अगदी हळू आवाजात म्हणाले, ''रोहिणी, आज आपल्याला शिफ्ट वाढवावी लागणार आहे आठ वाजेपर्यंत. तुला चालेल ना?'' मी नकळत 'हो' म्हणून मान डोलावली. नंतर विचार करत राहिले, 'आपण शिफ्ट वाढवतोय' असं नाही सांगितलं त्यांनी! मला विचारलं! समोरच्याच्या वेळेचा मान ठेवावा, त्याला गृहीत धरू नये, हा आणखी एक धडा मी शिकले. तर तो सीन... फार काही मोठा नव्हता. नदीत आम्ही बायका कपडे धुतोय आणि पलीकडून एक माणूस विचारतोय की मला गांधींना भेटायचंय. पण तो प्रसंग आकर्षक करण्यासाठी, वातावरणनिर्मितीसाठी पक्ष्यांच्या थव्यांवरून चित्रित करणं सुरू करून आमच्यावर यायचं, असा घ्यायचा होता. संध्याकाळी पाचच्या सुमारास पक्ष्यांचे थवे यायला सुरुवात होते असा अभ्यास झाला होता. चार-साडेचार वाजल्यापासून आम्ही तयार होतो. न जाणो लवकर आले तर? यमुनेच्या पात्रावरून उडणाऱ्या पक्ष्यांबरोबर कॅमेरा आमच्यावर! पण कधी पक्षी कॅमेऱ्याबाहेर, तर कधी फारच छोटा थवा, तर कधी फार खालून किंवा फारच वरून उडताहेत असं होत होतं. क्षितिजावर ठिपके दिसले की 'आले आले' असा ओरडा व्हायचा. की तयार व्हायचं, आपापलं काम करायचं आणि गोविंदजींच्या 'ओके'ची वाट बघायची. तेव्हा फिल्म 'डेव्हलप' झाल्याशिवाय कळायचं नाही. त्यामुळे कॅमेरामनचं, दिग्दर्शकाचं समाधान झालं तरच ओके! दहा-बारा 'टेक्स'नंतर 'ओके' मिळाला आणि उजेडही कमी झाला. केवढा तो प्रयत्न... पण चित्रपटाची प्रत्येक 'फ्रेम' महत्त्वाची असते ना!

असाच एक प्रसंग आठवतोय. तोच चंपारणहून आलेला माणूस गांधीजींना तिथली परिस्थिती सांगून तिकडे या अशी विनंती करतोय. त्या प्रसंगात गांधीजी झोपाळ्यावर बसले आहेत आणि समोर बैठकीवर हा माणूस जेवतोय असं दाखवायचं होतं. पण त्याचबरोबर 'बा' म्हणजे मी फ्रेममध्ये दिसायला हव्यात असं रिचर्डना वाटत होतं. रिचर्डनी मला विचारलं, ''हे असं आहे... अशी फ्रेम आहे. तू मला दिसायला हवी आहेस... काय करशील?'' ते एक दिग्दर्शक, स्वतः अभिनेता असून मला हे विचारलं जात होतं! म्हटलं, हा माणूस जेवतोय म्हणजे स्वयंपाक झाला आहे. काही वाढायला यायचं म्हणजे हालचाल होणार... ती नको होती सीनच्या मूडप्रमाणे. पोळ्या लाटायच्या तर चूल भिंतीपाशी हवी. म्हटलं, बादलीसारखी सिंगल चूल मिळाली तर स्वयंपाकघराच्या मध्यावर बसू शकते. झालं. सूचना लगेच अमलात आली आणि सीन त्यांच्या मनासारखा झाला. पण सांगायची गोष्ट अशी, की ती तशी चूल पण तयार होती. 'सेट डेकोरेटर' असंही एक डिपार्टमेंट होतं. सेट उभारल्यानंतर त्याला 'सजवण्यासाठी'! त्यांनी या गोष्टी आपल्या अभ्यासानुसार तयार ठेवायच्या. आणि हे सेट डेकोरेटर्स होते अमाल अलाना आणि निसार अलाना. अमाल ही स्वतः दिग्दर्शक आणि निसार नेपथ्यकार (डॉक्टर असूनही). कुठून कुठून काय काय जमा केलं होतं त्यांनी. याचमुळे वातावरण निर्मिती होते.

वातावरण निर्मितीवरून आणखी एक प्रसंग आठवला, विदेशी कपड्यांच्या होळीचा. त्या प्रसंगात प्रथमच माझं 'वय' दिसणार होतं आणि वाक्यं पण असणार होती. चारच वाक्य, पण माझं प्रथम चित्रीकरण होणार होतं. रिचर्डनी दोनतीनदा माझ्याकडून वाक्यं म्हणवून घेतली. शब्दोच्चार नीट होताहेत ना ते बघायला! (आम्ही करत होतो त्याचं 'डबिंग' होणार नव्हतं. 'सिन्क साउंड' असणार होतं. म्हणजे त्या वेळी तुम्ही जे बोलाल तेच 'फायनल'. म्हणून जरा सावधानता.) सीन सुरू होतो तेव्हा मी माईकसमोर बैठकीवर बसलेली. ती चार वाक्यं बोलून मी उठून मागे जाऊन बसते, मग गांधीजी माईकसमोर येतात, भाषण करतात आणि मंचाच्या समोर असलेल्या कपड्यांच्या ढिगाला आग लावली जाते. वय दाखवण्यासाठी मी गुडघ्यावर हात ठेवून जमिनीला दुसऱ्या हातानं रेटा देत उठले. रिचर्डच्या ते लक्षात आलं. त्यांनी माझ्याकडे बघून हलकेच स्मित करून मान डोलावली! नटाला आणखी काय हवं असतं? असो. सीन संपत आला होता, आता फक्त कपड्यांची होळी राहिली होती. पुरुषभर उंच ढीग होता. अर्थात एवढे कपडे नव्हते. मोठा पत्र्याचा कोन उलटा ठेवून त्यावर कपडे टाकले होते आणि होळी पेटल्यावर काही लोक अंगावरचे कपडे उतरवून 'भारतमाता की जय' म्हणत होळीत फेकताहेत असं चित्रित करायचं होतं. होळी पेटली, व्यवस्थित पेटल्यावर 'ॲक्शन' म्हटलं गेलं, 'भारतमाता की जय' ओरडत लोकांनी कपडे फेकायला सुरुवात केली आणि काय सांगू, असा सरसरून काटा आला अंगावर! ही तर पुनर्निर्मिती होती. पण काय मनःस्थिती झाली असेल त्या वेळी लोकांची! अप्रत्यक्षपणे अनुभवली मी.

'गांधी' चित्रपट खूप लक्षात राहातो आणि आपलासा वाटतो त्याला आणखी एक कारण आहे. काही काही प्रसंगांमध्ये जी रचना होती ती प्रत्यक्ष त्या वेळचे फोटो समोर ठेवून केलेली आहे. म्हणजे सरहद गांधी आणि गांधीजी पाठमोरे जातानाचा शॉट असो की अगदी अंत्ययात्रेच्या वेळी कोण कुठे बसलं होतं ते असो. त्या फोटोंबरहुकूम! गांधींवरच्या पुस्तकांची एक भली मोठी पेटी तिथे असायची आणि एक तज्ज्ञ... संदर्भांसाठी.

कल्पना करा, मी हे सगळं अनुभवलं जवळ जवळ चाळीस वर्षांपूर्वी माझ्या करिअरच्या सुरुवातीला. हा अनुभव माझ्या पुढच्या वाटचालीसाठी शिदोरीच की!

लिहीन ते कमीच वाटतंय... इतके अनुभव, इतक्या आठवणी! चित्रीकरणाच्या, 'प्रीमियर'च्या... आणखी एक लेख तो बनता हैं!... हो ना?!

◆ hattangadyrohini@gmail.com

(फोटो- इंटरनेट-गूगलवरून साभार)



सिद्धी महाजन

## वसुंधरेच्या लेकी

# बालीच्या बालिका

**मेलाती आणि इसाबेल विजसेन, वय वर्षं केवळ १० आणि १२. प्लास्टिक प्रदूषण करणाऱ्या देशांच्या क्रमवारीत इंडोनेशियाचा दुसरा क्रमांक लागत असल्याचा फटका त्यांच्याही नितांतसुंदर, देवभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाली बेटाला बसला. पर्यटनासाठी लोकप्रिय बालीचा जीव प्लास्टिकच्या जाळ्यात घुसमटू लागला. भवितव्य समोर होतं. दोघी बहिणींनी त्या विरोधात शंख फुंकलं. ' बाय बाय प्लास्टिक बॅग्स' या संस्थेची स्थापना केली. जनजागृतीसाठी कार्यशाळा घेतल्या, साफसफाई मोहिमा राबवल्या आणि अखेर महात्मा गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकत उपोषण सुरू केलं. शासनाला नमावं लागलंच. प्लास्टिक कचऱ्याविरोधात कायदा झालाच... बाली बेट पुन्हा एकदा मोकळा श्वास घेऊ लागलं... या बालीच्या बालिकांविषयी...**

**या लेखातून** आपण वळूया थोडंसं पूर्वेकडे!

नजर जाईल तिथपर्यंत मनाला खेचून घेणारी, डोळ्यांना सुखद गारवा देणारी हिरवी वनराई. निवांत पसरलेली मुलायम भातखाचरं. शांत, अनंत हिरवाईखाली पहुडलेले जागृत ज्वालामुखी. अन् या नयनरम्य नजाऱ्याला नजर लागू नये म्हणून की काय, या सुप्रसवा भूमीला चहूबाजूंनी वेढत कवेत घेणारे काजळकाळे समुद्र किनारे.

जावा आणि लंबोक या दोन बेटांमधोमध वसलेलं बाली हे इंडोनेशियन द्वीपसमूहातील एक छोटंसं अन् देखणं बेट. इथला निसर्ग जसा अवर्णनीय आहे तसा इथला सांस्कृतिक वारसाही अतुलनीय आहे. इथली अस्पर्श गहिरी शांतता, अन् शुद्ध मोकळी हवा श्वासात भरून घेण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून लाखो पर्यटकांची रीघ दरवर्षी इथे लागलेली असते. पण जसा पर्यटकांचा राबता वाढला, आधुनिकीकरण झालं, तशी बालीच्या सौंदर्याला दृष्ट लागली. देवभूमी म्हणून ओळखलं जाणारं हे देखणं बेट अन् इथला सागर, हळूहळू प्लास्टिकचं आगर बनू लागलं.

प्लास्टिक प्रदूषण करणाऱ्या देशांच्या क्रमवारीत इंडोनेशियाचा दुसरा क्रमांक लागतो. दरवर्षी पाच अब्ज पर्यटकांना आकर्षून घेणाऱ्या आणि पर्यटन हाच स्थानिकांच्या पोटापाण्याचा सर्वांत मोठा व्यवसाय असणाऱ्या बाली बेटावर समुद्रकिनारे, प्राचीन मंदिरं आणि इतर अनेक ठिकाणी प्लास्टिकचा खच पडलेला दिसून येत असे. सुंदर निळ्याशार समुद्राचे आणि निवळशंख पाण्याच्या स्रोतांचे श्वास जागोजागी अडकलेल्या प्लास्टिकमुळे घुसमटलेले दिसून येत. पावसाळा सुरू झाल्यावर, वारे उलटे वाहू लागल्यावर बालीमध्ये चक्क कचऱ्याचा मौसम सुरू होत असे. जिथे नजर जाईल तिथे प्लास्टिकची विद्रूप गुंतवळ दिसून येत असे आणि मुख्य म्हणजे कोणालाच याचं सोयरसुतक नव्हतं. आंतरराष्ट्रीय माध्यमातून सतत या प्रश्नावर आवाज उठवला जात असताना स्थानिक प्रशासन मात्र मूग गिळून गप्प बसलं होतं. सामान्य जनतेत याबाबत जनजागृती सोडा, काहीच कृती होताना दिसत नव्हती.

अशा वेळी दहा आणि बारा वर्षं वयाच्या दोन बहिणींनी आपल्या बेटावरील प्लास्टिकचं समूळ उच्चाटन करण्याचा चंग बांधला. आपल्या भोवताली उग्र रूप धारण करणारी ही समस्या दिवसेंदिवस प्रचंड वेगानं मोठी होत असताना, ते थांबवण्यासाठी त्यांना वयानं मोठं होण्यासाठी अजिबातच थांबायचं नव्हतं. ही समस्या म्हणजे त्यांच्या रोजच्या जगण्यात अडथळा आणणारा प्रश्न होता. दररोज लाखो टन प्लास्टिक समुद्रात ओतणारा त्यांचा देश प्लास्टिकमुळे समुद्री प्रदूषण करणाऱ्या देशांच्या यादीत जगात दुसऱ्या क्रमांकावर विराजमान होता आणि ते अजिबात भूषणावह नव्हतं. त्यांना समजत होतं, की या सगळ्याचे वाईट परिणाम आपल्याच पिढीला बघावे आणि भोगावे लागणार आहेत. या सगळ्यांबरोबर आपल्याला एक सुवर्णसंधीही मिळाली आहे. आपण ठरवलं तर प्रयत्न करून या नकारात्मकतेला सकारात्मकतेमध्ये बदलू शकतो. तेव्हाच आयुष्याच्या त्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर त्यांना कळून चुकलं, की प्लास्टिक निर्मूलनाचं काम आपण पुढाकार घेतल्याशिवाय कुणीच करणार नाही. त्यांच्या लक्षात आलं, की बालीमध्ये तयार होणाऱ्या ६८० क्युबिक मीटर्स इतक्या प्लास्टिक कचऱ्यापैकी फक्त पाच टक्के कचऱ्यावर पुन्हा प्रक्रिया केली जाते. म्हणजे एखाद्या चौदा मजली इमारतीएवढा कचरा! या एवढ्या मोठ्या समस्येला आळा घालण्यासाठी या मुलींना एक जालीम उपाय प्रत्यक्षात आणायचा होता. प्लास्टिकबंदी. त्या मुलींची नावं होती, मेलाती आणि इसाबेल विजसेन.

बालीमध्ये रामायणावर आधारित खूप पारंपरिक कलाप्रकार प्रचलित आहेत. त्यांपैकी एक आहे केचक नृत्य. यात अनेक वानर सारखा 'चक चक केचक' असा आवाज काढत रामाला प्रोत्साहन देत राहातात. एका क्षणाला त्यांचा आवाज एवढा घुमू लागतो, की मुख्य पात्रांच्या बरोबरच प्रेक्षकही रोमांचित होतात. असाच होता या वानर सेनेचा निर्वाणीचा लढा. ही बंदी प्रत्यक्षात आणण्यासाठी या दोन बहिणींनीही असंच जंग जंग पछाडले. प्लास्टिक बंदी प्रत्यक्षात आणण्याचा विचार मांडणं म्हणजेच भल्याभल्यांची झोप उडवणं होतं. इतकी वर्षं बेसुमार प्लास्टिक उत्पादन आणि वापर करण्यासाठी सरावलेल्या लोकांना आणि त्याहीपेक्षा स्थानिक सरकार आणि उत्पादक लॉबी यांना हा नियम मान्य करण्यासाठी आपल्या 'विशेष फायद्यां'ना तिलांजली द्यावी लागली असती. साहजिकच त्यांना वाकायला लावणं एकदम जिकिरीचं काम होतं. हा कायदा मान्य करण्यासाठी, सरकारचं लक्ष वेधून घेण्यासाठी त्यांनी जनहित याचिका दाखल केली. पण नुसते कागदावरच प्रयत्न करून भागणार नव्हतं, कारण सरकारचं प्रतिनिधित्व करणाऱ्या गव्हर्नर मांगकु पास्तिका यांनी तब्बल दीड वर्षं या सगळ्यावर काहीच प्रतिक्रिया नोंदवली नव्हती.

आता मात्र या दोघींचा धीर सुटत चालला होता. तेव्हा त्यांना आठवली भारतभेटीत साबरमती आश्रमाला दिलेली भेट. एका परक्या देशात मोहनदास करमचंद गांधी नावाच्या एका साध्यासुध्या दिसणाऱ्या माणसानं केवळ विचारांच्या अन् शांततेच्या मार्गानं दिलेल्या लढ्याची तिथे ऐकलेली गोष्ट. या माणसाच्या शिकवणीनं त्यांची समस्या चुटकीसरशी सोडवली. तिच्यातून प्रेरणा घेऊन एकमतानं त्यांनी गांधींच्या उपोषण आणि सत्याग्रहाचा मार्ग अनुसरला. वय लहान असल्यानं आहारतज्ज्ञांच्या सल्ल्यानं सूर्योदय ते सूर्यास्त जाहीर उपोषण करण्यास सुरुवात केली. आणि याचा जादूची कांडी फिरावी तसा परिणाम झाला. चोवीस तासांत पोलिसांच्या गराड्यात त्यांना गव्हर्नरपाशी नेण्यात आलं. आणि अशा प्रकारे बालीमध्ये प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालण्यावर अखेर शिक्कामोर्तब झालं.



इसाबेल आणि मेलाती विजसेन

या एवढ्याशा मुलींमध्ये दहाव्या आणि बाराव्या वर्षी ही हिंमत आली कुठून?

या प्रश्नाचं उत्तर मिळवण्यासाठी बालीतल्या शेतांमधून मजल दरमजल करत थोडा प्रवास करावा लागेल. घनदाट जंगलात लपलेल्या, बंडुंग प्रांतातील अबायनसेमाल या ठिकाणी जावं लागेल. या ठिकाणी गर्द हिरव्या वनराजीत प्रवेश केल्यावर थोडेसं आत, गोल छपराच्या, गवतानं शाकारलेल्या आणि पूर्णपणे बांबू आणि इतर नैसर्गिक गोष्टींचा वापर करून बांधलेल्या अवाढव्य तीन-चार मजली झोपड्यांनी सुसज्ज असा प्रासाद आपलं स्वागत करतो. पर्यावरणपूरक पर्यायी शिक्षणपद्धतीचा प्रसार करण्यासाठी जॉन आणि सिंथिया हार्डी या दाम्पत्यानं २००८ मध्ये सुरू केलेल्या 'ग्रीन स्कूल' नावाच्या शाळेमध्ये ४१ देशांमधली पाचशे मुलं आणि ४७० स्थानिक मुलं शिक्षण घेतात.

'चेंज मेकर्स' म्हणजेच बदलाचे शिल्पकार घडवणं हे शाळेचं ब्रीद आहे. इथे रोजच्या जगण्यातील छोट्या छोट्या गोष्टींमधून विद्यार्थ्यांच्या मनात शाश्वत विकासाची संकल्पना रुजवली जाते. मुलांमधल्या सर्जनशक्तीला आणि विचारक्षमतेला मोकळा अवकाश मिळत जातो. पूर्णपणे हरित इंधनावर चालणारी 'बायो बस' इथे आहे. शाळेनं समुद्रजीवनाची आणि प्रवाळांची तोंडओळख करून देण्यासाठी सुरू केलेले 'डायव्हिंग क्लब' आहेत. ही शाळा समाज, शिक्षक, पालक आणि इतर घटकांना एकत्रित आणणाऱ्या 'कुल कुल' या पारंपरिक बाली विचारपद्धतीतून निर्माण झाली आहे. इथे विद्यार्थ्यांना जगभरात चाललेल्या सकारात्मक कार्याची ओळख करून दिली जाते. काहीतरी वेगळं, भव्य कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्ती, त्यांचं जीवन यांच्याबद्दल रोजच्या पाठ्यक्रम आणि वर्गांतून माहिती दिली जाते.

शिक्षणानं माणसाला स्वतःपेक्षा मोठा विचार करायची शक्ती दिली पाहिजे. काहीतरी नवीन करून पाहण्याची दृष्टी दिली पाहिजे. समस्या तयार करणाऱ्या माणसांच्या संख्येत भर न घालता, मुलांना समस्या सोडवणारे म्हणजेच 'प्रॉब्लेम सॉल्व्हर्स' बनवलं पाहिजे. अन् ही शाळा मुलांना नेमकी हीच दिशा दाखवते, स्वतःच्या समस्यांवर स्वतः उत्तर शोधण्याच्या निर्णायक वळणावर मुलांना विचार करण्याचं खूप दुर्मीळ स्वातंत्र्य देते. या स्वातंत्र्याचा सकारात्मक उपयोग मेलाती आणि इसाबेल यांनी केला. आपल्या घरासमोरच्या समुद्रकिनाऱ्यावर पोहायला गेल्यावर प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये अंग गुरफटून जातंय अन् ४० देशांना जे साध्य झालं ते आपल्या देशात साध्य होत नाहीये हे पाहिल्यावर आपला परिसर प्लास्टिकमुक्त करण्याच्या उत्कट भावनेपोटी ' बाय बाय प्लास्टिक बॅग्स' या संस्थेची स्थापना केली. शाळा आणि सार्वजनिक ठिकाणी जनजागृती करण्यासाठी कार्यशाळा घेण्याचा झपाटा लावला. बेटावरील समुद्रकिनाऱ्यांवर प्रचंड मोठ्या प्रमाणावर साफसफाई मोहिमा राबवल्या आणि सर्वांत शेवटचा घाव घातला तो उपोषण करून.

बालीच्या गव्हर्नरनी जाहीरनाम्यावर सही केल्यानंतर २०१८ पर्यंत बालीला प्लास्टिकमुक्त करण्याचं आश्वासन दिलं होतं. पण ते म्हणावं तसं शक्य झालं नाही. परिणामी या बहिणींनी सरकारवर आणलेला दबाव तसाच कायम ठेवला. स्थानिक, नागरी आणि राष्ट्रीय पातळीवर सरकारला विश्वासात घेऊन उपक्रम सुरूच ठेवले. तरुणाईला संबोधित करण्यासाठी त्यांनी 'टेड टॉक'मध्ये व्याख्यान दिलं, न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्रांपुढे आपलं म्हणणं मांडलं आणि जागतिक नाणेनिधी- जागतिक बँकेच्या परिषदेत उत्साहानं भाग घेऊन वर्ल्ड बँकेच्या प्रमुख कार्यकारी अधिकारी क्रिस्टलीना जोर्जिव्हा यांच्याकडून कौतुकाची थाप मिळवली. पण त्यांच्या कामाची खरी पावती त्यांना मिळाली ती २०१९ मध्ये. बालीमध्ये पुनर्वापर करण्यास अयोग्य अशा प्लास्टिकवर बंदी आणणारा कायदा लागू झाला, बेकायदा प्लास्टिकचा वापर करणाऱ्या व्यावसायिकांना सहा महिन्यांची नोटीस बजावली गेली, न जुमानणाऱ्या अडेलतट्टू लोकांचे परवाने रद्द केले गेले आणि या दोन बहिणींनी उपोषण करत रस्त्यावर जागवलेल्या शंभर रात्रींचं चीज झालं.

मेलाती आणि इसाबेलनं २०१३ मध्ये सुरू केलेली 'बाय बाय प्लास्टिक बॅग्स' ही चळवळ आता जगभर फोफावली आहे. या संस्थेच्या पन्नास संघटना वेगवेगळ्या देशांत उभ्या राहिल्या असून जगभरातील मुलं, तरुण याद्वारे प्रबोधन करतात. 'सिंगल युज प्लास्टिक'चा वापर कमी करण्याच्या पलीकडे जाऊन या बहिणींनी 'माउंटन मामास' प्रकल्प सुरू केला आहे. त्यात बालीतील स्थानिक स्त्रियांना दान केलेल्या किंवा पुनर्निर्मिती केलेल्या साहित्यातून पुन्हा वापरण्यायोग्य पिशव्या तयार करण्यास प्रशिक्षण दिलं जातं. या पुढे जाऊन मेलाती आपल्या जमातीला भेटण्यासाठी जगभर फिरते आहे. तिच्या मते एक बुलंद हाक देणं खूप खूप महत्त्वाचं आहे, केचकमधल्या वानरांचा आवाज अविरत घुमण्यासाठी!

(फोटो विजसेन भगिनींच्या फेसबुक पेजवरून)


◆ snmhjn33@gmail.com



उल्हास कशाळकर

गद्धेपंचविशी


# पाय जमिनीवर ठेवणारी ‘पंचविशी’ !



**‘‘एखादी कला आपल्यात मुळातच असणं किंवा त्याची आवड असणं आणि कलेत स्वत:ची काही भर घालू शकणं या दोन्हीच्या मध्ये एक मोठा प्रवास असतो. स्वत:चं स्थान निर्माण केल्यावरही हा प्रवास संपत नाही, कारण ते चिरंतन शिकणं असतं. प्रवासाला निघतानाच योग्य दिशा मिळाली तर पुढची माहीत नसलेली वाट सापडणं अधिक शक्य. अंगातलं बालपण सरून खऱ्या अर्थानं जगाची समज येऊ लागते त्या तरुण वयातच ही गोष्ट ठरत असल्यामुळे ‘पंचविशी’ महत्त्वाचीच...’’ सांगताहेत ‘पद्मश्री’, ‘संगीत नाटक अकादमी पुरस्कार’ आणि ‘तानसेन सन्मान’प्राप्त ज्येष्ठ गायक पं. उल्हास कशाळकर.**

वयाची २० ते ३० वर्षं या ऐन तारुण्याचा काळ तुमच्यासाठी कसा होता, या प्रश्नावर मी विचार करतो तेव्हा ज्याला शब्दश: ‘गद्धेपंचविशी’ म्हणावं, असं मला काही आठवत नाही. मी कधी कुठला अविचारच केला नाही, अशी प्रौढी सांगण्याचा हेतू नाही. पण हा काळ माझ्यासाठी एकाच एका ध्येयानं भारलेला होता आणि त्यानं मला इतर कशाचाही विचार करू दिला नाही. ते ध्येयच तितकं मोठं होतं, आहे. सहज साध्य होणाऱ्यातलं नाही. त्या मार्गावर चालण्याची माझी सुरुवात विशी ते तिशीच्याच काळात खऱ्या अर्थानं झाली. जेव्हा मी हे म्हणतो, तेव्हा एक मजेशीर गोष्ट जाणवते, की मी आयुष्यभर केवळ शास्त्रीय संगीत करणार आहे, हे मात्र मी आधीपासून ठरवलं नव्हतं आणि वयाची तीस वर्षं उलटेपर्यंतही मी ते निश्चित केलं नव्हतं. पण मी पूर्णवेळ संगीत शिकत होतो, रियाज करत होतो. आता विचार करता असं वाटतं, की ही विद्या अशाच प्रकारे करायला हवी.

माझा जन्म पांढरकवडा, यवतमाळचा, १९५५ चा. घरात गाणं होतंच. माझे वडील (ॲड. नागेश कशाळकर) गायचे आणि मी लहानपणापासून त्यांच्याकडे शिकत होतो. माझे भाऊही गायचे. त्यामुळे घरात संगीतसाधनेसाठी कायम प्रोत्साहनाचं वातावरण होतं. मी नागपूर विद्यापीठातून ‘बी.ए.’ आणि नंतर संगीत विषयात ‘एम.ए.’ केलं. ते करताना मला हे समजलं, की केवळ या प्रकारे संगीताचं शिक्षण होऊ शकणार नाही. संगीतातली माहिती त्यातून मिळेलही, पण शिक्षण हवं असेल तर ते परंपरागत पद्धतीनंच घ्यावं लागेल. त्यामुळे कॉलेजचे तास संपल्यावरही मी गाणं शिकायला जायचो. आम्हाला ‘एम.ए.’ला शिकवणारे प्राध्यापक



डोंबिवली येथील वास्तव्याच्या काळात पं. उल्हास कशाळकर

राजाभाऊ कोगजे (अनंत केशव कोगजे), प्रभाकरराव खर्डेनवीस हे विद्वान होते. याच काळात मला केंद्र सरकारची संगीतासाठीची एक शिष्यवृत्तीही मिळाली होती. ती होती, ३०० रुपये. ‘एम.ए.’ पूर्ण झाल्यावर अगदी गुरूगृही नाही, पण गुरूंच्या सान्निध्यात राहून पूर्णवेळ संगीत शिकण्याचा विचार मी पक्का केला. मला पं. राम मराठे आणि पं. गजाननबुवा जोशी यांच्याकडे शिकायची इच्छा होती. मला ‘एम.ए.’ला दोन सुवर्णपदकंही मिळाली होती. या परिस्थितीत चांगली नोकरी मिळवणं त्या काळी अवघड नक्कीच नव्हतं. अशा वेळी मला गजाननबुवांकडे रीतसर गुरू-शिष्य परंपरेत शास्त्रीय संगीत शिकावंसं तळमळीनं वाटणं आणि त्यासाठी झोकू न देणं ‘गद्धेपंचविशी’त अनपेक्षित होतं.

गाणं ही २-३ वर्षांत शिकण्याची गोष्ट नाही आणि त्यासाठी पुरेसा वेळ द्यावा लागेल, हे माझ्या घरच्यांना मान्य होतं. घरची खूप मोठी अशी काही जबाबदारी माझ्यावर नव्हती. त्यामुळे मी अगदी वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत जरी पूर्णवेळ गाणं शिकलो आणि या काळात नोकरी-व्यवसाय केला नाही, तरी घरच्यांची त्याला परवानगी होती. मी असा निर्णय घेतला होता, तरी आधी म्हटल्याप्रमाणे आयुष्यात केवळ गाणंच करायचं हा निर्णय तोपर्यंत झालेला नव्हता. अर्थात कुणी लहानपणापासूनच तसं ठरवायला हरकत काहीच नसावी. पण या क्षेत्रात स्वत:चं काही मिळवायचं असेल, तर त्याला वेळ लागतो. नावही उशिराच होतं. एखादा उत्तम खेळाडू पस्तिशीच्या सुमारास निवृत्तीची तयारी करत असेल, पण शास्त्रीय संगीतातला गायक तिशी-पस्तिशीतही नवोदितच समजला जात असतो. शिवाय प्रत्येकाला या क्षेत्रात अपेक्षित यश मिळतंच असंही नाही. कदाचित या सर्व गोष्टी नकळत माझ्या डोक्यात सुरू असतील. पण तेव्हा तरी मला संगीतसाधना अधिक महत्त्वाची वाटत होती, व्यावसायिक गायक बनण्याचा विचार नव्हता. वयाची विशी ते तिशी हा पुढच्या आयुष्यासाठी पायाभरणीचा काळ म्हणतात. तसा माझाही या रियाजाच्या निमित्तानं पाया मजबूत करण्यात गेला.



पं. गजाननबुवा जोशी यांच्याकडून संगीताची तालीम घेत असताना

पं. राम मराठे ठाण्याला राहात असत, तर पं. गजाननबुवा जोशी डोंबिवलीत राहायचे. मग मीही डोंबिवलीला जाऊन राहाण्याचं ठरवलं. प्रसिद्ध साहित्यिक पु. भा. भावे यांचा तिथे बंगला होता. त्यांच्या घरात मला एक खोली भाड्यानं मिळाली आणि ठाण्यात माझं संगीत शिक्षण सुरू झालं. तेही नागपूरचे आणि मीही. ते कधी कधी माझ्या खोलीवर येत, चौकशी करत. पं. राम मराठे हे नाट्यसंगीतातलं प्रचंड मोठं नाव असूनही मी त्यांच्याकडे नाट्यसंगीत कधीच शिकलो नाही, केवळ ख्याल गायकी शिकलो. ख्याल गायकीमध्ये त्यांची एक स्वतंत्र शैली होती आणि त्यात ग्वाल्हेर, आग्रा आणि जयपूर घराण्यांच्या गायकीचा संगम होता. डोंबिवली आणि ठाणे हा भाग सांस्कृतिक कार्यक्रमांचं केंद्र असल्यासारखाच होता. अनेक संगीतकार, साहित्यिक, कलाकार या भागात राहायचे. संगीताचे कार्यक्रम, जाहीर भाषणं, कवीसंमेलनं, असे सतत काही ना काही उपक्रम सुरू असायचे. मी अशा खूप कार्यक्रमांना जात असे. या काळात शास्त्रीय संगीतातील उत्तुंग व्यक्तींचं गाणं ऐकण्याची संधी मला मिळाली. मोगूबाई कुर्डीकर, पं. भीमसेन जोशी, किशोरीताई आमोणकर यांचं गाणं, पं. रविशंकरांसारख्या कलाकारांचं वादन मी ऐकत होतो. गणेशोत्सवामध्ये तर जवळपास दररोज एकाच वेळी दोन वेगवेगळ्या ठिकाणी ४-५ मोठ्या कलाकारांचे कार्यक्रम सुरू असत. एकीकडे संगीताचं शिक्षण सुरू असताना मी हे ऐकत होतो, कलाकारांची बलस्थानं समजून घेत होतो. त्यातून मला जे घेता येईल, ते घ्यायचा प्रयत्न करत होतो. पु. भा. भावे, शं. ना. नवरे आणि विविध साहित्यिकांच्या भाषणांना जाऊन बसत होतो. संगीत नाटकं, इतर मराठी नाटकं आणि चित्रपट पाहाणं, साहित्य वाचणं, अगदी कृष्णधवल टीव्हीवर क्रिकेटचे सामने पाहाणं अशा सर्व गोष्टी मी या काळात केल्या. ही सगळी एक शिक्षणाची प्रक्रिया होती. या गोष्टींचा आपल्यावर आपल्याही नकळत परिणाम होत असतो. चांगली कला अनुभवण्याचा प्रत्येक अनुभव विचारप्रवण करत असतो, वेगळी दृष्टी देत असतो.

हे वय आपण ‘कुणासारखं तरी’ व्हावं असं वाटण्याचंही असतं. इतक्या मोठमोठ्या कलाकारांना ऐकत असूनही माझ्या डोक्यात ‘रोल मॉडेल’ ही संकल्पना नव्हती. याचं कारण असं, की प्रत्येक कलाकाराची त्याची म्हणून असलेली शैली त्या कलाकारांना ऐकताना मी समजून घेत होतो. अशी वेगळी शैली कमावण्यासाठी आपण स्वत:च काहीतरी करायला हवं, कुणाच्या गायकीसारखं मी गाणं योग्य नाही, हे उमजत होतं. माझ्या मर्यादा आणि माझ्यातले चांगले गुणही माझ्या लक्षात येत होते. शिवाय कान टोचायला गुरू होतेच. माझे गुरू पं. गजाननबुवा जोशी स्वभावानं कडक. त्यांना अपेक्षित आहे, तसंच झालं पाहिजे यासाठी ते आग्रही असायचे. पण संगीत काय असतं, संगीताचा दर्जा काय असतो, याची दृष्टी त्यांच्याकडे मिळाली. मी त्यांच्याकडे संगीत तर शिकायचोच, पण ते रोज दुपारी व्हायोलिन वाजवत असत, संध्याकाळी त्यांच्याबरोबर फेरफटका मारायलाही जायचो. घरी सकाळी साडेसहा वाजता रियाजाला बसायचो, नंतर ९ वाजता गुरुजींकडे जायचो, त्यांच्याकडून १२ वाजता घरी येऊन दुपारी २ वाजताच्या सुमारास पुन्हा जायचो. रात्री घरी स्वत:चा रियाज सुरू होताच. रियाज ही नियमित करण्याची गोष्ट असल्यामुळे आमच्यासाठी सर्व दिवस सारखे होते. ‘गद्धेपंचविशी’ या शब्दात अपेक्षित असतो तसा तरुण वयात घडणारा अविचार माझ्याबाबतीत घडला नाही, याचं कारण इथं होतं. एका लक्ष्यानं आणि स्वप्नानंच आम्ही सर्वजण तिथे एकत्र आलो होतो.



नागपूरमधील पदवीप्रदान समारंभात सुवर्णपदक स्वीकारताना

संगीतसाधनेत गुरू किती महत्त्वाचा असतो, हे मला या काळात प्रकर्षानं जाणवलं. मी लहानपणापासून संगीताच्या सान्निध्यात वाढलो आणि तेव्हापासूनच गातही होतो. संगीत स्पर्धांमध्ये सहभागी होत होतो, १४ व्या-१५ व्या वर्षापासूनच जाहीर कार्यक्रमांमध्ये गाण्याची संधी मला मिळू लागली होती. लहानपणी या सगळ्याचं लोकांकडून खूप कौतुक होत असे. आता मी हे मान्य करतो, की ते माझं गाणं काही अप्रतिम म्हणावं असं नव्हतं, पण अनेकदा ‘मी किती छान गायलो’ असं मलाच वाटून जात असे. अशा ठिकाणी तुम्हाला तुमची ओळख करून देणारा गुरू गरजेचा असतो.

पं. गजाननबुवांकडे शिकताना असा एखादा प्रसंग घडला, की ते मला त्याच संगीतकृतीचा कोणतातरी नवीन पैलू उलगडून दाखवत. त्यांचं ऐकल्यावर समजे, की त्यासारखं काहीच आपल्याला जमलेलं नाहीए!

ग्वाल्हेर, जयपूर आणि आग्रा घराण्यांची गायकी, त्यांच्या शैलीची वैशिष्ट्यं मला आवडत होती. त्यात माझं असं काय निर्माण करता येईल याचा मी विचार करत होतो, तसा प्रयत्न करत होतो. खरंतर या घराण्यांच्या गायकीत खास साम्य असं काही सांगता येणार नाही. त्यामुळे त्यांचा मेळ घालत उत्तम काय सादर करता येईल, ही प्रक्रिया माझ्यातील विद्यार्थ्यासाठी खूप रोचक होती, नवीन शिकल्याचा आनंद देणारी होती.

याच काळात मला साताऱ्यातील औंध संस्थान येथील ‘शिवानंद स्वामी संगीत प्रतिष्ठान’साठी संगीताचे कार्यक्रम आयोजित करण्याची संधी मिळाली. हे आणखी वेगळं आणि महत्त्वाचं शिक्षण होतं. अशा अनेक गोष्टी आपण करत असतो, ज्या करताना त्याचा आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी उपयोग होत आहे याची कल्पनाही येत नाही, तशी ती गोष्ट होती. आपल्या क्षेत्रातील नवीन माणसांना भेटताना ते क्षेत्र आणखी खोलवर जाऊन समजून घेता येतं. वयाच्या २८-२९ व्या वर्षी मी मुंबईत ‘ऑल इंडिया रेडिओ’मध्ये ‘प्रोग्रॅम एक्झिक्युटिव्ह’ म्हणून नोकरीला लागलो आणि चांगली ७-८ वर्षं ही नोकरी केली. व्यावसायिकदृष्ट्याही केवळ संगीत करण्याचा निर्णय मी पुढच्या या काळात पक्का केला. तोपर्यंत मला अनेक कार्यक्रमही मिळू लागले होते. याच काळात माझं लग्न झालं. माझी पत्नीही आकाशवाणीमध्ये प्रोग्रॅम एक्झिक्युटिव्ह होती.

पंचविशीच्या वयात मी जे करत होतो तो संगीताच्या शिक्षणाचा पाया होता. लवकरात लवकर संगीताचे जाहीर कार्यक्रम करायला लागावेत आणि प्रसिद्ध व्यावसायिक गायक व्हावं, असा अनावर मोह होण्याचं हे वय असतं. तसं वाटणं साहजिकही आहे. त्या वयात हा पाया मजबूत घातला जाणं किती महत्त्वाचं आहे, हे मला आता जाणवतं. हे शिक्षण कधीही न संपणारं, सतत नवीन शोधण्यासाठी आपल्याला जागं ठेवणारं आहे. त्याची दृष्टी विशी ते तिशीच्या वयात मिळणं हे म्हणूनच फार मोलाचं.

आज साठी सरल्यावर ‘गद्धेपंचविशी’ या शब्दावर जेव्हा रेंगाळतो तेव्हा सहज मनात येतं, पंचविशी आपल्या आयुष्यात आलीच, पण ती संगीताचा पाया मजबूत करून घेणारी! पाय जमिनीवर घट्ट रोवून ठेवणारी ‘पंचविशी’ होती.

शब्दांकन- **संपदा सोवनी**

◆ *chaturang@expressindia.com*

---

## पडसाद

### बहुरंगी चतुरंग!

नवीन वर्षातील ‘चतुरंग’ वाचून समाधान वाटले. ‘शांतता टोमणे सुरू आहेत’ हा मंदार भारदेंचा लेख वाचून निखळ मनोरंजन झाले. ‘स्मृति आख्यान’ कंटाळवाणे न वाटता उपदेशपर वाटले. ‘अल्झायमर’ होऊ नये म्हणून काय करायला हवे, ते साध्या सोप्या शब्दांत सांगितले आहे. नवीन माध्यमांशी प्रत्येक जण जुळवून घेईल, तर आयुष्य नक्कीच सुखकर होईल. ‘सावित्रीच्या लेकीं’विषयी खूप वाचले आहे, पण जोतिबांच्या लेकांविषयी आता समजून येईल. खरे तर स्त्रीला सामाजिक प्रवाहात आणण्याचे कार्य आपल्याकडे पुरुषांनी सुरू केले हे विसरून कसे चालेल. ‘ज्येष्ठांचे लिव्ह इन रिलेशनशिप’ मात्र आपल्या समाजाच्या पचनी पडायला बराच काळ जावा लागेल. कारण आपली मानसिकता या विचाराची नाहीये. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. आशीष देशपांडे यांच्यासारख्यांच्या सल्ल्याची आज खूप गरज वाटते. ‘गद्धेपंचविशी’तून आजच्या धडपडणाऱ्या तरुणांना शिकण्यासारखे खूप आहे. एकंदरीत, नवीन वर्षाची सुरुवात छान झाली आहे. असेच विविध लेख वाचायला मिळू दे!

**– अंजली अरविंद भातखंडे,** अलिबाग, रायगड

### ‘पुरुषांचे प्रांजळ मनोगत’ नेमके!

‘पुरुष हृदय बाई’ सदरातील सुनील सुकथनकर यांचे ‘आम्हा पुरुषांचे प्रांजळ मनोगत’ वाचले आणि पोट धरून हसले, मनापासून! त्यांनी नेमके, मोजके लिहिले आहे याबद्दल अपार आनंद आहेच, पण पुरुषप्रधान संस्कृतीचे खरे रूप या लेखात उमटले आणि ते एका पुरुषाने लिहावे याचेही कौतुक आहे.

एरवी आम्ही अनेक जणी स्त्रीवादी लेखन करत असतो अन् समाजाकडून आणि कधी कधी आमच्या भगिनींकडूनही ‘ट्रोल’ होत असतोच. पण अशा परिस्थितीत सगळ्या शक्यता धरूनही आपण लेखात पुरुषप्रधान संस्कृतीचे सगळे गुणावगुण अचूक लिहिले. याबद्दल करावे तेवढे कौतुक कमीच. असे बऱ्याच पुरुषांना कळेल तो सुदिन!

**– उमा मोकाशी,** पुणे

### स्त्रीच्या घरकामाचे मोल, मूल्य आणि मान!

‘घरकामाचे मोल’ हा स्त्री चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या लता भिसे सोनावणे यांचा लेख (१६ जानेवारी) वाचताना टीव्हीवरील आईविषयीच्या सध्या गाजणाऱ्या एका मालिकेची आठवण झाली. गृहीत धरलेल्या गृहिणीची व्यथा त्यात योग्य रीतीने मांडली आहे. परंतु घरकामाचे मोल मूल्यात करून आम्हाला मोलकरीण करू नका, असेच सारासार मत गृहिणींचे असावे असे वाटते.

‘घरकामाचे मूल्य स्त्रीचा पती कार्यालयात जाऊन करत असलेल्या कामाच्या तुलनेत कमी नाही,’ असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले, हे बरोबर. पण घरकामाला मोबदला पतीने दिला तर तो ताटातला वाटीत असाच होईल. हे राष्ट्रीय उत्पन्नात कसे धरणार? हा मोबदला (पगार) प्राप्तिकर विभाग तिचे उत्पन्न म्हणून मान्य करेल का? याउलट मोल आणि मूल्य यात फरक केला तर मान (आदर) राहील का? ‘ती आहे म्हणून आम्ही आहोत. ती नसते तेव्हा कळते ती आहे,’ ही जाणीव आणि आदर कुटुंबात महत्त्वाचा. ती जगाला आत्मिक समाधानाने सांगते, ‘दु:ख नाही याचे मी आहे गृहिणी, फक्त बदला तुम्ही तुमची विचारसरणी!’ समाधानाची बाब म्हणजे हल्लीचे तरुण चहाच्या पहिल्या कपाबरोबर वृत्तपत्र वाचण्याचे भाग्य तिला देतात, असे आढळून येते. भले जुनी पिढी (ज्येष्ठ नागरिक) याकडे कुत्सितपणे बघेल! जमाना हळूहळू का होईना बदलतो आहे, हेही नसे थोडके.

**– श्रीनिवास स. डोंगरे,** दादर, मुंबई

### ‘मी, रोहिणी’ उत्सुकता वाढवणारं



प्रख्यात अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांचे ‘मी, रोहिणी...’ सदर वाचले. त्यांच्या अभिनयाबद्दल खूप लिहिलं गेलं असलं तरी त्यांच्या आयुष्याबद्दल फार काही वाचलेलं नाही. त्यांची जीवनकहाणी वाचायला उत्सुक आहोत. सदराचा प्रत्येक भाग वाचल्यावर पुढचा भाग वाचण्याची उत्सुकता वाढीस लागते.

‘गांधी’ चित्रपटासाठी नसिरुद्दीन शाह आणि स्मिता पाटील यांनी ‘ऑडिशन’ दिली होती हे वाचले होते, पण जॉन हर्ट आणि भक्ती बर्वे ही जोडीसुद्धा ऑडिशनला होती, हे नव्याने कळले. नसीरजी आणि स्मिता पाटील यांचे ऑडिशनच्या वेळचे छायाचित्र इंटरनेटवर उपलब्ध आहे, पण भक्ती बर्वेंचे त्या वेळचे छायाचित्र उपलब्ध नाही. रोहिणीताईंचा लेख म्हणजे त्या काळाचा दस्तावेज जणू! वर्षभर ही वाचनीय मेजवानी लाभणार याचा आनंद आहे.

**– मंगेश शशिकला पांडुरंग निमकर,** कळवा

### कुटुंबीयांची मानसिकता बदलावी



आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या वटवृक्षाच्या खोलवर रुजलेल्या पाळामुळांच्या बरोबरीने आता स्त्रीवर्गाच्या जाणिवेच्या पारंब्याही जमिनीकडे रुजण्यासाठी झेपावू लागल्याचे पाहायला मिळत आहे. गृहिणींचे काम हे पतीच्या कार्यालयीन कामाइतकेच महत्त्वाचे असते, या न्यायालयाच्या दाखल्याने कागदोपत्री पुरुषांच्या बरोबरीने मूल्यमापन केले गेले ही गोष्ट स्वागतार्ह म्हणावी लागेल. ही समानता कौटुंबिक व्यवस्थेत सर्व पातळ्यांवर झिरपणे गरजेचे आहे. ‘हाऊसवाइफ’ शब्दाची जागा ‘होममेकर’ने घेतली हे त्याचे द्योतक म्हणावे लागेल.

कधी नव्हे ते ‘करोना’मुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना सक्तीने घरी बसावे लागले, त्यातच घरी कामाला मदतनीस येणे बंद झाल्याने घर चालवण्यातील अडथळ्यांची शर्यत सर्वांना पाहायला मिळाली. ‘घी देखा था बडगा भी देख लिया’ अशी अवस्था सर्वांची झाली. घरातील स्त्रियांची ओढाताण पाहायला मिळाली आणि आपोआपच सर्वांना मदतीचा पाझर फुटला. नोकरी न करता पूर्णवेळ गृहिणी असणाऱ्या पत्नीला आणि कुटुंबीयांनाही जेव्हा ‘या काय करतात?’ या प्रश्नाला ‘काही नाही, घरीच असते’ असे उत्तर द्यावेसे वाटते, तेव्हाच स्त्रियांचे अवमूल्यन झाले असे म्हणावेसे वाटते. पुरुष जेव्हा घरातील सर्व दायित्व पत्नीवर सोपवतात आणि त्या ते समर्थपणे निभावतात, त्या वेळी सर्व कामांचे मूल्यमापन पैशांत करणे शक्यच नसते. त्या भक्कम आधारावर पुरुष आकाशाला गवसणी घालण्याचे स्वप्न पाहू शकतात. कुटुंबीयांची मानसिकता जोखून, समस्या जाणून, त्यांना मानसिक आधार देत त्यांना एकत्र गुंफण्याची जबाबदारी गृहिणी पार पाडत असते. आर्थिक सुस्थितीसाठी पत्नीची नोकरी अपरिहार्य ठरू लागली आणि घर, नोकरीची दुहेरी जबाबदारी झेलताना स्त्रियांची ओढाताण वाढली. अशा परिस्थितीत तर स्त्रियांच्या मदतीचे मूल्यमापन दुपटीकडे झुकलेले मान्य करायला हवे. जेव्हा आर्थिक भार उचलण्याची अपेक्षाही घरातील स्त्रीकडून केली जाते, तेव्हा तर त्यांचा मानसन्मान नक्कीच वाढलेला लक्षात घ्यायला हवा. हळूहळू ही सुधारणा घडत आहे, या विषयावर गांभीर्याने चर्चा होत आहेत. तरीही न्यायालयाच्या निर्णयापेक्षा कुटुंबीयांची मानसिकता बदलणे गरजेचे ठरते.

**– नितीन गांगल,** रसायनी

### ‘जगणं बदलण्याचा’ वेग अफाट

नववर्षातील ‘चतुरंग’ वाचनीय आहे. ‘जगणं बदलताना’ सदरातील अपर्णा देशपांडे यांचा ‘ही पहाट वेगळी आहे’ हा लेख विशेष आवडला. अगदी शीर्षकसुद्धा चपखल आहे. सध्या पन्नाशीच्या पुढेमागे असलेल्या पिढीसाठी खरोखरच बदलांचा वेग खूप जास्त आहे. एखाद्या वेळी मती गुंग होऊन जावी इतका जास्त! त्याच्याशी जुळवून घेताना होणारी कसरत अपर्णाताईंनी खुसखुशीतपणे मांडली आहे. आणि हो, बदल ‘पॉझिटिव्हली’ स्वीकारायचा असतो, हेही त्यांनी उपदेश न करता, हलक्याफुलक्या शैलीत सांगितले आहे. लेखातील नवऱ्याला दिलेली पाघळलेल्या लाडवाची उपमा तर अफलातून!

**– अंजली जयंत कुलकर्णी**

### आजच्या पिढीची पहाट वेगळीच!

अपर्णा देशपांडे यांच्या ‘जगणं बदलताना’मधील लेखाच्या शीर्षकाने लक्ष वेधून घेतले, ‘ही पहाट वेगळी आहे’. जगण्यातील संघर्ष कितीही अटळ असला तरी त्यातूनही आनंद घेणे जमले पाहिजे हे मान्य. आजच्या पिढीची पहाट वेगळी आहे हे तर खरेच, पण आपण ती रम्य करायची की निरस हे आपल्या हातात आहे. हे सदर वाचायला निश्‍चित आवडेल.

**– अर्चना सातपुते**

हिरवाई आयोजित जंगल सफारी २०२१
वन्यजीवन, निसर्ग संवर्धन व पर्यटनक्षेत्रात २३ वर्षे काम करणाऱ्या हिरवाई चे आयोजन
केळवा निसर्ग सहल
● १४ फेब्रुवारी २०२१
कान्हा टायगर सफारी
● २७ ते ३१ मे ● ५ ते ९ जून २०२१
पेंच टायगर सफारी
● २२ ते २५ एप्रिल
● ३० एप्रिल ते ३ मे
● २१ ते २४ मे २०२१
सर्व टूर्सचे आयोजन कोविड १९ प्रोटोकॉलसह
पेंच आणि कान्हा विमान प्रवासासहित
वाघांचे साम्राज्य व वन्यजीवन अनुभवा
कुंभारगाव पक्षीनिरीक्षण सफर
● २५ ते २८ फेब्रु ● ११ ते १४ मार्च ● २५ ते २८ मार्च
नोंदणी मुदत : ७ फेब्रुवारी २०२१
वन्यजीव संशोधक व प्रकाशचित्रकार सौरभ महाडिक यांचे छायाचित्रणाविषयी मार्गदर्शन
संपर्क - ९६१९७५२१११ / ९६१९२४२८९७
Since 1998 Hirvai Nature Nd Wildlife Tourism

# महापालिकेचे ७ हजार ६५० कोटींचे अंदाजपत्रक; वास्तवाकडे दुर्लक्ष



आगामी आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी शुक्रवारी स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने यांना सादर केले. महापौर मुरलीधर मोहोळ, सभागृहनेता गणेश बीडकर, उपमहापौर सरस्वती शेंडगे, गटनेता आबा बागुल, अतिरिक्त आयुक्त रुबल अगरवाल आणि डॉ. कुणाल खेमनार या वेळी उपस्थित होते.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** आगामी आर्थिक वर्षासाठीच्या जमा-खर्चाचा ताळेबंद मांडताना उत्पन्नाच्या बाजूकडे दुर्लक्ष करत तब्बल ७ हजार ६५० कोटींचे अंदाजपत्रक महापालिका आयुक्तांनी मांडले आहे. मिळकतकर, बांधकाम परवानगी शुल्क, वस्तू आणि सेवा कर विधेयकाचे अनुदान यातून सर्वाधिक उत्पन्न आयुक्तांनी गृहीत धरले आहे. उत्पन्नवाढीचे नवे पर्याय न शोधता पारंपरिक स्रोतांवर आयुक्तांनी भिस्त ठेवली असल्याचेही स्पष्ट झाले आहे. मिळकतकरामध्ये ११ टक्के वाढही अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आली आहे.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षासाठीचे ७ हजार ६५० कोटी रुपयांचे अंदाजपत्रक महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी स्थायी समितीचे अध्यक्ष हेमंत रासने यांना शुक्रवारी सादर के ले. महापौर मुरलीधर मोहोळ, सभागृहनेता गणेश बीडकर, विरोधी पक्षनेत्या दीपाली धुमाळ, उपमहापौर सरस्वती शेंडगे, काँग्रेस गटनेता आबा बागुल, अतिरिक्त आयुक्त रुबल अगरवाल, डॉ. कुणाल खेमनार या वेळी उपस्थित होते. अंदाजपत्रकाचे सादरीकरण आयुक्त विक्रम कु मार यांनी नगरसेवकांना केले.

> मिळकतकरातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळावे, यासाठी प्रयत्न करण्यात येतील. पीपीपी तत्त्वावर रस्त्यांचे विकसन, मोकळ्या जागांच्या व्यावसायिक वापरातून उत्पन्न मिळणार आहे. अंदाजपत्रक वास्तवदर्शी असून सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.
>
> – विक्रम कुमार, आयुक्त, महापालिका

पायाभूत सुविधा वाढविणे, महत्त्वाचे २० रस्ते पीपीपी तत्त्वावर विकसित रकणे, येरवडा येथे उद्यानाची उभारणी, दहा किलोमीटर लांबीचे सायकल मार्ग, टीपी स्कीम, समाविष्ट गावांसाठी पायाभूत सुविधांचा आराखडा, नदी सुधार योजनेसाठी तरतूद आणि विजेवर धावणाऱ्या गाड्या खरेदीला प्राधान्य अंदाजपत्रकात देण्यात आले आहे.

महापालिकेच्या तिजोरीत जेमतेम ३०० कोटी रुपये आहेत. मात्र ७ हजार ६५० कोटींचे अंदाजपत्रक मांडताना उत्पन्नवाढीच्या ठोस उपाययोजना आयुक्तांनी सुचविलेल्या नाहीत. उत्पन्नाचा भार मिळकतकर आणि बांधकाम परवानगी शुल्कावरच ठेवण्यात आला आहे. मिळकतकरातून जवळपास २ हजार ४०० कोटी रुपये मिळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. समाविष्ट गावांच्या समावेशामुळे मिळकतकरामध्येही वाढ होईल, असा दावा करण्यात आला आहे. वस्तू आणि सेवा कर अनुदानापोटी २ हजार कोटींचे उत्पन्न गृहीत धरले असून बांधकाम परवानगी शुल्कातून १ हजार कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पाणीपट्टीतून ५०० कोटी मिळतील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

समाविष्ट गावांतील सेवा क्षेत्रासाठीच्या राखीव जागा (ॲमेनिटी स्पेस) आणि शहरातील मोकळ्या जागांचा लिलावातून महापालिके ला उत्पन्न मिळाले. मिळकतकराची थकबाकी वसुलीसाठीही प्राधान्य राहणार आहे. मिळकतकरामध्ये ११ टक्के वाढीचा प्रस्ताव असून त्यातून १३० कोटींचे उत्पन्न मिळणार आहे. गावांचा समावेशामुळे मिळकतींची संख्या वाढेल. थकबाकी वसुली, नव्याने मिळकतींची कर आकारणी यामुळे मिळकत करातून २ हजार ३५६ कोटी रुपये प्राप्त होतील, असे आयुक्त विक्रम कुमार यांनी सांगितले. नव्या योजना अंदाजपत्रकात मांडण्यात आल्या नसून जुन्या योजना-प्रकल्प पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे. करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य सेवा आणि सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार असल्याचा दावा आहे.

## जमा बाजू दाखविण्यासाठी कर्जाचा घाट

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** उत्पन्नात वाढ करण्यासाठी महापालिके ने ३०० कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा निर्णय घेतला आहे. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत या निधीतून कामे करण्यात येणार आहे. कर्ज घेण्याचा महापालिके चा हा निर्णय वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे.

महापालिका आयुक्त विक्रम कु मार यांनी आगामी आर्थिक वर्षासाठीचे अंदाजपत्रक मांडताना त्याबाबतची माहिती दिली.

समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत महापालिके ने यापूर्वी २०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जाची ही प्रक्रिया वादग्रस्त ठरली होती. यंदाही ३०० कोटींचे कर्ज महापालिका घेणार आहे. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत ही कामे करण्यात येतील, असे आयुक्त विक्रम कुमार यांनी सांगितले.

समान पाणीपुरवठा योजनेसाठी कर्ज घेण्यात येणार असले, तरी उत्पन्नाची जमा बाजू दिसावी, यासाठीच कर्ज घेण्यात येणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे. महापालिका आयुक्तांनी उत्पन्नाच्या जमा बाजूमध्ये ३०० कोटींचे कर्ज गृहीत धरले आहे. मिळकत कर, बांधकाम परवानगी शुल्क, वस्तू आणि सेवा कर अनुदान, पाणीपट्टीबरोबरच कर्जही उत्पन्नाच्या बाजूमध्ये धरण्यात आले आहे.

## अंदाजपत्रकाची वैशिष्ट्ये

### पाणीपुरवठा (तरतूद ११३७.२१ कोटी)

- समान पाणीपुरवठा योजना (४०१ कोटी)
- ८२ पैकी ६५ साठवणूक टाक्यांची कामे
- साठवणूक टाक्या कार्यान्वित करणे
- ६०० किलोमीटर लांबीची पाणी वितरण व्यवस्था
- १.५ लाख जलमापक बसविणे

### मलनिस्सारण (६८५.२३ कोटी)

- सांडपाणी शुद्धीकरण केंद्रात पाणी नमुने तपासण्याची सुविधा
- तानाजीवाडी, बोपोडी येथील केंद्रात नवी यंत्रणा
- विठ्ठलवाडी येथे नवीन ब्लोअर युनिट
- कसबा केंद्रातील उपसा पूर्ण क्षमतेने
- भैरोबा, बोपोडी, मुंढवा येथील केंद्रात यांत्रिकी जाळ्या

### घनकचरा व्यवस्थापन (७०३.४५ कोटी)

- उपनगरात निर्माण होणारा त्याच भागात जिरविणे
- भूगांव, बावधन परिसरात रॅम्प आणि १०० मे. टन प्रकल्प
- उरुळी फुरसुंगी येथे १० एकर जागेत शास्त्रोक्त भू-भराव
- बायोएनर्जी अंतर्गत ७५० मे. टन प्रकल्पांचे नियोजन
- उरुळी देवाची येथे २०० मे. टन प्रकल्प

### नगर नियोजन

- फुरसुंगी, देवाची उरुळी येथे टीपी स्कीम
- ११ गावांतील जमीन वापर माहिती संकलन
- हडपसर, खराडी, वडगांव खुर्द येथे आवास योजना
- बाणेर, बालेवाडी, कोंढवा बुद्रुक, धानोरी येथे पीपीपीवर प्रकल्प
- परवडणारी घरे बांधण्याचे नियोजन
- मेट्रो स्थानक परिसरात चार एफएसआय

### सांडपाणी प्रकल्प

- ११ सांडपाणी शुद्धीकरण केंद्रांची उभारणी
- ११३ किलोमीटर लांबीच्या मलवाहिन्यांचे विकसन
- ७० किलोमीटर लांबीच्या सांडपाणी वाहिन्यांचे विकसन
- सांडपाणी वाहिन्या विकसित करण्यासाठी बृहत् कृती आराखडा
- तीन वर्षांत कामे पूर्ण
- समाविष्ट गावांत सांडपाणी वाहिन्यांचे जाळे

### आरोग्य (५७४.०३ कोटी)

- करोना संसर्ग नियंत्रणासाठी पायाभूत सुविधांची उपलब्धता
- आरोग्य सेवा आणि सुविधांचे बळकटीकरण
- भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाला गती
- कत्तलखान्यांचे आधुनिकीकरण
- प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण
- नमुना तपासणी क्षमतेत वाढीसाठी प्रयत्न

### पथ विभाग (९२५.९३ कोटी)

- नव्याने आठ ठिकाणी १० किलोमीटरचे सायकल मार्ग
- लहान मुलांसाठी वाहतूक विषयक प्रकल्प
- पुणे स्ट्रीट प्रोग्रॅम अंतर्गत नव्याने ६ रस्त्यांचे विकसन
- २५ डीपी रस्त्यांसाठी स्वतंत्र तरतूद
- ३० किलोमीटर लांबीचे ५६ रस्ते प्रस्तावित
- क्रेडिट नोटच्या बदल्यात डीपी रस्ते, पुलांचे विकसन

### वाहतूक नियोजन आणि प्रकल्प (६५०.९५ कोटी)

- विश्रांतवाडी येथे उड्डाण पूल
- कल्याणीनगर-कोरेगांव पार्क जोडणारा पूल
- सिंहगड रस्ता परिसरात उड्डाण पूल
- ई-बस खरेदीला प्राधान्य
- नदी पुनर्जीवन प्रकल्प
- खराडी बाह्यवळण चौक येथे उड्डाण पूल, ग्रेडसेपरेटर
- चांदणी चौकातील रस्त्यांचे विकसन
- बोपोडी-सांगवी मुळा नदीवर पुलाची उभारणी
- करिश्मा चौक-कर्वे पुतळा उड्डाण पूल
- रामवाडी परिसरात भुयारी मार्ग
- शिवाजीनगर येथे उड्डाण पूल

### पीएमपी (३७८.६७ कोटी)

- बस ताफा वाढविण्यासाठी पाठपुरावा
- ३५० ई-बस पीपीपी तत्त्वावर
- केंद्राच्या अनुदानातून १५० गाड्या
- पीएमपी सक्षमीकरणासाठी उपाययोजना
- संचलन तूट भरून काढण्यासाठी आर्थिक तरतूद

### उद्यान (१०४.६५ कोटी)

- पु. ल. देशपांडे उद्यानात कलाग्राम विकसित
- राजीव गांधी प्राणिसंग्रहालायात मत्स्यालय
- सारसबाग आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ विकसित
- संवेदना पार्कची उभारणी
- अर्बन-९५ संकल्पनेअंतर्गत खराडीत उद्यान

### भवन रचना (३७७.२५ कोटी)

- कोथरूड येथे बालनाट्यगृह
- यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे विस्तारीकरण
- वारज्यात अद्यायावत प्रसूतिगृह उभारणी
- हडपसरमध्ये बहुउद्देशीय सांस्कृतिक हॉल
- कोथरूडमध्ये शिवसृष्टी प्रकल्प
- बालगंधर्व रंगमंदिराचे पुनर्निर्माण
- घोले रस्ता येथे सिटी लायब्ररी

### पुरातत्त्व विभाग

- लाल महालात शाहिस्तेखानावर हल्ला या प्रसंगावर चित्रफीत
- कोंढवा येथे हेरिटेज पार्क, व्हिलेज
- भिडेवाडा दुरुस्ती आणि स्मारक
- टुरिझमसाठी पायाभूत सुविधा
- आर्ट गॅलरीची उभारणी
- पर्यटनाला चालना

### विद्युत (१३४.०६ कोटी)

- ३० हजार एलईडी दिवे बसविणे
- पथ दिवे सक्षम आणि अद्यायावत करण्यासाठी तरतूद
- समाविष्ट गावांत प्रकाश व्यवस्थेला प्राधान्य
- महत्त्वाच्या रस्त्यांवर आधुनिक प्रकाश व्यवस्था
- शाळा, दवाखाने, स्मशानभूमीत विद्युत विषयक कामे
- वीज बचतीला प्राधान्य

### शिक्षण

- मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बसपास
- आयटीआय संस्थेचे अद्ययावतीकरण
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी विविध उपक्रम

### अतिक्रमण निर्मूलन

- फेरीवाला क्षेत्र करणे,
- परिमंडळ निहाय गोदामांची बांधणी
- टॅगिंग पद्धतीने जप्त मालाची नोंद
- संगणक प्रणाली विकसित

### भूसंपादन आणि व्यवस्थापन

- चांदणी चौक उड्डाण पूल भूसंपादन
- जायका प्रकल्पाला अंतर्गत जागा संपादन
- पर्वती-तळजाई टेकडी प्रकल्पासाठी जागा
- शिवणे-खराडी नदीपात्रातील रस्ता भूसंपादन

SBI भारतीय स्टेट बँक, आर ए सी पी सी १

शुद्धीपत्रक

भारतीय स्टेट बँक (आर ए सी पी सी १) यांनी दिनांक २९ जानेवारी २०२१ रोजी कर्जदार श्रीमती जयश्री नागपूरकर यांची वाहन विक्रीची (वाहन : जॅग्वॉर लँड रोव्हर) नोटीस दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिद्ध केली होती. सदर नोटीसीमध्ये नजर चुकीने **बयाणा** रक्कम रु. ११,२४,०००/– अशी छापली गेली आहे. त्या ऐवजी सुधारित **रक्कम रु. ९,५४,९४३/–** अशी वाचावी. तसेच कर्जदार श्री. राजेंद्र कृष्णा शर्मा यांच्या वाहनाचे वर्णन पुढील प्रमाणे वाचावे. **मॉडेल:** Jaguar land rover F- Pace 2.01. prestige **नोंदणी क्र.:** एमएच/१२/क्यु जी/३१३१ इंधन : डिझेल

अधिकृत अधिकारी

## ‘स्वरभास्करा’च्या जन्मशताब्दीनिमित्त ‘कानन दरस करो’

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त संवाद पुणे आणि समर्थ युवा फाउंडेशनतर्फे बुधवारी (३ फेब्रुवारी) ‘कानन दरस करो’ या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

बालगंधर्व रंगमंदिर येथे सायंकाळी साडेपाच वाजता होणाऱ्या कार्यक्रमात पंडितजींचे पुत्र आणि शिष्य श्रीनिवास जोशी तसेच नातू विराज जोशी विविध बंदिशींच्या सादरीकरणातून पंडिजींच्या सांगीतिक तसेच व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणार आहेत. त्यांना गंगाधर शिंदे संवादिनीची आणि पांडुरंग पवार तबल्याची साथ करतील. श्रीनिवास जोशी हे स्वतः रचलेल्या बंदिशी सादर करतील तर विराज जोशी गायनातून पंडितजींना नमन करणार आहेत. पं. भीमसेन जोशी यांना ४० वर्षे टाळ या वाद्याची साथ करणारे माउली टाकळकर आणि तबल्याची साथ करणारे नाना मुळ्ये यांचा विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते गौरव करण्यात येईल. किराणा घराण्याच्या गायिका मीना फातर्पेकर, सानिया पाटणकर आणि पं. उपेंद्र भट या वेळी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती संवादचे अध्यक्ष सुनील महाजन आणि समर्थ युवा फाउंडेशनचे अध्यक्ष राजेश पांडे यांनी दिली.

## डॉ. जयंत नारळीकर यांचा सत्कार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** नाशिक येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. जयंत नारळीकर यांचा महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे शुक्रवारी सत्कार करण्यात आला.

आयुका येथे झालेल्या कार्यक्रमात परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते डॉ. नारळीकर यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ गणितज्ञ डॉ. मंगला नारळीकर, परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोशाध्यक्ष सुनीताराजे पवार या वेळी उपस्थित होत्या.



महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष डॉ. जयंत नारळीकर यांचा डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते शुक्रवारी सत्कार करण्यात आला. सुनीताराजे पवार, प्रा. मिलिंद जोशी आणि प्रकाश पायगुडे या वेळी उपस्थित होते.

डॉ. नारळीकर म्हणाले, संशोधनात रमणारा आणि साहित्यक्षेत्राच्या बाहेरचा असूनही माझी संमेलनाध्यक्षपदी झालेली निवड हाच माझ्यासाठी आश्चर्याचा धक्का होता. युवकांच्या मनात विज्ञानाविषयीची ओढ निर्माण करण्यासाठी मी प्रयत्न करेन.

कसबे म्हणाले, संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. जयंत नारळीकर यांची झालेली निवड ही मराठी साहित्य विश्वाला आनंद देणारी घटना आहे. त्यांच्या निवडीमुळे समाजाच्या वैज्ञानिक जाणिवा प्रगल्भ होतील आणि विज्ञानाच्या अधिष्ठानावर उभी राहिलेली लोकशाही समृद्ध होईल.

महाराष्ट्र साहित्य परिषदेने डॉ. जयंत नारळीकर यांचे नाव अग्रक्रमाने सुचविले आणि महामंडळाने त्यास मान्यता दिली, याचा परिषदेचा अध्यक्ष या नात्याने मला विशेष आनंद आहे.

**दि महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई**
**(दि विदर्भ को–ऑपरेटिव्ह बँक लि., सम्मिलित)**
**शेड्युल्ड बँक**

मुख्य कचेरी :– सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृती भवन, ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२, फोन.नं.९१-०२२-२२८००७४७/२२८७६०१५ ते २० वेबसाइट: https://mscbank.com

**चल व अचल मालमत्ता विक्रीसाठी/भाडयाने देण्याबाबतची निविदा सुचना**

दि महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई **“सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल ॲसेटस ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२”** नुसार ०१ सहकारी सूत गिरणी व ०४ सहकारी साखर कारखाने व ०१ प्रक्रिया संस्था या कर्जदार संस्थांच्या मालमत्तेची विक्रीसाठी व १ साखर कारखाना व १ सूत गिरणी या कर्जदार संस्थांची मालमत्ता भाडयाने देणेसाठी मोहोरबंद निविदा मागवित आहोत.

**विक्री करावयाच्या संस्था**
क्र.१) जय किसान सहकारी साखर कारखाना लि., बोदेगांव, तालुका– दारव्हा, जिल्हा– यवतमाळ
क्र.२) पांझराकान सहकारी साखर कारखाना लि., भाडणे, तालुका–साक्री, जिल्हा–धुळे
क्र.३) स.म.स्व. बापूरावजी देशमुख सहकारी साखर कारखाना लि., वेळा, ता–हिंगणघाट, जिल्हा–वर्धा
क्र.४) जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, ता–सिंदखेडराजा, जिल्हा–बुलढाणा
क्र.५) अकोट तालुका सहकारी सूत गिरणी लि., जोगबन, ता–अकोट, जिल्हा–अकोला
क्र.६) तालुका शेतकरी दालमिल प्रक्रिया संस्था लि., मलकापूर, ता–उदगिर, जिल्हा–लातूर

**भाडयाने द्यावयाच्या संस्था**
क्र.७) जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, ता–सिंदखेडराजा, जिल्हा–बुलढाणा
क्र.८) स.म.दत्ताजीराव कदम सहकारी सूत गिरणी लि., कौलगे, ता–गडहिंग्लज, जिल्हा–कोल्हापूर

**मोहोरबंद निविदेवर ठळक अक्षरात “भाडेतत्वावर” किंवा “विक्री” साठी असे उल्लेखीत करावी.**

निविदेतील सविस्तर अटी / शर्ती तसेच माहिती दि.०१.०२.२०२१ पासून बँकेच्या **Website: https://mscbank.com** वर उपलब्ध राहातील. निविदा प्रक्रियेच्या तारखा खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म विक्री | ०१.०२.२०२१ ते १५.०२.२०२१ |
| २ | मालमत्ता पाहणी कार्यक्रम | ०८.०२.२०२१ ते १०.०२.२०२१ |
| ३ | निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | १५.०२.२०२१ (सायं.५.०० पर्यंत) |
| ४ | निविदा उघडण्याची तारीख | १६.०२.२०२१<br>क्र.१ सकाळी ११.०० वाजता<br>क्र.२ दुपारी १२.०० वाजता<br>क्र.३ दुपारी ०१.०० वाजता<br>क्र.५ दुपारी ०२.३० वाजता<br>क्र.६ दुपारी ०३.३० वाजता<br>क्र.८ दुपारी ०४.०० वाजता<br>क्र.४ व क्र.७ दुपारी ०४.३० वाजता |

सही/–
**(डॉ. अजित देशमुख)**
व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी
दि महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

दिनांक : ३०.०१.२०२१
स्थळ : मुंबई

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई निविदा मुदतवाढ सुचना**

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग पुणे अंतर्गत अनुभवी कंत्राटदारांकडुन महावितरणचे विविध कार्यालय येथे कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून निविदा क्र. T-48/2020-21 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेस अल्प प्रतिसादामुळे दि. 05/02/2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर निविदा सुचना व निविदा प्रपत्र महावितरणच्या संकेतस्थळावर **(https://etender.mahadiscom.in/eatApp)** उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. 05/02/2021 रोजी 14.00 वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था) विभाग पुणे भ्रमणध्वनी क्र. 7767000548 वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

**कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, पुणे**

PRO No. PZ/179/2020

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित**
**(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)**
म.रा.र.वि.म.
के. सी. मार्ग, वांद्रे रेक्लेमेशन बस डेपोजवळ, वांद्रे (प), मुंबई – ४०० ०५०
**दूरध्वनी क्र.:**०२२–२६५१ ७९४८; **फॅक्स:** ०२२–२६४१ ७८९३; संकेतस्थळ: www.msrdc.org
**ई–निविदा पोर्टल:** https://mahatenders.gov.in

**ई–निविदा मागविण्याबाबत जाहीर सुचना**

**जालना ते नांदेड द्रुतगती जोडरस्त्याद्वारे हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गास जोडण्यासाठी संयुक्त मोजणी करणे तसेच भूसंपादनाद्वारे जमीन प्राप्त करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत**

उपरोक्त कामासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या. मार्फत इच्छुक निविदाकारांकडून ई–निविदा प्रणालीद्वारे साक्षांकित निविदा मागविण्यात येत आहे.

१. निविदा संच https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.३०.०१.२०२१ रोजी दुपारी ११.०० वाजेपासून दि.०१.०३.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत पाहण्यासाठी/ डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहील.
२. निविदा पूर्व बैठक दि.१२.०२.२०२१ रोजी ३.०० वाजता होईल.
३. इच्छुक निविदाकांरानी निविदा संचाची रक्कम रु.२०,०००/– व बयाना रक्कम (EMD) रु.२,५०,०००/– https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या, “SBI Payment Gateway” द्वारे अदा करावयाची आहे.
४. निविदा सादर करण्याचा अंतिम दि.०१.०३.२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यत राहील.
५. कोणत्याही कारणाने, कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार म.रा.र.वि.म., मर्या महामंडळाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

## उत्पन्न वाढवण्यासाठी ‘क्रिएटिव्ह आयडिया’ सादर करा

### विद्यापीठाच्या अर्थसंकल्प समितीची विभागप्रमुखांकडे मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोना काळात शैक्षणिक चक्र बिघडल्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आर्थिक उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. विद्यापीठाच्या बँकांमधील ठेवीही घटल्या असून, विद्यापीठाचे उत्पन्न वाढवण्यासाठी शैक्षणिक विभागांच्या प्रमुखांकडे ‘क्रिएटिव्ह आयडिया’ मागण्याची वेळ विद्यापीठाच्या अर्थसंकल्प समितीवर आली आहे.

विद्यापीठाचा २०२१-२२चा अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र गेल्या वर्षभरात करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठाच्या उत्पन्नावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. दरवर्षीप्रमाणे जमा न झालेले परीक्षा शुल्क, लांबलेली प्रवेश प्रक्रिया, अभ्यासक्रमांच्या रिक्त जागा, परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येत झालेली घट अशा काही महत्त्वपूर्ण कारणांमुळे विद्यापीठाची आर्थिक कोंडी झाली आहे. व्याजदर कमी झाल्याने व्याजाच्या रूपात मिळणारी रक्कम, बँकांमधील ठेवींची रक्कमही कमी झाली आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या अर्थसंकल्प समितीने विभागप्रमुखांना ई-मेल पाठवून उत्पन्न वाढवण्यासाठी क्रिएटिव्ह आयडिया देण्याची मागणी केली आहे.

‘महासाथीमुळे विद्यापीठाला अभूतपूर्व अशी निधीची कमतरता जाणवत आहे. मात्र विद्यापीठाने कंत्राटी कामगार, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती देण्यात कोणतीही तडजोड, विलंब केलेला नाही. तसेच परीक्षा आणि प्रवेशातील विलंबामुळे विद्यापीठाला गेल्यावर्षीच्या तरतुदीप्रमाणे शुल्क रूपातील निधी मिळालेला नाही. त्यामुळे खर्चात मोठ्या प्रमाणात कपात करावी लागणार आहे. त्यामुळे आपल्या विभागाचा किमान एका वर्षासाठी खर्च कमी करून उत्पन्न वाढवण्यासाठी आपण क्रिएटिव्ह आयडियाज द्याव्यात अशी विनंती करण्यात येत आहे,’ असे अर्थसंकल्प समितीने शैक्षणिक विभागांच्या प्रमुखांना पाठवलेल्या ई-मेलमध्ये नमूद करण्यात आले आहे. तसेच उत्पन्न वाढवण्यासाठी विभागप्रमुखांसह बैठका घेण्यात येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### ठेवींमध्ये मोठी घट

विद्यापीठाच्या विविध बँकांमध्ये ठेवीच्या रूपात ६५० कोटींची गुंतवणूक करण्यात आली होती. त्यातच करोनाच्या प्रादुर्भावामुळे शैक्षणिक चक्रावर परिणाम होऊन आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या ठेवींची रक्कम ३५० कोटींपर्यंत कमी झाल्या आहेत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतही कमी झालेल्या उत्पन्नाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली.

### विद्यापीठ निधीची उधळपट्टी थांबणार का?

काही उपक्रम, प्राध्यापक-कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या, बांधकामे विद्यापीठाच्या निधीतून केली जातात. मात्र गेल्या काही वर्षांत सातत्याने बँकांतील ठेवी मोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यापीठासमोर निर्माण झालेले आर्थिक संकट पाहता आता तरी विद्यापीठ निधीची उधळपट्टी थांबणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

SBI

## भारतीय स्टेट बँक, स्ट्रेस्ड ॲसेट रिकव्हरी शाखा, (सार्ब) पुणे

**शाखा पत्ता :** वर्धमान बिल्डींग, २रा मजला, ३२१/ए/३, महात्मा फुले पेठ, सेवन लव्हज चौक, शंकरशेठ रोड, पुणे– ४११०४२.
**शाखा फोन :** ०२०–२६४४६०४४. **शाखा मेल :** sbi.10151@sbi.co.in
**अधिकृत अधिकारी:** जगदीश नाकाडे, **मेल :** jagdish.m.nakade@sbi.co.in, मोबाईल नं. ९१६८८८३११०, शाखा फोन : ०२०–२६४४६०४४.

### (ई–लिलाव विक्री नोटीस)

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये बँकेस तारण दिलेल्या अचल मालमत्तेची विक्री
खाली सही करणार अधिकृत अधिकारी भारतीय स्टेट बँक यांनी सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४)अन्वये खाली दर्शविलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.
तमाम जनतेस कळविण्यात येते की सरफेसी कायदा २००२ अन्वये खाली दर्शविलेल्या तारण मालमत्तेचा ''जेथे आहे तेथे'' ''जसे आहे जे आहे'' आणि ''जसे आहे तसे'' या तत्वावर लिलाव (इ ऑक्शन) करण्याचे ठरविले आहे.

| कर्जदारांची नावे | जामिनदारांची नांवे | येणे रक्कम ज्याकरिता मालमत्ता विक्रीस काढली आहे |
|---|---|---|
| श्री. संतोष बबन दर्शिले | सौ. दिपाली संतोष दर्शिले | दि. ०७.०१.२०१९ रोजी रु. १४,५७,०४८.३७ (रु. चौदा लाख सत्तावन्न हजार अठ्ठेचाळीस आणि पैसे सदोतीस फक्त) अधिक पुढील व्याज, खर्च, शुल्क इ. |

| मालमत्ता धारकांची नावे | मालमत्तेचा तपशिल | ई–लिलावाची तारीख / वेळ | राखीव किंमत (रु.) | सहभागी होण्याचे विनंतीपत्र/केवायसी कागदपत्रे/बयाणा रकमेचा पुरावा इ. सादर करण्याची अंतिम वेळ व तारीख |
|---|---|---|---|---|
| श्री. संतोष बबन दर्शिले (कर्जदार) आणि सौ. दिपाली संतोष दर्शिले (जामिनदार) | उपनोंदणी जिल्हा हवेली, आणि जिल्हा पुणे ४११०२८ येथील सर्व्हे नं. ४ए/४बी+५ए, सीटीएस नं. १११५, गाडीतळ, हडपसर, आदित्य नगर को. ऑप. हौसिंग सोसा. लि., बी विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २२. कार्पेट क्षेत्र ६९२.९४ चौ. फूट. **(प्रतिकात्मक ताबा)** | दिनांक : १६.०२.२०२१ वेळ : स.११.०० ते स.११.०० ते १.०० वा. प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित वाढीव वेळेसह | रु. ३५.१० लाख सदर रक्कमेखाली मालमत्ता विकली जाणार नाही. | बयाणा रक्कम रु. ३.५१ लाख दि.१२.०२.२०२१ रोजी सायं. ५ पुर्वी<br>पहाणीची तारीख व वेळ : दि. ११.०२.२०२१ रोजी दु. ११.३० ते दु. १.३० वा. संपर्क क्र. ७५०६२५९८३३<br>बोली वाढ रक्कम रु. ०.२५ लाख |

ई लिलावाच्या संक्षिप्त अटी व शर्ती. सदर विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम २००२ मधील तरतुदी व अटी व शर्तीच्या अधीन केली जाईल.
१) ई लिलाव, **'' जसे आहे तसे, जे काही आहे ते व जे जे तिथे आहे ते''** या तत्वावर ऑन लाईन पध्दतीने केला जाईल. २) लिलाव आयबीएपीआय च्या **https://ibapi.in** या पोर्टलवरुन केला जाईल. ई लिलाव निविदा कागदपत्रे, ज्यात ऑन लाईन ई लिलावाचा बोली नमुना, डिक्लरेशन, सर्वसाधारण अटी व शर्ती इ. आहेत हे **https://ibapi.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ३) इच्छुक बोलीदारांनी ई लिलावात भाग घेण्यासाठी आमचे सेवा पुरवठादार एमएसटीसी लिमिटेड यांच्याशी **www.mstcecommerce.com** या संकेतस्थळावर संपर्क करावा. इच्छुक खरेदीदार/बोलीदार यांना **https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp** या लिलाव पोर्टलवर आपली नोंदणी करणे आवश्यक आहे. ४) नोंदणी प्रक्रियेला साधारणपणे किमान तीन कार्यालयीन दिवस लागत असल्याने इच्छुक बोलीदारांनी आपली नोंदणी वेळेपूर्वीच करावी. ५) बँकेच्या **https://ibapi.in** या पोर्टलवरील ग्लोबल ईएमडी वॅलेटमधे बयाणा रक्कम जमा करावयाची आहे. बोलीदाराने त्याने भरलेली बयाणा रक्कम त्याच्या खात्यातून एमएसटीसी च्या खाती एनईएफटी अथवा आरटीजीएस द्वारी वर्ग झाली आहे किंवा नाही याची खातरजमा करावयाची आहे. यंत्रणेत बोलीदाराने बयाणा रक्कम भरली असून ती वॅलेटमध्ये दिसत असेल तरच त्याला लिलावात भाग घेण्यास परवानगी मिळेल. तशी दिसत नसेल तर त्याला लिलावात भाग घेता येणार नाही. ६) मिळकतीची अधिक माहिती व फोटोग्राफसाठी व पोर्टल संबंधातील अधिक माहितीसाठी कृपया **https://ibapi.in** या संकेत स्थळाला भेट द्यावी किंवा बँकेच्या हेल्प लाईन क्र. 1800 10 25026 किंवा 011-41106131 यावर संपर्क करावा. ७) जर लिलाव यशस्वी झाला नाही तर बोलीदाराने आपल्या एमएसटीसी कडे असलेल्या खात्यामार्फत भरलेली बयाणा रक्कम परत मागण्याची विनंती सादर करावयाची आहे. अशा विनंतीनंतर बयाणा रक्कम बोलीदाराच्या खात्यावर जमा केली जाईल. अधिक माहितीसाठी कृपया बँकेचे अधिकृत अधिकारी यांचेशी संपर्क करावा.

दिनांक : ३०.०१.२०२१
स्थळ : पुणे
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
सही/–
अधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक

---

SBI

**भारतीय स्टेट बँक, रिटेल ॲसेट सेंट्रल प्रोसेसिंग सेंटर– ४,** पहिला आणि दुसरा मजला, लालवाणी आयकॉन, सर्व्हे नं. ३२३/१+२, प्लॉट नं. ९३+९४, साकोरे नगर सोसा. विमान नगर, एअरपोर्ट रोड, पुणे– ४११०१४.

### वाहन विक्री सूचना

खालील नमुद केलेली वाहने जे **भारतीय स्टेट बँकेकडे** नजरगहाण आहे ते **'जसे आहे तसे व जेथे आहे तेथे'** या तत्त्वावर विकणे आहे.

| अ. क्र. | १) कर्जदाराचे नाव २) पत्ता, ३) कर्ज खाते क्र.,४) येणे असलेली रक्कम,५) जप्तीच्या नोटीसची तारीख | वाहनांचा तपशील, राखीव किंमत आणि बयाणा रक्कम |
|---|---|---|
| १. | i) **श्री. प्रदिपकुमार नायर**<br>ii) **पत्ता :** ५४३, क्लोव्हर ॲक्रोपोलीस, विमाननगर, एस बी आय बँकेमागे, गिगा स्पेस आय टी पार्क, पुणे ४११०१४.<br>iii) **कर्ज खाते क्रमांक –३६८१५१३७६३७**<br>iv) **येणे असलेली रक्कम– रु. ९,५४,४३१/– अधिक व्याज व प्रासंगिक शुल्क इ.**<br>v) **नोटीस दिनांक ०१.०१.२०२०** | **मॉडेल क्र. :** Verna FL 1.6 CRDI SX<br>**नोंदणी क्र. :** एम एच /12 /पीएच /3792<br>**इंधन :** डिझेल<br>**राखीव किंमत :** रु. ५,९५,२००/– + ६.५% जीएसटी<br>**बयाणा रक्कम :** रु. ५९,५२०/–<br>**रंग :** पांढरा |

**वरील वाहन पाहण्याची तारीख : ०३.०२.२०२१ सकाळी ११.०० ते दुपारी ०४.००**

**वरील वाहनाची लिलावाची तारीख : ०५.०२.२०२१ रोजी दुपारी १२:०० वा.**

संबंधित वाहनांसाठी वर उल्लेख केल्याप्रमाणे बयाणा रकमेसह खरेदी प्रस्ताव मागविले जात आहेत. प्रस्तावासोबतची बयाणारक्कम पुणे येथे देय असलेल्या व **भारतीय स्टेट बँके**चे नावे काढलेल्या डिमांड ड्राफ्ट किंवा पे ऑर्डरद्वारा भरावयाची असून त्यासह प्रस्ताव वंद लिफाफ्यातून त्यावर **'वाहन खरेदीसाठी प्रस्ताव'** असे लिहून वरील पत्त्यावर **दिनांक ०४.०२.२०२१ रोजी संध्याकाळी ०५.००** वाजेपर्यंत सादर करावयाचे आहेत.

**अटी व शर्ती**

१. प्रस्तावात जी वाहने खरेदी करण्यासाठी आहे त्या वाहनांचा नोंदणी क्रमांक लिहूनच सादर केले पाहिजे. प्रस्ताव मान्य झाल्यापासून सात दिवसांचे आत खरेदीदाराने पूर्ण पैसे भरले नाहीत तर प्रस्तावासोबत भरलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.
२. कृपया नोंद घ्यावी की खरेदीदाराने आपल्या खर्चाने सदर वाहने एक महिन्याचे आत आपले नावे करुन घ्यावयाचे आहे.
३. वाहने ताब्यात घेतल्यापासून ते त्याने त्याचे नावावर करण्याच्या काळापर्यंतची सर्व जबाबदारी वाहन विकत घेणाराने घ्यावयाची असून त्यासाठी रु.१००/– किमतीच्या स्टॅंप पेपरवर इंडेम्निटी बाँड द्यावयाचा आहे.
४. वाहन विक्रेते/दलाल या लिलाव प्रक्रियेत सहभागी होवू शकतात. अर्थात यशस्वी ठरल्यास वाहन त्यांचे नावावर नोंदवावे लागेल.
५. ही नोटीस कर्जदारासाठीही असून त्यांनी **दि. ०४.०२.२०२१ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत** संपूर्ण रक्कम भरुन कर्ज खाते बंद करावे.
**६. कोणतेही कारण न देता कोणताही अथवा सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार बँकेकडे राखीव आहे.**
**७. वाहने पाहण्यासाठी संपर्क क्र. श्री. कुंतुरकर ७७३८३६२७११ श्री. राहुल मोहिते ९३७२५१३२४५.**

ठिकाण : पुणे
दिनांक : ३०.०१.२०२१
(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)
सही/–
अधिकृत अधिकारी
भारतीय स्टेट बँक, आरएसीपीसी IV

---

## Cummins India Limited

Registered Office : Cummins India Office Campus, Tower A, 5th Floor, Survey No. 21, Balewadi, Pune 411 045, Maharashtra, India
Telephone : (020) 67067000 Fax : (020) 67067015. E-mail : cil.investors@cummins.com. Website: www.cumminsindia.com
(CIN: L29112PN1962PLC012276)

### Unaudited standalone and consolidated financial results for the quarter and nine months ended December 31, 2020

(₹ Lacs)

| Sr.No. | Particulars | Standalone | | | | | | Consolidated | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended | | | Nine months ended | | Year ended | Quarter ended | | | Nine months ended | | Year ended |
| | | December 31, 2020 | September 30, 2020 | December 31, 2019 | December 31, 2020 | December 31, 2019 | March 31, 2020 | December 31, 2020 | September 30, 2020 | December 31, 2019 | December 31, 2020 | December 31, 2019 | March 31, 2020 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) | (Audited) |
| 1 | Revenue from operations | 1,42,434 | 1,16,019 | 1,45,344 | 3,08,273 | 4,10,489 | 5,15,773 | 1,43,102 | 1,16,999 | 1,45,635 | 3,10,383 | 4,12,899 | 5,19,145 |
| 2 | Profit before exceptional items and tax | 30,361 | 18,868 | 25,383 | 56,274 | 65,809 | 77,891 | 26,549 | 18,953 | 24,453 | 51,844 | 60,693 | 70,507 |
| 3 | Profit before tax | 30,361 | 18,868 | 23,778 | 56,274 | 64,204 | 75,906 | 30,972 | 21,599 | 25,805 | 59,677 | 68,415 | 80,748 |
| 4 | Profit after tax | 23,407 | 14,555 | 18,624 | 43,218 | 51,103 | 62,934 | 24,029 | 17,316 | 19,988 | 46,647 | 53,537 | 70,561 |
| 5 | Total comprehensive income for the period [Comprising profit for the period (after tax) and other comprehensive income (after tax)] | 23,130 | 14,987 | 18,330 | 42,896 | 50,203 | 61,177 | 23,711 | 17,722 | 19,675 | 46,232 | 52,578 | 68,737 |
| 6 | Equity share capital (Face value ₹ 2 each) | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 | 5,544 |
| 7 | Other equity (as per Audited Balance Sheet) | | | | | | 4,11,952 | | | | | | 4,34,660 |
| 8 | Basic and diluted EPS (Not annualized) (₹) | 8.44 | 5.25 | 6.72 | 15.59 | 18.44 | 22.70 | 8.67 | 6.25 | 7.21 | 16.83 | 19.31 | 25.45 |

**Notes:**

1. The above is an extract of the detailed financial results filed with the stock exchanges under regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full financial results are available on the stock exchange websites (URL-www.nseindia.com and www.bseindia.com) and also on above mentioned website of the Company.
2. This statement has been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on January 28, 2021.

For Cummins India Limited
**Ashwath Ram**
Managing Director
DIN: 00149501

Place: Pune
Date: January 28, 2021

**Making people's lives better by powering a more prosperous world**

---

**RAJKUMAR FORGE LIMITED**
(CIN: L28910PN1990PLC056985)
Regd. Office: Office No. 511 to 513, Global Square, S. No. 247, 14B, Yerawada, Pune - 411 006
Tel: 8956616160
| E-mail: secretarial@rkforge.in
|Website: www.rkforge.in

**NOTICE**

**NOTICE** is hereby given that pursuant to Regulation 29 read with Regulation 47 and other applicable Regulations of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, a meeting of the Board of Directors of the Company will be held on **Saturday, February 06,** 2021, inter-alia, to consider and approve the Unaudited Financial Results of the Company for the quarter and nine months ended December 31, 2020.
Further details are available at the website of the Company at **www.rkforge.in** and also at the website of BSE Limited at **www.bseindia.com**

For **Rajkumar Forge Limited**
SD/-
Place : Pune **Satish Kadrolli**
Date : 29.01.2021 (ACS:43677)
Company Secretary & Compliance Officer

---

## कमिन्स इंडिया लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: कमिन्स इंडिया ऑफिस कॅम्पस, टॉवर ए, ५वा मजला, सर्वे नं. २१, बालेवाडी, पुणे ४११ ०४५ (इंडिया)
(सी.आय.एन.: L29112PN1962PLC012276)
दूरध्वनी क्र. : (०२०) ६७०६७०००
फॅक्स : (०२०) ६७०६७०१५
वेबसाईट : www.cumminsindia.com
ई–मेल: cil.investors@cummins.com

### अंतरिम लाभांशसाठी नोंद तारखेची सूचना

सूचना देण्यात येती कि कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या जानेवारी २८, २०२१ रोजी झालेल्या सभेत आर्थिक वर्ष २०२०–२१ साठी रुपये २/– दर्शनी मूल्य च्या समभाग वर रुपये ७/– प्रति भाग म्हणजेच ३५०% अंतरिम लाभांश जाहीर केला आहे. तरी अंतरिम लाभांश मिळण्यासाठी पात्र भागधारक निश्चित करण्यासाठी कंपनीने फेब्रुवारी १०, २०२१ (बुधवार) ही रेकॉर्ड डेट ठरविली आहे.

ज्या सभासदांकडे समभाग डिमॅट स्वरुपात आहेत, त्यांनी आपले ई–मेल पत्ते आणि मोबाइल नंबर डिपॉझिटरी सहभागी, जे त्यांचे डिमॅट खाती सांभाळतात, कडे रजिस्टर किंवा अद्द्यावत केलेले नाहित, त्यांनी ते करुन घ्यावे, ज्या सभासदांकडे समभाग भौतिक स्वरुपात आहेत त्यांनी आपले ई–मेल पत्ते आणि मोबाइल नंबर कंपनी कडे रजिस्टर किंवा अद्द्यावत केलेले नाहित, त्यांनी ते करण्यासाठी कृपया https://linkintime.co.in/emailreg/email_register.html या संकेतस्थळावर जाऊन रजिस्टर करावे किंवा कंपनीला cil.investors@cummins.com या किंवा लिंक ईनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना rnt.helpdesk@linkintime.co.in या आयडी वर फोलीओ नंबर व पॅन कार्डाच्या स्वत:च्या साक्षांकीत प्रत सहित लिहावे.

सभासदांनी याची नोंद घ्यावी की वीत्त कायदा, २०२० नुसार एप्रिल ०१, २०२० पासुन लाभांशद्वारे मिळनारे उत्पन्न हे करप्राप्त असेल आणि कंपनीला, विहित दराने भादीदारांना प्रदान करण्यात येणाऱ्या लाभांशांमधुन टॅक्स एट सोर्स कापणे, आवश्यक आहे. निवासी सभासदांसाठी आयकर कायदा, १९६१ च्या सेक्शन १९४ नुसार खालील दरा प्रमाणे अगाउ कर कपात केली जाईल.

| | |
|---|---|
| वैध पॅन असलेले सभासद | ७.५% किंवा भारत सरकारद्वारे सूचित केलेल्या दरा प्रमाणे |
| पॅन नसलेले / वैध पॅन नसलेले सभासद | २०% किंवा भारत सरकारद्वारे सूचित केलेल्या दरा प्रमाणे |

वैध पॅन असलेले निवासी सभासद ज्यांचा एकूण लाभांश वित्तीय वर्ष २०२०–२१ साठी रु ५,००० पेक्षा जास्त नसेल तर ते आयकर पात्र नसतील आणि जे सभासद अगाऊ कर कपात न करण्याचा फायदा घेऊ पाहतात त्यांनी https://linkintime.co.in/formsreg/submission-of-form-15g-15h.html या लिंक वर फॉर्म नं.१५जी/१५एच मध्ये वार्षिक घोषणा करावी.

अनिवासी सभासद, भारत आणि ते वास्तव्यात असलेल्या देशासोबत असलेल्या कर करारा नुसार फायदेशीर दर मिळवू शकतात. अश्या सभासदांनी https://linkintime.co.in/formsreg/submission-of-form-15g-15h.html या लिंक वर कायम स्वरुपी वास्तव्य नाही प्रतिज्ञापत्र, फायदेशीर मालकी प्रतिज्ञा पत्र, कर रेसिडन्सी प्रमाण पत्र, फॉर्म १० एफ, आणि कर करारा नुसार फायदेशीर दर मिळवण्यासाठी लागणारी इतर कागदपत्रे अपलोड करावी.

टॅक्स एट सोर्स आणि त्या संबंधित फॉर्म्स जमा करणे बाबत ची सूचना भागधारकांना त्यांच्या नोंदणीकृत ई–मेल वर जानेवारी २७, २०२१ रोजी पाठवण्यात आलेली आहे. सूचनेची प्रत कंपनी च्या संकेतस्थ्ळावर तसेच एन एस ई च्या संकेतस्थळावर (www.nseindia.com) आणि बी एस ई लिमिटेड च्या संकेतस्थळावर (www.bseindia.com) उपलब्ध आहे.

कमिन्स इंडिया लिमिटेड करिता
**विनया अ. जोशी**
कंपनी सेक्रेटरी आणि
कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ: पुणे
दिनांक: २९ जानेवारी, २०२१

---

लोकसत्ता Classifieds

### जाहिरातविषयक

**लोकसत्ता** + सर्वच वर्तमानपत्रांत स्कीम + डिस्काऊंट विवाहविषयक, जागाविषयक, श्रद्धांजली, शैक्षणिक, पाहिजेतच्या जाहिराती प्रसिद्धीसाठी 'सर्वोदया ॲडव्हर्टायझिंग' (Professional Management Prompt Service). +91-9321989026.
0070728163-1

### व्यवसाय

### शेअर्स

**Free!** Free! Free Seminar on Share Market, Option Strategy & Currency Market. Kadam Capital- 9834415204 www.kadamgroups.co.in
0090280925-1

जीवनसाथीच्या निवडीसाठी एकमेव मंगल मार्ग
दर रविवारी 'लोकसत्ता'तून
जीवनसाथी

### मालमत्तासंबंधी

**कोकणात** बंगलो प्लॉट विकणे, निसर्गाच्या सान्निध्यात २० बंगलो प्रोजेक्टमध्ये चिपळूण शहरापासून ५ मिनिट अंतरावर, चिपळूण पुणे हायवेलगत. मोबाईल: 9403931362, 9011683328.
0070727567-1

**दापोली जि. रत्नागिरी येथे (समुद्रालगत) विविध जागा विकणे आहे. मो. ९०८२५४७३९०.**
0070729271-1

**फलटण येथे** लक्ष्मीनगर भागात पावणेचार गुंठे जागेतील ४५०० स्क्वेअर फूट बांधकाम असलेली, २० वर्षे जुनी इमारत योग्य किंमत आल्यास विकणे आहे. एजंट क्षमस्व. मालक- ९८६०४०२७९५

**1BHK** Budget Flat for SALE in Dombivli East. Prime location, Walkable distance from Railway station 9320146035
0050174640-1

**टुरिस्ट** पॉईंटला प्रॉपर्टी नियर मुंबई, पुणे, नासिक, कोकण, गोवा, पंचगणी, रिव्हर, डॅम, सीव्ह्यू बंगलो प्लॉट, फार्महाऊससाठी - 8626099963/ 8855921341.
0070728464-1

visit us at
WWW.LOKSATTA.COM

### यात्रासहल

**देशपांडे ट्रॅव्हल्स**
**सिमला-कुलूमनाली डलहौसी-धरमशाला चंदिगड-अमृतसरसह**
13 दिवस, 10 मे, 35,500/-
**चारधामयात्रा-हरिद्वार-ऋषिकेशसह**
31,500/-, 13 दिवस, 17 मे, 27 मे, 7 जून, 17 जून
**काश्मिर श्रीनगर ते श्रीनगर**
16,500/-, 6 दिवस, दर मंगळवारी
**वैष्णोदेवी-काश्मिरसह**
24,500/-, 11 दिवस, 3 टायर एसी
15, 22, 29 एप्रिल, 6, 13, 20, 27 मे
**अष्टविनायक दर्शन-जेजुरी-आळंदीसह**
कॉमन स्टे 2,451/-, हॉटेल स्टे 3,351/-
3 दिवस, शुक्रवारी
**तुळजापूर-पंढरपूर-गाणगापूर-अक्कलकोटसह**
कॉमन स्टे 2,751/-, हॉटेल स्टे 3,351/-
4 दिवस, गुरुवारी
**गणपतीपुळे-पावस-डेरवण-रत्नागिरीसह**
कॉमन स्टे 3,551/-, हॉटेल स्टे 4,751/-
4 दिवस, गुरुवारी
**9820962500**
**9819453043**
**8291046167**
**0251-2212655**
www.deshpandetours.com
0070726008-22-1

**दोस्तीटुर - शास्त्रोक्त नर्मदापरिक्रमा, कुरवपूर - श्रीशैल्यम - पिठापूरम, श्रीदत्त परिक्रमा, चारधामयात्रा, नेपाळ - चितवनसह, सिमला - मनाली, त्रिस्थळी - नैमिष्यआरण्यसह - काशीयात्रा, सिक्कीम - यूमथांग - दार्जिलिंग. 9594880123/ 9702251584.**
0070692291-8

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

*** आसाम- अरुणाचल- 37600/- + Air Fare * आसाम- अरुणाचल- मेघालय- 48400/- + Air Fare * 5 सिस्टर्स- 84600/-. 'हिमसेतू टूर्स'तर्फे जानेवारीपर्यंत 3% Disount. 9920173723/ 7021799043.**
0070695215-7

### भविष्यविषयक

**ॲस्ट्रॉलॉजी:** गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे- सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ७, हस्तरेषा, ज्योतिषशास्त्र- कु. यशश्री सुधाकर जोशी, दररोज सकाळी ९ ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. २८८८९७०६/ ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070723274-1

### नावात बदल

**माझे** जुने नाव अनिलकुमार वासू पिल्ले हे होते, ते बदलून आता नवीन नाव अनिल वासू पिल्ले असे आहे. ॲफिडेव्हीट क्रमांक २०५२१४१९३१ २६८५००७१०६६४, दिनांक २३/१/२०२१
0090281059-2

My Old name Aaravsingh Mohitsingh Bisht changed to New Name Aaravsingh Poonam Adhikari vide Gazette No. P-2049484.
0090281042-3

I Army no.13993010K. Rank.Hav/N.Asst. Pawan Kumar.My Son''s old Name as per service record is Ritik Chaudhary New Name is Rithik Chaudhary adhar number 493572389580.
0090281036-3

I have changed my name from Sadhana Bhutkar to Sunanda Vijaykumar Bhutkar Vide adhar card 789900523034
0090281054-1

I Viminder S /O Vijender Changed My Name to Viminder Dhankar S/O Vijendra Singh Dhankar Vide Affidavit Dated 27.01.2021 Before Notary Shankar D. Marapur Pune .
0070729277-1

I have changed my name Aarya Ashwin Adsul (new name) my old name Aarya as per adhar card 996803490824
0090281039-1

My old name Shivani Hardik Bhandari Changed to new name as Shivani Singh Vide Aadhar Card No. 3674 9837 8504 Dated 29/01/2021
0090281085-1

**My** old name was Mangala Madhukarrao Bhange changed to new name Mangala Madhukar Bhange. aadhar no: 887298301960
0090281037-1

I Army no.13993010K. Rank.Hav/N.Asst. Pawan Kumar. My Son''s old Name as per service record is Yash New Name is Yash Choudhary adhar number 654456374166..
0090281036-4

### हरवले-सापडले

**मी** तुषार वाघोडे, माझ्याकडून माझे मूळ डीड ऑफ अपार्टमेंट (दि. ३०/०६/२००५, इंडेक्स- II ४४४५/२००५) हरवला आहे. कोणालाही सापडल्यास ते परत करण्यासाठी कृपया ९०११०२४८०९ वर कॉल करा. योग्य बक्षीस दिले जाईल.
0090280989-2

### जन्मतारखेत बदल

I Army no.13993010K. Rank.Hav/N.Asst. Pawan Kumar. My wife's old DOB is 24/11/1975 New DOB is 29/11/1975 Affidavit no. 151/2021
0090281036-2

I Army no.13991762P. Rank. Hav/N.Asst.Surjit Das. My wife's old DOB is 03/12/1979 New DOB is 01/04/1979 Affidavit no.152/2021
0090281036-1

### नोकरीविषयक

**(1) Sr. Executive Officer** (F), Diploma in Engg./ B.Sc./ BCA with 3/4 yrs. exp. in Computer work like Qtn./ Estimate etc. Interact with customers. (2) Sr. Finance Officer (F), B.Com. with 4/6 yrs. exp. in Accounting/ Tally etc. Contact: Global Shree Engg. Projects P. Ltd., Kasaradi, Old Mumbai- Pune Road, PCMC. e-Mail: globalshreeppl@gmail.com. Contact: 9922997025/29

### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

लोकसत्ता पुणे, शनिवार, ३० जानेवारी २०२१ WWW.LOKSATTA.COM

**अब्दूर रझाकचा निवड समितीत समावेश**



माजी फिरकीपटू अब्दूर रझाकची बांगलादेशच्या मिन्हाजूल अबेदिनच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय क्रिकेट निवड समितीत नियुक्ती करण्यात आली आहे.

**सकाळी ९.३० वा.**
उपांत्य फेरीतील बॅडमिंटन सामने
जागतिक मालिकेचा अंतिम टप्पा
थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स ३

**सायंकाळी ७.३० वा.**
मुंबई सिटी वि. नॉर्थईस्ट युनायटेड
इंडियन सुपर लीग फुटबॉल
थेट प्रक्षेपण : स्टार स्पोर्ट्स १ हिंदी

# जैव-सुरक्षेमुळे मानसिकतेवर परिणाम!

## भारताचा बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉयचे स्पष्ट मत

**पीटीआय, नवी दिल्ली**

**जैव-सुरक्षित** वातावरणात राहताना विलगीकरणाच्या कठोर नियमांचे पालन करणे अवघड असून यामुळेच थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेदरम्यान माझ्या मानसिकतेवर परिणाम झाला, अशी कबुली भारताचा पुरुष एकेरीतील अनुभवी बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉयने शुक्रवारी दिली.

करोना साथीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वप्रकारच्या स्पर्धांसाठी जैव-सुरक्षित वातावरणात राहणे खेळाडूंना अनिवार्य असून त्यांना विलगीकरणाच्या नियमांचेही काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे. परंतु यामुळे हळूहळू खेळाडूंच्या मानसिकतेवर परिणाम होत असून त्यांची कामगिरीही खालावत चालली आहे, असे मत २८ वर्षीय प्रणॉयने एका ऑनलाइन सवांदादरम्यान व्यक्त केले.

गतवर्षी मार्च महिन्यापासून देशात लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीनंतर जानेवारी महिन्यात प्रणॉय प्रथमच बॅडमिंटनकडे परतणार होता. परंतु थायलंड खुल्या स्पर्धेला प्रारंभ होण्यापूर्वीच करोना चाचण्यांसंबंधी झालेल्या गोंधळामुळे प्रणॉयला स्पर्धेतील प्रवेश नाकारण्यात आला.



‘‘बँकॉकमध्ये दाखल होताच आम्हाला जैव-सुरक्षित वातावरणात नेण्यात आले. आयुष्यात पहिल्यांदाच मी अशा एखाद्या गोष्टीचा सामना करत होतो. १४ दिवसांचा तो काळ फारच कठीण होता. दिवसाच्या २४ तासांपैकी दोनच तास सरावासाठी हॉटेलबाहेर पडण्याची मुभा होती. कालांतराने या दैनंदिनीचा माझ्या मानसिक आरोग्यावर प्रभाव जाणवू लागला,’’ असे प्रणॉय म्हणाला.


‘‘स्पर्धेच्या पहिल्या दिवशी झालेल्या घोळामुळे मी पूर्णपणे अस्वस्थ झालो. मी आणि सायनाने जवळपास संपूर्ण दिवस रुग्णालयातच करोना चाचण्या देण्यात घालवला. त्यानंतर आम्हाला खेळण्याची परवानगी देण्यात आली असली, तरी यामुळे माझ्या तयारीवर परिणाम झाला,’’ असेही प्रणॉयने सांगितले.

‘‘जैव-सुरक्षित वातावरण आता खेळाचा भागच झाल्याने विलगीकरणाच्या दिवसांमध्ये मानसशास्त्रज्ञाची भूमिका मोलाची ठरू शकते. मलाही त्या काळात कोणी तरी मार्गदर्शन करण्यासाठी तसेच संवाद साधण्यासाठी हवे होते. जेणेकरून मी मन स्थिर ठेवून खेळावर लक्ष केंद्रित करू शकलो असतो,’’ असे प्रणॉयने नमूद केले.

## सिंधूचा विजयी निरोप; श्रीकांत पुन्हा पराभूत

**जागतिक मालिकेचा अंतिम टप्पा**

**बँकॉक :** भारताची आघाडीची बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने जागतिक मालिकेच्या अंतिम टप्प्याची विजयानिशी सांगता केली. परंतु पुरुष एकेरीत भारताच्या किदम्बी श्रीकांतला सलग तिसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले. या दोघांचेही स्पर्धेतील आव्हान यापूर्वीच संपुष्टात आले आहे.



पी. व्ही. सिंधू

सिंधूने पोर्नपावी चोचुवाँगला २१-१८, २१-१५ असे नमवले. दुसऱ्या गेममध्ये सिंधू एक वेळ ९-११ अशी पिछाडीवर होती. परंतु अनुभवाच्या बळावर तिने जागतिक क्रमवारीत १३व्या स्थानी असलेल्या पोर्नपावीवर सरशी साधली.

श्रीकांतला हाँगकाँगच्या एनजी लाँग अँगुसने १२-२१, २१-१८, २१-१९ असे तीन गेममध्ये पराभूत केले. हा सामना एक तास आणि पाच मिनिटांपर्यंत रंगला. प्रत्येक गटातून पहिल्या दोघांनाच उपांत्य फेरी गाठण्याची संधी असून सिंधूला तीन सामन्यांत फक्त एकच विजय मिळवता आला, तर श्रीकांतला मात्र त्याच्या गटात अखेरच्या स्थानी समाधान मानावे लागले.

# भारताविरुद्ध गोलंदाजांची भूमिका निर्णायक!

## इंग्लंडचे फलंदाजी प्रशिक्षक थॉर्प यांचे मत

**पीटीआय, चेन्नई**

**भारताकडे एकापेक्षा** एक दर्जेदार फलंदाजांचा भरणा असल्याने आगामी कसोटी मालिकेत आमच्या गोलंदाजांची भूमिका निर्णायक ठरेल, असे मत इंग्लंडचे फलंदाजी प्रशिक्षक ग्रॅहम थॉर्प यांनी व्यक्त केले.



भारत-इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेला ५ फेब्रुवारीपासून चेन्नई येथे प्रारंभ होत असून सध्या इंग्लंडचे खेळाडू विलगीकरणात आहेत. इंग्लंडविरुद्धच्या २०१४तील दौऱ्यावर कोहली सपशेल अपयशी ठरला होता. परंतु २०१६-१७ तसेच २०१८मधील इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत कोहलीनेच भारताकडून सर्वाधिक धावा केल्या. त्यामुळे कोहलीसह सर्व फलंदाजांसाठी आमच्याकडे रणनिती तयार आहे, असे थॉर्प यांनी सांगितले.

**इंग्लंडचा भारत दौरा**

**मेनन, चौधरी, शर्मा पंचांच्या भूमिकेत**

भारत-इंग्लंड यांच्यातील कसोटी मालिकेसाठी नितीन मेनन, अनिल चौधरी आणि विरेंदर शर्मा हे पंचांच्या भूमिकेत दिसतील. जागतिक कसोटी अजिंक्यपद मालिकेत स्वदेशी पंच नसावेत, असे ‘आयसीसी’ने प्रथम जाहीर केले होते. करोनाच्या पार्श्वभूमीवर अन्य देशांतील प्रवांसावर निर्बंध असल्याने भारताचेच पंच या मालिकेत पंचांची भूमिका बजावतील.

# भारतीय महिला हॉकी संघाचा पराभव

**पीटीआय, ब्युनस आयर्स**

**भारतीय महिला** हॉकी संघाला अर्जेंटिना हॉकी दौऱ्यात सलग दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यजमान अर्जेंटिनाने भारतावर २-० अशी सहज सरशी साधत या दौऱ्यातील सलग दुसरा विजय संपादन केला.

> मिळालेल्या संधीचे सोने करता आले नाही तर काय होते, हे आजच्या कामगिरीने भारतीय महिला हॉकीपटूंना शिकता आले. भारतीय संघाने खूप चांगला खेळ केला. त्यामुळेच पहिल्या दोन सत्रांत भारताला प्रतिस्पर्ध्यांच्या गोलक्षेत्रात मजल मारून गोल करण्याच्या अनेक संधी निर्माण करता आल्या.
>
> - शोर्ड मरिन, भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक

**अर्जेंटिनाचा हॉकी दौरा**

भारताने पहिल्या सामन्यात अर्जेंटिनाला कडवी लढत दिली होती, पण हा सामनाही भारताने २-३ असा गमावला होता. शुक्रवारी झालेल्या सामन्यात अर्जेंटिनाकडून सिल्विना डेलिया (दुसऱ्या मिनिटाला) आणि ऑगस्टिना अल्बर्टारियो (५४व्या मिनिटाला) गोल केले. भारताकडून एकालाही गोल करता आला नाही.

अर्जेंटिनाच्या आघाडीच्या फळीने सुरुवातीपासूनच भारतावर दडपण आणण्यास सुरुवात केली. दुसऱ्याच मिनिटाला भारताच्या बचावफळीच्या चुकीमुळे यजमानांना पहिला पेनल्टी कॉर्नर मिळाला. त्यावर अनुभवी अर्जेंटिना संघाने सिल्विनाच्या गोलमुळे खाते खोलले. अर्जेंटिनाने सुरुवातीलाच १-० अशी आघाडी घेतल्यानंतर त्यांनी आक्रमक खेळ सुरूच ठेवला.

पिछाडीवर पडल्यानंतर भारतीय संघाने अधिक जोशाने खेळ करत प्रतिस्पर्ध्यांच्या गोलक्षेत्रात हल्ले चढवले. मात्र अर्जेंटिनाची बचावफळी भेदण्यात त्यांना वारंवार अपयश येत होते. भारताने पहिल्या आणि दुसऱ्या सत्रात गोल करण्याच्या अनेक संधी निर्माण केल्या, पण पाहुण्यांना एकही गोल नोंदवता आला नाही. चौथ्या सत्रात भारताने चांगला खेळ केला, पण मिळालेल्या संधीचे गोलमध्ये रूपांतर करणे त्यांना जमले नाही.

अर्जेंटिनाने भारताच्या चुकीचा फायदा उठवत ५४व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरवर आघाडी २-० अशी वाढवली. या वेळी ऑगस्टिना हिने यजमानांसाठी गोल केला. त्यानंतर अथक प्रयत्नांनंतरही भारताला गोल करता आला नाही. भारताची अर्जेंटिनाविरुद्धची पुढची लढत शनिवारी रंगणार आहे.

# टोक्यो ऑलिम्पिक होणारच -योशिहिडे सुगा

**टोक्यो :** जपानमध्ये करोनाग्रस्तांची संख्या वाढू लागल्याने टोक्यो ऑलिम्पिकच्या आयोजनाबाबत अनिश्चितता वाढू लागली आहे. मात्र कोणत्याही परिस्थितीत टोक्यो ऑलिम्पिक स्पर्धा होणारच, असा दावा जपानचे पंतप्रधान योशिहिडे सुगा यांनी केला आहे.

‘‘भविष्यातील विषाणू संसर्गाची तयारी करण्यासाठी आम्हाला धडा मिळाला आहे. गेल्या वर्षी ऑलिम्पिक स्पर्धा पुढे ढकलण्यात आली तरी यंदा मात्र ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिक स्पर्धेचे आयोजन होणारच. करोना संसर्गावर मानवी विजय संपादन करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. जागतिक एकतेचे प्रतीक तसेच लोकांमध्ये आशा आणि धैर्य निर्माण करण्यासाठी आम्ही ऑलिम्पिक स्पर्धेचे आयोजन करणार आहोत,’’ असे सुगा यांनी सांगितले. जागतिक आर्थिक परिषदेच्या बैठकीत दूरचित्रसंवादाद्वारे ते बोलत होते.

ते म्हणाले की, ‘‘जपानमध्ये लवकरात लवकर करोनाचा कहर आटोक्यात आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असू. त्यामुळे सुरक्षित आणि निर्विघ्नपणे ऑलिम्पिक स्पर्धा घेण्याचे आमचे ध्येय आहे. आम्ही करोनापासून धडा घेतला असून भविष्यातील संकटाचा सामना करण्यासाठी सज्ज झालो आहोत.’’






# फिरकीपटूंच्या बळावर पाकिस्तान विजयी

**कराची :** पदार्पणवीर नौमान अली (५/३५) आणि यासिर शाह (४/७९) या फिरकीपटूंनी दुसऱ्या डावात केलेल्या प्रभावी गोलंदाजीमुळे पाकिस्तानने पहिल्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेला सात गडी राखून धूळ चारली. आफ्रिकेने दिलेले ८८ धावांचे माफक लक्ष्य पाकिस्तानने चौथ्या दिवशीच गाठून दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

३४ वर्षीय डावखुरा फिरकीपटू नौमान आणि यासिर यांच्यापुढे आफ्रिकेचा दुसरा डाव २४५ धावांत आटोपला. सलामीवीर एडीन मार्करम (७४) आणि ऱ्हासी व्हॅन डर दुसेन (६४) यांनी दुसऱ्या गड्यासाठी १२७ धावांची भागीदारी रचूनही आफ्रिकेचा डाव १ बाद १७५ धावांवरून ६ बाद १९२ असा कोसळला.

लक्ष्याचा पाठलाग करताना कर्णधार बाबर आझम (३०) आणि अझर अली (नाबाद ३१) यांनी पाकिस्तानसाठी मोलाचे योगदान दिले. पहिल्या डावात शतक साकारणारा फवाद आलम सामनावीर ठरला. मालिकेतील दुसरी कसोटी ४ फेब्रुवारीपासून खेळली जाणार आहे.












हे पत्र वैदेही ठाकर यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी- ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११४७. लोकसत्ता मुंबई कार्यालय : मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२- २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहमदनगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.
■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठाकर ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92
© द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.